UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये स्वाईन फ्लू संदर्भातील लक्षवेधी सूचना दहाव्या क्रमांकावर आहे. माझी आपणास विनंती आहे की, आपण ती लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेसाठी घ्यावी.

**उप सभापती** : ठीक आहे.

**पृ. शी.** : राज्यात स्वाईन फ्लूच्या साथीने घातलेले थैमान

**मु. शी.** : राज्यात स्वाईन फ्लूच्या साथीने घातलेले थैमान यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, मुझफ्फर हुसेन सय्यद, अशोक ऊर्फ भाई जगताप, शरद रणपिसे, ॲड.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्रीमती हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, जयवंतराव जाधव, दीपकराव साळुंखे, अमरसिंह पंडित, किरण पावसकर, नरेंद्र पाटील, प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले, ॲड. निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री आनंद ठाकूर, सतीश चव्हाण, संदीप बाजोरिया, डॉ.नीलम गोऱ्हे, डॉ.अपूर्व हिरे, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती शोभा फडणवीस, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री ख्वाजा बेग, राजेंद्र मुळक, विक्रम काळे, ॲड. राहूल नार्वेकर, श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

07-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A-2

AJIT/ AKN/ MMP/ 10:30

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त...

"राज्यात स्वाईन फ्लूच्या साथीने थैमान घातले असून आतापर्यंत राज्यात 752 रुग्ण तर मुंबईत 265 रुग्ण आढळले असून अंदाजे 61 पेक्षाजास्त जणांचा या आजाराने बळी घेतल्याचे दिनांक 21 फेब्रुवारी 2015 वा त्यासुमारास उजेडात येणे, राज्यात स्वाईन फ्ल्यूची लागण झपाट्याने होत असून पुणे शहर-3, पिंपरी-चिंचवड-3, पुणे ग्रामीण-3, सातारा-1, औरंगाबाद शहर-2, जळगाव-1, अहमदनगर-2, लातूर-3, जालना-1, नागपूर शहर-11, नागपूर ग्रामीण-3, गोंदिया-1, ठाणे-3, नवी मुंबई-5, पालघर-1 व राज्यात इतर-6, अशी स्वाईन फ्ल्यूने मृत्यु झाल्याचे सरकारी आकडेवारीवरुन स्पष्ट होणे, स्वाईन फ्लूच्या नियंत्रणासाठी टॅमी फ्लू या औषधांची मोठ्या प्रमाणात आवश्यकता असताना त्याचा राज्यभर तुटवडा जाणवत असणे, स्वाईन फ्लूच्या संदर्भात जनजागृती मोहीम हाती न घेणे, स्वाईन फ्लूमुळे झालेल्या मृत्युनंतर उपचार करण्यासाठी ऑस्ट्रेलियाहून स्वाईन फ्लू व डेंग्युविरोधी औषध मागवण्याचे आरोग्य विभागाने निश्चित केल्याचे स्पष्ट होणे, स्वाईन फ्लूचा प्रभावी मुकाबला करण्यासाठी ठाणे जिल्ह्यात स्वाईन फ्लूच्या तपासणीसाठी लागणाऱ्या प्रयोगशाळेबरोबर संसर्गजन्य आजारांवरील उपचारासाठी 100 खाटांचे रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव राज्य शासनाच्या विचाराधीन असणे, राज्यात झपाट्याने पसरत असलेल्या स्वाईन फ्लूमुळे राज्यात येणारे पर्यटक कमी झाल्याचे निदर्शनास येणे, राज्यात वाढत असलेल्या स्वाईन फ्लू साथीच्या रोगाला कायमस्वरुपी आळा घालण्याच्या दृष्टीने सर्व शासकीय यंत्रणांकडून करावयाची उपाययोजना व कार्यवाही तसेच याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आज जागतिक आराग्य दिवस आहे. आजच्या आरोग्य दिवशी स्वाईन फ्लू आजारावर चर्चा होत आहे. राज्यात स्वाईन फ्लू आजाराने थैमान घातलेले आहे. हा आजार हाताबाहेर गेलेला आहे आणि त्यासंबंधी येथे चर्चा उपस्थित करावी लागते ही खरोखर दुर्दैवी बाब आहे. आमचे मित्र आणि आरोग्य विभागाचे मंत्री डॉ.दीपक सावंत हे स्वत: डॉक्टर आहेत आणि अभ्यासू देखील आहेत. आरोग्य विभागाचे मंत्री डॉक्टर असताना आणि त्यांना या आजाराची पूर्ण कल्पना असताना स्वाईन फ्लू आजार का फैलावत आहे ? स्वाईन फ्लू आजाराने आतापर्यंत 425 जणांचा मृत्यू झालेला आहे तर कितीतरी जणांना त्याची लागण झालेली आहे. या आजाराला आळा घालण्यास सरकार कमी पडलेले आहे असे चित्र राज्यामध्ये निर्माण झालेले आहे. या आजाराची जनजागृती करण्यामध्ये सरकार कमी पडलेले आहे. अनेक रुग्णालयांमध्ये व्हेंटीलेटर्स नसल्याच्या तक्रारी आलेल्या आहेत. लसींचा तुटवटा होता. टॅमी फ्लू गोळ्यांचा तुटवडा होता. रुग्णालयांमध्ये आयसोलेटेड वॉर्डस नव्हते. स्वाईन फ्लू रुग्णांना ॲडमीट करुन घेण्यास रुग्णालयांनी नकार दिलेला आहे अशा देखील तक्रारी आलेल्या आहेत. स्वाईन फ्लू झालेल्या 50 टक्के रुग्णांचा मृत्यू हा योग्यवेळी उपचार न मिळाल्यामुळे झाला असल्याचे अभ्यासाअंती लक्षात आले आहे. माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, सरकार कुठे कमी पडले आहे ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्य माझा "स्पेसिफीक प्रश्न आहे" असा उच्चार करतात, त्याऐवजी मी "मूळ मुद्याला हात घालून प्रश्न विचारतो," किंवा "मी ठोस प्रश्न विचारतो" असे मराठीत का बोलत नाहीत ?

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, आपण मराठीत बोलले पाहिजे. मी आमदार झाल्यापासून मराठीतच बोलत आहे हे मंत्री महोदयांनी ॲप्रिशिएट केले पाहिजे. आपण टीकाटीप्पणी नेहमी करता. आपण कधीतरी कौतुक देखील करावे. आपण ज्येष्ठ मंत्री आहात. आपल्याकडून वेगळी अपेक्षा आहे. माननीय मंत्री हे सदस्य असताना त्यांनी त्यांच्या भाषणात अनेकदा इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. मूळ विषयाला बगल देण्यासाठी आरोग्य मंत्र्यांच्या मदतीला श्री.दिवाकर रावते साहेब आलेले आहेत...



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी मराठी भाषेवर मेहरबानी करु नये.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, येथे मेहरबानीचा प्रश्न कुठे आला ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त म्हणाले की, मी मराठीत बोलतो. मराठीत बोलतो म्हणजे आमच्यावर मेहरबानी करता काय ?

**उप सभापती** : आपण दोघांनीही कृपया खाली बसावे. स्वाईन फ्लूला मराठीत "डुकऱ्या रोग" म्हणतात.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी भाषण करताना इंग्रजी शब्दांचा वापर केलेला आहे. मी आपणास रेकॉर्ड देतो. सभागृहात कोणत्याही भाषेत भाषण करता येते. (अडथळा)...

**उप सभापती** : आपण लक्षवेधी सूचनेवर चर्चा करण्याऐवजी दुसऱ्याच विषयावर चर्चा करीत आहात. तेव्हा मी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलू का ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना संरक्षण दिले पाहिजे. सन्माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांचे मराठी प्रेम हे प्रत्येकाच्या मनातील मराठी प्रेम आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या सभागृहात माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्प मांडताना अनेक इंग्रजी शब्दांचा वापर केला होता. त्यावेळी आम्ही माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांच्या निदर्शनास ही बाब आणून दिली होती.

**उप सभापती** : हा वाद फार वाढत आहे. मूळ विषय बाजूला राहत आहे. मी ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलू का ?

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक प्रश्न आहे की, स्वाईन फ्लू आजाराला आळा घालण्यास हे सरकार कमी पडले आहे हे सरकारने मान्य करावे. या आजारासंबधी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या त्याची माहिती निवेदनात दिलेली आहे. सरकारने उपाययोजना करुन देखील या आजारामुळे अनेक जणांचा मृत्यू का झाला, मागील महिन्यांचा अनुभव लक्षात घेऊन जून ते ऑगस्ट हे महिने प्रिव्हेन्टीव्ह केअरसाठी खूप महत्वाचे आहेत. त्याबाबत शासनाने कोणती

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त....

पावले उचलली आहेत, अशाप्रकारच्या पॅन्डेमीक किंवा एपिडॅमिक असतात त्याला कंट्रोल करण्यासाठी महाराष्ट्र इमर्जन्सी सर्व्हीसेस ॲक्ट आणण्याचा सरकारचा प्रस्ताव आहे असे समजते. या इमर्जन्सी ॲक्टचा मसुदा कसा आहे आणि तो या अधिवेशनात आणणार आहात काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, स्वाईन फ्लू आजाराचा प्रादूर्भाव आपल्या राज्यासह इतर आठ राज्यात झालेला आहे. या आजारामुळे आपल्या राज्यासह इतर राज्यांत देखील अनेकांचे मृत्यू झालेले आहेत हे मी मान्य करतो. मृत्यू हा मृत्यू असतो त्यामध्ये राजकारण करायचे नसते. हा आजार ड्रॉपलेट इन्फेक्शनमुळे होत असल्यामुळे हा आजार ज्या व्यक्तीला झालेला आहे ती व्यक्ती कुठे शिंकली किंवा खोकली तर त्यातून दुसऱ्या व्यक्तीला हा आजार होऊ शकतो. आपण हवेला प्रतिबंध करु शकत नाही. मला स्वाईन फ्लू झाला असेल आणि मी लोकल ट्रेनने प्रवास करीत असेन आणि मला शिंक आली किंवा मी खोकलो तर त्याचा प्रादूर्भाव ट्रेनमधील 15-20 व्यक्तींना होऊ शकतो. कोणी कुठे जावे असे आपण कोणावर बंधन घालू शकत नाही, हे देखील तितकेच खरे आहे. या आजाराला आळा घालण्यासाठी राज्य सरकार कमी पडले आहे असे मुळीच म्हणता येणार नाही. राज्यात साधारणत: जून ते ऑगस्ट या कालावधीत स्वाईन फ्लू होतो. परंतु या वेळी वाढलेली थंडी, पडलेल्या गारा आणि तापमानात झालेला प्रचंड बदल यामुळे स्वाईन फ्लूचा व्हायरस जास्त ॲक्टीव्ह झाला आणि स्वाईल फ्लूचा प्रसार वेळेआधी झाला.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत....

जानेवारी महिन्यात साधारणपणे स्वाइन फ्लूचे रुग्ण सापडले. वास्तविक पाहता पुणे शहरात स्वाइन फ्लू हा आजार 2009 पासून आजपर्यंत सातत्याने येत आहे. मधली दोन वर्षे स्वाइन फ्लू या आजाराने दडी मारली होती. 2012-13 या काळात स्वाइन फ्लूचे रुग्ण हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते. पण 2009 मध्ये पुणे शहर आणि इतर शहरात स्वाईन फ्लू आजाराने एका महिन्यात 220 बळी घेतले. स्वाइन फ्लू आजार घातक आहे. स्वाइन फ्लूचा प्रसार हवेच्या माध्यमातून होतो.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी टॅमीफ्ल्यूचा साठा उपलब्ध नसल्याचे सांगितले. मी सांगू इच्छितो की, जानेवारी महिन्यात सातत्याने 12 लाख गोळ्या स्टॉक म्हणून ठेवल्या आहेत. तो स्टॉक कमी होऊ दिला नाही. इतकेच नव्हे तर बाकीच्या राज्यांनी मागितल्यानंतर त्यांना सुध्दा तात्पुरत्या स्वरुपात त्या गोळ्यांची मदत केली. शिवाय मास्क सुध्दा कमी पडू दिले नाही. या सर्व उपाययोजना करीत असतानाच 250 व्हेंटीलेटर सुध्दा उपलब्ध आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या जिल्हा रुग्णालयात जवळजवळ दोन व्हेंटीलेटर हे केवळ स्वाइन फ्लूच्या रुग्णांसाठी राखीव ठेवलेले आहेत.

सभापती महोदय, नागरी भागात स्वाइन फ्लू आजाराचे प्रमाण जास्त होते. ग्रामीण भागात सर्वसाधारणपणे 35 टक्के आणि शहरी भागात सर्वसाधारणपणे 65 टक्के स्वाइन फ्लू आजाराचे प्रमाण होते. कारण शहरातील लोकसंख्या दाटीवाटीची असते. 20 वर्षांखालील 6 टक्के मुलांचा, 21 ते 60 वर्षांतील 82 टक्के लोकांचा आणि 61 वर्षांवरील 12 टक्के लोकांचा मृत्यू स्वाइन फ्लू आजारामुळे झाला आहे. स्वाइन फ्लू आजारामुळे जास्तीत जास्त रुग्ण जे मृत्युमुखी पडले आहेत ते हायपरटेन्शन, गरोदर माता, डायबिटीसचा आजार असलेले आहेत. याचा अर्थ असोसिएटेड सिम्टम्स् असलेल्या जास्तीत जास्त रुग्णांचा आजारी पडून मृत्यू झाला आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, गेल्या दोन दिवसात स्वाइन फ्लू आजारामुळे एकही मृत्यू झालेला नाही. जसजसे तापमान वाढत गेले आहे तसतसे स्वाइन फ्लू आजाराचे प्रमाण कमी होताना दिसून येते.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत....

सभापती महोदय, स्वाइन फ्लू आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी येणाऱ्या काळात कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत, असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहे. मी त्यांना सांगू इच्छितो की, राज्य सरकार या संदर्भात ॲक्ट काढण्याच्या मन:स्थितीत आहे. राज्यामध्ये केवळ सार्वजनिक आरोग्य विभागाची रुग्णालये आहेत असे नाही तर खाजगी, महापालिकेंची आणि छोटीमोठी नर्सिंग होम सुध्दा आहेत. स्वाइन फ्लूच्या आजाराचे गांभीर्य लक्षात घेता या सर्व रुग्णालयांना एकाच छत्राखाली आणणे आवश्यक आहे. प्रत्येकाचा सल्ला वेगवेगळा असू शकतो. तज्ज्ञ डॉक्टरांची मते वेगवेगळी असू शकतात. सन्माननीय सदस्य ॲड.राहुल नार्वेकर, दोन वकिलांमध्ये जसे एकमत नसते, तसेच दोन डॉक्टरांमध्ये सुध्दा कधीच एकमत होत नाही, ही गोष्ट लक्षात घेतला पहिजे. त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करता एक ॲक्ट असा हवा की, अशा साथीच्या रोगांसाठी सर्व रुग्णालयांना एकाच अंब्रेलाखाली म्हणजेच छत्राखाली आणून या बाबतीत आवश्यक त्या उपाययोजना करता येतील. महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी प्रत्येक इंग्रजी शब्दानंतर मराठी शब्द सुध्दा उच्चारत आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेत. इतर सन्माननीय सदस्यांना आणखी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर माझी उत्तर देण्याची तयारी आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, स्वाइन फ्लू आजारामुळे मृत्युमुखी पडल्याची जी आकडेवारी दिलेली आहे त्यावरुन स्वाइन फ्लू आजाराचा सर्वात जास्त परिणाम आणि मृत्यू महाराष्ट्र राज्यात झाल्याचे दिसून येते. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, या आजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी औषधांचा साठा भरपूर प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यांनी असेही सांगितले की, ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागामध्ये स्वाइन फ्लू या रोगाची लागण अधिक प्रमाणावर होते. शहरी भागात उदाहरणार्थ पुणे, नाशिक, नागपूर किंवा मुंबई यासारख्या मोठ्या शहरांमध्ये स्वाइन फ्लू आजाराचे प्रमाण जास्त आहे. सर्व ठिकाणी औषधे पुरविली असतील किंवा प्रयोगशाळांची व्यवस्था केली असली तरी आतापर्यंत आलेला अनुभव बघता येत्या चार-सहा महिन्यानंतर म्हणजेच पावसाळ्यामध्ये या आजारामध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. त्यातल्या त्यात पावसाळ्यात नाशिकला कुंभमेळा होणार आहे. कुंभमेळ्याला मोठ्या प्रमाणावर भाविक येणार

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

आहेत. त्यामुळे स्वाइन फ्लूचा प्रादुर्भाव आणि प्रसार वेगाने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, कुंभमेळ्याला होणारी गर्दी लक्षात घेता नाशिकसारख्या ठिकाणी प्रयोगशाळा उघडण्यात येईल काय, या आजारावर नियंत्रण आणण्यासाठी आतापासूनच जनजागरण मोहीम होती घेण्यात येईल काय आणि स्वाइन फ्लू या आजारावरील उपचाराचा औषध साठा नेमका कोठे ठेवण्यात आलेला आहे याची माहिती होण्यासाठी जिल्ह्याच्या मुख्य रुग्णालयात त्या संदर्भातील माहितीचा फलक लावून आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा प्रश्न रास्त आहे. मी आपल्यासमोर या संदर्भातील आकडेवारी ठेवतो. माझ्याकडे दिनांक 6 एप्रिल, 2015 रोजीची आकडेवारी आहे. त्यानुसार स्वाइन फ्लू आजारामुळे गुजरात राज्यात आतापर्यंत 437, राजस्थानमध्ये 430 च्या आसपास आणि मध्य प्रदेशमध्ये 400 च्या आसपास मृत्यू झालेले आहेत. हे खरे आहे की, नाशिकच्या कुंभमेळ्यामध्ये लाखो भाविक येणार आहेत. त्यामुळे जेवढे सामान्य रुग्णालय, खाजगी रुग्णालय, सार्वजनिक आरोग्य विभागाचे रुग्णालये, महापालिकांची रुग्णालये आहेत, त्या ठिकाणी पुढील डिसेंबर महिन्यापर्यंत आयसोलेशन वॉर्ड तयार करण्याचे सांगितले आहे. शिवाय 50 बेडवरील रुग्णालयात किंवा नवीन रुग्णालयात त्यांनी आपल्या बेडच्या संख्येच्या कमीत कमी 2 ते 5 टक्के बेड हे आयसोलेशन वॉर्ड म्हणून तयार करण्याचे सांगितले आहे. मात्र कुंभमेळ्याच्या ठिकाणी सर्व रुग्णालयांमध्ये 2 ते 5 टक्के बेड राखीव ठेवण्यास सांगितले आहे. शिवाय त्या ठिकाणी व्हेंटीलेटर मोठ्या प्रमाणावर उपलब्ध करुन देत आहोत. शिवाय तपासणीसाठी एनआयव्ही, हाफकीन, एसआरएल लेबॉरेटरी आहे. तसेच नव्याने इन्स्पेक्शन करुन मेट्रो पोलीस लेबॉरेटरीला परवानगी दिली आहे. मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, स्वाइन फ्लू आजार झालेल्या गरीब किंवा दारिद्र्यरेषेखालील रुग्णांना खाजगी रुग्णालयात दाखल केले असेल आणि ते व्हेंटीलेटरवर असतील तर दिनांक 2 मार्च, 2015 पासून व्हेंटीलेटरील रुग्णांचा सर्व खर्च राज्य शासन उचलणार आहे. ही बाब केवळ गरीब आणि दारिद्र्यरेषेखालील रुग्णांनाच लागू आहे. त्याचा परतावा देण्यासाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा शल्य चिकित्सक यांच्या अंतर्गत समिति नेमली आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, स्वाइन फ्लू आजारावर गेली दोन-तीन वर्षे चर्चा सुरु आहे. मध्यंतरी केंद्र सरकारने जाहीर केले होते की, या आजारावर प्रतिबंधात्मक लस काढलेली आहे. माननीय श्री.हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले की, मी स्वतःही ती लस घेतली आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, त्या लसीची पुढे काय प्रगती झाली आहे, तसेच टी ट्री ऑईलमधून कोणते प्रतिबंधात्मक औषध तयार केले आहे आणि त्याचा वापर कसा करावयाचा आहे ?

डॉ.दीपक सावंत : महोदय, लसीकरणाच्या बाबतीत सांगू इच्छितो की, राज्यामध्ये, देशामध्ये आणि जगामध्ये दोन मतप्रवाह आहेत. ज्यावेळी एखाद्या साथीचा प्रादुर्भाव होतो त्यावेळी लस दिली जात नाही. कारण लसीच्या द्वारे त्याचे कील्ड व्हायरस शरीरात टोचत असतो. त्यामुळे कदाचित त्याची लागण मोठ्या प्रमाणात होण्याची जास्त शक्यता असते.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. दीपक सावंत ....

त्यामुळे आपण ते रेकमेंड करीत नाही. आपण आजपर्यंत लोकांसाठी आवश्यक असलेल्या 3 हजार लसी तयार केल्या आहेत. मी आपणाला या संदर्भात सत्यच सांगतो की, दुर्दैवाने राज्यातील डॉक्टर्स व हेल्थ वर्कर्स ही लस टोचून घेण्यास तयार नाहीत. आज केवळ 1700 लोकांनी लस टोचून घेतली आहे. साथीमध्ये जे लोक सतत संपर्कात येत असतात त्यांच्यासाठी पहिल्यांदा लसीची गरज आहे. परंतु ते लोक ही लस टोचून घेण्यास तयार नाहीत. मुंबईमध्ये फक्त एका डॉक्टरने ही लस टोचून घेतली आहे. कस्तुरबा रूग्णालयाच्या बाकी सर्व डॉक्टर्सने आणि हेल्थ वर्कर्सनी ही लस टोचून घेण्यास नकार दिला आहे. आपण ती लस उपलब्ध करून देऊ. लोकांचा या संदर्भात गैरसमज आहे तो दूर करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. जे जोखमीचे गट आहेत म्हणजे हायपर टेंशनचे रूग्ण, गरोदर स्त्रिया, मधुमेही रूग्ण यांनी लस घ्यावी आणि ज्यांना शक्य नसेल त्यांना शासन लस उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करेल असे आवाहन शासन करणार आहे. मी जबाबदारीने सांगतो की, फार्मास्युटिकल कंपनी यांची देखील यामध्ये थोडी मार्केटिंग स्ट्रॅटेजी आहे हे देखील सर्वांनी लक्षात ठेवावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी संगितले आहे की, मागच्या 2 दिवसांत स्वाईन फ्लू मुळे एकही रूग्ण दगावलेला नाही. परंतु संचालक, आरोग्य यांच्या अहवालानुसार गेल्या 3 दिवसांत 10 रूग्ण दगावलेले आहेत. माननीय मंत्र्यांनी खाजगी रूग्णालयाच्या संदर्भात सांगितले आहे. मी कालचेच उदाहरण देतो. काल सौ. पार्वती शहाजी ठोंबरे, वय वर्षे 45 या महिला लातूरहुन स्वाईन फ्लू च्या उपचारासाठी पुणे येथे आल्या. पुणे येथील रूबी रूग्णालय येथे त्यांना ॲडमिट करण्याचा प्रयत्न केला. परंतु तेथे बेड शिल्लक नाही म्हणून त्यांना ॲडमिट करून घेण्यात आले नाही. ससून रूग्णालयात तेवढ्या काळापुरते त्यांना ॲडमिट करावे लागले. रूबी रूग्णालयाने ॲडमिट करून घेतले नाही त्यामुळे काल त्यांचा स्वाईन फ्लू मुळे मृत्यू झाला. आपण याची चौकशी करणार आहात का ? माननीय मंत्र्यांनी उत्तरात सांगितले आहे की, ग्रामीण भागात टॅमिफ्लू गोळ्यांचा पुरवठा केला आहे. मी जबाबदारीने सांगत



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

आहे की, ग्रामीण भागातील आरोग्य केंद्रांमध्ये टॅमिफ्लू गोळ्या मिळत नाहीत आणि त्यामुळे लातूरसारख्या ठिकाणाहून रुग्णाला पुण्याला आणावे लागते. पुण्यातील मोठ्या रुग्णालयांमध्ये देखील रुग्णांना बेड मिळत नाही. आरोय खाते या संदर्भात काय करणार आहे ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगत आहे की, दिनांक 3 व 4 या 2 दिवसांमध्ये एकाही रुग्णाचा मृत्यू झालेला नाही. माझ्याकडे या संदर्भातील आकडेवारी उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, सौ. पार्वती शहाजी ठोंबरे यांना स्त्री रूग्णालयामध्ये ॲडमिट करुन घेतले नाही. आयसोलेशनसाठी जे बेड असतात ते कदाचित उपलब्ध नसतील. परंतु तरी देखील सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी मानून या संदर्भात चौकशी करण्यात येईल. स्त्री रुग्णालयाने आयसोलेशनसाठी बेड उपलब्ध असताना, व्हेंटिलेशन उपलब्ध असताना रुग्णाला नाकारले असेल तर रुग्णालयावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की, स्वाईन फ्लू झालेल्या रुग्णांना जनरल वॉर्डमध्ये ॲडमिट करता येत नाही. एक्स शेड्यूल ड्रग्जचे लायसन्स असलेल्या केमिस्टकडेच टॅमिफ्लू गोळ्यांचा साठा उपलब्ध होतो. आपण औषधाचा वापर फार कसोशीने करीत आहोत. कारण औषध नुसतेच घेऊन रुग्णांना जर याचा रेजिस्टन्स तयार झाला कदाचित भविष्य काळात हे औषध आपल्याला उपयोगी पडणार नाही आणि मग फार मोठी अडचण निर्माण होईल. आपण यासाठी औषध कसोशीने वापरत आहोत.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लक्षवेधी सूचनांसाठी देण्यात आलेल्या वेळेबाबत**

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज कामकाजपत्रिकवर 10 लक्षवेध्‌ी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत. आज लक्षवेधी सूचनांसाठी देण्यात आलेल्या वेळेत त्यांना न्याय मिळेल असे वाटत नाही. आपण यासाठी वेळ वाढवून द्यावा. सर्व लक्षवेध्‌ी सूचना आज घेण्यात याव्यात किंवा उद्या घेण्यात याव्यात.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : ठाणे शहरातील आराधना सिनेमाजवळील बस आगारासाठी असलेला आरक्षित भूखंड

**मु.शी.** : ठाणे शहरातील आराधना सिनेमाजवळील बस आगारासाठी असलेला आरक्षित भूखंड या संबंधी ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"ठाणे शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आराधना सिनेमाजवळ सुमारे पाच हजार चौरस मीटर क्षेत्रफळाचा मोकाळा भूखंड ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमध्ये राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस आगारासाठी जमीन आरक्षित करण्यात येणे, राज्य मार्ग परिवहन महामंडळ व ठाणे महानगरपालिका यांनी ही जमीन खरेदी करावी यासाठी मूळ जमीनमालकाने ठाणे महानगरपालिका व संबंधितांना नोटीस पाठवून देखील सदरहू भूखंड खरेदी करण्यास ठाणे महानगरपालिकेकडून टाळाटाळ करण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2015 च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, इतकेच नव्हेतर सदर जमीन तातडीने खरेदी करण्यात यावी अशा आशयाचे पत्र / निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक 1 एप्रिल, 2015 रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.आयुक्त, ठाणे, महानगरपालिका व राज्य मार्ग परिवहन महामंडळास देण्यात येणे, तथापि सदर भूखंडाचे आरक्षण संपादीत करण्याची जबाबदारी राज्य शासनाची असल्याने महापालिका त्यासाठी कोटयावधीची गुंतवणूक करणार नसल्याची आडमुठी भुमिका ठाणे महानगरपालिकेने घेण्यात आल्याचेही त्याच सुमारास निदर्शनास येणे, परिणामी सदर भूखंड वेळीच संपादीत न केल्यास हा भूखंड आपोआप आरक्षण मुक्त होण्याचा धोका असणे, त्यामुळे आरक्षित असलेला भूखंड संपादित करण्यास ठाणे महानगरपालिकेकडून होत असलेली जाणिवपूर्वक टाळाटाळ तसेच सदर भूखंड संपादित न करण्यामागे ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी व



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अॅड. निरंजन डावखरे ....

विकासक यांच्यामध्ये संगनमत होऊन त्यामध्ये मोठया प्रमाणात गैरव्यवहार होण्याचा संशय व्यक्त होणे, परिणामी त्याप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंध खात्याकडून चौकशी करण्याची आग्रही मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून शासनास करण्यात येणे, तथापि त्याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे ठाणे शहरातील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, त्याप्रकरणी शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची भूमिका."

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी लक्षवेधी सूचनेला सविस्तर उत्तर दिले आहे त्यासाठी मी त्यांचा आभारी आहे. उत्तर जेवढे सहज दिले आहे तेवढा सहज, सोपा विषय नाही. जमिनीच्या बाबतीत पार्श्वभूमी सांगितली पाहिजे. सदर जमिनीचे मूळ मालक मडवी यांचा सदर जमिनीसाठी दिनांक 09 एप्रिल, 2011 मध्ये खून झाला. संबंधित आरोपी रवी परब यास अटक केली आहे. परंतु तरी सुध्दा या मागे कोण बिल्डर आहे, हा जो प्रकार घडविण्यात आला त्याच्या मागे कोण आहे हे शोधणे फार गरजेचे आहे. दिनांक 11.08.2014 ला जमिनी मालकाने त्याच्या ॲडव्होकेटच्या माध्यमातून पर्चेस नोटीस दिली, ती सकृतदर्शनी खरी आहे का, त्याची सत्यता तपासली का ?

सभापती महोदय, ठाणे मनपाचा विकास आराखडा सन 2002 मध्ये मंजूर झाल्यानंतही यातील आरक्षित जमीन अजूनही पुरेशा प्रमाणात संपादित करण्यात आली नाही हे खरे आहे का, असल्यास, जमीन संपादित न करण्याची कारणे काय आहेत, एसटी महामंडळ प्रशासन व बिल्डर यांच्यामध्ये काही संगनमत झाले का, हा विकासक कोण आहे, कोणाच्या माध्यमातून हे सर्व सुरू आहे याबाबतीत शासन तपास करणार का ?

सभापती महोदय, 1 वर्षात आरक्षणाचा काळ संपुष्टात येत आहे. त्यामुळे शासन या प्रकरणी तातडीने हालचाल करून हा भूखंड आरक्षणमुक्त होऊ नये यासाठी काय उपाययोजना करणार आहे ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, ही बाब खरी आहे की, सदर आरक्षण ठाणे मनपाने एसटी महामंडळासाठी ठेवले होते. परंतु 10 वर्षे उलटले. आरक्षण मनपाला करायचे नव्हते तर एसटी महामंडळाला करायचे होते. सदर 2 कि.मी.च्या परिसरात अनेक एसटी स्टॅण्ड असल्यामुळे तेथे मनपाला त्याची गरज नाही असे त्यांनी लेखी कळविले आहे. उपासणी समिती होती. शासनाने 10 वर्षांचे धोरण ठरविले होते की, पैसे खर्च करून असे कोणतेही भूखंड संपादित करायचे नाहीत. परंतु ही गोष्ट तितकीच सत्य आहे. दिनांक 11.08.2014 ला ॲडव्होकेटने दिलेली पर्चेस नोटीस मी स्वतः पाहिली आहे. संबंधित 4-5 लोकांना, खात्यांना ती सर्व्ह झाली आहे. परंतु अजून 1 वर्ष उलटून जायचे आहे. त्यामुळे तत्संदर्भात जी काही कारवाई करायची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ. रणजित पाटील ....

आहे ती शासन स्तरावर निश्चितपणे होईल. आमच्याकडे तो प्रश्न जेव्हा एसटी महामंडळाकडून त्याचे आरक्षण 6 प्रमाणे सुरू होईल तेव्हा येईल. ही लक्षवेधी सूचना पूर्णतः नगरविकास खात्याकडे येत नाही. कारण आरक्षण एसटी महामंडळाचे आहे, संपादित करणे ही जबाबदारी एसटी महामंडळाची आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ठाणे मनपाची अशा प्रकारच्या आरक्षणाच्या संदर्भातील सद्य:स्थिती काय आहे असे विचारले आहे. मी सांगू इच्छितो की, सदर बाबतीतील सर्व माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, एसटी महामंडळाने आता आम्हाला याची गरज नाही असे पूर्वी सांगितले असले तरी सुध्दा मधल्या काळात एसटी महामंडळाने धोरण आखले होते की, काही आगारे अद्ययावत करायची किंवा काही आगारे बीओटी तत्वावर करायची. ठाण्यातील एसटी महामंडळाचा हा अतिशय महत्त्वाचा आरक्षित भूखंड आहे. योगायोगाने माननीय नगरविकास राज्यमंत्री व माननीय परिवहन मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. एक वर्षात याचे आरक्षण संपुष्टात येत असले तरी एसटी महामंडळाच्या भल्यासाठी पाहिले पाहिजे. उद्या या जागेतून एसटी महामंडळाला बीओटी तत्वावर अद्ययावत आगार केल्यावर काही प्रमाणात नफा होऊ शकतो. एसटी महामंडळ बीओटी तत्वावर या आरक्षित जागेवर आगार उभे करू शकते का ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना परिवहन विभागाकडे आली पाहिजे होती. परंतु ती नगरविकास विभागाकडे गेल्यामुळे या संदर्भातील कोणतेही मार्गदर्शन मला झालेले नाही. राज्यात बीओटीला स्थगिती देण्यात आली आहे. एसटी महामंडळ सर्व आगारांचे काम समर्थपणे, योग्य पध्दतीने आणि एसटी महामंडळाच्या फायद्याचे असेल तर करणार आहे. सदर भूखंडाच्या बाबतीत गेल्या 10 वर्षात घेतलेला हा निर्णय आहे. एसटी महामंडळाचे संचालक मंडळ आज अस्तित्वात नसल्यामुळे सदर निर्णय बदलण्याच्या संदर्भात काहीही तातडीने करता येऊ शकत नाही.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.......

आरक्षित जागा ताब्यात घेण्यासाठी 1 वर्षाची मुदत आहे. हे प्रकरण अतिशय महत्त्वाचे असल्याची बाब सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिल्यामुळे या संदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयाचा फेरविचार करता येईल का, कसा करता येईल, याबाबत निश्चितपणे विचार करण्यात येईल. एक गोष्ट नक्की आहे की, हा भूखंड एस.टी.महामंडळाने ताब्यात घ्यायचा असेल तर तो महानगरपालिकेने अतिक्रमणविरहित करुन देणे गरजेचे आहे, हे देखील मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, परिवहन मंत्री महोदयांनी उत्तर देत असताना सांगितले की, महामंडळाचे संचालक मंडळ अस्तित्त्वात नाही व त्यामुळे निर्णय घेण्यास थोडासा विलंब लागण्याची शक्यता आहे. संचालक मंडळ जरी अस्तित्त्वात नसले तरी त्या ठिकाणी भारतीय प्रशासन सेवेतील प्रशासकीय अधिकारी आहेत, परिवहन मंत्री म्हणून आपण स्वतः आहात. अन्य विभागाशी संबंधित महामंडळात संचालक मंडळ अस्तित्त्वात नसताना त्या विभागाच्या प्रधान सचिवांकडे त्या महामंडळाचा कार्यभार सोपविलेला असतो. त्यामुळे एस.टी.महामंडळाने घ्यावयाच्या निर्णयाबाबत काही अडचण येण्याचे कारण नाही, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून ठाणे शहराच्या मध्यवर्ती असलेल्या भूखंडाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यात आले आहे. या लक्षवेधी सूचनेमधून असे ध्वनीत होते की, काहीही करुन आरक्षित असलेला हा भूखंड आरक्षणामधून मोकळा व्हावा, खाजगी लोकांच्या हातात जावा, यासाठी प्रशासकीय पातळीवरुन चालढकल करण्यात येत आहे आणि हे थांबविणे सर्वस्वी आपल्या हातात आहे. त्याप्रमाणे परिवहन मंत्री म्हणून आपण कार्यवाही कराल का ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले आहे की, ही लक्षवेधी सूचना अन्य विभागाकडे गेल्यामुळे मला या संदर्भातील काहीही माहिती घेता आलेली नाही. तथापि, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा ठाणे शहरातील अतिशय मोक्याचा भूखंड आहे. परंतु, तो त्यावेळी एस.टी.महामंडळाला आवश्यक का वाटला नाही**,** हा एक महत्त्वावचा भाग आहे. या भूखंडाची एस.टी.महामंडळाला आवश्यकता आहे, याची मला खात्री आहे. यामधील पुढील

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते........

कार्यवाही जरूर करु. तथापि, मी अगोदर सांगितल्याप्रमाणे ही लक्षवेधी सूचना आमच्या विभागाकडे न आल्यामुळे मला कोणतीही माहिती घेता आली नाही किंवा चर्चा करता आली नाही. तथापि, सदनामध्ये ही बाब उपस्थित झाली असल्यामुळे या संदर्भातील धोरणात्मक भूमिका घेण्याबाबत शासन नक्की पुढील पावले टाकील.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, एस.टी.महामंडळाचे संचालक मंडळ अस्तित्त्वात नसल्याची बाब मंत्री महोदयांनी सांगितली आहे. तथापि, ठाणे शहराची वाढती लोकसंख्या, वाढते दळणवळण, या गोष्टी लक्षात घेऊन भविष्यातील नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ भूसंपादनाचा खर्च टाळण्यासाठी उपलब्ध आरक्षित भूखंड सोडून दिला तर भविष्यात वाढत्या लोकसंख्येची व्यवस्था करण्यात फार मोठी अडचण निर्माण होणार आहे. म्हणून माझी विनंती आहे की, उपलब्ध आरक्षित भूखंड परिवहन विभागाने स्वत:कडे घ्यावा आणि बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा, या माध्यमातून नव्हे तर परिवहन विभागाने स्वत: त्या जागेवर आगार बांधावे. ही विनंती मंत्री महोदय मान्य करणार आहेत का ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. परंतु, या संदर्भातील निर्णय हा आता घेतलेला नाही. भूखंड ताब्यात घेऊ नये, असा निर्णय पूर्वीच झाला आहे. योगायोगाने ज्या पक्षाच्या वतीने हा प्रश्न विचारण्यात आला आहे त्याच पक्षाचे सदस्य या महामंडळाचे अध्यक्ष होते. त्या नियुक्त अध्यक्षांनी हा निर्णय का घेतला, हे मी आज सांगू शकणार नाही. परंतु, मी त्याचाही अभ्यास करीन आणि संबंधितांनी बिल्डरधार्जिणा निर्णय घेतला असेल तर योग्य ती कारवाई करण्याबाबत मी योग्य ती पावले उचलीन.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेमध्ये वेगवेगळे पक्ष असले तरी तेथे एक वेगळा विशिष्ट बिल्डरधार्जिणा पक्ष आहे आणि त्या माध्यमातून सर्वपक्षीय नगरसेवक एकत्र येऊन महानगरपालिकेचा कारभार करीत आहेत. मी निश्चितपणे सांगतो की, महामंडळाचे संचालक मंडळ अस्तित्त्वात नसले तरी परिवहन मंत्री त्यापेक्षाही मोठे आहेत. हा सभागृहाचा निर्णय आहे. सभागृह तुम्हाला सांगते आहे. परिवहन विभागाला 150 ते 200 कोटी रूपयांची

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील.......

तरतूद या अर्थसंकल्पात झालेली आहे व ती कमी आहे. परंतु, त्यामधील निधी वापरुन हा भूखंड ताबडतोब विकत घ्यावा. सभागृहाने हा निर्णय घेतला असल्यामुळे मंत्री महोदयांकडून आमच्या अपेक्षा आहेत. करोडो रुपयांचा भूखंड बिल्डरच्या घशात घालण्याचे काम थांबविणे त्यांच्या हातात आहे. अन्यथा, त्यामधून वेगळा अर्थ काढला जाईल. हे सभागृह आणि शासन बिल्डरधार्जिणा निर्णय घेत आहे, असा मेसेज राज्यामध्ये जाईल. त्यामुळे तो थांबविण्याचे काम राज्य शासन करील का ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आरक्षित भूखंड खरेदी करण्याबाबत नोटीस दिल्यानंतर एक वर्षाचा कालावधी असतो. दिनांक 11/11/2014 रोजी नोटीस दिली असल्यामुळे दिनांक 11/11/2015 पर्यंतची मुदत आहे.

सभापती महोदय, परिवहन विभागासाठी 125 कोटी रुपयांची तरतूद झाली असून ती कमी आहे, असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. परंतु, मी त्यांना सांगू इच्छितो की, महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यापासून प्रथमच महामंडळाला भांडवली खर्चासाठी एवढी मोठी आर्थिक तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. त्यामुळे तत्कालीन राज्यकर्त्यांनीच या विभागाला काही दिले नाही, याचा विचार खरे तर त्यांनी केला पाहिजे. ही सुविधा त्याकरिता आहे किंवा नाही, ते बघू.

सभापती महोदय, भूखंड खरेदी करण्याकरिता एक वर्षाचा कालावधी आहे. तथापि, परिवहन महामंडळाने हा आरक्षित भूखंड ताब्यात घेण्याचा निर्णय घेतल्यास तो पूर्णपणे अतिक्रमणमुक्त करुन द्यावा लागेल, हे देखील मी येथे नमूद करीत आहे.

**उप सभापती :** ठाणे शहराशी माझा निकटचा संबंध आहे, याची जाणीव मंत्री महोदयांना आहे. मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात दोन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. हा भूखंड अतिक्रमणमुक्त असला पाहिजे, हे त्यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. परंतु, मी त्यांच्या हे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा भूखंड अतिक्रमणमुक्तच आहे. त्या भूखंडावर आजही एस.टी.स्टॅण्ड कार्यरत आहे व तेथून वाहतूक होत आहे. हा भूखंड शहराच्या अगदी मध्यवर्ती भागात असून तो नागरिकांसाठी

अतिशय सोयीस्कर आहे. या व्यतिरिक्त ठाणे शहरात दोन एस.टी.स्टॅण्ड आहेत. त्यापैकी ठाणे

..4....



**उप सभापती......**

स्टेशनजवळ झालेला एस.टी.स्टॅण्ड नव्याने झालेला नाही. तो सुध्दा अस्तित्त्वात होता. तिसरा एस.टी.स्टॅण्ड खोपट भागात आहे व ती जागाही एस.टी.महामंडळाचीच होती. त्या भूखंडावर बीओटी तत्त्वावर काम झाल्यानंतर भूखंडाची मागील बाजू संपूर्णपणे एस.टी.महामंडळाची आहे. परंतु, शहरात अन्य दोन एस.टी.स्टॅण्ड असल्यामुळे प्रश्नाधिन भूखंडाची आवश्यकता नाही, ही भूमिका गैरलागू, चुकीची आणि डोळ्यात धूळफेक करणारी आहे. बिल्डर आणि डिव्हिजनल कंट्रोलर यांनी पाठविलेला अहवाल चुकीचा आहे.

ही गोष्ट खरी आहे की, लक्षवेधी सूचना अन्य विभागाकडे गेल्यामुळे परिवहन मंत्री महोदयांना आवश्यक माहिती घेता आलेली नाही. परंतु, हे देखील खरे आहे की, ही लक्षवेधी सूचना कालच एस.टी.महामंडळाकडे पाठविण्यात आली होती, हे मी आपल्या माहितीसाठी सांगतो आहे. हे प्रकरण अतिशय महत्त्वाचे आहे. या एका प्रकरणाभोवती शहराच्या भवितव्याचे अन्य प्रश्न अवलंबून आहेत व त्यामुळे याला प्रतिबंध केला नाही तर शहराचे भवितव्य धोक्यात येणार आहे.

ठाणे शहरातील किती भूखंडांवर महानगरपालिकेने आरक्षण घातलेले आहे, कोणत्या कारणांसाठी आरक्षण आहे, याची माहिती त्या शहराचा लोकप्रतिनिधी म्हणून मी उद्या सभागृहाला सादर करणार आहे.

आता परिवहन मंत्री महोदयांनी दिलेली उत्तरे समाधानकारक आहेत, त्याबद्दल माझा कोणताही आक्षेप नाही. परंतु, आपल्याकडे पुरेशी माहिती आलेली नाही, ही बाब देखील सत्य आहे. या लक्षवेधी सूचनेला समाधानकारक उत्तर यावे, यासाठी एस.टी.महामंडळाकडून आपण आजच सर्व माहिती मागवू शकाल का आणि या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा उद्या ठेऊन त्यावेळी आपण समर्पक उत्तर देऊ शकाल का, असा माझा आपल्याला प्रश्न आहे. मी आपल्या कन्व्हिनिअंटसाठी हे विचारतो आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपण अतिशय गांभीर्यपूर्वक या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. ठाणे शहरातील स्टेशनजवळ असलेल्या, मध्यवर्ती भागात असलेल्या आरक्षित भूखंडाविषयी आणि अन्य एस.टी.स्टँण्ड विषयी आपण माहिती दिली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, मी नम्रपणे निवेदन करु इच्छितो की, हा भूखंड विकसित करण्याकरिता बाजूचा प्लॉट बिल्डरला देऊन एका बिल्डरने आपल्या इमारती बांधल्या आणि नंतर भूखंड विकसित केला आहे. अशा प्रकारचे बिल्डरधार्जिणे धोरण राबविण्याची बिल्डरधार्जिणी प्रवृत्ती मोडून काढण्याकरिता आपण मला आवाहन केले आहे, याचे मी स्वागत करतो. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन आजच या संदर्भातील बैठक मी लावीन आणि अभ्यास करुन या लक्षवेधी सूचने संदर्भातील योग्य ते निवेदन सदनामध्ये अधिवेशन संपण्यापूर्वी नक्की करीन, कदाचित उद्या सुध्दा करीन. या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेमधून आणि उत्तरामधून समर्पकता आलेली आहे. आपण व्यक्त केलेल्या भावनेनुसार भविष्यात असे घडून नये, हे सर्व थांबले पाहिजे, आरक्षणाचा उपयोग झाला पाहिजे, हीच आमची भूमिका आहे. त्या संदर्भात बैठक घेऊन योग्य ते निवेदन या सदनामध्ये करीन.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : नगर विकास राज्य मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, महानगरपालिकेमध्ये अशा प्रकारचे अनेक भूखंड आहेत, याबाबत मी आज माहिती घेतली आहे. तेव्हा मला कळले की, बरेच भूखंड अतिक्रमित आहेत, हे सर्व भूखंड वेगळ्या मार्गाने सोडविण्यासाठी आता महानगरपालिकेत स्पर्धा सुरु आहे. हा प्रकार तातडीने थांबविता आला तर या शहरातील बरेच भूखंड लोकोपयोगी कामासाठी वापरता येतील. यासंदर्भात प्रतिबंध करण्यासाठी यासंदर्भातील माहिती आजच्या आज मागवून घ्यावी व यावर योग्य ती कार्यवाही करावी असे माझे आपणाला निर्देश आहेत.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, होय.

ॲड.राहूल नार्वेकर : सभापती महोदय, आता आपण ठाणे शहराचा मुद्दा उपस्थित केला आहे तशीच परिस्थिती मुंबई शहराची आहे. मुंबई महानगरपालिकेतील खाजगी प्लॉटरवर आरक्षण आहे, ते प्लॉट अक्वायर न केल्यामुळे बरेच प्लॉट सरकारच्या ताब्यातून जात आहेत. असे असताना मुंबई उप नगरात मुंबई महानगरपालिकेने 200 कोटी रुपयांची तरतूद करुन एक भूखंड अक्वायर करण्याचे ठरविले आहे. अशा प्रकारचे नियोजन किंवा तरतूद राज्य शासन करणार आहे काय ? मुंबईतील भूखंडाच्या लीजची टर्म संपत आहे, त्याबाबत राज्य शासन कोणते धोरण आखणार आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, हा एक स्वतंत्र व वेगळा प्रश्न असला तरी मुंबई महानगरपालिकेशी संबंधित आहे. यासंदर्भात शासनाचे धोरण ठरलेले आहे. अशा प्रकारे महानगरपलिकेचे निर्णय असतील व ते निर्णय महानगरपालिकेने राज्य शासनाकडे पाठविले तर शासनाकडून ते निर्णय विखंडीत करण्यात येतील असे शासनाचे धोरण आहे.

**उप सभापती** : मुंबईतील आरक्षणे आपण विखंडित करीत असताना ठाणे शहरातील आरक्षणाबाबत काय निर्णय घेणार आहात.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, महानगरपलिके संदर्भातील निर्णय जुना आहे, सदर आरक्षण एस.टी.महामंडळाचे असल्यामुळे एस.टी.महामंडळ यावर काय निर्णय घेते ते पाहून शासन निर्णय घेईल.

------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : बाळगंगा, काळू व शाई धरणाचे रखडलेले काम

**मु.शी.** : बाळगंगा, काळू व शाई धरणाचे रखडलेले काम या संबंधी श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

*"मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, मीरा-भाईंदर, वसई, विरार, अंबरनाथ या महानगरपालिकेच्या व सर्वात जास्त लोकसंख्येची घनता असलेल्या शहरांना बाळगंगा धरण, काळू धरण व शाई धरण या धरणांमधून पाणी पुरवठा करण्याची योजना असणे, पेण तालुक्यातील (जि.रायगड) बाळगंगा धरणाकरिता सिडकोने अर्थ पुरवठा केलेला असणे,सदर धरण हे कोकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्यामार्फत बांधण्यात येत असणे, बाळगंगा धरणाचे काम ८५ ते ९० टक्के पूर्ण झालेले असणे, मात्र गेल्या १ वर्षापासून कंत्राटदारांने काम बंद करणे, कोकण पाटबंधारेमार्फत एम.एम.आर.डी.मार्फत वित्त पुरवठा करुन काळू धरणाचा प्रकल्प सुरू करण्यात आलेला असून या प्रकल्पाकरिता कोकण पाटबंधारेमार्फत सन २०११ मध्ये टेंडर काढण्यात येवून धरणाचे काम सुरू करण्यात येणे, काळू धरणाची जुलै २००९ मध्ये परवानगी देण्यात येणे, या धरणाकरिता ९९९ हेक्टर वन जमीनीची आवश्यकता असून वन जमीन वापरण्याकरिता केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीची अट असणे, केंद्र शासनाच्या मान्यतेकरिता महाराष्ट्र शासनामार्फत प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर केंद्र शासनाने सन २०१३ मध्ये वन जमीन वापरण्याची परवानगी दिलेली असणे, मात्र अशी परवानगी देताना एम.एम.आर.डी.ने या परवानगीपोटी नेट प्रेझेंट व्हॅल्यू २२३ कोटी रुपये केंद्र शासनाकडे अदा करणे होते ते अद्यापपर्यंत न भरणे, काळू धरण हे ५ वर्षांमध्ये पूर्ण करणे आवश्यक असणे, अशा प्रकारे ५ वर्षात धरण पूर्ण न झाल्यास केंद्र शासनाने दिलेली वन जमीन वापरण्याची परवानगी ही रद्द होण्याची शक्यता असणे, कोकण पाटबंधारे विकास महामंडळामार्फत एम.एम.आर.डी.कडून अर्थ पुरवठा देऊन सदरच्या धरणाचे काम प्रस्तावित*

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...३...

श्री.जयंत प्र.पाटील..

*असून या धरणाकरिता ४५० हेक्टर वन जमीन आवश्यक असणे, वन जमीन वापरण्याकरिता केंद्र शासनाच्या पूर्व परवानगीची अट असणे, केंद्र शासनाच्या मान्यतेकरिता महाराष्ट्र शासनामार्फत प्रस्ताव पाठविण्यात आल्यानंतर केंद्र शासनाने वन जमीन वापरण्याची परवानगी दिलेली असणे, ५ वर्षात शाई धरण पूर्ण न झाल्यास केंद्र शासनाने दिलेली वन जमीन वापरण्याची परवानगी ही रद्द होण्याची शक्यता असणे, या तिन्ही धरणांचे काम योग्यरितीने पूर्ण न झाल्यास धरणांच्या प्रकल्प खर्चात वाढ होणार असून या तिन्ही धरणांच्या परिसरामध्ये नवी मुंबई विमानतळ, तळोजा औद्योगिक विकास व वरीलप्रमाणे नमूद केलेल्या मोठ्या लोकसंख्येच्या शहराचा समावेश असणे, या शहरांमध्ये साधारणत: माहे जानेवारी पासूनच १४ टक्के पाणी कपातीस सुरूवात होणे, धरणे पूर्ण न झाल्यास जनतेला पाणी कपातीस तोंड द्यावे लागणे, तसेच औद्योगिक क्षेत्रासाठी देखील योग्य पाणी पुरवठा होणे शक्य नसणे, भविष्यामध्ये या शहरांची लोकसंख्या वाढण्याची शक्यता असल्यामुळे वाढत्या लोकसंख्येला पाणी देणे अशक्य असून धरणांच्या प्रकल्प खर्चात वाढ होणे, सबब शासनाने याबाबत केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."*

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

...४...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण व मिरा-भाईंदर येथील पाणी पुरवठा व पाणी कपातीबाबत गेल्या आठवड्यात सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी चिंता व्यक्त केली होती. आज देखील नवी मुंबई व लगतच्या चार महानगरपालिकांमध्ये 14 टक्के पाणी कपात करण्यात येत आहे. यासाठी पर्याय म्हणून बाळगंगा, काळू व शाई धरण या तीन प्रकल्पाची कामे करण्यात येत आहेत. या परिसरात आज आंतरराष्ट्रीय विमानतळ होत आहे. जगातील सर्वात मोठे टर्मिनल जेएनपीटी येथे उभारले जात आहे. नयना प्रकल्प तयार करण्यात येणार आहे. असे असताना या भागासाठी पिण्याच्या पाण्याची मोठी टंचाई निर्माण होणार आहे. सिंचनाची चौकशी होत राहील. त्यासंदर्भात आम्ही प्रश्न उपस्थित केले होते. येथील 80 ते 90 टक्के प्रकल्पाची कामे पूर्ण झाली आहेत, हे प्रकल्प पूर्ण करण्याचा निर्णय राज्य शासन तातडीने घेणार आहे काय ? सभापती महोदय मला अशी भीती वाटते की, कोर्टाचा आदेश आहे म्हणून येथील कामे प्रलंबित ठेवले जातात. असे केल्यावर तेथील कंत्राटदार मशनरी व इतर साहित्यासाठी जास्त रकमेची मागणी करतात. यामध्ये शासनाचे करोडो रुपये जास्तीचे जातात. ही कामे थांबविल्यामुळे नवीन कामे करताना पुन्हा 25 ते 30 टक्के रकमेची वाढ होते. संबंधित ठेकेदाराकडून हमी घेऊन ही कामे पूर्ण करण्याची व्यवस्था करण्यात येईल काय ? बाळगंगा, काळू व शाई या प्रकल्पांसाठी वन खात्याने परवानगी दिल्यानंतर त्यासाठी मुदत दिलेली असते. या परवानगीसाठी राज्य शासनाने करोडो रुपये भरलेले आहेत. या प्रकल्पाची कामे सुरु झाली नाही तर पुन्हा वन विभागाची परवानगी नव्याने काढावी लागते. पुन्हा यासाठी पैसा भरावा लागतो. कालावधी वाढल्यामुळे वेळेचा आणि निधीचा अपव्यय होणार आहे. त्यामुळे ठेकेदारांना जास्त नफा मिळतो. हे सर्व प्रकार थांबविण्याचे काम राज्य शासन करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी अतिशय मूलभूत प्रश्न विचारला आहे. ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर पर्यंत पाण्याचा पुरवठा या तीन धरणांतून होणार आहे. या शहरांतील पाणी पुरवठ्याचा जास्त भार या तीन धरणांवर राहणार आहे. आता सिडकोकडे या परिसराची मागणी 230 एमएलडी आहे. आता 190 एमएलडी पुरवठा करण्यात येत आहे. आजच 14 टक्के पाणी कमी पडत आहे.ही बाब सत्य आहे. बाळगंगा धरणाचे काम 70 ते 80 टक्के झाले आहे. जे अपूर्ण काम आहे त्याबाबत ठेकेदार कोर्टात जातात. यासंदर्भातील ॲग्रीमेंट एमआयडीसी व सिडको या दोघांमध्ये होते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.

ठेकेदार कोर्टात गेल्यामुळे कोर्टाने अशी विचारणा केली होती की, या मध्ये दोघांचे ॲग्रीमेंट असल्यामुळे हा वाद मुख्य सचिवांनी सोडवावा. त्यानंतर यासंदर्भात मुख्य सचिवांनी एक बैठक घेतली होती. त्यासंदर्भात बरेच काम पुढे गेले आहे. आर्बिट्रेटर तीन असावेत की, पाच असावेत. तीन आर्बिट्रेटर राहिले तर सिडकोला त्यांची भूमिका व्यवस्थित मांडता येणार नाही. पाच सदस्यांचे आर्बिट्रेटर पॅनल असावे असे ठरले आहे. ही बाब सध्या न्यायप्रविष्ट आहे. या धरणाचे काम 70 ते 80 टक्के पूर्ण झाले आहे. पाच वर्षात ही कामे पूर्ण झाली नाही तर पुन्हा वन विभागाची परवानगी घ्यावी लागेल. या सर्व बाबींचे भान ठेऊन एक महिन्याच्या आत शासनाची समिती निर्णय देईन. त्यानंतर कोर्टात माहिती देण्यात येईल गरज पडली तर ॲडव्होकेट जनरल तर्फे शासनाची बाजू कोर्टात मांडली जाईल व यासंदर्भातील निर्णय तातडीने केला जाईल.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर चांगले दिले आहे. मी जी भूमिका येथे मांडली ती भूमिका राज्य शासनाच्यावतीने कोर्टात मांडण्यात येईल काय ? राज्य शासनातर्फे कोर्टात सांगितले पाहिजे की, टेंडरमध्ये गैरव्यवहार किंवा अनियमितता झाला आहे. कोर्ट कोणावर आक्षेप ठेवतो याबाबत आमचे काहीही म्हणणे नाही. बाळगंगा धरणाचे काम 90 टक्के पूर्ण झाले आहे. तेथील गावे अजून उठविण्याचे काम सुरु आहे. शेतकऱ्यांना अद्याप निधी मिळालेला नाही. राज्य शासनाच्यावतीने कोर्टात ही भूमिका सांगण्यात येईल काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, सिडको किंवा शासनाची भूमिका अशीच राहिली आहे. प्रकल्पाची किंमत पहिल्यांदा 498 कोटी रुपये वाढली तेव्हा देखील सिडकोने विरोध केला होता. या प्रकल्पाच्या वाढत्या किंमतीला सिडकोने नेहमीच विरोध केला आहे. त्यामुळे कंत्राटदार कोर्टात गेला आहे. सिडकोने फक्त 498 कोटी रुपयांचे पेमेंट केले आहे. ठेकेदारांची मागणी 1200 कोटी रुपयाची आहे, शासनाने व सिडकोने ठरवून पुढील पेमेंट रोखले आहे. सचिव स्तरावरुन राज्य शासन योग्य ती भूमिका घेणार आहे. हा करार दोघांमध्ये असल्यामुळे पाच आर्बिट्रेटरप्रमाणे कार्यवाही करण्यात येणार आहे. या धरणाचे काम लवकर पूर्ण व्हावे म्हणून मुख्य सचिवांची देखील तीच भूमिका राहणार आहे. या प्रकल्पाचे काम जवळपास 90 टक्के पूर्ण झाले आहे. फक्त घळ भरणीचे काम शिल्लक आहे. बुडीत क्षेत्राचे पुनर्वसन व भूसंपादन

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील.

पूर्ण झाल्याशिवाय धरणाचे पाणी थांबविता येणार नाही. त्यामुळे ही कामे पूर्ण करण्यात येतील व त्यानंतर धरणाचे उर्वरित काम पूर्ण करण्यात येणार आहे.

-------

...7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजगृह या इमारतीचा समावेश फेरिवाला क्षेत्रात समाविष्ट होणे

**मु.शी.** : डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या राजगृह या इमारतीचा समावेश फेरिवाला क्षेत्रात समाविष्ट होणे या संबंधी, श्री.अनंत गाडगीळ वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अनंत गाडगीळ (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

***"भारताच्या घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे मुख्य निवासस्थान "राजगृह" ही इमारत मुंबईतील दादर (पूर्व) येथील लखमसी नप्पूरोड व खारेगाट रोड या रस्त्याच्या कोपऱ्यावर स्थित असणे, शिवाजीपार्क येथे चैत्यभूमी होण्यापूर्वीपासून हजारो नागरिक ६ डिसेंबरला "राजगृह" येथे दर्शनासाठी येत असणे, आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अनेक अनुयायी वर्षभरात या वास्तूला भेट देण्यासाठी येत असणे, अशा ऐतिहासिक पवित्र वास्तुस मुंबई महापालिकेच्या वॉर्ड पूनर्रचना योजनेत "फेरीवाला क्षेत्र / हॉकर्स झोन" मध्ये समाविष्ट करण्यात येणे, व येत्या १५ दिवसात या योजनेस अंतिम रुप देण्यात येणार असणे, यामुळे या वास्तूच्या भोवताली सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होणे, तसेच फेरीवाल्यांचा गजबजाटामुळे निर्माण होणारी अनुयायी यांची असुविधा, यामुळे जनमानसात पसरलेली चिडीची व असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रीया."***

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, मुंबईतील दादर परिसरात लखमसी नप्पू रोड व खारेगाट या रोडच्या कोपऱ्यावर राजगृह नावाची इमारत आहे. भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे ते निवासस्थान आहे. व्ही इमारत राष्ट्रीय स्मारक होणार होती. परंतु काही तांत्रिक व कायदेशीर बाबीमुळे ती इमारत राष्ट्रीय स्मारक होऊ शकली नाही. जोपर्यंत शिवाजी पार्क येथे चैत्यभूमी नव्हती तोपर्यंत 6 डिसेंबर रोजी लाखो अनुयायी राजगृहाच्या दर्शनासाठी येत होते. आज देखील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी वर्षभर राजगृहाला भेट देतात. सभापती महोदय मला खेदाने नमूद करावेसे वाटते की, नवीन आराखड्यामध्ये अशी ऐतिहासिक व पवित्र वास्तू फेरिवाला झोनमध्ये दाखविण्यात आली आहे. ही बाब अत्यंत निंदनीय आहे. घटना समितीच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना तयार केली त्यावेळी कॅबिनेट समितीचे सदस्य काकासाहेब गाडगीळ यांनी त्यांना शेवटपर्यंत साथ दिली होती. त्या परंपरेतून मी वाढलेलो आहे. पोटतिडकीने मी ही लक्षवेधी सूचना मांडत आहे.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ.........

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, ना फेरीवाला क्षेत्रात याचा समावेश आहे. आज त्या ठिकाणी फेरीवाल्यांनी बसण्यास सुरुवात केलेली आहे. त्यामुळे सुरक्षिततेचा धोका निर्माण होणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, किमान अर्धा किंवा एक किलो मीटर परीसरामध्ये ना फेरीवाला क्षेत्र जाहीर करुन शासन ही पवित्र वास्तू कशा प्रकारे प्रोटेक्ट करणार आहे ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी भावनेच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, केंद्र शासनाच्या कायद्यामुळे किंवा तेथील वॉर्ड ऑफिसरने दिलेल्या माहितीनुसार आपण दादर येथील ज्या भागात राजगृह आहे त्या भागात हॉकर्स झोन करीत आहोत काय ? परंतु, या संदर्भात शासनाची अशी भूमिका अशी आहे की, मे 2014 मध्ये स्ट्रीट वेंडिंग सेंट्रल ॲक्ट आला. आपल्याला या ॲक्टच्या कलम 36 (1) आणि 36 (2) नुसार ड्राफ्ट प्लॅन आणि रूल्स तयार करावयाचे होते. या ॲक्टनुसार जी टाऊन वेंडीग कमिटी गठीत करण्यात आली त्या कमिटीचे अध्यक्ष संबंधित महापालिकेचे आयुक्त असतात. त्या समितीचा अहवाल दिनांक 27.11.2014 रोजी प्राप्त झालेला आहे. प्रारुप आराखडा आणि नियम नगर विकास विभागाकडे स्क्रिनिंगसाठी येतात. शासन स्तरावर समितीचा अहवाल आल्यानंतर आपण तो विधी व न्याय विभागाकडे पाठवितो. त्यांच्याकडून तो आल्यानंतर आपण त्यावर हरकती व सूचना मागवणार आणि त्यानंतर आपण तो डीआर आणि डीएस फायनल करतो. परंतु, या सर्व गोष्टींचा सुरक्षिततेसाठी, हॉकर्स झोनच्या ॲम्बिटमध्ये ठेवावयाचा किंवा बाहेर ठेवावायाचा काही संबंध नाही. कलम 21 अंतर्गत टीव्हीसी जो प्लॅन बनविते त्यामध्ये 24 विभागीय सह आयुक्तांची आपण नेमणूक करतो. त्यांची एक समिती असते. त्यांनी तेथे जाऊन तेथील रस्त्याची विट्‌थ किती आहे, रस्त्याचे प्रमाण काय आहे, रस्त्याची स्थिती काय आहे यावरुन कोणता हॉकर्स झोन, कोणता नॉन हॉकर्स झोन आणि कोणता रिस्ट्रीक्टेड हॉकर्स झोन हे ठरवावयाचे असते. मी सभागृहाला आश्वस्त करु इच्छितो की, दादर क्षेत्रातील या अर्धा किलो मीटरच्या परिसरात नॉन हॉकर्स झोन अशीच शासनाची भूमिका आहे आणि पुढे देखील राहणार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील........

त्यामुळे आपण या संदर्भात संभ्रम निर्माण होऊ देऊ नये की, कोणताही ॲक्ट आला असेल आणि काहीही झाले असेल तरी शेवटी टीव्हीसी मार्फत किंवा तेथील सह आयुक्तांमार्फत जी माहिती मिळते त्यावरुन आपण ऑलरेडी हा रिजन इम्युन केलेला आहे की, हा नॉन हॉकर्स झोनच राहणार आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन येथील ज्या घरात राहत होते, ते घर आपण स्मारक म्हणून घोषित केलेले आहे. ही अतिशय चांगली गोष्ट आहे. दादर येथील राजगृह या वास्तूमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अतिशय दीर्घ काळ वास्तव्य केलेले आहे. ते अंतिम काळापर्यंत तेथे होते. म्हणून शासनाने ही वास्तू हेरिटेज घोषित केली पाहिजे. शासन ही वास्तू हेरिटेज म्हणून घोषित करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, खरे म्हणजे हा विषय सांस्कृतिक विभागाशी संबंधित आहे. सजेशन फॉर ॲक्शन. It will be forwarded to respective department.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत गंभीर आहे. दादर येथील हिंदू कॉलनीमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजगृह हे निवासस्थान आहे. 6 डिसेंबर रोजी देशातून, जगभरातून लाखो लोक अभिवादन करण्यासाठी मुंबई येथे येतात आणि त्या ठिकाणी दर्शन घेण्यासाठी जातात. या परिसरात एक ऐतिहासिक शाळा देखील आहे. हा विषय या विभागाकडे पाठविला, इकडे स्क्रिनिंग केले, तिकडे स्क्रिनिंग केले हे करण्याऐवजी शासनाने अत्यंत ठामपणे सांगितले पाहिजे की, कोणत्याही परिस्थितीत मग महानगरपालिकेने कोणताही निर्णय घेतला, आयुक्तांनी कोणताही निर्णय घेतला तरी दादर येथील राजगृहाच्या संपूर्ण 1 किलो मीटरच्या परिसरामध्ये कोणत्याही प्रकारच्या फेरीवाल्यांचा उपद्रव होणार नाही असा निर्णय शासनाने घेतला पाहिजे. शासन तसा निर्णय घेणार आहे काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, शासनाचे हेच धोरण आहे आणि तसा निर्णय देखील झालेला आहे. जर फेरीवाल्यांची संघटना कोर्टात गेली तरच प्रश्न निर्माण होणार आहे. एरवी आमचा तसा निर्णय झालेला आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आज त्या ठिकाणी फेरीवाले बसतात.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्या परिसरातील फुटपाथवर कोणतेही फेरीवाले बसत नाहीत.

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, ही अत्यंत चुकीची माहिती आहे. त्या वास्तूच्या समोर एक दुधाचे केंद्र आहे. तेथे दूध सोडून इतर सर्व वस्तू मिळतात. तेथे वेफर्स, बिस्कीट मिळतात. त्या ठिकाणी पानवाला देखील बसतो. मी आपल्याला यादी द्यायला तयार आहे. तो संपूर्ण परिसर फेरीवाल्यांनी काबीज केलेला आहे. मी आपल्याला तेथे घेऊन जाण्यास तयार आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अनंत गाडगीळ यांनी जी माहिती दिलेली आहे ती सत्य समजून तेथील परिस्थिती काय आहे याची माहिती घेण्यात येईल आणि तसे असल्यास त्याबाबत योग्य ती कार्यवाही करुन तो नॉन हॉकर्स झोन कसा राहील याची काळजी घेण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर लंडन येथील ज्या घरात राहत होते ते घर राज्य शासनाने विकत घेण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि राज्य शासनाच्या वतीने माननीय सांस्कृतिक मंत्री श्री.विनोद तावडे यांनी त्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. खरोखर ही आनंदाची आणि अभिनंदनाची गोष्ट आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राजगृह या वास्तूमध्ये वास्तव्य होते. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील आणि मी चर्चा करीत होतो. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, आता त्या ठिकाणी श्री.प्रकाश आंबेडकर साहेब राहतात. परंतु, स्वतः श्री.प्रकाश आंबेडकर साहेबांनी काय सांगितले ? त्यांनी असे सांगितले की, आम्ही आंबेडकर आहोत, परंतु आमच्या राजगृहात आम्हीच बेवास झालेलो आहोत, ही वस्तुस्थिती आहे. राजगृहाच्या परिसराच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले त्या संदर्भात मंत्री महोदयांनी

उत्तर दिलेले आहे आणि शासनाने या संदर्भात कठोर कारवाई करण्याबाबत खात्री देखील दिलेली

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे........

आहे. परंतु, राज्य शासन सर्वसामान्य लोकांसाठी प्रेरणा म्हणून संपूर्ण राजगृह मोकळे करणार आहे काय ?

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मघाशी देखील हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. मी त्यावेळी देखील सांगितले की, हा प्रश्न सांस्कृतिक कार्य विभागाकडे जाईल. राजगृह लोकांसाठी खुले करावयाचे, हेरिटेज म्हणून घोषित करावयाचे, सर्व सामान्य लोकांना प्रेरणा घेण्यासाठी तेथे काही व्यवस्था करावी तर हा त्या त्या विभागाचा प्रश्न आहे. म्हणून तसे सूचित करण्यात येईल.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे )**

**पृ.शी.** : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस कौटुंबीक आरोग्य योजना लागू करणे

**मु.शी.** : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस कौटुंबीक आरोग्य योजना लागू करणे या संबंधी श्री.कपिल पाटील, प्रा.श्रीकांत देशपांडे, श्री दत्तात्रय सावंत, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेप्रमाणे राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना कॅशलेस कार्डाची योजना लागू नसणे, त्यामुळे वैद्यकीय बिलांच्या परताव्यासाठी शिक्षक व कर्मचारी यांना प्रचंड दगदग व त्रास सहन करावा लागणे, तरीही वर्षानुवर्षे वैद्यकीय बिले मंजूर न होणे, वेळेवर महागडे उपचार पैशाअभावी उपलब्ध न होणे, त्यात कधी कधी जीवित हानी होणे, त्यामुळे अशा उपचारांसाठी शिक्षक व शिक्षकेतरांना कर्ज काढावे लागणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना औषधोपचार व शस्त्रक्रिया यासाठी राज्यातील अद्ययावत इस्पितळांमध्ये कॅशलेस कौटुंबीक आरोग्य योजना लागू करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, प्रमुख कार्यवाह सुभाष मोरे व कार्यवाह जालिंदर सरोदे यांनी शिक्षकांसाठी सावित्री फातिमा कॅशलेस कुटुंब आरोग्य योजनेचा प्रस्ताव शासनास सादर करणे, या बाबत तत्कालीन शिक्षणमंत्री यांनी तसेच विद्यमान शिक्षणमंत्री यांनी तत्वत: मान्यता देणे, मात्र शासनाने या बाबत अंमलबजावणीचा निर्णय न घेतल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना होणारी दगदग आणि त्रास तसाच चालू राहणे, याबाबत शासनाने दखल घेवून तातडीने करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..7...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, सध्या रुग्णालयात घेतलेल्या उपचाराचे परताव्याने पैसे मिळतात आणि एक हृदय विकाराचा झटका आल्यानंतर त्याचे बिल वसूल करण्यासाठी दुसरा हृदय विकाराचा झटका येतो, अशी स्थिती आहे. अनेक शिक्षकांना आणि कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्षे त्यांची बिले मिळत नाहीत, म्हणून मी ही लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. राज्य सरकारने पोलिसांसाठी कॅसलेस योजना राबविली आणि ती चांगल्या प्रकारे यशस्वी झालेली आहे. त्यामुळे चांगल्या रुग्णालयांमध्ये वेळेवर उपचार होतात आणि रुग्णांच्या खिशातील पैसे देखील खर्च होत नाहीत, ही चांगली सुविधा आहे. अशा प्रकारची योजना शिक्षण विभात राबविली गेली पाहिजे यासाठी मी मागील दोन वर्षापासून प्रयत्न करीत आहे. मला खात्री आहे की, माननीय शिक्षण मंत्र्यांमध्ये तशी धमक आहे आणि त्यांनी तसा मनोदय देखील जाहीर केला होता. मात्र लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये अद्याप विचाराधीन आहे, असे म्हटलेले आहे.

सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, पुढील शैक्षणिक वर्षात जून महिन्यापर्यंत ही योजना आपण लागू करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सध्या यामध्ये जो भ्रष्टाचार सुरु आहे तो संपविण्यासाठी या शिवाय दुसरा पर्याय नाही. त्यामुळे त्यातील सर्व पायऱ्या कमी करण्यासाठी ही योजना आपण तातडीने अंमलात आणणार आहात काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, डायलेसिस संदर्भात शासन निर्णय आहे. परंतु, त्याची बिले मिळत नाहीत. नी रिप्लेसमेंट किंवा इतर अवयव ट्रान्सप्लांटची जी बिले मिळावयास पाहिजेत ती मिळत नाहीत. म्हणून आपण जी 17 आजारांची यादी आहे त्या यादीमध्ये याचा समावेश करणार आहात काय ?

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर मी या खात्याचा चार्ज घेतला तेव्हापासून महिन्याभराच्या काळात जी विविध प्रकारची निवेदने प्राप्त झाली त्यांचा मी सहज अभ्यास करीत होतो. कोणते प्रश्न घेऊन लोक पुढे येतात हे लक्षात आले.

**तालिका सभापती :** सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ दुपारी 12.30 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये बदल्यांचे, शाळांच्या अनुदानाचे, वेतनश्रेणीचे प्रश्न होते. तद्वत निवृत्त होऊन 5 ते 7 वर्षे झाली तरी निवृत्तीवेतन मिळत नसल्याबाबत, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे 2-3 वर्षे प्रलंबित असल्याबाबतचेही प्रश्न होते. या सगळ्या विषयांची छाननी करुन अहवाल मागविला, त्यातून काही गोष्टी लक्षात आल्या आहेत. वैद्यकीय बिलांची प्रतिपूर्ती मिळण्याकरिता शासनाने वेगवेगळे निकष ठरवून दिले आहेत. त्यातून भ्रष्टाचाराला वाव मिळतो. गेल्या 5 ते 7 वर्षाचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, शालेय शिक्षण विभागाला दरवर्षी 120 ते 125 कोटी रुपये वैद्यकीय बिलांच्या प्रतिपूर्तीवर खर्च करावे लागतात. त्यामुळे मेडिकल इन्शुरन्स कंपनीला ही रक्कम देऊन राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस सुविधा देण्याबाबत आग्रह धरला या कॅशलेस योजनेच्या माध्यमातून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय उपचाराची सोय होऊ शकते. अनेकदा आजारी पडल्यानंतर नजिकच्या चांगल्या रुग्णालयात उपचार घेण्यासाठी गेल्यास अगोदर पैसे भरा आणि नंतर क्लेम करा असे सुचविण्यात येते. त्यातून भ्रष्टाचाराला जो वाव मिळतो तो थांबविता येऊ शकतो म्हणून कॅशलेस योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, कॅशलेस योजनेच्या दृष्टीने माहिती घेतली असता असे निदर्शनास आले की, गृह खात्यामध्ये अशी योजना राबविली जात आहे. त्या योजनेचा अभ्यास केल्यानंतर कागदोपत्री ती योजना चांगली असल्याचे दिसून आले. परंतु गृह विभागाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केल्यानंतर त्यांनी योजनेतील त्रुटी लक्षात आणून दिल्या. त्या त्रुटींवर मात करुन शिक्षण खात्याची योजना तयार करण्याचा विचार केला आहे. त्यामुळे आम्ही ही योजना निश्चित आणू.

सभापती महोदय, हा अभ्यासक्रम नाही, त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षापासून योजना सुरु केली पाहिजे असे नाही. परंतु फूलप्रूफ योजना आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यातून शिक्षकांचे, कर्मचाऱ्यांचे आणि सगळ्या नेत्यांचे समाधान होईल याची काळजी घेतली जाईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्व शिक्षक कर्मचाऱ्यांचे या योजनेकडे लक्ष लागले आहे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात मंत्री महोदयांनी आश्वासन दिले होते की, कॅशलेस योजना आणण्यात येईल. आताही निवेदनामध्ये म्हटले आहे की, शासनाचा विचार पूर्ण झाला आहे, शासन विचार करीत आहे. मंत्री महोदयांना नेमके काय म्हणावयाचे आहे? ही योजना म्हणजे अभ्यासक्रम नाही हे आम्हाला मान्य आहे. परंतु आता नवीन वित्तीय वर्ष सुरु झाले असून किमान जुलै महिन्यापूर्वी किंवा पुढील अधिवेशनात प्रश्न विचारावा लागणार नाही याची काळजी घेऊन योजना सुरु करण्यात येईल काय?

सभापती महोदय, वैद्यकीय देयक दाखल करताना शिक्षक कर्मचाऱ्यांकडून जे 3 टक्के शुल्क घेतले जाते ते रद्द करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सभागृहात सांगितले होते. त्या संदर्भातील शासन आदेश तातडीने निर्गमित करण्यात येईल काय?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांचे आभार मानतो. त्यांनी हे अधिवेशन संपण्यापूर्वी जीआर काढावा असे म्हटले नाही. पुढील अधिवेशनापूर्वी किंवा जुलै महिन्यापर्यंतची वेळ दिलेली आहे. सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मागणी केलेली नसतानाही मी मागील हिवाळी अधिवेशनात स्वत: अभ्यास करुन योजनेसंबंधी विवेचन केले होते.

श्री.कपिल पाटील : तत्कालीन शिक्षणमंत्री यांच्याकडे मागणी केली होती. सविस्तर योजना तयार करुन दिली होती. आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील, रामनाथ मोते यांनी शिक्षक भारती व शिक्षक परिषदेच्या माध्यमातून मागणी केलेली आहे. परंतु माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी मागणी केलेली नाही हे मी निदर्शनास आणून देत आहे. मी स्वत: शिक्षण खात्यावरील चर्चेला उत्तर देताना हा विषय सभागृहात घोषित केला होता. घाईघाईने घोषित करुन मोकळे सोडले असे न होता त्याबाबत अभ्यास करताना असे लक्षात आले की, गृह खात्याने कॅशलेस योजना लागू केलेली आहे. तेव्हा त्या खात्याच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली, काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

हॉस्पिटल्सच्या, विमा कंपनीच्या प्रतिनिधींबरोबर चर्चा केली. त्यातून कोणकोणत्या अडचणी येतात हे हॉस्पिटलच्या प्रतिनिधींनी लक्षात आणून दिले. सरकारकडून वेळेवर पैसे मिळत नाहीत असे

...3..



श्री.विनोद तावडे....

त्यांचे म्हणणे होते. काही रुग्णालयांमध्ये योजना लागू असताना पेशंटला ॲडमिट होताना पैसे भरा आणि नंतर क्लेम करा असे सांगितले जाते. त्यानंतर वित्त विभागाबरोबर चर्चा करण्यात आली. दरवर्षी विभागाकडून 125 कोटी रुपये वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता खर्च केले जात असतील तर तो निधी एप्रिल-मे महिन्यामध्ये उपलब्ध झाला तर योजना योग्यरित्या राबविता येऊ शकते. मी या विषयाचा पूर्ण अभ्यास करीत आहे. मी परीक्षार्थी नसून विद्यार्थी आहे. पूर्ण अभ्यास करुन या विषयातील भ्रष्टाचार पूर्ण संपविणार आणि फूलप्रूफ योजना आणू हे नक्की.

सभापती महोदय, 3 टक्के शुल्क रद्द करण्याची घोषणा केली आहे, त्याची अंमलबजावणी करु परंतु हे अधिवेशन संपू द्या.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, विनाअनुदानित संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक 12 मे, 1990 पासून राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती योजना लागू केली आहे. या योजनेत अनेक अडचणी आहेत, प्रतिपूर्ती होण्यास विलंब लागत आहे. गृह विभागाने कॅशलेस योजना आणली आहे. ती योजना शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करावी अशी मागणी आम्ही सातत्याने करीत आहोत. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील सातत्याने मागणी करीत आहेत. शिक्षक परिषदेने अनेकदा मागणी केली आहे.

गृह विभागाचा दिनांक 2 डिसेंबर, 2005 चा निर्णय आहे. त्यानंतरही त्यांनी काही निर्णय निर्गमित केले आहेत. त्यात अनेक त्रुटी आहेत, हे आम्हाला मान्य करावे लागेल. दिनांक 2 डिसेंबर, 2005 व 28 जुलै, 2006 च्या जीआर मधील त्रुटी दूर करुन शिक्षण विभागाला ते निर्णय लागू करावेत किंवा कॅशलेस योजना लागू करावी. योजनेतील त्रुटी दूर करुन ती योजना शिक्षण विभागामध्ये लागू केली जाईल काय? राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना ही योजना लागू केली आहे. नंतर दिनांक 12 मे, 1989 च्या शासन निर्णयानुसार अनुदानित शिक्षण संस्थांमधील शिक्षक व शिक्षकेतर ही योजना लागू झाली. या संदर्भात शालेय शिक्षण विभागाने आरोग्य विभागाशी चर्चा केली आहे काय? आमदार, खासदार, सभापती, उप सभापती, मंत्री, शासकीय कर्मचारी यांना 3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

टक्के शुल्क भरण्याबाबत वगळले आहे. फक्त शिक्षकांना ही सवलत दिलेली नाही. मी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे. मंत्री महोदयांनी हे मान्य केले की, शिक्षकांवर अन्याय होत आहे. त्यांना 3 टक्के शुल्कातून वगळणार आहोत असे सांगण्यात आले आहे. या संदर्भातील शासन निर्णय लवकरात लवकर निर्गमित केला जाईल काय?

नंतर एच.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री.रामनाथ मोते, कपिल पाटील, सन्माननीय सदस्य श्री.नागो गाणार व माजी सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी या प्रश्नासाठी निवेदन देऊन मागणी केली आहे. तथापि, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी या विषयासंबंधी कोणतीच मागणी केलेली नाही. तरीही त्यांचा आग्रह आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय मंत्री हे राज्याचे मंत्री असतात. कोणा एका व्यक्तीचे मंत्री नसतात. आम्ही या प्रश्नासंबंधी निवेदन देऊन वारंवार पाठपुरावा करीत आहोत. माननीय मंत्र्यांनी एकदा उल्लेख केला म्हणून मी ऐकून घेतले आहे. परंतु, वारंवार त्यांनी असे बोलणे बरोबर आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी दिलेली माहिती तंतोतंत खरी आहे. आय स्टँड माय वर्डस्. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी असा उपस्थित केला आहे की, 25 डिसेंबर रोजीचा गृह विभागाचा जी.आर.चांगला असला तरी त्याचे इंटरप्रीट नीट होत नाही. त्यामुळे त्यात फाटे फुटायला वाव राहतो. तो वाव राहू नये म्हणून मी यात थोडा अभ्यास करीत आहे. आताच येथे सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी 3 टक्क्याचा मुद्दा मांडला आहे. हा मुद्दा कोणाच्याही लक्षात आला नाही. पण तो सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांच्या लक्षात आहे. त्याचे त्यांना क्रेडिट दिले पाहिजे. 3 टक्क्याचा मुद्दा सन्मानीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी देखील मांडला होता. या विषयासंबंधी शिक्षण विभागाने संपूर्ण विषय क्लिअर करून आरोग्य विभागाकडे पाठविला आहे. आरोग्य विभागाची मान्यता आल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. मूळात घोषणा करण्यापूर्वी या विषयावर आम्ही चर्चा केली होती. माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री व सचिवांशी चर्चा करूनच सभागृहात मी "होय" असे उत्तर दिले होते. आम्ही तत्कालीन मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांच्या सारखे प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविला आहे अशा प्रकारची उत्तरे देत नाहीत. आम्ही सामूहिक निर्णय घेतो. जे चार वर्षात झाले नाही ते आम्ही चार महिन्यात करतो. त्यासाठी आपण थोडा वेळ थांबावे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, यासंबंधातील निर्णय लवकरात लवकर घेण्याचे मान्य केल्यामुळे मी सर्वप्रथम माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करतो. आम्ही देखील सप्टेंबर महिन्यामध्ये मागणी केली होती. यासंबंधी आमची सचिवांसमवेत बैठक होऊन चर्चेत आम्ही ही मागणी केली होती. तेव्हा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, हा निर्णय आपण नगरपालिकांसह सर्वच शिक्षकांना लागू करणार आहात काय ? कारण यातून नगरपालिकांमधील शिक्षक वगळले जातात. विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी अपघात विमा योजना आहे. तिची अंमलबजावणी नीटपणे होत नाही. ती नीटपणे करण्यासाठी तसेच त्यातील मर्यादा वाढविण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ज्या शिक्षकाला शासनाचे वेतन मिळते त्यांना हे लागू होईल.

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवल्यामुळे मी त्यांचा अतिशय आभारी आहे. त्यांचा सकारात्मक दृष्टिकोन लक्षात घेता मी त्यांना एकच व विनंती करतो की, कॅशलेस पॉलिसी ही लवकरात लवकर सुरू व्हावी आणि त्यामध्ये नी-रिप्लेसमेंट, डायलीसीस व हार्ट एलिमेंट आजार देखील अंतर्भूत करण्यात यावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राजीव गांधी अपघात विमा योजनेमध्ये, जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये 30 बाबींचा उल्लेख आहे. तसेच 27+5 चा उल्लेख वारंवार करण्यात येत आहे. त्यासंबंधी आरोग्य विभागाशी चर्चा करून सकारात्मक विचार करण्यात येईल. सध्या मी शिक्षकांना कोणत्या प्रकारचे आजार होतात याचा अभ्यास करीत आहे. आता येथे गुडघ्याचा काय संबंध आहे हे मला सांगावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, शिक्षकांना उभे राहून शिकवावे लागते.

......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** लक्षवेधी सूचनेच्या निवेदनाबाबत अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

डॉ.दीपक सावंत (सावर्जनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई, विदर्भ, मराठवाडा व इतर राज्याच्या भागात चिकन गुन्या व डेंग्यूचा झालेला प्रादूर्भाव या विषयावरील डॉ.दीपक सावंत, वि.प.स.व इतर वि.प.स.यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 5 डिसेंबर 2006 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे)** : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पुणे शहरातील बांधकामांमध्ये होत असलेल्या अनियमितता

**मु.शी.** : पुणे शहरातील बांधकामांमध्ये होत असलेल्या अनियमितता या संबंधी सर्वश्री विनायक मेटे, पांडुरंग फुंडकर, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे हे शहर राहण्याकरीता सुरक्षित असल्यामुळे शहराचा विस्तार व विकास झपाट्याने होत असणे, यामुळे बाहेरुन शिक्षण, उद्योग, नोकरी व अनेक कामांनिमित्त लोक येत असणे, पुणे हे शहर ऐतिहासिक व शैक्षणिक परंपरा लाभलेले असणे, या सर्व बाबींचा विचार करुन काही श्रीमंत लोकांनी शहराजवळील जमिनी खरेदी करणे, तसेच अतुल गोयल व अमित गोयल यांनी मे.गोयल गंगा डेव्हल्पर्स इंडिया प्रा.लि. 3 रा मजला, सन माहू कॉम्प्लेक्स, 5 बंड गार्डन रोड, पुणे-1 या नावाखाली बांधकाम व्यवसाय सुरु करणे, सदरील फर्मच्या अंतर्गत अमृतगंगा या इमारतीमध्ये व प्रकल्पाच्या बांधकामाचे अवलोकन केले असता सदरील प्रकल्पामध्ये अनियमितता, बेकायदेशीरपणा, गैरप्रकार व अनुचित व्यापारी पध्दत करुन सदनिकाधारकांना फसवलेले असणे, जाणीवपूर्वक कायदेशीर अटी व शर्थींचे उल्लंघन केलेले असणे, यामध्ये चटईक्षेत्र निर्देशांक घोटाळा, कमी क्षेत्रफळांच्या सदनिका, जास्त उंचीच्या इमारती, अग्निशामक सुरक्षा नियमावलीचे उल्लंघन, जास्तीच्या वाहनतळांची नियमबाह्य विक्री, मोका कायद्याचे उल्लंघन, पुणे म.न.पा. च्या डी.सी. रुलचे उल्लंघन केलेले असणे, चटईक्षेत्रामध्ये प्लॉटचे क्षेत्रफळ वाढविणे व नागरी सांस्कृतिक सभागृहाचे राखीव क्षेत्रफळ कमी करणे, सदनिका व दुकाने यांच्याच चटईक्षेत्रामध्ये विक्री पश्चात बेकायदेशीर घट करणे, यामुळे म.न.पा. चे झालेले प्रत्येक वर्षी झालेले 100 कोटींचे नुकसान जास्त असणे, सदनिका व दुकानांची हेतुपुरस्सर मुल्यांकनापेक्षा कमी केलेल्या विक्रीमुळे शासनाने मुद्रांक शुल्क व नोंदणी फीचा झालेला आर्थिक तोटा, मुल्यवर्धीत कर, सेवाकर व आयकर चुकवेगिरीही 35 कोटी रुपये असणे, पर्यावरण विभागाच्या मंजुरीनुसार प्लॉट 1 वर बारा इमारती,

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे....

552 सदनिका, 50 दुकाने व 34 कार्यालय बांधणे आवश्यक असताना बेकायदेशीर व विनापरवाना 15 इमारती, 773 सदनिका व 115 दुकाने बांधण्यात आलेली असणे, तसेच इमारतीची उंची 36 मीटरपेक्षा कमी असणे आवश्यक असताना 39 मीटरपेक्षा जास्त बांधणे, यामुळे या फर्मखालील सदनिकाधारक, दुकानदार यांच्यामध्ये बांधकाम विकासकाबद्दल पसरलेला तीव्र असंतोष, आयकर, शासन व पुणे मनपा यांची झालेली फसवणूक, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायकराव मेटे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील उत्तर हे बिल्डर्स आणि भ्रष्ट अधिकारी यांची किती घट्ट मैत्री असू शकते याचे हे प्रतीक आहे. या लक्षवेधी सूचनेवरील अर्धे उत्तर हे चुकीचे आहे. माझ्याकडे या संबंधातातील सर्व कागदपत्रे आहेत. मी वर्तमानपत्राच्या माहितीच्या आधारावर बोलत नाही. असे असताना सर्रास सांगितले जाते की, असे नाही, तसे नाही. मी उप प्रश्न विचारण्यापूर्वीच माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, माझ्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या आधारे चौकशी केल्यानंतर चुकीचे उत्तर दिल्याचे निष्पन्न झाले तर ज्यांनी चुकीचे उत्तर दिले आहे, चुकीची माहिती दिली आहे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात येणार आहे काय? त्यानंतर मी माझे उप प्रश्न विचारतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी जे लेखी उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे, अर्धे उत्तर दिलेले आहे असा एक मूलभूत प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली कागदपत्रे सत्य समजून ती त्यांनी पटलावर ठेवल्यानंतर त्याची शहानिशा करून मगच संबंधित महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यात कुठेही कसूर केल्याचे किंवा चुकीची माहिती दिली असल्याची किंवा अर्धी माहिती दिल्याचे निदर्शनास आले तर त्यांच्यावर कायद्यान्वये योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय,.....

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी प्रश्न विचारावा.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला प्रश्न विचारण्यास अनुमती द्यावी.

**तालिका सभापती :** मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना प्रश्न विचारण्यास अनुमती दिलेली आहे. मी आपणास प्रश्न विचारण्यास अनुमती दिली होती. त्यास माननीय मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. आपणास प्रश्न विचारण्यासाठी नंतर पुन्हा संधी दिली जाईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ही कुठली पद्धत आहे ?

**तालिका सभापती :** कृपा करून आपण खाली बसावे. आपणास संधी जाईल.

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, ही चुकीची पद्धत आहे. आपण चुकीची पद्धत आणि पायंडे पाडू नको. असे केले तर पीठासीन अधिकारी या पदाचा अनादर केल्या सारखे होईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी अतिशय तपशीलवार आणि अनेक मुद्दे देऊन हा प्रश्न उपस्थित केला आहे. पुणे महानगरपालिकेच्या क्षेत्रात बिल्डर्सनी अनियमितता केलेली आहे. गेल्या 3 वर्षात झालेल्या अनियमिततेसंबंधात चौकशी करण्याचे शासनाने जाहीर करून देखील त्या चौकशीचे पुढे काय झाले हेच कळत नाही. आता येथे राजकीय इच्छाशक्ती दाखविण्याचे उत्तर माननीय राज्यमंत्र्यांनी दिले आहे. तेव्हा सदर चौकशीचे स्वरूप कसे राहणार आहे, यापूर्वी पुण्यासंबंधात ज्या चौकशा करण्यात आल्या आहेत त्यांचे काय झाले आहे, यासंबंधातील माहिती आम्हाला अवगत होण्यासाठी बैठक घेण्यात येणार आहे काय, त्यातून या प्रकरणी पुणे महानगरपाकि व नगरविकास विभागाने काय केले यासंबंधातील काही तरी उत्तरदायित्त्व आम्हाला स्पष्ट होईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील लेखी माहिती अर्धवट दिली आहे, चुकीची दिली आहे असे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचे म्हणणे आहे. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी दिलेली माहिती सत्य समजून ती व्हेरिफाय केल्यानंतर अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिली असेल तर ती तपासून घेण्यात येईल अशा प्रकारचे उत्तर मी आधीच दिलेले आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी यापूर्वी किती चौकशी समित्या स्थापन केल्या आहेत असा प्रश्न विचारला आहे.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील .......

सन्माननीय सदस्या डॉ.गोऱ्हे यांचा प्रश्न होता की, या विषयाच्या संदर्भात अगोदर कोणत्या समित्या स्थापन करण्यात आल्या व त्या समित्यांचा निष्कर्ष काय होते ? यासंदर्भात समित्या स्थापन केल्या जातील असे मी म्हणालो नाही. परंतु यासंदर्भात मला एवढेच म्हणावयाचे आहे की, यासंदर्भात ज्या काही समित्या स्थापन झाल्या असतील किंवा त्यांचे जे काही निर्णय झाले असतील ते संकलित करुन आपण ते पटलावर ठेवू शकतो.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सर्व प्रथम मी सदनाला हे सांगू इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी गांभीर्याने बोललो आहे. या लक्षवेधीच्या संदर्भात 732 फ्लॅट्स या बिल्डरने बांधलेले असून त्यासंदर्भातील सर्व ॲग्रीमेंट्स तसेच यासंदर्भातील सर्व ट्रकभर कागदपत्रे मी उद्या या सभागृहात आणून दाखवतो. गोयल गंगा डेव्हलपर्स या बिल्डर 80 हजार चौ.मीटर क्षेत्रफळावर 17 इमारती उभ्या करणार असून त्यापैकी 15 इमारतींचे काम पूर्ण झाले असून 2 इमारतींचे काम सुरु आहे. 737 फ्लॅटस बांधण्यात आले आहेत अशी माहिती निवेदनात देण्यात आली आहे परंतु निवेदनात त्यासंदर्भात चुकीची माहिती देण्यात आलेली आहे तसेच पुढे 470 ला परवानगी मिळाली, 115 प्लस 64 दुकाने अशी माहितीही देण्यात आलेली आहे. या लिल्डरने एफएसआयची चोरी केलेली आहे. सांस्कृतिक सभागृहाचे क्षेत्रफळ 5 हजार चौ.फुटाने कमी केले आहे. परंतु त्याची माहिती निवेदनामध्ये दिलेली नाही. तसेच या बिल्डरने 732 सदनिका धारकांना एका ॲग्रीमेंटद्वारा विक्री केली असून त्यासंदर्भात दुरुस्तीचा प्रस्ताव महानगरपालिकेला दिला व त्यामध्ये कमी क्षेत्रफळ दाखवले गेले. सदनिकांची विक्री झाल्यानंतर कमी क्षेत्रफळाच्या सदनिका सदनिका धारकांना देण्यात आल्या आहेत. या बिल्डरने प्रत्येक सदनिकेमागे 35 ते 40 चौ.फूट कमी क्षेत्रफळ दिलेले आहे. या चोरीच्या क्षेत्रफळामध्ये जवळपास एक ते दोन इमारती उभ्या राहू शकतील. पर्यावरणाच्या परवानग्यांच्या संदर्भात 35.80 मीटरची इमारतीची उंची असताना प्रत्यक्षात 39 मीटर उंच इमारत बांधली असून त्यामध्ये या बिल्डरने अनाधिकृत 2-2 मजले वाढवले आहे. वॉर्ड 36 च्या पुढे दोन जिने असावयास पाहिजे, फायर ब्रिगेडच्या सर्व सुविधा पाहिजे, त्या ठिकाणी जागा मोकळी असावयास पाहिजे परंतु यापैकी बिल्डरने काहीही केलेले नाही. बिल्डरने फक्त

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे ......

वाहनतळांची परवानगी असताना 732 वाहनतळे विकेलेली आहेत. वाहनतळासाठी जे बेसमेंट होते ते बेसमेंट दुकानासाठी विकरण्यात आले आहे. एवढेच नाही तर यामध्ये मुद्रांक शुल्क, जमीन विकासक शुल्क, एफएसआय फ्री कण्यासाठीचे शुल्क चुकवले आहे, व्हॅट, सेल्सटॅक्स तसेच इन्कमटॅकस दखील या बिल्डरने चुकवला आहे.

सभापती महोदय, बिल्डर आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मदतीने हा सर्व प्रकार झालेला आहे. या व्यवहारात पुण्यातील महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी रेस्टॉरंट आणि इतर काही गोष्टी घेतलेल्या आहेत. मला कोणाबद्दल व्यक्तिगत टिकाटिपणी करावयाची नाही. परंतु अशा प्रकारामुळे बिल्डर व अधिकारी भ्रष्ट झाले असून यामध्ये 150 ते 200 कोटी रुपयांचा फायदा बिल्डरला झाला आहे व 50 कोटी रुपयांचे नुकसान शासनाचे झालेले आहे. या प्रकरणामध्ये बिल्डर व अधिकाऱ्यांनी संगनमताने जो भ्रष्टाचार केला आहे त्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन संबंधितांवर फसवणुकीचे गुन्हे दाखल केले जातील काय ? ज्या सदनिका धारकांची 35 ते 40 चौ.फूटाची फसवणूक करण्यात आली आहे त्या सदनिका धारकांना नुकसानभरपाई दिली जाणार आहे काय ? कर चुकवेगिरीमुळे शासनाचे जे 50 कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे ते वसूल केले जाणार आहे काय ? तसेच या प्रकरणातील संबंधितांवर फसवणुकीचे गुन्हे किती कालावधीत केले जातील याची माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी अशी विनंती आहे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, सदनिका विक्री झाल्यानंतर 35 ते 40 चौ. फूट क्षेत्रफळ कमी देण्यात आले आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे परंतु अशा प्रकारची कोणतीही तक्रार कोणत्याही अधिकाऱ्याकडे अद्याप पर्यंत आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी उंचीच्या संदर्भात विचारणा केली आहे. परंतु मी उंचीच्या संदर्भात महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना विचारणा केली होती त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमची यासंदर्भात पाहणी झाली असून त्या ठिकाणी उंचीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे व्हायोलेशन झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी जीने, फायरब्रिगेड,वाहनतळ, बेसमेंटचे दुकानामध्ये कन्व्हर्शन तसेच मुद्रांक शुल्क आणि नोंदणी यासंदर्भात उल्लेख केलेला आहे. मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्काची

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील .......

माहिती त्या त्या संबंधित विभागाकडे आहे. मी यासंदर्भात अगोदर सांगितल्या प्रमाणे कोणत्याही बाबतीत सन्माननीय सदस्य जे काही सांगत आहेत ते सत्य समजून महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी परवानग्या देण्यामध्ये कुचराई केली असेल किंवा अनियमितता केली असेल तसेच अनाधिकृतपणे बिल्डरला मदत केली असेल तर त्यासंदर्भात शहानिशा केली जाईल. शहानिशेमध्ये चुकीचे काही आढळले तर संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई देखील केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**उप सभापती :** आता सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना या लक्षवेधी सूचनेवर शेवटचा प्रश्न विचारण्याची संधी दिली जाईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, या प्रकल्पातील नकाशांना सन 2007 मध्ये परवानगी घेण्यात आली होती. परंतु सन 2007 ते 2014 पर्यंत सात वेळेस परत परत परवानगी घेण्यात आलेली आहे. त्यामुळे या परवानग्या परत परत कशासाठी घेण्यात आल्या ? सदनिकेची विक्री झाल्यानंतर सुध्दा बिल्डरला फायदा होईल यासाठी परत परत परवानग्या देण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील सर्व कागद पत्रे मी उद्याच आपल्याकडे सादर करतो. त्यामुळे मी दिलेल्या कागदपत्रावरुन संबंधितांची सखोल चौकशी केली जाईल काय व ही चौकशी किती दिवसात पूर्ण केली जाईल ? सदर चौकशी करतांना आमच्याकडील कागदपत्रांना विश्वासात घेतने जाईल काय ?

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, या बिल्डरला महापालिकेने वेळोवेळी ज्या परवानग्या दिल्या किंवा नकाशामध्ये फेरबदल केले ते नियमाला धरुन आहे की, नाही याबद्दल खातरजमा केली जाईल. नकाशामध्ये जर काही चुकीचे केले गेले असेल तर त्यासंदर्भात शहानिशा केली जाईल.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी आपले प्रश्न संपवावे. आता मी लक्षवेधी सूचना सातवी पुकारीत आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी विचारलेल्या प्रश्नांच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांचे उत्तर तरी येऊ द्या. सभापती महोदय,....

**उप सभापती :**आपल्याला पाहिजे ती उत्तरे मंत्री महोदयांकडून मिळाली पाहिजे असा आग्रह सन्माननीय सदस्यांनी धरु नये. सन्माननीय सदस्यांनी नम्रतेने बोलावे. सन्माननीय सदस्यांनी प्रथम कसे बोलावयाचे असते ते प्रथम शिकावे. मी मंत्री महोदयांचे उत्तर बंद केले नाही. मंत्री महोदयांचे उत्तर जवळ जवळ पूर्ण झाले होते. पहिल्यांदा आपली लक्षवेधी लावण्याच्या संदर्भात आग्रह त्यानंतर लक्षवेधी सूचनेवर मंत्री महोदयांनी उत्तर काय द्यावे यासंदर्भात तुमचा आग्रह असे जर असेल तर सभागृह तुम्हीच चालवा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितलेली प्रत्येक बाब सत्य समजून संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी केली जाईल. चौकशीमध्ये अधिकारी दोषी आढळले तर संबंधितावर कडक कारवाई देखील केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांचा प्रश्न गंभीर असून त्यांना त्यावर मंत्री महोदयांचे गंभीर उत्तर हवे आहे. परंतु ते ज्या पध्दतीने बोलत आहे ते बरोबर नाही. या अगोदर तालिका सभापती महोदयांबरोबर सुध्दा त्यांनी जी भाषा वापरली ती योग्य नव्हती. हे वरिष्ठांचे सभागृह आहे. त्यामुळे तारतम्य आणि आदेश आपल्या सर्वांना पाळावेच लागतील.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर...

आपणास या सभागृहाचा डेकोरम पाळावा लागेल. सन्माननीय सदस्य ज्या भाषेत माननीय उप सभापतींशी बोलले ते पाहता त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे हे सांगण्यासाठी मी उभा आहे. ही बोलण्याची पद्धत होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्य ज्या पद्धतीने बोलत आहेत त्यास आम्हालाही त्या पद्धतीने उत्तर देता येईल. सन्माननीय सदस्य ज्या पद्धतीने बोलत आहेत ते पाहता तो सर्व सन्माननीय सदस्यांचा अपमान आहे. या सदनाचा अपमान आहे. आपण हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, यापूर्वी असे कधी झाले नाही. प्रत्येक सन्माननीय सदस्यांना त्यांनी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेवर समाधानकारक उत्तर मिळेलच असे नाही. परंतु सन्माननीय सदस्य आपल्याकडे पाहून ज्या पद्धतीने बोलत आहेत ते पहाता तो या सभागृहाचा अपमान आहे. आपल्याकडे हातवारे करुन आपण मंत्री महोदयांचे उत्तर थांबवीत आहात असा आरोप करणे देखील चुकीचे आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जे प्रश्न उपस्थित होतात त्या संदर्भात मंत्री महोदयांकडून समाधानकारक उत्तरे मिळविण्याचा सर्वांचा प्रयत्न असतो. आपण आसनस्थ असलेल्या त्या उच्च पदाचा मान राखणे हे प्रत्येक सन्माननीय सदस्यांचे प्राथमिक कर्तव्य आहे. सभापतीस्थानी असलेल्या उप सभापती बद्दल उपर्मद करण्याची भाषा करणे हे अत्यंत निषेधार्ह आहे आणि अशापद्धतीने कोणी वागत असेल तर अशा सदस्याला त्याच वेळी समज देणे हे त्या आसनाचे कर्तव्य आहे. आपण सभापतीस्थानी असताना अशाप्रकारचा अधीक्षेप अजिबात स्वीकारता येणार नाही, त्याचा निषेधच केला पाहिजे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पुणे शहरातील काही प्रश्न विचारले आणि प्रश्न विचारणे हा त्यांचा हक्क आहे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना मंत्री महोदय उत्तर देत होते. सन्माननीय सदस्यांना न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका देखील योग्य आहे. त्यांनी आग्रही असणे ही भूमिका देखील योग्य आहे. या प्रश्नाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी चौकशीची मागणी केली. ती मागणी देखील मंत्री

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट....

महोदयांनी मान्य केलेली आहे. हे ज्येष्ठ सभागृह आहे. आपल्या भावना कितीही तीव्र झाल्या तरी आपला आवाज हा भावनेतून व्यक्त न होता शब्दातून व्यक्त व्हावा अशी माझी इच्छा आहे. सभागृहातील वातावरण बिघडू नये असे मला वाटते. माझी आपणास विनंती आहे की, आपण सन्माननीय सदस्यांना असे सांगावे की, "सन्माननीय सदस्यांचा विषयाला न्याय देण्याच्या संदर्भात उद्रेक झाला असेल, पण अशामुळे सभागृहातील वातावरण चांगले राहत नाही." माननीय उप सभापती असे म्हणत होते की, आता मी हा प्रश्न थांबवितो. माननीय सभापती व माननीय उप सभापती माननीय मंत्र्यांचे उत्तर संपल्यानंतरच विषय संपवितात. तेवढा वेळ त्यांनी दिला होता पण आपण मध्येच उठल्यामुळे आपणास असे वाटले की, मंत्री महोदयांना मध्येच बसायला सांगितले. परंतु तसे माननीय उप सभापतींनी सांगितलेले नाही. मंत्री महोदयांचे उत्तर झाल्यानंतर ते खाली बसणार होते. सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी दिलगिरी व्यक्त करुन मोठे मन दाखवावे असे मला वाटते.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय सभापती व माननीय उप सभापती यांचेबद्दल सर्वांनी चांगली भावना दाखविली त्याबद्दल मला अतिशय आनंद आहे. आपण ती भावना पुढेही दाखवावी अशी माझी विनंती आहे. माझ्याकडून काही अनवधानाने चुकीचा शब्द गेला असेल तर त्याबद्दल माननीय संसदीय कार्य मंत्री यांनी सांगितल्याप्रमाणे मी दिलगिरी व्यक्त करतो.

**उप सभापती** : ठीक आहे. जे झाले ते झाले. परंतु यापुढे सन्माननीय सदस्यांकडून असे वर्तन घडू नये अशी माझी स्वतःची अपेक्षा आहे.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**लक्षवेधी क्रमांक 6 संबंधी**

**उप सभापती** : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेली लक्षवेधी क्रमांक 6 उद्या घेण्यात येईल.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : महा ऑनलाईन कंपनीने संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप करणे

**मु. शी.** : महा ऑनलाईन कंपनीने संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप करणे यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, सतीश चव्हाण, जयवंतराव जाधव, अनिल भोसले, नरेंद्र पाटील, संजय दत्त, ॲड.रामहरी रुपनवर, सर्वश्री अमरनाथ राजूरकर, सुभाष झांबड, डॉ.सुधीर तांबेवि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय ग्राम विकासमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात ग्रामविकास विभागामार्फत संगणकीय ग्रामीण महाराष्ट्र (संग्राम) हा प्रकल्प चालू असणे, या प्रकल्पांतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी महा ऑनलाईन कंपनीतर्फे एका सुशिक्षित बेरोजगाराची संगणक परिचालक म्हणून प्रत्येक ग्रामपंचायतीवर नियुक्ती करणे, या संगणक परिचालकांना द्यावयाचे वेतन व स्टेशनरी खर्च यासाठी रु.8000/- प्रतिमाह इतके मानधन देण्याचे निश्चित असणे, प्रत्यक्षात महा ऑनलाईन कंपनी या संगणक परिचालकांना केवळ रुपये 2500/- ते 3000/- इतकेच मानधन देत असणे, उर्वरीत रक्कम स्टेशनरीच्या नावाखाली वळती करुन घेत असले तरी प्रत्यक्षात प्रती ग्रामपंचायत स्टेशनरीवर केवळ 200/- रु. खर्च करीत असणे, मागील तीन वर्षात महा ऑनलाईन कंपनीने या वेतनापोटी राज्यातील 27 हजार संगणक परिचालकांच्या श्रमाचे चारशे कोटी रुपये हडप केल्याचे निदर्शनास येणे, महाराष्ट्र ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या संघटनेने वेळोवेळी आंदोलन करुनही कंपनीच्या या गैरव्यवहाराची कसलीही चौकशी न करुन कंपनीवर कार्यवाही न करण्यात येणे, वेतनासाठी आंदोलन करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कंपनीकडून काढून टाकण्यात येणे, 27 हजार संगणक परिचालकांना पूर्ण वेतन न मिळणे, किमान

श्री.धनंजय मुंडे....

वेतन कायद्याचा महा ऑनलाईन कंपनीकडून भंग होणे, कंपनीच्या भितीपोटी काम करीत असल्याने संगणक परिचालक वैफल्यग्रस्त होणे, त्यांच्यात यामुळे संतापाची लाट निर्माण होणे, 27 हजार युवकांच्या दृष्टीने महत्वाच्या या प्रश्नाकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत कंपनीच्या गैरव्यवहाराची चौकशी करुन करावयाची कारवाई व शासनाची भूमिका."

श्री. दीपक केसरकर (ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना मागील आठवड्यात चर्चेसाठी आली होती. त्यावेळी या लक्षवेधी सूचनेवर समाधानकारक उत्तरे न मिळाल्यामुळे ती राखून ठेवण्यात आली होती. राज्यातील जवळपास 27 हजार डेटा ऑपरेटर्सच्यादृष्टीने हा अतिशय महत्वाचा विषय आहे. महाराष्ट्र शासन आणि टाटा कन्सल्टसी सर्व्हीसेस यांची सहभागीदारी असलेली महाऑनलाईन कंपनी आहे. या कंपनीच्या माध्यमातून डेटा ऑपरेटर्सना काम देण्याचा निर्णय झाला. महाऑनलाईन कंपनीने हे काम युनिटी आय.टी.ला दिले. एका डेटा ऑपरेटरला प्रतिमाह 8 हजार रुपये मानधन देण्यात येते परंतु त्यामध्ये कागद, टोनर, प्रकल्प अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या इतर आज्ञावली विकसित करणे व इतर कामांचा त्या रकमेमध्ये समावेश आहे. मी मागील वेळी असा प्रश्न विचारला होता महाऑनलाईन कंपनी डेटा ऑपरेटर्सना थेट पगार देणार काय ? प्रति ऑपरेटर्सपोटी 8 हजार रुपये ठरलेले आहेत त्यामध्ये जो खर्चाचा तपशील दाखविण्यात आलेला आहे त्याबाबत मी मागील वेळी देखील विचारणा केली होती. जवळपास 27 हजार 920 ग्रामपंचायती आहेत. त्यातील प्रत्येक डेटा ऑपरेटर्सला 4 हजार 800 रुपये देण्यात येते म्हणजे जवळपास 13 कोटी 40 लाख प्रती महिना इतकी रक्कम अन अकाऊन्टेबल आहे. तेव्हा ज्या युनिटी आय.टी.ने हे काम केले त्या युनिटी आय.टी.ची चौकशी करणार काय ? राज्य सरकार महाऑनलाईन कंपनीमार्फत डेटा ऑपरेटर्सना थेट 5 हजार 500 रुपये पगार देईल काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्यामध्ये दोन भाग आहेत. व्हीएलई म्हणजे व्हीलेज लेव्हल इन्ट्रप्युनर यांच्या मानधनामध्ये वाढ करता येईल का असा प्रश्न विचारलेला आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की, आपण त्यांचे मानधन 4100 रुपयांवरुन 4500 रुपयांपर्यंत केले आहे. मानधनामध्ये आणखी वाढ करण्याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार सुरु आहे. ज्यावेळी एखादी टेक्निकल गोष्ट करायची असते किंवा ज्यामध्ये खूप एक्स्परटाईज इन्व्हॉव्ह असतो ते काम आय.टी.विभागामार्फत केले जाते. राज्यात ही योजना राबविण्यात आली त्यावेळी एक समिती नेमण्यात आली होती. त्या समितीमध्ये ग्रामविकास विभागाचे सचिव अध्यक्ष तर आय.टी.विभागाचे सचिव हे सदस्य सचिव होते. त्यावेळी डेटा ऑपरेटर्सचे

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर....

मानधन 3700 रुपये ठरले होते. त्यानंतर त्यामध्ये वाढ होऊन ते 4100 रुपये आणि नंतर 4500 रुपये करण्यात आले. आणखी वाढ करण्यामध्ये काही दुमत नाही. आपण जे 8 हजार रुपये देतो त्यामध्ये दोन भाग आहेत. पहिला भाग म्हणजे संपूर्ण सॉफ्टवेअर विकसित करणे, ती संपूर्ण यंत्रणा चालविणे आणि हे काम महाऑनलाईन कंपनीस दिलेले आहे. महाऑनलाईनने त्या कामाचे आऊट सोर्सिंग केले आहे. असे करताना चांगल्या कंपनीने प्रिंटर्स देण्यास सांगितले. या कामासाठी कॅनन कंपनीचे प्रिंटर्स वापरण्यात येत आहेत. कोणत्याही कामाचे आऊटसोर्सिंग करीत असताना ते काम कोणती कंपनी करते हे देखील पहावे लागते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, युनिटी कंपनीस दिलेले मार्जीन जास्त आहे. हा विषय टेक्निकल समितीपुढे ठेवण्यात येऊन त्या समितीकडून याची पूर्ण चौकशी करण्यात येईल. कारण हे सर्व टेक्निकल समितीने करुन दिलेले आहे. सॉफ्टवेअर इंजिनिअर्सना लाखो रुपये द्यावे लागतात. व्हीएलईचे काम फक्त इन्ट्री करणे एवढेच नाही तर त्यांना वेगवेगळ्या प्रकारचे 33 दाखले द्यावे लागतात. आपण त्यांना प्रत्येक दाखल्यासाठी वेगळे तीन रुपये देणार आहोत. या माध्यमातून त्यांना चांगले उत्पन्न मिळावे अशी शासनाची भावना आहे. आता 13 व्या वित्त आयोगाचा कार्यकाल संपत आहे. व्हीएलईचे वेतन किती वाढवावे याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल. ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना 10 हजार रुपयांपेक्षा जास्त पगार मिळत असेल तर या व्हीएलईंना 5 हजार 900 रुपये देण्याचे ठरले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर....

आणि 50 ते 10 हजार असेल तर त्या कर्मचाऱ्यांना 5700 रुपये मिळतात. पण 1 हजार पेक्षा कमी एंट्री असेल तर त्यांना 5100 रुपये मिळतात. त्या ठिकाणी दुसरा जो कर्मचारी वर्ग काम करतो त्यांना जास्तीत जास्त 5100 रुपये पगार मिळतो. त्यामुळे या गोष्टीचा सुध्दा आपण विचार केला पाहिजे. व्हीएलई यांना अधिकाधिक मानधन कसे मिळेल याबाबत जास्तीत जास्त प्रयत्न करण्यात येतील. तसेच सन्माननीय सदस्यांनी युनिटी-आयटी कंपनीची चौकशी करण्याबाबत सांगितले आहे. या बाबतीत चौकशी करण्यात येईल आणि चौकशीत जे निष्पन्न होईल ती बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. परंतु मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, मी महाऑनलाईन कंपनीबाबत बोललो नव्हतो. युनिटी-आयटी ही कंपनी गेल्या तीन वर्षांपासून हे काम करीत आहे. महाऑनलाईन कंपनी युनिटी-आयटी या कंपनीला पैसे देते. त्यांनी पूर्वी डेटा एंट्री ऑपरेटरला केवळ 3200 रुपये मानधन दिले आहे. मी एका तालुक्याच्या बाबतीत सांगितले होते की, प्रिंटरसाठी किंवा अन्य कामांसाठी एक लाख रुपयांच्या वर तेथे गेलेच नाहीत. यामध्ये युनिटी-आयटी कंपनीचा फायदा झाला असेल तर युनिटी-आयटी या कंपनीची गेल्या तीन वर्षातील कारभाराची चौकशी केली पाहिजे. महाराष्ट्र राज्य ई-पंचायतीमध्ये देशात गेल्या तीन वर्षांपासून सलग पहिल्या क्रमांकावर आहे. कर्नाटक राज्यात डेटा एंट्री ऑपरेटरला कामगार कायद्यानुसार किमान वेतन दिले जाते. राज्यामध्ये 28 हजार डेटा एंट्री ऑपरेटर्स आहेत. मी विचारु इच्छितो की, या ऑपरेटर्सना किमान वेतन कायद्यानुसार वेतन देण्यात येईल काय ? राज्य सरकार महाऑनलाईन कंपनीला एकूण 8 हजार रुपये देते. त्यातील 1 हजार रुपये महाऑनलाईन कंपनी स्वत: ठेवते आणि उर्वरित 7 हजार रुपये युनिटी-आयटी कंपनीला देते. त्यामुळे किमान वेतन कायद्यानुसार डेटा एंट्री ऑपरेटरला किमान 5500 रुपये मिळाले पाहिजे. तरच या डेटा एंट्री ऑपरेटर्सना कुठे तरी न्याय मिळेल. महोदय, डेटा एंट्री ऑपरेटर्सनी तीन वेळा मुंबईमध्ये आंदोलन केले होते. माननीय मंत्री महोदय, आपण हिवाळी अधिवेशनात या विषयी उत्तर दिले होते. ग्रामीण भागात डेटा एंट्री

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

ऑपरेटर म्हणून काम करणाऱ्या मुलांना न्याय मिळावा अशी आमची रास्त अपेक्षा आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, युनिटी-आयटी या कंपनीच्या अनअकाऊंटेबल रकमेची राज्य सरकार चौकशी करणार काय, तसेच चौकशीमध्ये त्या कंपनीकडे आगाऊ रक्कम आढळल्यास त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करुन ती रक्कम वसूल करण्यात येईल काय ?

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, व्हीएलई हे केवळ मानधनावर अवलंबून नसतात तर त्यांना इतर सुध्दा इन्कम असते. व्हीएलई यांचे मानधन 5500 रुपयांच्या वर निश्चितपणे जाईल याची मी आपल्याला खात्री देतो. ते मानधन 5500 रुपये करता येईल काय हे सुध्दा आम्ही तपासून बघू. यामध्ये दुमत नाही. डेंटा एंट्री ऑपरेटर जेवढ्या एंट्री करतात तेवढे...(अडथळा) ऑपरेटर्सना सुरुवातीपासून 3500 रुपये दिले जातात ही वस्तुस्थिती आहे. महोदय, ही बाब आम्ही चेक करु सन्माननीय विरोधी पक्ष नेते जे सांगत आहेत त्यामध्ये तथ्य आढळले तर....(अडथळा) महोदय, माझी विनंती आहे की, मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. ही लक्षवेधी सूचना आज तिसऱ्यांदा चर्चेला आली आहे.

महोदय, व्हीएलईचे मानधन 5500 रुपयांपर्यंत नेता येईल काय हे तपासून बघण्यात येईल. युनिटी-आयटी कंपनीला जादा रक्कम दिली असेल तर ते तपासण्याची तयारी दाखविली आहे. मी निदर्शनास आणून देतो की, पूर्वी केवळ 6 लाख एंट्री होत होत्या. परंतु एंट्री बेस्ड सिस्टीम आल्यामुळे आज 12 लाख एंट्री होतात. त्यामुळे एंट्री करणाऱ्यांनी सुध्दा जास्तीत जास्त काम केले पाहिजे. एंट्री बेस्ड सिस्टीम लिंक केल्यामुळे राज्याला सुध्दा न्याय मिळत आहे. माझी विनंती आहे की, मला पूर्ण माहिती देऊ द्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सर्वप्रथम मी एक गोष्ट क्लीअर करते की, व्हीएलई यांना शासनाकडून पगार दिला जात नाही. त्यांना उद्दिष्टपूर्तीनुसार मानधन दिले जाते. त्यांचे पेमेंट करताना 10 टक्के रक्कम रिकन्सीलेशनसाठी ठेवली जाते. त्यानंतर सर्व गोष्टींचा हिशेब व अभ्यास करुन ती रक्कम रिलीज केली जाते. आजही या लोकांची 75 कोटी रुपयांची रक्कम बीड जिल्ह्याकडे आहे. त्यामुळे सर्व बाबींचा हिशेब केल्याशिवाय ती रक्कम अदा करण्यात

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे....

येणार नाही. जर आम्हाला हिशेबामध्ये काही तफावत आढळली तर त्याबाबत शासनाकडून योग्य तो निर्णय घेतला जाईल. परंतु शासनाचा एकही रुपया वाया जाणार नाही याची शाश्वती मी या सभागृहाच्या माध्यमातून देते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य सरकार महाऑनलाईन या कंपनीला जबाबदार आहे. यामध्ये युनिटी-आयटी कंपनी कोण आहे हे आम्हाला माहीत नाही. मला वाटते ही चर्चा वेगळ्या दिशेने जात आहे. बालवाडीचे टेंडर हे मार्केटींग फेडरेशनला मिळते आणि फेडरेशनकडून ते काम अन्य व्यापाऱ्यांना दिले जाते. राज्य सरकार हे केवळ महाऑनलाईन कंपनीला ओळखते. त्यामुळे आपण युनिटी-आयटी कंपनीची वकिली का म्हणून करीत आहात ? राज्य सरकारचा युनिटी-आयटी कंपनीशी काहीही संबंध नाही.

महोदय, रायगड जिल्ह्यात महाऑनलाईनच्या टोनर, स्टेशनरीची रक्कम ही ग्रामपंचायतीतून खर्ची पडते. कारण ती रक्कम वेळेवर येत नाही. त्यामुळे या संदर्भातील चौकशी करण्यात येईल काय ? तसेच दुसरी बाब अशी की, गरीब ऑपरेटर्सचे 192 कोटी रुपये गिळंकृत केले जातात. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, राज्य सरकार महाऑनलाईन कंपनीला सदरहू काम महाऑनलाईने कंपनीनेच करावे या बाबतचे आदेश देणार काय, यापुढे जी कंपनी स्वतः काम करेल त्याच कंपनीला काम देण्यात येईल काय, तसेच एका कंपनीला दिलेल्या कामाचे सबलीज करण्यास राज्य सरकार परवानगी देणार नाही असा धोरणात्मक निर्णय राज्य सरकार घेईल काय ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्वतःच क्लिअर केले आहे की, युनिटी-आयटी कंपनीशी राज्य सरकारचा संबंध नाही. त्यामुळे हे स्पष्ट होते की, आम्ही कोणाचीही वकिली करीत नाही. मी मघाशी स्पष्ट सांगितले आहे की, शासनाचा एकही पैसा वाया जाणार नाही याची शाश्वती या पवित्र सभागृहात मी देत आहे.

महोदय, मघाशी माननीय विरोधी पक्ष नेते कामगार कायद्याबाबत बोलले. मी सांगू इच्छिते की, डेटा एंट्री ऑपरेटर हे कामगार कायद्या अंतर्गत येत नाहीत. ते व्हीएलई आहेत. महाऑनलाईन कंपनीने त्यांना डेटा एंट्रीचे काम दिले आहे. शासनाने त्यांना नियुक्त केलेले नाही.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे....

त्यामुळे त्यांना कामगार कायदा लागू करता येत नाही. तसेच 'त्यांचे 8 हजार रुपये' असा या ठिकाणी उल्लेख केला आहे. मला वाटते हा उल्लेख सुध्दा चुकीचा आहे. कारण 8 हजार रुपये पूर्णपणे त्यांना देण्याबाबतचा विषय कधीही क्लिअरली समजला गेला नाही. मी सांगू इच्छिते की, हे 8 हजार रुपये सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटसाठी, मेन्टनन्ससाठी आणि स्टेशनरी साठी आहेत. मला वाटते माननीय सदस्यांनी हा विषय समजून घ्यावा. राज्याची आणि सभागृहाची दिशाभूल होऊ नये म्हणून मी काळजी घेत आहे. 8 हजार रुपये हे त्या लोकांचे आहेत, असे चुकीचे रेकॉर्डवर आलेले आहे. वास्तविक पाहता असे म्हणणेच मुळी चुकीचे आहे. मी पुन्हा सांगते की, 8 हजार रुपये त्यांचे नाहीत. हे 8 हजार रुपये त्यांनी केलेल्या डेटा एंट्रीच्या मोबदल्यापोटी, सॉफ्टवेअर मेन्टनन्स, स्टेशनरी आणि सर्व गोष्टी ऑपरेट करण्यासाठी लागणारा खर्च या बाबतचे आहेत. महोदय, ही लक्षवेधी सूचना तीन वेळा राखून ठेवली होती. त्यामुळेच मी आता उत्तर देण्यासाठी उभी राहिली आहे. स्टेशनरीचा रँडमली खर्च तोंडी 200-300 रुपये लागतो असे सांगितले जाते. परंतु ती वस्तुस्थिती नाही. यामध्ये प्रिंटरचा समावेश नाही. यात फक्त टोनरचा समावेश आहे. बाजारामध्ये टोनरची किंमत जवळपास 4090 रुपये आहे. त्यामधून 700 ते 1000 प्रींटआऊट निघू शकतात.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे ....

आपण त्या हिशेबाने विचार केला तर 2 महिन्यांत अंदाजे एखादा टोनर या लोकांना लागतो. बाजारात टोनरची किंमत 4090 रूपये आहे, तो त्यांना 3700-3800 रूपयापर्यंत मिळत असावा. सन्माननीय सदस्य म्हणाले की, स्टेशनरी दिली नाही. मी सांगू इच्छिते की, आपल्याकडे त्यांचे 75 कोटी रूपये आहेत. आपण हिशेब केल्याशिवाय त्यांचे पैसे रिलिज करणार नाही हे मी आपल्याला सभागृहाच्या माध्यमातून सांगते.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, युनिटीआयटीशी शासनाचा काहीही संबंध नाही असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. मी विचारतो की, 28 हजार डेटा ऑपरेटर यांच्याशी मानधनाच्या संदर्भात कोणी करार केले याचे उत्तर मिळाले पाहिजे. मी मागच्या वेळी सुध्दा सांगितले होते. आम्ही म्हणत नाही की, त्यांचे मानधन 8 हजार रूपये आहे. आमचे म्हणणे स्पष्ट आहे की, स्टेशनरीसाठी दाखविण्यात आलेला खर्च अनअकाऊंटेड आहे. सदर खर्च कसा अनअकाऊंटेड आहे हे मी एका तालुक्याचे उदाहरण देताना सांगितले होते.

सभापती महोदय, परळी तालुक्यात 3 वर्षांत स्टेशनरीसाठी 1 लाख 11 हजार रूपये आले आहेत आणि मानधनापोटी मात्र त्यांना 2 कोटी 37 लाख 52 हजार रूपये मिळाले आहेत. एका तालुक्यापोटी 3800 रूपये प्रत्येकी मानधन वजा केल्यास कंपनीला 1 कोटी 40 लाख रूपये महिन्याला नफा मिळाला आहे. मी आपल्याला पाहिजे असल्यास पुराव्यानिशी देतो. मला माहीत आहे की, सभागृहात सदर लक्षवेधी सूचना उपस्थित केल्यानंतर ग्रामविकास विभागाच्या मंत्री कार्यालयातून या तालुक्याची माहिती घेण्यात आली, ही माहिती सुध्दा त्यांच्याकडे आहे. मी हे जबाबदारीने सांगत आहे.

सभापती महोदय, युनिटीआयटीने सर्व डेटा ऑपरेटर्संबरोबर करार केला आहे. डेटा ऑपरेटर्संची संख्या 28 हजार असल्याने किमान त्यांना कामगार कायद्यानुसार मानधन मिळावे. जन्म नोंद, मृत्यू नोंद, गरोदर महिला नोंद अशा गावातील प्रत्येक गोष्टीची नोंद डेटा ऑपरेटर्संना ठेवायची आहे. मात्र त्यांना त्या संदर्भातील काम 3200 रूपयांमध्ये करावे लागत आहे. आमचे म्हणणे एवढेच आहे की, डेटा ऑपरेटर्संना 5500 रूपये मानधन द्यावे. मी अनअकाऊंटेड रक्कम

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

कशी आहे हे स्पष्ट केले आहे. प्रिंटर किती रूपयांचा आहे हा विषय नाही. निधी किती दिला जातो हा विषय महत्त्वाचा आहे. त्यामध्ये किती घोळ आहे हे आपण पाहिले पाहिजे. मागील 3 वर्षांची पूर्ण चौकशी झाली पाहिजे आणि डेटा ऑपरेटर्सना किमान 5500 रूपये मानधन दिले पाहिजे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले तेच मी म्हणत आहे की, शासनाने त्या डेटा ऑपरेटर्सशी करार केलेला नाही. मला एवढेच सांगायचे आहे की, त्या मुलांच्या विषयी पूर्ण सहानुभूती आहे. शासन स्थापन झाले त्यावेळी त्या डेटा ऑपरेटर्सना 3700-3800 रूपये मानधनापोटी मिळत होते, त्यामुळे त्यांना 4500 रूपये द्यावेत असे शासनाने निर्देश दिले होते. स्टेशनरीसाठी 1300 रूपये सीओंकडे राखून ठेवण्याचाही मोठा निर्णय घेतला आहे. शासनाला फेअर पॉलिसी राबवायची आहे. फेअर वितरण झाले पाहिजे. प्रत्येक रूपया खर्च झाला पाहिजे. आपल्याला यावर अंकूश ठेवायचा आहे. अनअकाऊंटेड पैसा आहे असे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांचे म्हणणे असेल तर ते तपासून पाहण्यासाठी आम्ही तयार आहोत. आम्ही त्यास नकार देत नाही. समिती सुध्दा नेमली आहे. सचिव, आयटी, डायरेक्टर, आयटी, आरडीडी सचिव, नियोजन सह सचिव, वित्त सचिव, एनआयसी संचालक, आयआयटीचे प्राध्यापक श्री. हरिएन पांडा यांच्या समितीने मिळून हा निर्णय घेतला आहे. (अडथळा) प्रश्न विचारल्यावर उत्तर ऐकण्याची सवय पाहिजे. फक्त प्रश्न विचारणे इतकेच विरोधी पक्षाचे काम नाही. उत्तरही ऐकले पाहिजे.

सभापती महोदय, 10 टक्के पैसे राखून ठेवले आहेत. कुठेही अनअकाऊंटिबिलीटी आढळल्यास त्या संदर्भात योग्य निर्णय करून कंपनीच्या बाबतीत कठोर कारवाई करण्याचा मी शब्द देते.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहात प्रश्न जबाबदारीने उपस्थित केला जातो. सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला प्रश्न सत्य मानून त्या संदर्भात चौकशी करावी लागते. मी एका तालुक्याच्या संदर्भात निदर्शनास आणल्यानंतर तत्संदर्भात चौकशी करण्याचा विषय येत नाही. मी निदर्शनास आणून दिले आहे. एका तालुक्यात स्टेशनरीसाठी 3 वर्षांत फक्त 1 लाख 11 हजार आले हे निदर्शनास आणून दिले आहे. एका तालुक्यात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

मानधनापोटी 2 कोटी 67 लाख रूपये गेली आणि अनकाऊंटेड रक्कम 1 कोटी 40 लाख रूपये असल्याचे मी सांगत आहे. मग याची पाहणी करून चौकशी काय करणार ? माझे म्हणणे आहे की, या संदर्भात चौकशीचे आदेश झाले पाहिजेत. आपण तत्संदर्भात चौकशीचे आदेश द्यावेत आणि डेटा ऑपरेटर्सना 5500 रूपयांप्रमाणे मानधन करण्यात यावे. सदर प्रकरणाच्या चौकशी बाबतीत शासन तयार असेल तर आम्ही स्वागत करतो. आमची अडचण नाही. आम्ही सांगितलेली माहिती सत्य मानून चौकशी केली पाहिजे. माझा व माननीय मंत्र्यांचा तालुका एकच आहे. मी त्या तालुक्याचीच माहिती सांगितली आहे. आपण त्याबाबतीत चौकशी लगेच जाहीर करावी.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली एका तालुक्याची माहिती सत्य मानून, त्या तालुक्याच्या सर्व अधिकाऱ्यांना बोलावून त्यांचा कॉम्प्युटराईज्ड सर्व अकाऊंटिंग आहे ते तपासून याबाबतीतील निर्णय लवकर उद्याच्या उद्या बोलावून घेईन असा मी शब्द देते. डेटा ऑपरेटर्स यांचे मानधन वाढविण्याच्या बाबत आमचा सहानुभूतीपूर्वक विचार आहे. आम्ही आल्यापासून त्यांचे 700 रूपयांपर्यंत मानधन वाढविले आहे. त्यामुळे त्यांचे मानधन वाढविण्याकडे आमचा कल आहे. 14 व्या वित्त आयोगामध्ये डेटा ऑपरेटर्सना जास्त प्राधान्य देऊन त्यांचे मानधन वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. दीपक केसरकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य म्हणाले की, मी युनिटीची वकिली करीत आहे. मी सांगू इच्छितो की, मी कधीही अशी वकिली केलेली नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. मंत्री महोदय आपण खाली बसावे.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>लक्षवेधी सूचनांच्या संदर्भातील वेळ वाढविण्याबाबत</u>

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना महत्त्वाची असल्यामुळे लक्षवेधी संपेपर्यंत वेळ वाढवून द्यावा.

**उप सभापती** : ठीक आहे. मी सभागृहाची वेळ लक्षवेधी सूचना संपेपर्यंत वाढवित आहे.

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : पूरक पोषण आहार योजनेत पडलेला खंड

**मु.शी.** : पूरक पोषण आहार योजनेत पडलेला खंड याबाबत सर्वश्री दीपकराव साळुंखे, धनंजय मुंडे, प्रा. जोगेंद्र कवाडे, श्री. प्रकाश गजभिये, ॲड. जयदेव गायकवाड, सर्वश्री प्रकाश बिनसाळे, हेमंत टकले, जयवंतराव जाधव, ख्वाजा बेग, आनंद ठाकूर, अब्दुल्ला खान दुर्राणी, ॲड. राहुल नार्वेकर, सर्वश्री अमरसिंह पंडित, विक्रम काळे, सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंगणवाडीतील स्तनदा माता, 0 ते 6 वर्षे वयोगटातील बालके व इतर लाभार्थ्यांना चांगल्या दर्जाचा पुरक पोषण आहार घरपोच मिळावा याकरिता आहार पुरवठ्याच्या प्रक्रियेतून कंत्राटदार/ठेकेदार यांना वगळून महिला बचत गटांमार्फत विकेंद्रीत स्वरुपात सदरचे काम देण्याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी निर्देश देणे, त्याआधारे शासनाने सन 2013-2014 मध्ये महिला बचत गटांकडून अर्ज मागविणे, त्यातील निकषांनुसार 450 युनिटसमध्ये महिला बचत गटांची निवड करण्यात येणे, यापैकी सुमारे 350 बचत गटांशी तीन वर्षाच्या करारावर करारनामे करण्यात येऊन काम पुर्ण क्षमतेने सुरु करणे, 100 पेक्षा अधिक बचत गटांना जाणीवपूर्वक व विशिष्ट हेतूने कार्यारंभ आदेश अद्याप न देण्यात येणे, सदरच्या 450 महिला बचत गटांनी विविध निकषातील अटी व शर्तीनुसार युनिट उभारण्याकरीता 25 ते 30 लक्ष रुपयांचे कर्ज उभारणी करुन मशिनरी व वीज जोडणी याकरिता खर्च करुन युनिट उभारणे, कार्यरत महिला बचत गटांची आर्थिक कुचंबणा करण्यासाठी जाणीवपूर्वक माहे ऑक्टोबर,2014 पासून त्यांची देयके प्रलंबित ठेवणे, सदरची महिला बचत गट युनिट बंद पडावीत या हेतुने 41 पानी मार्गदर्शक नियमावली

श्री. दीपकराव साळुंखे ....

विभागाने निर्गमित करणे, मार्गदर्शक नियमावलीनुसार ग्रामीण भागात तालुका पातळीवर युनिटला कॉर्पोरेट लुक देण्याकरिता किमान 20 ते 25 लक्ष रुपये वाढीव खर्च अपेक्षित असणे, ही सर्व प्रक्रिया जाणीवपूर्वक महिला बचत गटांचे काम बंद पाडुन आहार पुरवठ्याच्या कामात खंड निर्माण होऊ नये, या सबबीखाली काही विशिष्ट कंत्राटदारांचा मागील दराने आहार पुरवठा प्रक्रियेत समावेश करण्याचा हेतु असल्याबाबतची चर्चा, या संदर्भात संबंधितांनी मुख्यमंत्र्यांकडे दाद मागुनही उपयोग न होणे, महाराष्ट्रातील बालकांच्या आरोग्य व जिवीताशी कंत्राटदारांच्या फायद्यासाठी खेळण्याचा होत असलेला प्रयत्न, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, शासनाने सन 2009 मध्ये 6 महिने ते 6 वर्षे वयाच्या बालकांना, स्तनदा व गरोदर मातांना सूक्ष्म तंतूयुक्त पोषण आहार पुरवठा व्हावा म्हणून सर्वोच्च न्यायालयाच्या गाईडलाईन्सप्रमाणे हे काम राज्यातील महिला बचत गटांना देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु दुर्दैवाने प्रत्यक्षात महिला बचत गटांना हे काम देण्याऐवजी राज्यातील तथाकथित 3 महिला बचत गटांना, महिला मंडळांना हे काम देण्यात आले आहे. आहार पुरवठ्याच्या संदर्भात अनेक तक्रारी आल्या आहेत. सदर पोषण आहार इतर राज्यातून आणून त्याची पाकिटे 4 महिन्यानंतर स्तनदा माताना, बालकांना देण्याचे काम झाले. तत्संदर्भात फार मोठ्या प्रमाणात तक्रारी करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयाने त्या संदर्भात चौकशी समिती नेमली. चौकशी समितीने तातडीने तीनही संस्थांचे काम बंद करून प्रत्यक्षात काम करणाऱ्या महिला बचत गटांना हे काम द्यावे असे निर्देश दिले. श्री. उज्ज्वल उके, आयसीडीएस आयुक्त असताना त्यांनी राज्यातील सर्व महिला बचत गटांना हे काम देण्याच्या दृष्टीनी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समित्या नेमल्या आणि साडे तीनशे महिला बचत गट अंतिम करून ते काम सुरू झाले.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक साळुंखे........

पूर्वीच्या 3 तथाकथित संस्थांची वकिली करण्यासाठी राज्यातील एक संस्था नागपूर खंडपीठामध्ये गेली आणि त्यांनी तेथे एक याचिका दाखल केली. सरकारने कोर्टामध्ये एक खोटे ॲफेडेव्हिट दाखल केले. वास्तविक पाहता, सर्वोच्च न्यायालयात असा निर्णय झाला होता की, महिला बचत गटांना काम द्यावे आणि अटी व नियम थिथिल करुन त्यांना काम दिले पाहिजे. याप्रमाणे 350 बचत गटांना काम दिले गेले आणि काम सुरळीत सुरु झाले. 64 बचत गटांची कामाची निविदा फायनल झाली. परंतु, नागपूर खंडपीठाचा निर्णय दाखवून आय.सी.डी.एस.कमिशनर यांनी ते काम थांबविले. महिला बचत गटातील आमच्या माता-भगिनींनी घरे, सोनेनाणे गहाण ठेऊन मशिनरी आणल्या आहेत. परंतु, गेल्या एक वर्षापासून त्यांचा पुरवठा थांबविण्यात आला आहे. ज्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, त्याप्रमाणे हा पुरवठा सुरु झाला नाही तर महिला बचत गटातील महिलांचे आत्महत्या सत्र सुरु होईल, अशी परिस्थिती यामुळे निर्माण झाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिल्यानंतर सुध्दा पूर्वीच्या 3 संस्थांचा पुरवठा बंद न करता तो आजही सुरु आहे. या निमित्ताने दोन प्रश्न मला उपस्थित करावयाचे आहेत.

सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या विशेष कमिटीने पूर्वीच्या 3 महिला बचत गटांना दिलेले काम तातडीने बंद करावे, त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करावी, असे आदेश दिले होते का ? ज्या 64 महिला बचत गटांच्या निविदा अंतिम झाल्या होत्या, प्रक्रिया पूर्ण झाली होती, त्यांचा पुरवठा आदेश तातडीने देणार का ?

सभापती महोदय, सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांनी दिनांक 31 मार्च, 2015 ला पुरवठा आदेश द्यावेत, अशा प्रकारची शिफारस राज्य शासनाकडे केलेली आहे. तथाकथित 3 महिला संस्थांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करुन सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे त्यांचे काम ताबडतो बंद करणार आहात का ? त्यांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी दोन्ही सदनाच्या सन्माननीय सदस्यांची समिती नेमणार का ? ज्या 64 संस्थांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्यांना पुरवठा आदेश आजच देणार आहात का ? कारण दोन दिवस हे आदेश लांबविले तर तथाकथित संस्थांचे काम पुन्हा सुरु होणार आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक साळुंखे........

श्री.पंकजा मुंडे : सभापती महोदय, मूळ लक्षवेधी सूचना 64 बचत गटांना पुरवठा आदेश देण्याबाबतच्या महत्त्वाच्या विषयासंबंधी आहे. त्या विषयी शासन सकारात्मक आहे. 553 प्रकल्पांची सुरुवात करीत असताना 314 ठिकाणी पात्र असलेल्या बचत गटांना काम देण्यात आले. एकूण 378 बचत गट पात्र ठरले होते. त्यापैकी 64 बचत गटांच्या प्लँट उभारणीमध्ये तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यांची तयारी नसल्यामुळे ते काम लांबले. त्यानंतर कोर्टाचा स्टे आल्यामुळे 3-4 महिन्यांचा कालावधी लोटलेला आहे. त्यामुळे त्यांना वर्क ऑर्डर देण्यामध्ये दिरंगाई झाली आहे, हे मी मान्य करते. कोर्टाच्या आदेशामुळे आयुक्तांनी आदेश पारित केले होते. पण आता आम्ही या 64 बचत गटांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेण्यासाठी तयार आहोत.

सभापती महोदय, केवळ तीनच नाही तर सर्वच संस्थांचे इव्हॅल्युएशन करण्याबाबत केंद्र सरकार आणि सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. एकदा ऑर्डर दिली म्हणजे ती लाईफ टाईमसाठी दिली, असे नाही तर दरवर्षी त्या संस्थांचे इव्हॅल्युएशन झाले पाहिजे, ही आमची भूमिका आहे. आम्ही सत्तारुढ झाल्यानंतर असे आदेश दिलेले आहेत की, सर्व महिला संस्था, बचत गट, ग्राम समुदाय संस्था यांचे इव्हॅल्युएशन झाले पाहिजे, त्यांची तपासणी झाली पाहिजे. कारण, सर्वोच्च न्यायालय आणि केंद्र शासनाच्या मुख्य ध्येयाकडे आपण दुर्लक्ष करीत आहोत. कुपोषित बालकांना चांगल्या प्रकारचा आहार मिळावा, हा मुख्य उद्देश असून महिला बचत गटांना काम मिळावे, हा त्यामधील एक भाग आहे. मुख्य मुद्दा हा आहे की, कुपोषण दूर झाले पाहिजे आणि त्या कार्यक्रमात जास्तीत जास्त महिला बचत गटांचा समावेश करुन कशा प्रकारे काम करता येईल, यासंदर्भात शासन सकारात्मक पावले उचलणार आहे.

सभापती महोदय, मी मंत्री झाल्यानंतर चौकशीचे आणि इव्हॅल्युएशनचे आदेश दिलेले आहेत. तो अहवाल आमच्याकडे आल्यानंतर आणि त्याच्या तपासणीनंतर एक महिन्यात 64 संस्थांना वर्क ऑर्डर देण्यात येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 64 बचत गटांना आदेश देण्यासाठी आणखी एक महिन्याचा वेळ शासनाला लागणार आहे. गेल्या दोन महिन्यांपासून जिल्हाधिकाऱ्यांनी आयुक्तांना

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे......

असे सांगितले आहे की, आम्ही या बचत गटांनी तयार केलेल्या प्लँटची पहाणी केली आहे. पहाणी करण्याबाबत शासनानेच त्यांना आदेश दिले होते. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. या समित्यांनी पहाणी केली असून ॲप्रुव्हल रिपोर्ट पाठविले आहेत. तरी देखील आय.सी.डी.एस.कमिशनर यांनी वर्क ऑर्डर दिलेली नाही. यामधून स्पष्टपणे शासनाचा असा उद्देश लक्षात येतो की, पूर्वी ज्या बचत गटांची या कामासाठी निवड झालेली आहे त्यामधील 64 बचत गटांची ऑर्डर मागील 3 महिन्यांपासून प्रत्येक वेळी थांबविली गेली आहे. जेणेकरुन जुन्या कॉंट्रॅक्टरना दोन महिन्यांचे एक्सटेंशन देता यावे. हे काम थांबविता येत नाही. हे कशासाठी चालले आहे ? त्या कॉंट्रॅक्टरना दोन महिन्यांचे एक्सटेंशन मिळावे, यासाठी हे चालले आहे का ? पूर्वीच्या 3 बचत गटांचा प्रश्न वेगळा आहे. आय.सी.डी.एस.कमिशनर यांनी बचत गट बंद पडावेत म्हणून नवीन 41 पानांची नियमावली पाठविली आहे. माझा एवढाच स्पेसिफिक प्रश्न आहे की, जुन्या कॉंट्रॅक्टरना काम मिळावे, असा शासनाचा उद्देश आहे का ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, शासनाचा असा अजिबात उद्देश नाही.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आजच्या वर्तमानपत्रात असे छापून आले आहे की, "मुंबई सारख्या ठिकाणी निकृष्ट अन्नामुळे रोज 50 बालकांचा मृत्यू होत आहे." मुंबईमध्ये एवढ्या बालकांचा मृत्यू होत असेल तर राज्याची काय परिस्थिती असेल, याची कल्पना आपण करावी.

सभापती महोदय, घरपोच आहार, टी.एच.आर. आणि ताजा आहार एच.सी.एल. या प्रकरणांमध्ये अनेक चौकशा झाल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी अशी माहिती दिली आहे की, महिला बचत गटांना काम द्यावे, असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश आहेत. पण ज्यांनी बोगस महिला बचत गट बनविले आहेत, असे 3 ते 4 कॉंट्रॅक्टर महाराष्ट्रात आहेत, ज्यांच्या संबंधी सर्वोच्च न्यायालयाने एस.आय.टी.नेमली आहे. हे खरे आहे का ?

सभापती महोदय, महिला बचत गटांनी कॉर्पोरेट लुक आणावा म्हणून नियमावलीमध्ये बदल होत आहे. ज्यांनी बोगस महिला बचत गट बनविले, त्यांच्या संदर्भात हायकोर्ट, सुप्रिम कोर्टापर्यंत

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर......

केसेस झाल्या आणि एस.आय.टी. नेमली गेली, त्यांनाच शासन पुन्हा काम कशासाठी देत आहे ? ज्या अधिकाऱ्यांनी त्यांना काम दिलेले आहे, अशा अधिकाऱ्यांना आपण पाठीशी का घालीत आहात ?

सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण सत्तेवर येण्यापूर्वी ही चौकशी सुरु झालेली आहे. हा गंभीर प्रश्न आहे. महाराष्ट्र राज्याला शरमेने मान घाली घालायला लागेल, असा प्रश्न आहे. देशातील तीन राज्यांमध्ये या योजनेत भ्रष्टाचार झाला असून महाराष्ट्रात एक हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार टी.एच.आर.मध्ये झाला आहे, अशा नोटस् आहेत. त्यानंतरही अधिकारी अशी नियमावली बनवीत आहेत आणि पात्र बचत गटांचे काम काढून या तीन-चार कॉंट्रॅक्टरना जपत आहेत. एवढे जपण्यासारखे काय आहे ? जर ही परिस्थिती सत्य असेल तर या 4 कॉंट्रॅक्टरचे काम तातडीने बंद करणार आहात का ? आजच्या आज तसे निर्देश देणार आहात का ?

सभापती महोदय, या सत्ता काळात ही चौकशी सुरु झालेली नाही. अगोदर पासून चौकशी सुरु आहे. पण गांभीर्याची बाब अशी आहे की, काही अधिकारी याच लोकांना काम देत आहेत. हे काम बंद करुन त्यांना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात का ?

सभापती महोदय, आपण सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश मानीत आहात. पण सर्वोच्च न्यायालयामध्ये ज्यांच्यावर ताशेरे ओढले गेले आहेत त्यांना सरकार पुन्हा काम देत आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी समिती वगैरे नेमून वेळ काढण्यापेक्षा तातडीने कारवाई करणे गरजेचे आहे. कारण हायकोर्ट, सुप्रिम कोर्ट करीत आपण येथपर्यंत पोहोचलो आहोत. त्यामुळे त्यांच्यावर आपण कडक कारवाई करणार आहात का ?

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, जो कुणी या मुलांच्या आहाराबद्दल, त्यांच्या पोषणाबद्दल काळा व्यवहार करील, भ्रष्टाचार करील त्या कुणालाही या शासनामध्ये थारा दिला जाणार नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

आपण सांगत आहात की, हे सुप्रीम कोर्टात सिध्द झाले आहे. एसआयटीची नियुक्ती करण्यात आली आहे. एसआयटीचा अभ्यास झाल्यानंतर तो अहवाल शासनाला सादर होईल. याबाबत मला असे म्हणायचे आहे की, या विषयाला एका पध्दतीने हाताळले जात आहे. येथे दोन वाद निर्माण झाले आहेत. महिला बचत गट आणि स्वयंसेवी संस्था, माझ्यासाठी या दोन्ही बाबी तेवढ्याच महत्वाच्या आहेत व तेवढ्याच महत्वाच्या देखील नाहीत. माझ्यासाठी महत्वाचा तेथील बालक आहे, त्याचे कुपोषक कमी करण्यासाठी शासन कटिबध्द आहे. याबाबत महिला बचत गट किंवा स्वयंसेवी संस्था दोषी असतील तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल. महिला बचत गटांच्या बाबतीत माझ्याकडे काही पत्रे आली आहेत. महिला बचत गटांबाबत महिला म्हणून निर्णय घेताना बालकांचे कुपोषण नाहीसे करण्यासाठी महिला बचत गटांना प्राधान्य देऊन जास्तीत जास्त बालकांपर्यंत सकस आहार पोचविण्याचे काम सुप्रीम कोर्ट व केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे राज्य शासन करण्यास कटीबध्द आहे. बचत गट किंवा संस्थेत काळेबेरे आढळून आले तर योग्य ती कारवाई शासनातर्फे केली जाईल. 64 बचत गटांना लवकरात लवकर कार्यादेश देण्याची शासनाची तयारी आहे.

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आता सांगितले की, मला पहिले व नंतरचे देखील सारखेच आहेत. पहिले महिला बचत गट तथाकथित आहेत. त्यांच्या प्रोप्रायटर यांची नावे पाहिली तर हे लक्षात येईल की, ही महिला बचत गट आहेत की, व्यापारी आहेत. यासंदर्भात चौकशी करण्यासाठी सुप्रीम कोर्टाने विराज पटनाईक यांची समिती नियुक्त केली होती. त्या समितीने असे सांगितले होते की, हे तीन बचत गट बोगस आहेत त्यांना ताबडतोब बंद करावेत. अद्याप देखील हे बचत गट बंद करण्यात आले नाहीत. मंत्री महोदयांकडे कदाचित चुकीची माहिती येत असेल. यासाठी सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती नियुक्त करुन 1000 कोटी रुपयांचा झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यात यावी. या तीन संस्था बोगस असल्याचा निर्णय दिला असला तरी त्यांना सतत मुदतवाढ दिली जात आहे. मंत्री महोदय सांगतात की, दोन्ही संस्था मला सारख्याच आहेत हे त्यांचे वाक्य अत्यंत दुर्दैवी आहे. यामध्ये भ्रष्टाचाराचे रॅकेट तयार झाले आहे. ज्या गरिबांसाठी योजना सुरु केली त्या गरिबाला काहीच मिळत नाही. या

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव सांळुखे...

तीन महिला बचत गट अळ्या असलेली पाकिटे गेल्या तीन वर्षापासून देत आहेत. हे अन्न बालक खात नाहीत. ही पाकिटे फेकून दिली जातात.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, हे सर्व मला सारखे आहे असे म्हणण्यामागील उद्देश हा आहे की, बचत गट व संस्थांची दरवर्षी तपासणी करणे आवश्यक आहे. मी मंत्री झाल्यावर मागील सरकारने काय केले हे न पाहता मी पुन्हा तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. हे मी चुकीचे केले नाही. ..... (गोंधळ)....

**उप सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्यावे. मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिले तर मी येथून निर्देश देऊ शकतो.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, मंत्री महोदयांना माझी विनंती आहे की, महाराष्ट्रात बचत गटांना मदत करण्याचे धोरण सरकारचे प्रत्येक वेळी स्वीकारले आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी 2009 मध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, बचत गटांना कामे दिली पाहिजेत. तरी देखील ठेकेदार इतके मात्तबर होते की, त्यांनी त्या निर्णयाची अंमलबजावणी चार वर्षे होऊ दिली नाही. 2013 पासून महिला बचत गटांना ही कामे मिळायला लागली.. आता तपासणी करतांना त्यांना असे सांगण्यात येते की, एक्सक्ल्युझर लावा. यासाठी 50 ते 60 लाख रुपयांचा खर्च येतो. समितीच्या माध्यमातून 300 बचत गट कामे करीत आहेत. या सर्वांची कामे यामुळे बंद होणार आहेत. या बचत गटांची कामे बंद करुन ठेकेदारांना पोसण्याचे पाप सरकार करीत असेल तर ही बाब अत्यंत चुकीची आहे. आमच्या आदिवासी जिल्ह्यातील पाच बचत गटांची निवड होऊन एक वर्षे झाले, त्यांनी युनिट उभे केले तरी अद्याप त्यांना वर्क ऑर्डर दिली नाही. ज्या 64 बचत गटांची निवड झाली त्यांना अधिवेशन संपण्याअगोदर किंवा आजच्या आज पुरवठा आदेश देणार आहात काय ? बचत गटांची छाननी पुन्हा करण्यात येणार आहे. एक्सक्ल्युझर युनिट टाकण्यास सांगितले जात आहे. अधिकाऱ्यांनी त्याना चेकलिस्ट दिली होती. त्याप्रमाणे त्यांनी रोष्टर पध्दतीने युनिट उभे केले आहेत. रोष्टर पध्दत चुकीची होती तर ज्या अधिकाऱ्यांनी हे सांगितले त्यांच्याकडून या रकमेची वसुली करण्यात येईल काय ?

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी 64 बचत गटांबाबत विचारणा केली आहे. याबाबत शासन सकारात्मक आहे. या 64 बचत गटांसंदर्भातील उर्वरित कार्यवाही लवकरात लवकर करुन त्यांना परवानगी देण्यास शासन कटीबध्द आहे. दुसरा विषय रोस्टर पध्दतीचा विचारण्यात आला आहे. लक्षवेधी सूचनेची व्याप्ती वाढत चालली आहे. याबाबत खरे तर चर्चा घेतली पाहिजे. सन्माननीय सदस्यांना रोष्टर पध्दत लावण्यात आली असे कोणत्या अधिकाऱ्यांनी लेखी वा तोंडी सांगितले याची मला माहिती नाही. सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार या मुलांना जे अन्न दिले जाते त्यामध्ये जास्तीत जास्त प्रोटीन, कॅलरिज न्युट्रीशन असणारे अन्न दिले जावे. त्यासाठी लागणाऱ्या सर्व पध्दतीचा अवलंब करण्यात यावा. यामध्ये हायजीन मेंटेन केले जावे. कारण ही मुले अगोदरच कुपोषित आहेत. हायजीन पध्दतीने केले पाहिजे, मानवी टच कोठेही होऊ नये. अशा प्रकारे केंद्र शासनाचे आदेश आहेत. हे आदेश पाळण्यासाठी राज्य शासन कटीबध्द आहे. 64 महिला बचत गटांचा प्रश्न मर्यादित आहे, त्यांना कार्यादेश देण्याबाबत शासन सकारात्मक आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

**उप सभापती** : आता मी कोणत्याही सन्माननीय सदस्यांना बोलण्यास परवानगी देत नाही. मी स्वत: बोलणार आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकले आहे, मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांना बोलण्यास संधी दिलेली आहे. आपणामध्ये एक वाक्यता दिसून येत नाही. सन्माननीय सदस्य बोलत असताना दहा सन्माननीय सदस्य उभे राहतात. मंत्री महोदयांना उत्तर देऊ देत नाहीत. लक्षवेधी सूचनेचे गांभीर्य आपण घालवून टाकीत आहात.

सर्व सन्माननीय सदस्यांनी या विषयाबाबत भावना व्यक्त केल्या आहेत. शासनातर्फे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे. हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. राज्यातील आर्थिकदृष्टया कमकुवत महिलांना न्याय मिळणे आवश्यक आहे.

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती.......**

परंतु, या विषयाची व्यापकता लक्षात घेता या संदर्भात सभागृहात निर्णय होईल, असे मला वाटत नाही. म्हणून या संपूर्ण विषयाला न्याय देण्याच्या दृष्टीने मी उद्या दुपारी 4.00 वाजता माझ्या दालनात सर्व संबंधित सन्माननीय सदस्यांची माननीय मंत्री महोदयांसमवेत बैठक आयोजित करतो. ज्या 3 महिला संस्थांच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी ऑब्जेक्शन घेतलेले आहे, ते ठेकेदार आहेत किंवा कसे, हे मला माहीत नाही. परंतु, त्यांचे पुरवठा करण्याचे काम ताबडतोब बंद करावे आणि ज्या 64 महिला संस्था आहेत त्यांना ताबडतोब उर्वरित काम देण्यात यावे आणि ते सुरु करण्याचे आदेश देण्यात यावेत.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, आपण उद्या बैठक आयोजित केलेली आहे. सुप्रीम कोर्टाचे आदेश.....

**उप सभापती** : मी मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, या संदर्भात मला जी माहिती प्राप्त झाली त्या अनुषंगाने सांगावयाचे झाले तर या विषयावर सभागृहात परिपूर्ण चर्चा होऊ शकत नाही आणि सुप्रीम कोर्टाने आदेश दिलेलेच आहेत....

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मला या संदर्भात सांगावयाचे आहे की, जो कोणी दोषी असेल त्याला आपण हद्दपार करु. मला 553 प्रकल्पांची यासाठीच तपासणी करावयाची आहे. तुम्ही म्हणता हा दोषी आहे, ते म्हणतात तो दोषी आहे. सर्वांची फेर चौकशी होऊ द्यावी.

**उप सभापती** : मी आपल्याला सांगू इच्छितो की, ज्या 3 महिला संस्था आहेत त्या खरोखर महिला संस्था असतील तर गोष्ट वेगळी आहे. मी काल परवाची एक गंभीर बाब आपल्या निदर्शनास आणून देतो. या संस्थांच्या पाठीमागील एक पदाधिकारी काल पासून मंत्रालय परिसरात फिरत आहे. आता ही गोष्ट मला या ठिकाणी सांगावी लागली. म्हणून मी सांगत होतो की, या विषयाची संपूर्ण व्यापकता बघितल्यानंतर मी आपल्याला माझ्या दालनात बोलावितो. आपण त्या ठिकाणी सविस्तर चर्चा करु परंतु, मला जे सकृतदर्शनी दोषी वाटले त्यांना आपण ताबडतोब थांबवावे, हेच मी आपल्याला सांगत आहे. मी शासनाच्या हितासाठीच हे सांगत आहे. यामध्ये माझा व्यक्तिगत काहीही हेतू नाही. मला प्राप्त झालेल्या माहितीनुसार मी ही घोषणा केलेली आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती.........**

आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 01.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 12.52 वाजता दुपारी 01.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**स्थगितीनंतर**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

**सभापती :** आता दिनांक 31 मार्च, 2015 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.2652 घेण्यात येईल.

**राज्यातील दुधाचे दर कमी झाल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आल्याबाबत**

**(२) * २६५२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतीश चव्हाण, डॉ.अपूर्व हिरे, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दुधाचे दर कोसळल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दुधाचे दर घसरल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दूध उत्पादक शेतक-यांना दिलासा देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) दि.29.10.14 रोजीच्या काही स्थानिक वृत्तपत्रांमधून "दुधाच्या दरात कपात" तसेच "दुधाचा भाव घटल्याने शेतकरी अस्वस्थ" अशा प्रकारच्या बातम्या प्रसिध्द झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) व (३) ऑक्टोबर ते मार्च हा दुधासाठी पुष्टकाळ समजला जातो. याशिवाय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत दूध भूकटीच्या दरामध्ये मोठया प्रमाणात घसरण झाल्यामुळे देशातील दूध भुकटीच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. त्यामुळे खाजगी क्षेत्राने दूध खरेदी दर कमी केले असल्याने शेतक-यांकडून उत्पादित होणा-या दुधाच्या खरेदीवर परिणाम होतो, हे खरे आहे.

राज्यात दुधाचा व्यवसाय शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत केला जातो. त्यापैकी ६०% खाजगी क्षेत्र, ३९.५ % सहकार क्षेत्र व ०.५ % शासन असे दूध संकलनाचे प्रमाण आहे. केंद्र शासनाने दि.२६.३.२००२ रोजी एमएमपीओ १९९२ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार राज्यातील खाजगी/सहकारी दूध संघ व दूध उत्पादक त्यांच्या व्यवसायाला पूरक असे खरेदी विक्री दर तसेच कमिशन दर निश्चित करुन दुधाचे संकलन व वितरण त्यांच्या स्तरावरुन नियोजित करीत असतात. यामध्ये शासनास हस्तक्षेप करण्यास वाव नाही.

असे असले तरी दूध उत्पादक शेतक-यांच्या हिताकरीता शासकीय दूध योजनेमधून होणारे वितरण १ लाख लिटरने प्रतिदिन वाढविणे, उदगीर येथील प्रकल्प कार्यान्वीत करुन सुमारे १ लाख लिटर प्रतिदीन दुधाचा विनियोग करणे, सहकारी संघाकडील अतिरिक्त दूध शासनाने खरेदी करुन शासकीय दराने स्वीकारणे तसेच दूध भुकटी निर्यातीवर १० % प्रोत्साहनपर अनुदान पुन्हा सुरु करण्याबाबत केंद्र शासनास प्रस्ताव पाठविणे इ. उपाययोजना केल्या आहेत.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2652.....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दृष्टीने हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. मागील सहा महिन्यापासून दुधाचे दर 24 रूपयांवरुन 16 रुपये प्रती लिटर एवढे घसरल्याने दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला आहे. यापूर्वी देखील दुधाचे दर घसरले होते तेव्हा आघाडी सरकारने व देशाचे तत्कालीन कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी अतिरिक्त दुधापासून भुकटी करण्यासाठी प्रती लिटर 2 रूपये सानुग्रह अनुदान दिले होते. त्याच धर्तीवर दूध उत्पादकांना दिलासा देण्यासाठी प्रती लिटर 4 ते 5 रूपये सानुग्रह अनुदान देण्याबाबत राज्य सरकार विचार करणार आहे काय किंवा भुकटी करण्यासाठी 2 रूपये प्रती लिटर अनुदान देण्याची पूर्वीची योजना पुन्हा सुरु केली जाईल काय?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सध्या तरी दुधाच्या संदर्भात अशा स्वरूपाची योजना सुरु करणे राज्य सरकारच्या विचाराधीन नाही. राज्यात जेवढे दूध उत्पादित होत आहे तेवढे दूध खरेदी करण्याची राज्य सरकारने तयारी केली आहे. विविध माध्यमातून शेतक-यांमार्फत जे दूध उपलब्ध झाले ते दूध राज्य सरकारने खरेदी केले आहे. उदगीर तसेच अन्य ठिकाणच्या प्लँटमध्ये दूध भुकटी तयार करण्यासाठी राज्य सरकारने कार्यवाही केली आहे. एका बाजूला अतिरिक्त दूध खरेदी करून त्यावर प्रक्रिया करून दूध भुकटी तयार करण्याची कार्यवाही केली असून 31 मार्चपर्यंत दूध भुकटी तयार करण्याचा निर्णय घेतला होता, त्या निर्णयाला एक महिन्याची मुदतवाढ दिली असल्यामुळे शेतकऱ्यांना अशा स्वरूपाचे सानुग्रह अनुदान तूर्त देणे शक्य नाही.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मूळ प्रश्न माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उपस्थित केला होता, त्यावेळी मंत्री महोदयांकडून समर्पक उत्तर न मिळाल्यामुळे तो राखून ठेवण्यात आला होता. दूध दरात घट झाल्यामुळे शेतकऱ्यांना दूध उत्पादन करणे परवडत नाही. पूर्वीच्या आघाडी सरकारने अतिरिक्त दुधापासून भुकटी तयार करण्यासाठी प्रती लिटर 2 रूपये सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय घेतला होता. आज जी स्थिती निर्माण झाली आहे तिचा विचार करता दुधापासून

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

भुकटी तयार करण्यासाठी दूध उत्पादक शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान जाहीर करण्याचा शासन विचार करणार आहे काय?

...3...



ता.प्र.क्र.2652.....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्य सरकारने दूध भुकटी निर्यातीवर 10 टक्के प्रोत्साहनपर अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. त्या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर अनुदान देण्याबाबत विचार करता येईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, उत्तर वाचल्यानंतर असे लक्षात येते की, अतिरिक्त 50 ते 60 लाख लिटर दुधापैकी फक्त 1 ते 1.5 लाख लिटर दुधाचे नियोजन केले आहे. उर्वरित अतिरिक्त दुधाचे नियोजन करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे? दूध उत्पादक शेतकऱ्यांना कर्ज घेऊन गायी, म्हशी खरेदी केल्या आहेत. दूध धंद्यातून घेतलेल्या कर्जाची परतफेड करता येईल ही भावना त्यांच्या मनात होती.

नंतर क्यू.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2652....

श्री.धनंजय मुंडे...

जेव्हा दुधाचे भाव घसरले त्यावेळी शासनाने मायबाप म्हणून पुढे येऊन दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत देण्याच्या दृष्टीने काही तरी धोरण अवलंबिले पाहिजे. त्या शिवाय दूध उत्पादक शेतकऱ्यांची अडचण दूर होणार नाही. आपण त्यांना मदत केली नाही तरी दूध उत्पादक शेतकरी आत्महत्या केल्याशिवाय राहणार नाही. तेव्हा या सर्व गोष्टींचा विचार करून शासनाने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा आणि दुधा मागे किंवा दुधाच्या भूकटी मागे 2 ते 4 रूपये अनुदान देण्याची योजना शासनाने सुरूकरावी अशी माझी या प्रश्नाच्या आधारे शासनाला विनंती आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सहकार क्षेत्रातील दूध 50 ते 60 लाख इतके अपेक्षित नाही. ते फक्त 5 ते 6 लाख लिटर इतके अपेक्षित आहे व त्याचे नियोजन राज्य सरकारने केलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अतिरिक्त दूध महाराष्ट्रातील कोणकोणत्या जिल्ह्यात आहे व सर्वाधिक अतिरिक्त दूध कोणत्या जिल्ह्यात आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अतिरिक्त दुधाची आकडेवारी दर महिन्यांमध्ये बदलत असते. बदललेली आकडेवारी आज माझ्याकडे उपलब्ध नाही. ती माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. राज्य सकारने दूध घेतले असून दुधाचे भूकटीत रूपांतर करण्याच्या संदर्भात ज्या ज्या डेअरींशी करार करण्यात आला किंवा जेथे राज्य सरकारच्या डेअरी बंद होत्या त्या परत नव्याने सुरू करून तेथे दूध भूकटीच्या उत्पादनाला सुरूवात केली. त्यामुळे काही प्रमाणात अतिरिक्त दुधाचा प्रश्न सुटू शकला. दूध भूकटी तयार करण्याचे शासनाने ठरविले असले तरी देखील तेही नुकसानीत जात आहे. दूध भूकटीमध्ये आम्हाला 6 ते 8 रूपये नुकसान आजही सहन करावे लागत आहे. दूध भूकटी तयार करण्यामध्ये 8 रूपयापर्यंत नुकसान होत आहे. प्रत्येक ठिकाणचे दूध खरेदी करण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या उपाययोजना केलेल्या आहेत. राज्यभरात कुठेही दूध असले तरी ते खरेदी करण्याची राज्य शासनाची तयारी आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..2

ता.प्र.क्र.2652.....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये शेतकरी दुधाकडे पूरक व्यवसाय म्हणून पाहतो. सांगली, सातारा, कोल्हापूर, नगर, नाशिक, पुणे, सोलापूर या जिल्ह्यांमध्ये दूध उत्पादक शेतकरी मोठ्या प्रमाणावर आहेत. आज दुधाचे दर घटले आहेत हे सरकारला मान्य आहे काय ? भूकटीची निर्यात करण्याच्या दृष्टीने केवळ केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठवून चालणार नाही तर यासाठी पाठपुरावा करून दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय दिला पाहिजे. कारण एका बाजूला अवकाळी पाऊस, गारपीट याने शेतकरी त्रस्त झाला आहे. त्याचे खरीप व रब्बीचे पीक गेले आहे. या पाच-सहा जिल्ह्यातील शेतकरी हा दुधाच्या पूरक व्यवसायावरच राहात होता. दुधापासून उत्पन्न मिळत होते म्हणून तो आत्महत्येपासून दूर होता. त्यामुळे आज दुधाचे दर कमी झाले आहेत याची जाणीव राज्य सरकारला आहे काय ? तेव्हा या दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने राज्य सरकार कालबद्ध कार्यक्रम जाहीर करणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दुधाचे दर कमी अधिक होत असतात हे खरे असले तरी राज्य सरकार 20 रुपये प्रति लिटर या दराने आज दूध खरेदी करीत आहे. त्यावर अडीच रुपये अतिरिक्त भार देखील आपण सहन करीत आहोत. आता उन्हाळ्याचा काळ येत आहे. त्यामुळे एप्रिल आणि मे महिन्यात भाव वाढतील. त्यामुळे दरामध्ये बदल होईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दूध उत्पादक शेतकऱ्यांना जेव्हा सरकारच्या मदतीची गरज आहे तेव्हा ती मदत देण्याचे टाळले जात आहे. उन्हाळ्यामध्ये दुधाची मागणी वाढते. त्यामुळे स्वाभाविकपणे भाव वाढतो. तेव्हा सरकारच्या मदतीची गरजच पडत नाही. मधल्या काळात व आज जे भाव कमी आहेत त्यासंबंधी शेतकऱ्यांच्या प्रती सहानुभूती दाखवावी. कापूस, सोयाबीन, ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्याबाबतीत देखील असेच झाले आहे. आज दूध उत्पादक शेतकऱ्यांच्याबाबतीत सरकारची अशी भूमिका असेल तर त्याने मरायचेच काय ? तेव्हा आपण दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा. आज निदान दूध उत्पादक शेतकरी तरी टिकला पाहिजे. जनावर खरेदी करण्यासाठी घेतलेले कर्ज तरी त्याला फेडता आले पाहिजे. तेव्हा यासंबंधी राज्य सरकारने सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2652...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्य सरकारने दुधाचा भाव 20 रूपये + 2.50 रूपये ठेवल्यामुळे बाजारामधील भाव स्थिर राहिले आहेत. राज्य सरकारने हस्तक्षेप केला नसता तर खाजगी दूध उत्पादकांनी दुधाचा भाव 14 ते 16 रूपयांपर्यंत खाली आणला असता. माझ्या माहिती प्रमाणे त्यांनी तो भाव काही ठिकाणी खाली आणला. गेल्या चार महिन्यांपासून आम्ही दूध खरेदी करायला सुरूवात केली तेव्हा पासून दुधाचा भाव 20 रूपये आहे. आजही आम्ही 20 रूपये या दराने दूध घेण्यास तयार आहोत. उलट सरकारने अडीच रूपयांचा तोटा देखील सहन केला आहे. गोकुळ व अन्य डेअरीमध्ये 23 रूपये इतका भाव आहे.

**सभापती :** मंत्री महोदय, मी ज्या भागातून येतो त्या भागात दुधाचे मोठे उत्पादन होते. दुधाचे दर आणि भूकटीचे दूर यासंबंधी सर्वांनाच काळजी आहे. आपण दूध उत्पादकांना काय देणार हा यातील खरा विषय आहे. माझी अशी सूचना आहे की, आपल्याला जमले तर येत्या 2,4 दिवसात न पेक्षा पुढच्या आठवड्यात सर्व दूध उत्पादक संघ व संबंधित आमदारांना माझ्याकडे किंवा आपल्याकडे बैठकीसाठी बोलवावे. मागच्या सरकारने विधायक पावले टाकली होती. तसा विचार करून केंद्र किंवा राज्य सरकारकडून काही मदत मिळविता येते किंवा कशी हे पहावे.

श्री.एकनाथराव खडसे : ठीक आहे.

......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सातान्यातील खंडोबा यात्रेतील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना मदत देण्याबाबत**

**(1) * 2846 डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सातान्यातील खंडोबा यात्रेत हत्ती बिथरुन दोन महिलांचा मृत्यु व दोन जण जखमी झाल्याचे दिनांक 3 जानेवारी, 2015 रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, अशाच प्रकारे मांढरदेवी यात्रेच्या दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत अनेक जण मृत व जखमी झाल्याच्या घटनेची चौकशी करण्याकरिता नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालातीललशिफारशींपैकी कोणकोणत्या शिफारशींवर शासनाने आतापर्यंत अंमलबजावणी केली आहे,
(3) राज्यात अनेक देवस्थानांच्या ठिकाणी नेहमीच मोठमोठया यात्रा भरत असून अशा प्रकारच्या घटना पुन्हा घडू नये याकरिता शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(4) तसेच सातान्यातील खंडोबा यात्रेत मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना कोणती तातडीची मदत दिली वा देण्यात येत आहे
(5) अद्याप कोणतीच मदत दिली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप कांबळे,श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (1) अंशतः खरे आहे.
खंडोबा देवाच्या यात्रेत हत्ती स्वतः भवती जागेवर फिरुन खाली बसण्याच्या प्रयत्नात हत्तीच्या पायाचा धक्का लागल्याने एका महिलेचा मृत्यू झाला आहे.
(2) व (3) महाराष्ट्र राज्यात यात्रांचे नियोजन आणि करावयाच्या उपाययोजना यासाठी राज्य शासनाने शासन परिपत्रक क्र.आरएलएफ 2009/प्र.क्र.58/म-3, दिनांक 23.03.2009 व 26.03.2009 च्या परिपत्रकांन्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. या सूचनांच्या अनुषंगाने अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण या नात्याने सर्व जिल्हाधिका-यांकडून त्यांच्या जिल्ह्यातील यात्रांकरीता यात्रेच्या कालावधीत विविध खात्यांनी पार पाडावयाच्या जबाबदा-यांसाठी प्रमाणित कार्यपध्दती (Standing operating Procedure) निश्चित करण्यात येते. त्यानुषंगाने आपत्ती व्यवस्थापन आराखडा व प्रमाणित कार्यपध्दतीस अनुसरुन उपाययोजना व अंमलबजावणी करणेबाबत जिल्हाधिका-यांकडून सूचना निर्गमित करण्यात येतात.
(4) व (5) खंडोबा देवस्थान पाल, यात्रा कालावधीत संबंधित भाविकांना तात्काळ वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या. एका मृत महिलेच्या नातेवाईकांना मार्तंड देवस्थान ट्रस्ट, कमिटी पाल यांचेकडून रु.1.51 लाखाची मदत देण्यात आलेली आहे.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.2846...

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या घटनेमध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून दोन जण जखमी झाले आहेत. सातारा जिल्ह्यातील खंडोबाच्या यात्रेत पूर्वी दोन वेळा हत्ती बिथरण्याचा प्रकार झाला होता. हत्ती बिथरल्यासंबंधात जे उत्तर देण्यात आले आहे ते वस्तुस्थितीला धरून नसावे असे मला वाटते. कारण खाली बसण्याच्या प्रयत्नात हत्तीच्या पायाचा धक्का लागल्याने एका महिलेचा मृत्यू झाल्याचे लेखी उत्तरात नमूद केले आहे. हत्ती का बिथरला याची चौकशी शासनाने केली आहे काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सन 2005 मध्ये मांढरदेवी गडावर दुर्घटना घडली होती. त्यावेळी बरेच लोक मृत्युमुखी पडले होते. तत्संबंधातील अहवाल श्री.राजन कोचर समितीने ऑक्टोबर 2005 मध्ये दिला आहे. त्यास जवळ जवळ नऊ वर्षे झालेली आहेत. या अहवालमध्ये चेंगराचेंगरी होऊ नये, अपघात होऊ नये यासंबंधातील सूचना दिलेल्या आहेत. तेव्हा तेथे तशा प्रकारची व्यवस्था करण्यासंबंधी शासनाने एटीआर स्वीकारलेला नाही. तेव्हा यासंबंधातील एटीआर स्वीकारण्यासंबंधात शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय, तसेच जखमींच्या संदर्भात येथे उल्लेख करण्यात आलेला नाही. शासनाने जखमींना काही मदत दिली आहे काय ?

**सभापती :** यासंबंधातील उत्तर अनुक्रमांक 4 मध्ये नमूद केलेले आहे.

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, ज्या यात्रेकरू महिलेचा हत्तीचा धक्का लागून मृत्यू झाला आहे त्या महिलेच्या नातेवाईकांना देवस्थानच्या मदतीने मदत करण्यात आली आहे. मांढरदेवी येथे झालेली दुर्घटना यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी केला आहे. मांढरदेवी दुर्घटना घडल्यानंतर समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीने दिलेल्या ॲक्शन टेकन रिपोर्टवर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे असे देखील त्यांनी विचारले आहे. त्यांच्या सूचनेचा शासन नक्की विचार करणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, संबंधित हत्ती विरुद्ध राज्य शासनाने गुन्हा नोंदविला आहे काय, त्याला ताब्यात घेतले आहे काय, तसेच हत्तीच्या माहुतावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, सध्या हत्तीची परिस्थिती काय आहे ?

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

*ता.प्र.क्र. : २८४६......*

*श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, सदर हत्ती देवस्थानाचा असून गेल्या २० वर्षापासून हा हत्ती मिरवणुकीमध्ये वापरला जातो. हत्तीला मिरवणुकीमध्ये नेण्यापूर्वी त्याची पशुवैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी केली जात असते व या वर्षीही या हत्तीची तपासणी करण्यात आली होती व त्या संदर्भात प्रमाणपत्र सुध्दा उपलब्ध आहे. हत्ती व्यवस्थित होता परंतु यात्रेमध्ये भंडारा आणि लोकर उधळल्यामुळे हत्ती बिथरल्यामुळे जागेवर फिरला व जागेवर फिरत असतांना या हत्तीचा पाय महिलेला लागल्यामुळे सदर महिलेचा मृत्यू झालेला आहे. सदर प्रकरणात हत्तीवर कारवाई करणे आवश्यक वाटत नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.*

-----

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सीमा शुल्क आकारणी नाका, दापचरी (ता.तलासरी, जि.पालघर) येथून अवजड वाहनांची चोरट्या मार्गाने होत असलेली वाहतुक**

*(२)* * **४०७१*श्री.आनंद* ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटीललल:लसन्माननीय परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
*(१)* सिमा शुल्क आकारणी दापचरी नाका (ता.तलासरी, जि.पालघर) येथून रोज किमान ४०० ते ५०० अवजड वाहनांची चोरट्या मार्गाने वाहतूक होत आहे, हे खरे आहे काय,
*(२)* असल्यास, सिमा शुल्क आकारणी करीत असलेली सदभाव कंपनीचे अधिकारी व स्थानिक पोलीस विभागाचे (आर.टी.ओ.) अधिकारी यांच्या संगनमताने रोज मोठ्या प्रमाणावर रक्कमेचा अपहार केला जात आहे, हे ही खरे आहे काय,
*(३)* असल्यास, शासनाने याची चौकशी वा पाहणी केली आहे काय,
*(४)* असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व अशा प्रकारे शासनाचा मोठ्या प्रमाणावर महसुलाचा अपहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
*(५)* अद्याप कारवाई केली नसल्यास होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ***?***
**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
*(२)* नाही.
*(३)* व (४) तपासणी नाक्यावरुन अधिका-यांची नजर चुकवून काही वाहने पळून जातात असे निदर्शनास आल्यामुळे सीमा तपासणी नाका, दापचेरी येथे वाहनांची नियमित तपासणी केली जाते. दि. १४.०१.२०१५ रोजी तपासणी नाका चुकवून व बॅरिकेटस् मोडून वाहन पळवून नेल्या प्रकरणी वाहन मालकाविरुध्द तलासरी, पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल केला आहे.
*(५)* प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या अनुमतीने मी उत्तरामध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करु इच्छितो. पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "अंशता खरे आहे" अशी दुरुस्ती असून बाकी उत्तर छापल्या प्रमाणे.

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दुरुस्ती केल्याबद्दल धन्यवाद. मंत्री महोदयांनी दुरुस्ती सुचवली नसती तर मी उत्तरालाच आक्षेप घेतला असता. दापचारी नाक्यावरुन दररोज ४०० ते ५०० वाहनांमधून चोरटया मार्गाने वाहतूक केली जात असल्यामुळे शासनाचा मोठया प्रमाणात महसूल बुडविला जातो. या नाक्याच्या बाजूलाच मी राहत असल्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात मला संपूर्ण माहिती आहे. या नाक्यावर मोठे रॅकेट कार्यरत आहे. परिवहन अधिकारी, पोलीस अधिकारी तसेच सदभावना कंपनीचे कर्मचारी मिळून रॅकेट चालवित आहेत. हायवेला अडथळे उभारुन त्याच्या बाजूने असलेल्या तपासण्या नाक्यावरुन तपासणी होऊन गाडया पुढे जात असतात. परंतु या रस्त्यावरील अडथळे काही वेळेसाठी काढले जातात व त्या ठिकाणावरुन अवजड वाहने पास केली जातात. तलासरी,उद्वा-सायवान कासा मार्गाने गाडया पास केल्या जातात. मध्यंतरीच्या काळात आयुक्त परिवहन यांनी डिसेंबर महिन्यात चौकशी केली होती व ही सर्व बाब त्यांना सुध्दा आढळून आली होती. आज या ठिकाणी कमिशनवर लाखो रुपये खाल्ले जात आहेत. त्यामुळे माझा आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना

...३...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : ४०७१.....

श्री.आनंद ठाकूर .......

स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, चोरटी वाहतुकीच्या बाबतीत मंत्री महोदय काही कारवाई करणार आहेत काय, जे अधिकारी यामध्ये सामील आहेत त्यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, वाहने चोरटया मार्गाने कशा प्रकारे जातात यासंदर्भात मंत्री महोदयांनी मार्गदर्शन केले आहे. याबाबतीत शासनाने सदरचा रस्ता कायमचा बंद करुन सर्व वाहने नाक्यावरुन जाणे अनिवार्य करण्याकरिताशासनाने यासंदर्भात राष्ट्रीय महामार्ग यांच्याकडे औपचारिक प्रस्ताव दाखल केला असून त्यांची यासंदर्भात मान्यता आल्यानंतर अधिककृतरित्या चोरटे मार्ग बंद केले जातील व वाहनांना आपल्या नाक्यावरुन येण्याकरिता अनिवार्य केले जाईल.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, सदरहू तपासणी नाक्यावरुन प्रतिदिनी किती महसूल गोळा केला जातो ? आपल्या नाक्याशेजारीच गुजरात राज्याचा देखील तपासणी नाका आहे .गुजरात राज्याच्या टोलनाक्यावर प्रतिदिनी किती महसूल गोळा केला जातो, आपल्या सदरच्या तपासणी नाक्यावरुन किती ओव्हरलोड वाहनांवर कारवाई करण्यात आली व त्यातून किती महसूल गोळा झाला ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गुजरात राज्याच्या नाक्यांची माहिती घेणे मला संयुक्तीक वाटत नाही. आपल्या राज्याचा महसूल कसा वाढेल याबाबीत मी आणि अधिकारी प्रयत्नशील आहोत. सन्माननीय सदस्य जी माहिती मागत आहे ती माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अनिल तटकरे यांनी एकंदर तीन प्रश्न विचारले होते परंतु तीन पैकी मंत्री महोदयांनी केवळ एकाच प्रश्नाला उत्तर दिले आहे. गुजरातच्या राज्याच्या तुलनेत आपल्या नाक्यावर किती महसूल गोळा होत असतो याची तुलना करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यामुळे या नाकयावरुन राज्याशासनाला प्रतिदिनी किती महसूल मिळतो व ओव्हरलोड वाहनाकडून किती महसूल मिळाला आहे या प्रश्नाची उत्तरे मंत्री महोदयांनी देणे आवश्यक आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, यासंदर्भातील अगोदरची पारंपारिक पध्दत बंद करुन सर्व वाहनांची योग्य प्रकारे तपासणी केली जावी याकरिता आपल्याच माध्यमातून आलेले सर्व नाक्यावर सदभावनाचे नियोज आहे. हे काम आतापर्यंत पूर्ण झालेले नाही. परंतु आता ओव्हर लोड सर्व वाहनांची योग्य तपासणी करुनच वाहने पुढे जातील. या ठिकाणच्या नाक्यावरुन प्रतिदिनी किती महसूल मिळतो याची माहिती आता माझ्याकडे नाही परंतु ही माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : ४०७१.....

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, टोलनाकयावर वे ब्रीज लावले आहेत. परंतु अशा ठिकाणावरुन सुध्दा ओव्हरलोड वाहने सर्रास जात असतात. वे ब्रिजच्या साईडला ट्रक पाठवतात. त्या ठिकाणी एक छोटे वाहन उभे करुन ओव्हरलोड वाहनातून छोटया वाहनात ओव्हरलोड माल ठेवला जातो. हे वाहन नंतर वे ब्रीज वरुन खाली उतरते व पुढे गेल्यानंतर त्या ट्रकमध्ये छोटया वाहनाील माल ठेवला जातो. ज्या ज्या टोल नाक्यावर वे-ब्रीज उभे केले आहेत त्या त्या टोल नाक्यावर हे प्रकार सर्रास सुरु आहेत. टोल नाक्यावरील वे-ब्रीजचा उद्देश चांगला आहे परंतु तो उद्देश पूर्ण होत नाही. त्यामुळे सर्व टोल नाक्यावर चौकशी पथक नेमून कारवाई केली जाईल काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. तटकरे साहेबांनी दापचरी नाक्यावरील महसुलाची माहिती मागितली होती. सदर माहिती आता माझ्याकडे उपलब्ध झाली असून या तपासणी नाक्यावरुन ११० ते १२० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल मिळत असतो. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी अशी माहिती देतो की, वाहनाची तपासणी करीत असताना त्यांच्या बिलाप्रमाणे वजन असेल तर अशी वाहने विभागाला अडविता येत नाही. परंतु बिलाच्या व्यतिरिक्त माल गाडीत भरला असेल तर अशा वाहनावर आम्हाला कारवाई करता येते, अन्यथा कारवाई करता येत नाही.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री ज्यावेळेस माझ्या शजारी बसत होते तेव्हा आम्ही लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून टोलच्या सुदर्भात चर्चा घडवली होती. या ठिकाणी नियुक्त होत असलेल्या आरटीओचा नेमणुकीचा दर राज्यातील इतर ठिकाणच्या आरटीओ पेक्षा जास्त आहे. हा दर आपल्या कारकिर्दीत बंद झाला असेल अशी माझी अपेक्षा आहे.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, नेमणुकीचा दर म्हणजे नेमके काय ?

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आता मंत्री महोदयांवर शासन म्हणून काही बंधने असतील. या ठिकाणी आरटीओची नेमणूक करतांना मोठया प्रमाणात वजन वापरले जाते त्यामुळे हे वजन कमी होईल काय ? तसेच या ठिकाणच्या आरटीओच्या नेमणुका दर दोन वर्षानी बदलण्याच्या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय ? या नाक्यावरील महसूल वाढविण्यासाठी शासन वेगळे धोरण जाहीर करणार आहे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागच्या सरकारच्या काळात कोणाचे दर कसे ठरविण्यात आले होते यासंदर्भात मी आता अभ्यास करीत आहे त्यामुळे यासंदर्भात मला काही माहिती नाही. मागच्या सरकारमधील सदस्य जेवढया उताविळपणे माहिती विचारीत असून त्यांना सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नंतरही

...5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. : ४०७१.....

श्री. दिवाकर रावते.......

माहिती दिली तरी चालेल. नाक्यावरील महसुलाच्या संदर्भात या शासनाने धोरण आखले आहे. बदल्यांच्या संदर्भात मी एवढेच सांगतो की, यापुढे मनमानी पध्दतीने कोणाच्याही बदल्या होणार नाहीत. बदल्यांच्या संदर्भात समिती नियुक्त करण्यात आली असून त्या समितीच्या शिफारसीनुसार बदल्या केल्या जातील. अपरिहार्यकारणाच्या बदल्यांच्या संदर्भात मुख्यमंत्री महोदय स्वतः निर्णय घेत असतात. आपल्याला जे अभिप्रेत आहे ते घडणार नाही याची काळजी नक्की घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 4071....

श्री.भाई जगताप :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाची माहिती सदनाला दिलेली आहे. परंतु त्याचे उत्तर मंत्री महोदयांनी दिलेले नाही. तो प्रश्न जास्त महत्वाचा आहे. ओव्हर लोड वाहने भरुन ती पॅरामीटरमध्ये आहेत हे दाखविण्यासाठी सावळागोंधळ होतो. हे सर्व प्रकार चेक नाक्यावर सीसीटीव्ही लावून नियंत्रणाखाली ठेवता येतील. या ठिकाणी सन्माननीय सदस्य जी माहिती देतात ती आपण ग्राह्य समजतो. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, ओव्हर लोड ट्रक चेक नाक्यावर आल्यावर रिकामा करण्यात येतो आणि आपणास जेवढ्या क्षमतेची परवानगी मिळालेली आहे तेवढी क्षमता पूर्ण करुन निघून जातो व पुढे जाऊन तो माल पुन्हा ट्रकमध्ये भरतो. असे प्रकार थांबविण्यासाठी सरकार कोणती पावले उचलणार आहेत ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी अतिशय बरोबर प्रश्न विचारलेला आहे. वाहनामध्ये योग्य वजन असेल तर त्या वाहनावर कारवाई करता येत नाही. वाहनामध्ये क्षमतेपेक्षा जास्त वजन असेल तरच कारवाई करता येते. दुसरे वाहन वापरुन वजन कमी केले याचा अर्थ तेवढ्या वेळापुरता तो कायद्याचे पालन करतो. पण पुढे जाऊन तो माल पुन्हा वाहनामध्ये भरतो असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. त्यासाठी फिरत्या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या वाहनांवर 100 टक्के कारवाई करण्यात येते. तपासणी नाक्यावर सीसीटीव्ही आणि इलेक्ट्रॉनिक वजनकाटे लावण्यात आले आहेत आणि त्याची नोंद मुंबईपर्यंत येते. त्यामुळे अशाप्रकारांवर नियंत्रण आलेले आहे. मागील सरकारने ही योजना आणलेली असून ती पूर्णत्वास येईल त्यावेळी पूर्ण नियंत्रण होईल. एक दिवसांत नियंत्रण येणार नाही. आम्ही नियंत्रणाची पूर्ण आखणी केलेली आहे. त्यानुसार अशा प्रकारावर 100 टक्के नियंत्रण आल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी थोडा कालावधी लागेल. तपासणी नाक्यावर जे गैरप्रकार होतात त्यावर निश्चितपणे अंकुश ठेवण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांनी परिवहन विभागाचा कार्यभार हाती घेतल्यानंतर त्या विभागामध्ये काही क्रांतिकारी बदल होतील अशी आमची अपेक्षा होती. आपण आता सांगितले की, ट्रकचालक 100 फुटापर्यंत कायदा पाळत असेल त्याला



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 4071....
श्री.हेमंत टकले...

आपण अडवू शकत नाही. ही हतबलता फक्त एका प्रश्नापुरती मर्यादित नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी गुजरात राज्यासंबंधी सांगितले. गुजरात राज्यात चांगल्याप्रकारची पद्धती असल्यामुळे त्या ठिकाणी चांगला महसूल गोळा होतो आणि आपल्याकडे त्यामानाने कमी होतो असा प्रकारची माहिती यापूर्वी सभागृहात आलेली आहे. आपण आधुनिक सोयीसुविधा केल्यानंतरही असे प्रकार थांबणार नसतील तर आपणास फिरत्या पथकाची नियुक्ती करुन त्यांच्या माध्यमातून जरब बसेल अशाप्रकारची कारवाई केली पाहिजे. दंड भ्रला आणि वाहन निघून गेले असे होता कामा नये. दंडाची भरलेली रक्कम आणि त्यामुळे होणारे नुकसान हे वाहनचालकांच्या लक्षात येईल किंवा वाहनचालकांचे परवाने काही काळासाठी रद्द होतात याची त्यांना जाणीव अधिक प्रमाणात होईल त्यादृष्टीने धोरणात्मक निर्णय घेऊन फेररचना करणार आहात काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, निवडणुकीच्या काळामध्ये केलेल्या भाषणांची आठवण करुन दिल्याबद्दल मी सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री व आताचे माननीय पंतप्रधान असे म्हणाले होते की, "मेरे गुजरात नाके पे हे होता है, आपके नाके पे क्यू नही होता है ". आता आम्हाला ते दुरूस्त करायचे आहे. क्रांतिकारी निर्णय घेण्यासाठी काही कालावधी लागेल. आपल्या अपेक्षा पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करीन त्यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. दोन-तीन महिन्यांमध्ये क्रांती घडत नाही. यापूर्वीच्या काळात ज्या काही पळवाटा होत्या त्या आम्हाला बंद करायच्या आहेत त्यासाठी अभ्यास करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, फिरते पथक स्थापन करावे. परिवहन विभागामध्ये 40 टक्के पदे रिक्त आहेत. आम्ही जास्तीत जास्त फिरते पथक स्थापन करू. सन्माननीय सदस्यांनी दंडाच्या रकमेबाबत सांगितले. त्याबाबत माझी भूमिका स्पष्ट केलेली आहे की, भीक नको कुत्रा आवर अशाप्रकारे दंड नको पण मी कायद्याचे पालन करीन अशाप्रकारची कायद्यामध्ये तरतूद झाली पाहिजे. ही सुधारणा केंद्र सरकारला करावी लागते. मी या प्रश्नाच्या संदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र. 4071....

श्री.दिवाकर रावते....

गडकरी यांना नागपूरमध्ये भेटून मी त्यांच्याशी चर्चा केली. मला सांगण्यास आनंद वाटतो की, या संदर्भातील कायदा पारित झालेला आहे. बेल्ट लावला नाही तर एक हजार रुपये दंड, दारु पिऊन गाडी चालविली तर 25 हजार रुपये दंड आकारलेला आहे. गुजरात राज्यामध्ये दंडाची रक्कम जास्त असल्यामुळे तेथे जास्त रक्कम जमा होते. तसा दंड वाढवून आपली वसुली वाढली असे दाखववयाचे मला मान्य नाही. मला दंड करण्यामध्ये अजिबात स्वारस्य नाही. कायद्याप्रमाणे वाहतूक झाली पाहिजे. दंड वसूल करुन पळवाटा शोधून द्यायच्या या मताचा मी नाही. अवजड वाहनांनी त्यांना अनुज्ञेय असलेल्या वजनाची वाहतूक केली पाहिजे. सरकारच्या तिजोरीमध्ये दोन पैस कमी आले तरी चालतील पण कायद्याचे पालन झाले पाहिजे अशी माझ्ी भूमिका आहे. किती दंड वसूल होतो यापेक्षा कायद्याचे पालन कसे होईल याकरिता माझा विभाग सक्षमतेने काम करण्याचा प्रयत्न करील.

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**परतवाडा (जि.अमरावती) येथील मेळघाटातील रोजंदारी करणा-या मजूरांसाठी बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर करू दिला जात नसल्याबाबत**

***(३)*** *** ४४४० *श्री.राजेंद्र* मुळक, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** परतवाडा (जि.अमरावती) येथील मेळघाटातील रोजगार संपल्यानंतर निवाऱ्यासाठी मजूरांकरिता बांधण्यात आलेल्या भवनाचा वापर त्यांना करू दिला जात नसल्याने या मजूरांना उघड्यावर रात्र काढावी ***लागत*** असल्याचा प्रकार माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, रोजंदारी करणा-या मजूरांना सदरहू भवनाचा रात्री राहण्यासाठी वापर करू देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
***(३)*** नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ***?***

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), ***(२)*** व (३) प्रश्नाधीन इमारत, परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे तत्कालीन लोकप्रतिनिधींच्या सूचनेवरुन आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ***मेळघाट*** आदिवासी लोकांकरीता औद्योगिक भवनन म्हणून बांधण्यात आली असून सदर इमारत मेळघाट येथील मजूरांच्या रात्रीच्या निवाऱ्याकरीता बांधण्यात आली नाही. तसेच सदर इमारतीचा वापर उक्त हेतूकरिता करू देण्याबाबत मागणी/निवेदन जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे प्राप्त झालेले नाही. सदर इमारतीचा वापर मागील लोकसभा व विधानसभेच्या सार्वजनिक निवडणूकांच्या कालावधीत साहित्य ठेवण्यासाठी व इतर प्रशासकीय कामकाजासाठी करण्यात आला आहे. निवडणूकविषयक साहित्य अजूनही सदर ठिकाणी ठेवण्यात आले आहे. त्यामुळे त्याठिकाणी मजूरांना रात्रीच्या निवाऱ्याची सोय करणे शक्य नाही.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मेळघाटातील रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांसाठी ही इमारत बांधण्यात आली होती. उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, सदर इमारत स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत बांधण्यात आली आहे. म्हणजे आमदारांच्या विनंतीवरून ही इमारत बांधण्यात आलेली आहे. मेळघाट हा अतिदुर्गम भाग आहे आणि त्या परिसरात वाघांचा संचार असतो. रात्रीच्या वेळी मजुरांना सुरक्षित आसरा मिळावा या भूमिकेतून ती इमारत बांधलेली आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद केलेले आहे की, "सदर इमारतीचा वापर हा लोकसभा आणि विधानसभेच्या सार्वजनिक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4440..

श्री.राजेंद्र मुळक...

निवडणुकींच्या कालावधीत साहित्य ठेवण्यासाठी व इतर प्रशासकीय कामकाजासाठी करण्यात आला आहे."  माझी मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे की, रोजंदारीवर काम करणारी ही आदिवासी मंडळी आहेत. रात्रीच्या वेळी निवासाची सोय व्हावी यासाठी इमारत बांधण्यासाठी विनंती करण्यात आली होती. माझा प्रश्न आहे की, त्या इमारतीमध्ये असलेले सामान तातडीने इतरत्र हलवून रोजदारींवर काम करणाऱ्या मजुरांची तेथे राहण्याची व्यवस्था करण्यात येईल का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सदरहू इमारत ही आमदार निधीतून औद्योगिक वसाहतीसाठी बांधण्यात आली होती. ती इमारत मजुरांच्या निवासासाठी बांधण्यात आलेली नाही. ही इमारत शहरापासून लांब व जंगलामध्ये आहे. ती इमारत मजुरांना राहण्यासाठी द्यायला हरकत नाही. परंतु ही इमारत आम्हाला राहण्यासाठी द्यावी अशाप्रकारची कोणतीही विनंती शासनाकडे आलेली नाही. मधल्या कालखंडात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणूका असल्यामुळे निवडणुकीचे साहित्य ठेवण्यासाठी त्या इमारतीचा वापर झाला. कोणाकडून मागणी आली आणि त्या इमारतीच्या देखभाल दुरूस्तीची कोणी हमी घेतली तर ती इमारत देण्यास काही हरकत नाही.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, ही इमारत जंगलामध्ये बांधलेली आहे. आमदारांकडे तशी विनंती आली म्हणून त्या कामासाठी आमदार निधी दिला. माननीय मंत्री सांगत आहेत की, आमच्याकडे विनंती आलेली नाही. मेळघाट हा अतिदुर्गम भाग आहे. ती मजूर मंडळी शिक्षित नाहीत.  इमारतीमध्ये राहण्याबाबत मजुरांकडून विनंती आली तर इमारतीतील सामान दुसरीकडे हलवून मजुरांना ती इमारत वापरण्यासाठी देण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी अगोदच सांगितले की, इमारत देण्यास कोणतीही अडचण नाही. परंतु कोणतीही इमारत ताब्यात देत असताना त्या इमारतीची देखभाल दुरूस्ती करणारी एखादी संस्था असावी लागते. तेथील कोणत्याही संस्थेने पुढाकार घेऊन आम्हाला ती इमारत द्यावी असे सांगितले तर मजुरांसाठी ती इमारत मोकळी करण्यात येईल. कोणी इमारतीच्या देखभाल दुरूस्तीची जबाबदारी घेण्यास तयार असेल तर तातडीने इमारत देण्यात येईल.

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4440..

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मेळघाट हा दुर्गम भाग आहे आणि त्या ठिकाणी जंगली श्वापदे फिरतात. एखाद्या आदिवासीला वाघाने मारल्यानंतर आपण धावपळ करुन पुढची कारवाई करतो. त्यापेक्षा तेथे एक आसरा आहे आणि तो तेथील मजुरांच्या विनंतीवरुन बांधण्यात आलेला आहे. त्या इमारतीस औद्योगिक वसाहत असे वेगळे नाव असू द्या. परंतु तेथील नागरिकांचे जीवन सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने त्या इमारतीचा वापर करता आला तर तो करणे आवश्यक आहे, जे आपण मान्य केलेले आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4440....

श्री.भाई जगताप....

तसेच माननीय मंत्र्यांनी असेही सांगितले की, आमदार निधी किंवा अन्य निधीतून बस स्टँड किंवा अन्य बांधकाम केल्यानंतर ती बांधकामे हस्तांतरित करण्यासाठी लोक पत्र देतात. या प्रकरणी सुध्दा एक संस्था सदरहू बांधकाम हस्तांतरित करुन घेण्यास तयार आहे. लोकसभेच्या निवडणुका होऊन एक वर्षाचा काळ लोटला आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, सदरहू संस्थेने विनंती केल्यानुसार सदरहू भवन तत्काळ त्या संस्थेकडे हस्तांतरित करणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, मी वारंवार सांगत आहे की, ती इमारत मुळात निवाऱ्यासाठी बांधलेलीच नाही. ती इमारत 100 चौ.मी. क्षेत्रफळाची आहे. इमारत हस्तांतरित केल्यानंतर अनेकदा खिडक्यांच्या काचा फोडल्या जातात, कुलूप तोडले जाते किंवा दरवाजे तोडले जातात. परंतु नंतर त्याकडे कोणी लक्ष देत नाही. ही इमारत संस्थेकडे हस्तांतरित करण्यात राज्य सरकारला कोणतीही अडचण नाही. आपण सर्वजण बघतो की, राज्यामध्ये शासकीय इमारती वा समाज मंदिराच्या इमारती हस्तांतरित केल्यानंतर त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. तरी सुध्दा या इमारतीसाठी कोणी पुढे आले तर ती इमारत हस्तांतरित करण्यास राज्य सरकारची हरकत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, रोजगारांना राहण्यासाठी ती इमारत द्यावयाची असली तरी रोजगार हे ठेकेदारांचे असतात. शिवाय त्या ठिकाणी एकच ठेकेदार काम करीत नाही. मी स्पेसिफिक विचारते की, ठेकेदार वारंवार बदलत असल्यामुळे अशा स्थितीत ती इमारत मेन्टेनन्ससाठी नेमकी कोणाला देणार आहात ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, ती इमारत निवाऱ्यासाठी बांधलेलीच नाही. ज्या प्रयोजनासाठी आपण ती इमारत मागत आहात त्या प्रयोजनासाठी ती बांधलेलीच नाही.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी अतिशय परिपूर्ण उत्तर दिलेले आहे. त्यामुळे मी आता ता.प्र.क्र.4710 पुकारतो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.4710 आणि ता.प्र.क्र.6595 एकत्रित चर्चेला घेण्याबाबत**

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक-4 वरील ता.प्र.क्र.4710 आणि अनुक्रमांक-13 वरील 6595 हे दोन्ही प्रश्न सारखेच असल्यामुळे ते क्लब करुन त्यावर एकत्रित चर्चा घ्यावी, अशी माझी विनंती आहे.

**सभापती** : ठीक आहे. दोन्ही प्रश्नांतील आशय सारखाच असल्यामुळे आता ता.प्र.क्र.4710 आणि ता.प्र.क्र.6595 या दोन्ही प्रश्नांवर एकत्रित चर्चा घेण्यात येईल.

**मडूरा व पाडलेस, *(ता.सावंतवाडी,* जि.सिंधुदुर्ग) येथील बागायतीला लागलेल्या आगीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई मिळणेबाबत**

***(४)* * ४७१० *श्री.सुनील* तटकरे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.प्रकाश गजभिये, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

***(१)*** मडूरा व पाडलेस (ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग) येथील कोकण रेल्वे स्टेशन जवळील बागायतीला जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यानच्या दुसऱ्या आठवडयात लागलेल्या भीषण आगीत ३० एकर क्षेत्रातील हजारो काजू व आंबा कलमे जळून सुमारे ५० लाख रुपयांहून अधिक नुकसान झाल्याची धक्कादायक घटना घडली, हे खरे आहे काय,
***(२)*** असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
***(३)*** असल्यास, ज्या शेतकऱ्यांचे आगीत नुकसान झाले त्यांना कोणती नुकसान भरपाई देण्यात आली वा येत आहे,
***(४)*** अद्याप मदत देण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

***श्री.दिलीप कांबळे,* श्री. एकनाथराव खडसे *यांच्याकरिता* :** (१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी तालुक्यातील मडुरा व पाडलोस गावामध्ये दिनांक १० जानेवारी, २०१५ रोजी आकस्मिक आग लागून एकूण ४.४५ हेक्टर क्षेत्रात काजूची ४२० झाडे जळून अंदाजे रुपये ४.२० लक्ष चे नुकसान झाले आहे.
***(२)*** होय.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710...
श्री.दिलीप कांबळे....

*(३)* केंद्र शासनाच्या निकषानुसार आग लागून शेती अथवा फळ पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही. यास्तव वरीलप्रमाणे फळबागांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत देता येत नाही.
*(४)* प्रश्न उद्‌भवत नाही.

**आगीमुळे नुकसान झालेल्या आंबा व काजू बागायतदारांना मदत मिळणेबाबत**

*(१३)* * **६५९५** ***प्रा.जोगेन्द्र* कवाडे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

*(१)* मुंबई गोवा महामार्गावरील कपडगाव ते झरेवाडी दरम्यान दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या ***सुमारास*** लागलेल्या वणव्यात सुमारे ४०० एकर क्षेत्रातील आंबा, काजू, कलमांची हानी झाली असून १०० एकरमधील आंबा व ३०० एकर क्षेत्रातील काजू बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले हे खरे आहे काय,
*(२)* असल्यास, उक्त नुकसानीचे पंचनामे कर्मचा-यांच्या अभावामुळे पूर्ण झालेले नसल्याने शेतक-यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत विलंब झाला आहे, हे ही खरे आहे काय,
*(३)* असल्यास, उक्त ठिकाणच्या शेतक-यांना त्वरित नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
*(४)* अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ***?***

***श्री.दिलीप कांबळे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :*** (१), *(२)* व (३)
मुंबई गोवा महामार्गावरील रत्नागिरी जिल्ह्यातील चरवेली, झरेवाडी या दोन गावात दिनांक ४ फेब्रुवारी, २०१५ रोजी वणवा लागून फळपिकांचे नुकसान झाले आहे. सदर आगीचे पंचनामे करण्यात आले असून, त्यानुसार वणव्यामध्ये ६६ व्यक्तींच्या आंबा १६.१६ हेक्टर व काजूचे १७.५० हेक्टर असे एकूण ३३.६६ हेक्टर बागायतीचे नुकसान झाले आहे.

केंद्र शासनाच्या निकषानुसार वणवा लागून शेती अथवा फळ पिकाचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही. यास्तव वरीलप्रमाणे फळबागांच्या झालेल्या नुकसानीसाठी मदत देता येत नाही.
*(४)* प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, ता.प्र.क्र.4710 च्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "आकस्मिक आग लागून 4.45 हेक्टर क्षेत्रात काजूची 420 झाडे जळून अंदाजे रुपये 4.20 लक्ष चे नुकसान झाले आहे." याचा अर्थ 10 एकर जमिनीवर कृषी विद्यापीठाच्या नॉर्म्सनुसार 420

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710 व 6595....

श्री.सुनील तटकरे....

झाडे पूर्णपणे जळाली आहेत. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, सरकार एका झाडाची किंमत 10 हजार रुपये गृहीत धरत आहे काय ? महोदय, या बागा एका दिवसातील नाहीत. बागायतीमध्ये अनेक वर्षांपूर्वी लावलेली झाडे असतात. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, एका झाडाची किंमत किती गृहीत धरावी या बाबत सरकारचे धोरण काय आहे ? तसेच या प्रश्न क्रमांक-3 ला असे लेखी उत्तर दिले आहे की, "केंद्र शासनाच्या निकषानुसार आग लागून शेती अथवा फळ पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही." महोदय, केंद्र सरकारमुळे हे नुकसान झाल्याचे प्रश्नात कोठेही म्हटलेले नाही. प्रश्नामध्ये कोकण रेल्वे स्टेशन जवळील बागायतीत ही झाडे असल्याचा उल्लेख केला होता. त्यामुळे मी विचारु इच्छितो की, राज्य सरकारच्या प्रचलित नियमानुसार आगीत नुकसान झालेल्या बागायतदारांना राज्य सरकार मदत देणार आहे काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, वणव्यामुळे किंवा आगीमुळे शेती पिकाचे नुकसान झाले तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची तरतूद नाही. तसेच दुसरी बाब अशी की, या प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये केंद्र सरकारचा उल्लेख एवढ्याचसाठी करण्यात आला की, आकस्मिक नुकसान झाले तर केंद्र सरकारच्या एनडीआरएफ मधून मदत करण्याबाबतचे निकष दिले आहेत. वर्षानुवर्षे अनेक ठिकाणी आगी लागू पिकांचे नुकसान होते. वणव्यामुळे आग लागली तर नुकसान भरपाई देण्याचा उल्लेख केंद्र शासनाच्या निकषात नसल्यामुळेच त्या बाबतचा उल्लेख उत्तरात केला आहे. अशा प्रसंगी नुकसान भरपाई देण्याचा कोणताही धोरणात्मक निर्णय राज्य सरकारने घेतलेला नाही. दररोज कोठेना कोठे वणव्यामुळे किंवा अन्य कारणामुळे आगी लागतात. शेती ही विस्तृत असल्यामुळे प्रत्येकाला नुकसान भरपाई देणे आज तरी शक्य नाही.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, इतर ठिकाणी आग लागणे ही गोष्ट निराळी आहे. परंतु ही आग शेतकऱ्यांशी संबंधित आहे. सावंतवाडी तालुक्यातील मडूरा व पाडलेस या ठिकाणी असलेल्या बागायतीला दिनांक 10 जानेवारी, 2015 रोजी आग लागून त्यात जवळपास 420 झाडे जळून खाक झाली. यामध्ये अंदाजे 4.20 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सरकारने मान्य केले आहे.

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710 व 6595....

प्रा.जोगेंद्र कवाडे....

महोदय, मी आता ता.प्र.क्र.6595 च्या अनुषंगाने विचारतो की, मुंबई-गोवा महामार्गावरील कपडगाव ते झरेवाडी दरम्यान दिनांक 5 फेब्रुवारी, 2015 रोजी लागलेल्या आगीत सुमारे 400 एकर क्षेत्रातील आंबा, काजू कलमांची हानी झाली आहे. त्यामध्ये 100 एकरमधील आंबा व 300 एकर क्षेत्रातील काजू बागायतदारांचे आर्थिक नुकसान झाले आहे. या दोन्ही आगीमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याचे शासनाने मान्य केले आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "केंद्र शासनाच्या निकषानुसार आग लागून शेथी अथवा फळ पिकांचे नुकसान झाले असल्यास मदत अनुज्ञेय नाही." मला वाटते हे उत्तर फार निर्दयीपणाचे आहे. माननीय मंत्र्यांनी सांगितले की, केंद्र सरकारचे एनडीआरएफ असते. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, केंद्र सरकारचा जसा डिझास्टर मॅनेजमेंट फंड आहे तसाच राज्य सरकारचा डिझास्टर मॅनेजमेंट फंड आहे काय, असल्यास त्यातून ही मदत करणार काय आणि नसेल तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन वेगळी उपाययोजना करणार काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, या क्षणापर्यंत अशा प्रकारच्या अनेक आगी यापूर्वी लागलेल्या आहेत. परंतु कोणत्याही ठिकाणी राज्य सरकारने 100 टक्के नुकसान भरपाई दिलेली नाही. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारप्रमाणेच राज्याचा स्टेट डिझास्टर रिलीफ फंड आहे. केंद्र सरकारला कळवून राज्याच्या डिझास्टर रिलीफ फंड मधून 75 टक्के आणि राज्य सरकारचा त्यामध्ये 25 टक्के सहभाग असतो. केंद्र सरकारच्या निकषामध्ये अशा प्रकारे आगीची भरपाई देणे ही बाब मोडत नाही. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांनी विनंती केल्यानुसार, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारसमोर ठेवण्यात येईल. तत्पूर्वी मी सांगतो की, वर्षानुवर्षे राज्यात अशा प्रकारच्या आगी लागतात आणि त्यात मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. तद्नंतर नुकसान भरपाईबाबत मागणी केली जाते. परंतु राज्य सरकारने अशा प्रकरणात आतापर्यंत नुकसान भरपाई देण्याबाबतचा निर्णय घेतलेला नाही. किती आणि कशा स्वरुपात मदत करावी या बाबत कोणतेही निकष ठरलेले नाहीत. तरी सुध्दा माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील अन्य सहकाऱ्यांशी चर्चा करुन अशा घटनांमध्ये मदत देता येईल काय यावर विचार-विनिमय करुन निर्णय घेतला जाईल.

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710 व 6595....

श्री.भाई जगताप : महोदय, सावंतवाडी तालुक्यात आगीमुळे 420 झाडे जळून खाक झाली आहेत. यामध्ये 4.20 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सरकारने नमूद केले आहे. याचा अर्थ एका झाडाची किंमत 1 हजार रुपये गृहीत धरली आहे. वास्तविक पाहता ही झाडे फळे देणारी आहेत. ही झाडे लावल्यानंतर प्रत्यक्षात पीक यायला 7 वर्षे लागतात. परंतु ती झाडे जळाल्यानंतर एका झाडाचे मूल्यांकन केवळ 1 हजार रुपये करण्यात आले आहे, हाच यातील मुख्य भाग आहे. ज्यावेळी नुकसान भरपाई द्यावयाची असते त्यावेळी नुकसान झालेल्या झाडांचे मूल्यांकनच इतके कमी केले तर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कशी मदत मिळू शकेल ? या प्रकरणी झाडांचे जे मूल्यांकन गृहीत धरलेले आहे ते चुकीचे असल्यामुळे प्रथम त्यात सुधारणा करण्यात येईल काय आणि सुधारित मूल्यांकनानुसार नुकसान भरपाई अदा करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : महोदय, कोणत्याही झाडाचे मूल्यांकन हे कृषी विभागाच्या सूत्रानुसारच केले जाते. त्यानुसार झाडाचे आयुष्यमान किती आहे, सध्या ते किती वयाचे आहे, त्याची फलोत्पादनाची सुरुवात झाली आहे काय, फळ प्रक्रियेस किती वर्षे लागणार आहेत इत्यादी सर्व गोष्टींचा अंदाज घेऊन झाडाची किंमत ठरविली जाते. या प्रकरणी झाडाची किंमत 1 हजार रुपये ठरविण्यात आली आहे. ती किंमत 2 हजार रुपये ठरविली तरी अशा घटनांमध्ये नुकसान भरपाई देऊ शकत नाही. मला वाटते ही झाडे छोटी असल्यामुळे कदाचित त्यांची किंमत 1 हजार रुपये ठरिवली असेल. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांची मागणी असेल तर या बाबत तपासणी करता येईल. ही किंमत वाढविता आली तर वाढविता येईल. परंतु अशा घटनांमुळे नुकसान झाल्यास मदतच देता येत नाही तर ती किंमत कितीही वाढविली तरी त्याचा उपयोग नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710 व 6595....

श्री. एकनाथराव खडसे ....

आतापर्यंत मदत दिलेली नाही. 50-60 वर्षांत असे एखादेही उदाहरण नाही की ज्यामध्ये मदत दिली आहे. धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून कोणत्या मार्गाने देता येईल ती बाब तपासून पाहण्यात येईल. मदत देता येईल या दृष्टीने सकारात्मक विचार करण्यात येईल. रोज इतक्या घटना घडत आहेत. आंबा, काजू या फळांच्या संदर्भातच घटना घडल्या आहेत असे नाही तर गहू, ज्वारी अशा अनेक पिकांच्या बाबतीतही असे घडते. सदर बाबतीत धोरणात्मक निर्णय घेऊन त्या संदर्भात अंदाज करावा लागेल. सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे, योग्य आहे. सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. राहुल नार्वेकर : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, शासनाकडून आग लागून नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देता येणार नाही. स्टेट डिझास्टर मॅनेजमेंट फंड व नॅशनल डिझास्टर मॅनेजमेंट फंड यामध्ये अशी कोणतीही तरतूद नसल्यामुळे त्यांना नुकसानभरपाई देता येणार नाही. परंतु कृषी विमा योजनेत अशी अट टाकली आहे का की आग लागून किंवा विजेचे तारांमुळे आग लागून नुकसान झाले तर भरपाई मिळेल, अशी अट नसेल तर, शासन अशी अट टाकेल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, विम्यामध्ये आगीच्या संदर्भातील अट आहे. परंतु आता आंबा, काजू फळ झाडे जळाली, त्यांनी विमा काढलेला नाही, त्यामुळे त्यांना विम्याचे संरक्षण देता आलेले नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मंत्री ज्येष्ठ असून सभागृहाचे नेते आहे. फळबाग विमा योजना राज्यात लागू करून अशा फळबाग उत्पादक शेतकऱ्यांचे विम्याचे हप्ते भरण्याच्या दृष्टीने शासन सकारात्मक विचार करणार का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यात फळबाग योजना टप्प्याटप्प्याने लागू करण्याचा शासनाचा विचार आहे. हवामानावर आधारित फळबाग विमा योजना, नैसर्गिक आपत्तीमधील अडकलेल्या फळबाग योजना अशा स्वरूपाच्या योजनांचा वेगवेगळा विचार केलेला आहे. आजही केळीच्या संदर्भात, विदर्भातील संत्र्यांच्या संदर्भात फळबाग विमा योजना लागू केली

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4710 व 6595....

श्री. एकनाथराव खडसे ....

आहे. राज्य शासन त्या विम्याचा काही हप्ता आपल्या तिजोरीतून भरतो तशी आंबा, काजू वगैरेच्या संदर्भात जर फळबाग विमा योजना स्वीकारली तर त्या विम्याचा सुध्दा काही हप्ता, काही टक्के शासन भरेल.

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## जैतापुर प्रकल्पाचे रेंगाळलेले काम मार्गी लावण्याबाबत

**(5) * ४८८७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जैतापुर प्रकल्पाबाबत सरकारमध्ये मतभेद असल्यामुळे सदर प्रकल्पाच्या कामाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, सदर प्रकल्पाचे रेंगाळलेले काम मार्गी लावण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(3) अद्याप कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) नाही.
(2) प्रकल्पाच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण होऊन जमिनीचा ताबा न्युक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला देण्यात आला आहे.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी मंत्र्यांना विचारू इच्छितो की, उत्तरात काही बदल करावयाचा आहे का ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, उत्तर बरोबर आहे. उत्तरात काहीही बदल करावयाचा नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी प्रश्न विचारला होता की, या प्रकल्पाच्या बाबतीत सरकारमध्ये काही मतभेद आहेत का ? राज्यात विजेचा प्रश्न गंभीर झाला आहे. सरकार पक्षातील एका घटकाच्या काही स्थानिक आमदारांनी, खासदारांनी न्युक्लिअर पॉवर कार्पोरेशनचे ऑफिस चालू देणार नाही म्हणून गेल्या 8 दिवसांपूर्वी तेथे मोर्चे काढले आहेत. त्यामुळे आमच्या निदर्शनास असे येत आहे की, सरकारमधील एक घटक पक्ष याला प्रबळपणे विरोध करीत आहे. त्यामुळे मी माननीय मंत्र्यांना हा प्रश्न विचारला आहे. माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले त्याअर्थी सरकारमध्ये या प्रकल्पाबाबत कोणतीही मतभिन्नता नाही. जैतापूरमध्ये हा प्रकल्प होईल अशी मला माननीय मंत्र्यांच्या उत्तरातून खात्री झाली आहे.

सभापती महोदय, आजपर्यंत या प्रकल्पाला किती जमीन अपेक्षित होती, ती जमीन शंभर टक्के अधिगृहित झाली का आणि झाली असेल तर त्या जमिनीचा ताबा देऊन न्युक्लिअर पॉवर



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4887....

श्री. जयवंतराव जाधव ....

कार्पोरेशन कंपनीला ही जागा हस्तांतरित होऊन सदर प्रकल्प किती दिवसांत सुरू होणार आहे ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सरकारमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. 2336 शेतकऱ्यांची 938 हेक्टर जमीन संपादित केली आहे. दिनांक 22 मार्च, 2010 ला संपादन पूर्ण झाले आहे. मार्च, 2010 ला ताबा दिला आहे. राज्य सरकाची भूमिका जमीन संपादित करण्यापुरती आहे, पुनर्वसन प्राधिकरणाच्या कायद्याप्रमाणे त्यांना न्याय मिळतो का हे तपासण्याची आहे. हा प्रकल्प केव्हा सुरू करायचा, केव्हा पूर्ण होईल हे सर्व पाहणे केंद्र सरकारचे काम आहे. प्रकल्प केंद्र सरकारचा असल्याने प्रकल्पाचे बांधकाम यामध्ये राज्य शासनाचा कोणताही सहभाग नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण प्रकल्प आहे. देशाचे माननीय पंतप्रधान श्री. नरेंद मोदी साहेब फ्रान्सला गेल्यावर त्यांनी पुन्हा अनु करारावर स्वाक्षरी केली. हा प्रकल्प कार्यान्वित होणार आहे अशी केंद्र सरकारच्या वतीने हमी दिली. सरकारमध्ये मतभेद नाही असे माननीय मंत्र्यांनी सांगितले आहे. परंतु सरकारमधील भाग असणाऱ्या शिवसेना पक्षाचे प्रमुख श्री. उद्धव ठाकरे यांनी या प्रकल्पाला ठामपणे विरोध करणार असल्याची भूमिका जाहीर केली आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयवंतराव जाधव यांनी संगितल्याप्रमाणे शिवसेना पक्षाच्या 2 विधानसभा आमदारांनी रत्नागिरीमध्ये 8 दिवसांपूर्वी मोर्चा काढला होता. कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न होता अशी वर्तमानपत्रात बातमी आली होती. प्रत्यक्षात हा प्रकल्प कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने सरकारची भूमिका काय आहे ? पर्यावरण विभागाचे माननीय मंत्री श्री. रामदास कदम सांगतात की, पर्यावरण विभागाकडून या प्रकल्पाला ना हरकत प्रमाणपत्र दिले जाणार नाही. त्यामुळे या प्रकल्पाला पर्यावरण विभागाचा ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे का, ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे का ?

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी वारंवार सांगितले आहे की, राज्य शासनाची भूमिका जमीन संपादन करण्यापुरती मर्यादित आहे.

**सभापती** : मला कल्पना आहे की, नेहमी राज्य शासनाच्या मार्फत प्रकल्पासाठीचे भूसंपादन होते. परंतु या प्रकल्पामुळे होणारा वीज निर्मितीचा फायदा राज्याला, देशाला होणार आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4887....

**सभापती ....**

सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. राजकीय इश्यू नाही. शासनाने सांगितले आहे की, आमचे या संदर्भात मतभेद नाहीत. आपल्याकडे आता आवश्यक माहिती नसेल तर आपण ती पटलावर ठेवावी.

श्री. चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, राज्य शासन म्हणून माझ्याकडे या संदर्भातील पूर्ण माहिती आहे. सदर प्रकल्प केंद्र सरकारचा आहे. केंद्र सरकारने या प्रकल्पाचे काम केव्हा सुरू करायचे, केंद्र सरकारी काय काम करेल, प्रकल्प किती दिवसांत पूर्ण करायचा आहे, वीज केव्हा वितरित करतील हे सर्व प्रश्न केंद्र शासनाची संबंधित आहेत. केंद्र सरकारचा प्रकल्प असल्यामुळे शासनाने जमीन संपादित करण्याची भूमिका पूर्ण केली आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदय, मी आपल्याला निर्देश दिले आहेत. राज्य शासनाची यामध्ये भूमिका नसली तरी राज्य शासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असल्यामुळे, प्रकल्प सुरू करण्यामध्ये आपला रोल नसला तरी आपण आपल्या खात्यामार्फत पाठवून किंवा आपण वैयक्तिकरित्या जाऊन माहिती घेऊन यावे आणि प्रकल्प कधी पूर्ण होईल याची संपूर्ण माहिती पटलावर ठेवावी.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री चुकीची माहिती देत आहेत. माननीय राज्यपालांचे अभिभाषण शासनाचे पुढील धोरण म्हणून आमच्यासमोर व जनतेसमोर मांडले जाते. माननीय राज्यपालांनी त्यामध्ये राज्याला आश्वासन दिले आहे की, विजचे उत्पादन होण्यामध्ये जैतापूर प्रकल्पाचा मोठा सहभाग असणार आहे. शासनाची अशी भूमिका असताना, धोरण असताना शिवसेनेमार्फत रत्नागिरीमध्ये अधिवेशन सुरू असताना मोठा मोर्चा काढण्यात आला आहे. अधिवेशन सुरू असल्यामुळे मोर्चाला कमी लोक हाते. माननीय मुख्यमंत्र्यांना पत्रकारांनी विचारले असता त्यांनी असे सांगितले की, जैतापूर प्रकल्प होणार आहे, हे राज्याचे धोरण आहे. राज्याच्या हितासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. हा प्रकल्प पूर्ण करणे ही आमची जबाबदारी आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4887.....

श्री.जयंत प्र.पाटील.......

या ठिकाणी चुकीचे उत्तर दिले जात आहे व चुकीची नोंद होत आहे. त्यामुळे मंत्री महोदयांनी केलेले वक्तव्य कामकाजातून काढून टाकावे, अशी माझी मागणी आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, केंद्र सरकारने जैतापूर प्रकल्पासंदर्भात फार पूर्वीच निर्णय घेतलेला आहे. तेव्हापासून आजपर्यंत भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. ती आजची प्रक्रिया नाही. मागील कालखंडातील प्रक्रिया पूर्ण करण्याच्या दृष्टीने राज्य सरकार प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, मुळात प्रश्न असा आहे की, राज्य सरकारची भूमिका काय आहे ? हा केंद्र सरकारचा प्रकल्प आहे. केवळ राज्यालाच नाही तर संपूर्ण देशाला वीज पुरविण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या संदर्भात राज्य सरकारने आपली भूमिका यापूर्वीच स्पष्ट केली आहे. आजही राज्य सरकारची हीच भूमिका आहे की, जैतापूरचा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे आणि त्यासाठी ज्या काही आवश्यक असतील त्या परवानग्या नियमानुसार राज्य सरकारच्या माध्यमातून दिल्या जातील.

सभापती महोदय, शिवसेना आणि भारतीय जनता पक्षाच्या संदर्भात जो प्रश्न आहे तो समन्वयाने सोडविला जाईल, त्याची काळजी आपण कुणीही करु नये. हा सरकारचा प्रश्न आहे. शिवसेना हा एक स्वतंत्र पक्ष आहे आणि पक्ष म्हणून बाहेर त्यांनी काही भूमिका मांडली आहे. परंतु, राज्य सरकारमध्ये समन्वयाने हा प्रश्न सोडवू आणि हा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, हीच राज्य सरकारची भूमिका आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, फ्रान्स आणि भारत या दोन देशांमध्ये झालेला हा करार आहे. राज्यपाल महोदयांनी देखील आपल्या भाषणात या प्रकल्पाबाबत सकारात्मक भाष्य केले आणि तशाच प्रकारचे भाष्य आता सभागृहाचे नेते, महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी केले आहे.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पविरोधी आंदोलनामध्ये एका व्यक्तिचा मृत्यू झाला आहे. हा प्रकल्प निश्चितपणे होणार आहे, असे राज्य सरकार सांगत आहे. परंतु, सरकारमधील एक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.4887.....

श्री.किरण पावसकर......

पक्ष त्या ठिकाणी आंदोलन करुन वेगळी भूमिका मांडत आहे. स्थानिक रहिवाशांमध्ये संशयाचे वातावरण आहे. सत्तारुढ पक्षाचे एक सन्माननीय सदस्य असे म्हणतात की, त्या ठिकाणी प्रकल्पाचे ऑफिसही उभारु देणार नाही. दुसरे एक सन्माननीय सदस्य असे म्हणतात की, कोणत्याही परिस्थितीत हा प्रकल्प होऊ देणार नाही. त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की, एका व्यक्तिचा मृत्यू झाला आहे. आंदोलन अधिक उग्र करण्यात आले तर कुणीही आमदार किंवा खासदार असेल तरी त्यांच्यावर कठोर कारवाई शासन करील, असे आश्वासन मंत्री महोदय देतील का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, नियमानुसार आणि कायद्यानुसार जे जे शक्य आहे, तशी भूमिका राज्य सरकार घेईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहाचे माननीय नेते आणि महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी उत्तर देत असताना सांगितले की, सत्तेमध्ये दोन्ही पक्ष एकत्र असले आणि जैतापूर प्रकल्पाच्या बाबतीत शिवसेनेचा विरोध असला तरी समन्वय साधून प्रकल्प पूर्ण करु. हा समन्वय किती दिवसात साधला जाणार आहे आणि साधला गेला नाही तरी, शिवसेनेचा विरोध झाला तरी हा प्रकल्प आपण पूर्ण करणार आहात का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, समन्वयाने हा प्रश्न सुटेल, असा आम्हाला विश्वास आहे. विरोधी पक्ष म्हणून आपण एकत्र असला तरी सभापती महोदयांच्या निवडीच्या वेळी आपला समन्वय आम्ही पाहिला आहे. एका पक्षाने विरोध केला आणि एका पक्षाने मदत केली. शेवटी स्वतंत्र पक्ष आहेत. प्रत्येक पक्षाची भूमिक वेगळी असू शकते. त्यामुळे समन्वय साधण्याचा प्रयत्न आम्ही करीत आहोत. आम्हाला आशा आहे की, आज ना उद्या काही तरी मार्ग निघेल.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, या राज्याच्या पर्यावरण मंत्री महोदयांनी असे स्पष्टपणे म्हटले आहे की, जैतापूर प्रकल्पाला पर्यावरणाचा दाखला दिला जाणार नाही. अशा

प्रकारे पर्यावरणाचा दाखला दिला जाणार नसेल तर हा प्रकल्प पूर्ण होऊ शकेल का, या संदर्भातील उत्तर सांघिक जबाबदारी म्हणून महसूल मंत्री महोदय देतील का ?

...3...



ता.प्र.क्र.4887.....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या प्रकल्पाला केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे. राज्याच्या पर्यावरण मंत्री महोदयांनी सभागृहात अशा प्रकारचे निवेदन केल्याचे माझ्या ऐकिवात नाही व त्याची मला माहिती नाही. याबाबत माहिती घेऊन मी सभागृहाला अवगत करीन.

-------------

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यात मुक्त विद्यापीठांमार्फत घेण्यात आलेल्या पदवीधारकांना नोकरीची संधी आणि पदोन्नती नाकारली जात असल्याबाबत**

**(6) * ५३०० डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक १७१८ ला दिनांक २३ डिसेंबर,२०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भातः** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात मुक्त विद्यापीठामार्फत घेण्यात आलेल्या पदवीधारकांना नोकरीची संधी आणि पदोन्नती नाकारली जात असल्याच्या पार्श्वभुमीवर राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु यांची बैठक आयोजित करून तद्संबंधीचा अहवाल डिसेंबर, २०१४ पर्यंत शासनास सादर करण्याच्या सुचना महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, तद्संबंधीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, अहवालात नमुद मुख्य बाबींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(3) मुक्त विद्यापीठाची शासनमान्य पदवी अग्राह्य धरण्याचे नेमके कारण काय, याबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(4) अद्याप अहवाल प्राप्त झालेला नसल्यास, होत असलेल्या विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय
(2) चारही कृषि विद्यापीठांतील कार्यरत कृषि सहाय्यकांना (मुक्त विद्यापीठांच्या पदवीधारकांसहित) कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर नियामानुसार पदोन्नती देण्याबाबत विचार होण्यास हरकत नसल्याचे दि. २०.१२.२०१४ रोजी महासंचालक, कृषि परिषद, पुणे यांचे दालनात राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांचे कुलगुरु व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु यांच्यात झालेल्या बैठकीतील अहवालात नमूद केले आहे. तसेच कनिष्ठ संशोधन सहाय्यक या पदावर पदोन्नती/निवड होण्यासाठी त्यांनी महाराष्ट्र कृषि विद्यापीठे, १९९०/शासन निर्णय/परिपत्रक/सुचना/ नियमानुसार आवश्यक ती शैक्षणिक अर्हता आणि अनुभव धारण करणे बंधनकारक राहील असे मत व्यक्त केले आहे.
(3) सामान्य प्रशासन विभागाचा दि. १२.१२.२००६ च्या शासन निर्णयानुसार दिलेल्या सूचनेनुसार अध्यापकीय पदे वगळून इतर पदांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पदवीका/पदवी पात्र ठरविलेल्या आहेत.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, राज्यातील विविध विद्यापीठातून मिळविलेल्या पदवी आणि पदवीकाधारक विद्यार्थ्यांना नोकरीमध्ये आणि पदोन्नतीमध्ये संधी मिळत असते. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाकडून काही पदव्या आणि पदविका दिल्या जातात. परंतु, कृषी विद्यापीठामध्ये मात्र त्या पदवी आणि पदविकाधारकांना पदोन्नतीसाठी आणि नियुक्तीसाठी ग्राह्य



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.5300.....

श्री.रामनाथ मोते......

धरल जात नाहीत. मागील अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. दिनांक 20 डिसेंबर, 2014 रोजी महासंचालक, कृषी परिषद, पुणे यांच्या दालनात राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांचे कुलगुरु व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे कुलगुरु यांच्यात बैठक होऊन हा प्रश्न मार्गी लागला असल्याचे उत्तरात नमूद केले आहे. कनिष्ठ संशोधन सहाय्यक पदावर पदोन्नतीसाठी मुक्त विद्यापीठाची पदवी व पदविका ग्राह्य धरली जाईल, असे त्यामधून ध्वनित होत आहे. उत्तरामध्ये असेही म्हटले आहे की, नवीन नियुक्तीसाठी मात्र ही पदवी किंवा पदवीका ग्राह्य धरली जाणार नाही. माझी अशी विनंती आहे की, यशवंतराव चव्हाण विद्यापीठाची पदवी व पदविका सर्व ठिकाणी ग्राह्य धरली जात असताना नियुक्तीसाठी देखील ग्राह्य धरण्यात यावी. या प्रकारचा निर्णय शासन घेणार आहे का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सर्व कुलगुरुंची बैठक झाली असून त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार अध्यापकीय पदे सोडून कनिष्ठ संशोधन सहायक पदोन्नतीसाठी मुक्त विद्यापीठाच्या पदवी व पदविका ग्राह्य धरुन इतर विद्यापीठाप्रमाणे न्याय देण्याची भूमिका घेतलेली आहे. अंतिम निर्णय शासन स्तरावर प्रलंबित आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून याबाबत लवकरात लवकर कार्यवाही होणे अपेक्षित आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे कायद्याने स्थापन झालेले विद्यापीठ आहे. हजारो, लाखो विद्यार्थी दिवसभर काम करुन या विद्यापीठातून शिक्षण घेत आहेत. परंतु, त्यांनी कष्टाने संपादित केलेल्या पदवी किंवा पदविका ग्राह्य धरल्या जात नसल्यामुळे त्यांच्यावर होणार हा अन्याय अत्यंत खेदजनक आहे. त्याचा मी निषेध करतो. सामान्य प्रशासन विभागाकडून या संदर्भातील अंतिम निर्णय अपेक्षित आहे, असे उत्तर मंत्री महोदयांनी दिले आहे. हा निर्णय येते शैक्षणिक वर्ष संपण्याअगोदर घेण्यात येईल का ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या स्तरावर हा निर्णय प्रलंबित आहे. अध्यापकांची पदे वगळून कनिष्ठ सहायक संशोधक पदांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या

...6....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.5300.....

प्रा.राम शिंदे......

संदर्भात चार विद्यापीठांचे कुलगुरु आणि यशवंतराव चव्हण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरु यांची बैठक कृषी व संशोधन विकास परिषदेमध्ये झाली असून असा निर्णय घेण्यात आला आहे की, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ हे अन्य विद्यापीठांच्या समकक्ष आहे. त्यामुळे त्यांच्या पदव्या किंवा पदविका ग्राह्य धरल्या जाव्यात. दिनांक 19/12/2014 रोजी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे आला असून सामान्य प्रशासन विभागाकडे प्रलंबित आहे. लवकरात लवकर या संदर्भात निर्णय व्हावा, असे सामान्य प्रशासन विभागाला कळविण्यात येईल.

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

-----------

...7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : लेखी उत्तरे.

**मु. शी. :** तारांकित प्रश्नासंबंधी अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "गुढे पाचगणी (ता.शिराळा, जि.सांगली) पठारावरील शिरसाटवाडी व खरींगवाडी येथील शेतकऱ्यांची मे.सुझलॉन कंपनीने केलेली फसवणूक" या विषयावरील श्री.भगवान साळुंखे, माजी वि.प.स.व श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांच्या दिनांक 22 मार्च, 2010 रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्न क्रमांक 3502 ची अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**अध्यक्ष/सभापती :** अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

--------------

...8.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहातील कामकाजाबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. आजच्या कामकाज पत्रिकेत विधान परिषद नियम 260 अन्वये दोन प्रस्ताव दाखविण्यात आले आहेत. सर्वसाधारणपणे आपल्या नियमानुसार, प्रथा, परंपरेनुसार मंगळवारी सत्तारुढ पक्षाचा एकच प्रस्ताव चर्चेला येत असतो. परंतु, या ठिकाणी दोन प्रस्ताव दाखविण्यात आले आहेत.

सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार शासनाच्या वतीने केळकर समितीच्या अहवालावरील चर्चा ठेवली जाईल, असे सांगितले गेले होते. या ठिकाणी शासनाचा कोणताही प्रस्ताव नाही तर सत्तारुढ पक्षाचा प्रस्ताव आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

सभापती महोदय, मला पॉईंट ऑफ प्रोसिजरद्वारे हे जाणून घ्यावयाचे आहे की, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावात अनुशेषाचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये असे ठरले होते की, डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात दोन दिवस चर्चा करण्यात येईल. आता जो प्रस्ताव दिलेला आहे त्यामध्ये अनुशेष कोठे आहे, काय आहे, याचा उल्लेख करण्यात आला आहे. सत्ताधारी पक्षाने नियम 260 अन्वये प्रस्ताव आणलेला असताना दुसरा प्रस्ताव देखील नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाचा कसा काय घेता येऊ शकतो. एका वेळी एकच प्रस्ताव कामकाज पत्रिकेवर दाखविता येऊ शकतो. गेल्या आठवड्यातील प्रलंबित प्रस्ताव असेल तर तो कामकाज पत्रिकेवर दाखविता येईल. याच आठवड्यातील नियम 260 अन्वये दुसरा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाचा दाखविता येणार नाही. अशी माझी पॉईंट ऑफ प्रोसिजरद्वारे हरकत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जो मुद्दा मांडला तो बरोबर आहे. केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा करावी अशी मी मागणी केली होती. त्यावेळी सभागृहाचे नेते म्हणाले होते की, केळकर समितीचा अहवाल सभागृहात शासनाच्यावतीने मांडून त्यावर चर्चा करण्यात येईल. आता हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाच्या वतीने मांडण्यात आला आहे, शासनाचा प्रस्ताव वेगळा असतो. शासकीय कामकाजात हा प्रस्ताव आला पाहिजे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई मंत्रिमंडळात नाहीत. त्यांचा शासनाला पाठिंबा आहे. त्या मंत्रिमंडळात असत्या तर असे झाले नसते. आज नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेला आहे त्यावर चर्चा करण्यात येऊ नये. उद्या शासनाच्या वतीने हा प्रस्ताव पुन्हा आणावा व त्यावर सभागृहात चर्चा करावी अशी माझी मागणी आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे व सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी जो विषय उपस्थित केला ती वस्तुस्थिती आहे. सभागृहाच्या प्रथा परंपरा व नियमाप्रमाणे नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाचा नेहमी एक प्रस्ताव घेण्यात येतो. कामकाज सल्लागार समितीत केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करण्यासाठी आजचा दिवस निश्चित करण्यात आला होता. केळकर समितीच्या अहवालावर चर्चा करायची असेल तर नियोजन मंत्री महोदयांकडून हा प्रस्ताव येणे अपेक्षित होते. हे सोपस्कार टाळण्यात आले आहेत. नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाकडून यासंदर्भातील प्रस्ताव आणण्यात आला आहे. असे असताना दुसरा

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...
नियम 260 अन्वये प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून आणण्यात आला आहे. माझी विनंती आहे की, एक तर हे दोन्ही प्रस्ताव बाजूला सारुन कामकाज सल्लागार समितीत ठरल्याप्रमाणे केळकर समितीच्या अहवालावर आज किंवा उद्या चर्चा सुरु करावी. नियम 260 चा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाचा आहे, त्यामुळे एका प्रस्तावावर चर्चा व्हावी व दुसरा प्रस्ताव कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षाच्या सदस्यांना हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून यावा किंवा नियोजन मंत्री महोदयांकडून यावा यामध्ये स्वारस्य आहे की, या अहवालावर चर्चा व्हावी यामध्ये स्वारस्य आहे. नियम 260 अन्वये हा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून आल्यानंतर सविस्तर चर्चा होईल त्या चर्चेला उत्तर नियोजन मंत्री देणार आहेत. दुसरे कोणतेही मंत्री उत्तर देणार नाहीत. प्रस्ताव कोणी आणला, का आणला यापेक्षा विरोधकांना चर्चा हवी की नाही, यावर उत्तर हवे की नाही. त्यामुळे हा प्रस्ताव कोणीही आणला आणि विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील आणला असता तरी त्या प्रस्तावाला नियोजन मंत्री महोदयांनीच उत्तर दिले असते. त्यामुळे या अहवालावर चर्चा व्हावी असे आम्हाला वाटते. विरोधी पक्षाच्या सदस्यांची इच्छा असेल तर या अहवालावर पुढील अधिवेशनात चर्चा घेण्यात येईल. आता अधिवेशनाचे दिवस कमी राहिले आहेत, त्यामुळे चर्चा होऊ शकत नाही. केळकर समितीच्या अहवालावर आता चर्चा होत नसेल तर पुढील अधिवेशनात चर्चेसाठी घ्यावा असे मला वाटते.

**सभापती** : मी याबाबत दोन्ही बाजूंकडील म्हणणे ऐकून घेतले आहे. राज्याच्या भविष्याच्या दृष्टीने केळकर समितीच्या अहवालावर सांगोपांग चर्चा होणे आवश्यक आहे. कामकाज सल्लागार समितीमध्ये हा प्रस्ताव शासनाकडून येईल असे गृहीत धरले होते. हा प्रस्ताव कोणत्या ना कोणत्या आयुधामार्फत आलेला आहे. आता दुसरा प्रोसिजरचा प्रश्न तयार होत आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा नियम 260 चा प्रस्ताव आहे, त्यामध्ये देखील सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांचे नाव आहे. याबाबत मी असे रुलिंग देतो की, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केळकर समितीचा जो प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर नियम 260 अन्वये शासन उत्तर देणार असेल तर शासनाचे उत्तर रेकॉर्डवर राहील. हा पहिला मुद्दा आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचा नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आहे तो पुढे ढकलला जाईल आणि दुसरा प्रस्ताव विरोधी सदस्यांकडून घेण्यात येईल.

----------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:मु.शी.:** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री.एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ***महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे सन २००५-२००६, २००६-२००७, २००७-२००८, २००८-२००९ व २००९-२०१० या वर्षांचे स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.***

**सभापती** : लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ***महाराष्ट्र सागरी मंडळ यांचे सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचे प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवतो.***

**सभापती** : प्रशासकीय अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने ***महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचे सन २०११-२०१२ व २०१२-२०१३ या वर्षांचे अनुक्रमे अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.***

**सभापती** : अडतीसावा व एकोणचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुभाष देसाई (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कोकण विकास महामंडळ मर्यादित यांचा सन 2012-2013 या वर्षाचा बेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : बेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळ मर्यादित यांचा सन 2013-2014 या वर्षाचा छत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : छत्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित पुणे यांचा सन 2013-2014 या वर्षाचा त्रेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : त्रेचाळिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मुंबई महानगरपालिकेच्या महापौर यांच्या संभाषणाच्या सीडीबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनवर बोलण्यासाठी उभा आहे. चार दिवसापूर्वी मुंबईच्या महापौरांच्या संभाषणाच्या बाबतीत विषय उपस्थित केला होता. याबाबत आपण सरकारला निदेश दिले होते की, सरकारने याबाबत निवेदन करावे. चार दिवस झाले तरी सरकारकडून याबाबत निवेदन करण्यात आले नाही. सभापती महोदयांच्या निदेशाचे पालन केले जात नाही. ही अतिशय दुर्भाग्यपूर्ण गोष्ट आहे. आपण निदेश देऊन सरकार निवेदन करणार नसेल तर या सभागृहाला व सभागृहाच्या प्रथा परंपरेला अर्थ राहणार आहे. असा प्रश्न आमच्या मनात निर्माण होत आहे. आपल्या निदेशाचे पालन सरकार करणार नसेल तर या सभागृहाचे काय महत्व राहणार आहे ही बाब स्पष्ट होणे आवश्यक आहे.

**सभापती** : मंत्री महोदयांनी सरकारकडून खुलासा करावा.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय सभापतींकडून निदेश आल्यानंतर त्याचे पालन व्हायला पाहिजे, यामध्ये दुमत नाही. यासंदर्भातील सर्व माहिती मी आज घेतो. विरोधी पक्ष नेत्यांना मी सांगू इच्छितो की, सार्वभौम सभागृहाचा राजकारणासाठी वापर होता कामा नये. ती सीडी पुन्हा आपण पाहून घ्यावी. सभागृहातील प्रश्नोत्तरे झाल्यानंतर ती सीडी मी पुन्हा पाहिली आहे. त्यामध्ये काहीही आक्षेपार्ह नाही. महापौर यांना त्यात गोवण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. त्यांना प्रश्न विचारण्याचे काम करण्यात आले होते.

**सभापती** : मंत्री महोदय आपण शासनातर्फे याबाबत एक निवेदन करावे, एवढाचा हा विषय आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय.

-------

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यात मोकाट कुत्र्यांचा मोठ्या प्रमाणावर प्रादुर्भाव झालेला आहे आणि सामान्य जनतेला याचा मोठ्या प्रमाणावर त्रास होत आहे. मोकाट कुत्रे लोकांना चावतात....

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना सांगू इच्छितो की, आपण कोणत्या आयुधाच्या माध्यामातून हा विषय उपस्थित करीत आहात ? ठीक आहे, आपण या संदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांना गोरेगांव परिसरात याचा अनुभव आलेला आहे. त्या ठिकाणी एक कुत्रे दुसऱ्या व्यक्तीच्या अंगावर धावून गेले होते. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर त्या कुत्र्याला हटविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु, तेच कुत्रे त्यांच्या अंगावर धावून आले व त्यांना चावा घेतला. म्हणजे ते कुत्रे पिसाळले होते काय याचा तपास झाला पाहिजे. त्या परिसरात असे कुत्रे वावरत आहेत. सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांच्या अंगावर असे कुत्रे कोणी सोडले हाते की काय, अशी आम्हाला शंका वाटते. म्हणून याचा संपूर्ण तपास झाला पाहिजे. जनतेला त्रास होऊ नये म्हणून मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाच्या वतीने निवेदन करण्यात यावे, अशी मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

**सभापती** : माननीय श्री.दिवाकर रावते साहेब, मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत शासनाचे धोरण निवेदनाच्या माध्यमातून शासनाने स्पष्ट करावे.

------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मांसाहारावर सरसकट बंधने आणण्याच्या संदर्भात शासनाने भूमिका स्पष्ट करणेबाबत**

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशन**

डॉ.निलम गोऱ्हे : सभापती महोदय, आता अधिवेशन सुरु आहे. केंद्र शासनाने काल गोवंश हत्या बंदी कायदा संपूर्ण देशात लागू केलेला आहे.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,........

**सभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ.निलम गोऱ्हे यांना बोलण्याची परवानगी दिलेली आहे. त्यानंतर मी आपल्याला बोलण्याची परवानगी देतो.

डॉ.निलम गोऱ्हे : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपली आभारी आहे. मी सांगू इच्छिते की, महाराष्ट्र सरकारच्या वतीने काल उच्च न्यायालयात असे सूचित करण्यात आले की, गोवंश हत्या बंदी ही सुरुवात आहे.....

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

डॉ.निलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी एका मिनिटात माझे म्हणणे मांडणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचना प्रथम घेतल्या पाहिजेत.

डॉ.निलम गोऱ्हे : सभापती महोदय, यामुळे काही लोकांचा रोजगार जाणार आहे. विशेषतः कोंबड्या पालन, बकऱ्या पालन, मासेमारी यावर हजारो लोकांचा व्यवसाय अवलंबून आहे. भाषा, भूषा, भोजन, भवन हा व्यक्तींचा मूलभूत अधिकार आहे. आहाराच्या संदर्भात सर्वच प्रकारच्या मांसाहारावर बंदी आणण्याच्या संदर्भात सरकारच्या वतीने माजी वकील महोदयांनी न्यायालयात म्हणणे मांडलेले आहे. आम्ही सत्तेत सहभागी झालेलो आहोत. आमचा शासनाला पाठिंबा आहे. हे सभागृह सार्वभौम आहे. आपण लोकशाहीवादी आहोत, असे आपण वारंवार सांगता. राज्य शासनाने सर्व प्रकारच्या मांसाहारावर सरसकट बंधने आणण्याच्या संदर्भात काही भूमिका घेतलेली आहे काय या संदर्भात आम्हाला माहिती मिळावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृहात वेगळी प्रथा पडत आहे. माझी हरकत आहे की, म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना असतील तर त्यापूर्वी लेईंग देखील

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील..........

घ्यावयाचे नसते. नियमानुसार म.वि.प. नियम 289 अन्वये दिलेली प्रस्तावाची सूचना प्रश्नोत्तरे सुरु होण्यापूर्वीच घ्यावयाची आहे. परंतु, अपवाद म्हणून आपण त्यावेळी या संदर्भात निर्णय घेतला होता. आम्ही ज्यावेळी हरकत घेतली त्यावेळी आपण सांगितले की, लेईंग होऊ द्यावे. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशनच्या माध्यामतून मुद्दे उपस्थित केले. आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना कशासाठी देतो आणि ज्या विषयावर आम्ही म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना देतो, त्याच विषयावर दुसऱ्या माध्यमातून सन्माननीय सदस्य बोलणार असतील तर 289 च्या सूचनेचे महत्व निघून जाते.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**</u>

**सभापती** : आज माझ्याकडे म.वि.प. नियम 289 अन्वये तीन सूचना प्राप्त झालेल्या आहेत. हे विषय आजच्या कामकाजापत्रिकेत समाविष्ट नाहीत.

सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "राज्यात जनावरांच्या जतनाविषयी सन 1976 च्या कायद्यानुसार गायींची कत्तल करण्यास बंदी असून फेब्रुवारी, 2015 पासून लागू झालेल्या नव्या सुधारित कायद्यानुसार गायींसोबत आता बैल व वासरांचाही समावेश केला गेला आहे. एवढेच नव्हे तर परराज्यात मारलेल्या अशा जनावरांचे मांस जवळ बाळगणेही गुन्हा ठरविण्यात आला असून त्यासाठी पाच वर्षापर्यंत कैद व 10 हजार रुपये दंडाची शिक्षा ठरविण्यात अली आहे. बकरी, कोंबडी इतर प्राण्यांवर बंदी आणल्यास राज्यातील गरीबातला गरीब माणूस, खाटकांचा धंदा करणारा वर्ग नामशेष होईल, कायद्यामुळे गोवंशबंदी पासून सुरुवात करण्यात आली असली तरी भविष्यात सरकार इतर जनावरांच्या कत्तलीवरही बंदी आणेल असे मत सरकारतर्फे न्यायालयात व्यक्त करणे, त्यामुळे राज्यात या बंदीमुळे उद्रेक होण्याची शक्यता असणे" या विषयावर म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी या संदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सभागृह सुरु असताना राज्याचे ॲडव्होकेट जनरल शासणाचे धोरण जाहीर करतात यावर माझा आक्षेप आहे. सभागृह सुरु असताना शासनाला वटहुकूम काढता येत नाही किंवा सभागृहाबाहेर धोरण देखील जाहीर करता येत नाही. ते धोरण मंत्री नाहीत तर ॲडव्होकेट जनरल शासनाच्या वतीने सांगतात की, आम्ही आज गोहत्या आणि गोवंश बंदी केली, यापुढे पूर्ण मांसाहाराला देखील बंदी करु. सभापती महोदय, मी रात्रभर झोपलो नाही. आपल्याला माहिती आहे की, सकाळी भाकरी बरोबर मांसाहार असल्याशिवाय मी जेवणच करु शकत नाही. सन्माननीय सदस्या डॉ.निलम गोऱ्हे यांनी पाठिंबा दिला त्याबद्दल मला आनंद वाटला. त्यांच्या कुटुंबात मांसाहार खात नसले तरी त्या मांसाहार खातात. मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना सांगू इच्छितो

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयंत प्र.पाटील..........

की, काही समाजामध्ये कांदा आणि लसून खाण्यास बंदी आहे. मग यापुढे कांदा आणि लसून खाण्यास देखील बंदी घातली जाईल. घटनेच्या अनुच्छेद 47 मध्ये पोषण आहार आणि राहणीमान यासंबंधी उल्लेख केलेला आहे. नागरिकांना घटनेनुसार जे अधिकार आहेत ते अधिकार शासन हिसकावून घेऊ इच्छित आहे. ॲडव्होकेट जनरल यांनी जे सांगितले त्या संदर्भात शासनाने खुलासा केला पाहिजे. म्हणून आज सभागृहासमोर असलेले संपूर्ण कामकाज बाजूला ठेऊन या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी मी म.वि.प. नियम 289 अन्वये मागणी करीत आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. सूचनेतील विषय म.वि.प. 289 चा विषय कसा होतो हे सांगण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अधवेशन सुरु असताना महाअधिवक्ता यांनी राज्याचे धोरण ठरविणे अशी घटना देशात पहिल्यांदाच घडलेली आहे. गोवंश हत्याबंदी कायद्याच्या बाबतीत निर्णय झाला, त्यावर चर्चा झाली. काल असे सांगण्यात आले की, आता राज्याने संपूर्ण शाकाहार सुरु करावा आणि याचा एकच अर्थ निघतो. हा विषय सामान्य जनतेशी निगडित आहे. उद्या जर संपूर्ण शाहाकार स्वीकारण्याच्या बाबतीत महाअधिवक्ता धोरण जाहीर करणार असतील तर कुक्कुट पालन व्यवसायाचे काय होणार आहे ? श्री.महादेव जानकर साहेब, तुमच्या आमच्या शेळी-मेंढी पालन व्यवसायाचे काय होणार आहे ? कोळी बांधव मासे पकडतात. मग त्या कोळी बांधवांचे काय होणार आहे ? कोणताही विषय सामान्य माणसाशी निगडित आहे. अधिवेशन सुरु असताना महाअधिवक्ता राज्य शासनाच्या वतीने त्या ठिकाणी अशा पद्धतीचे धोरण जाहीर करतात. म्हणून आमची विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी म.वि.प. नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना दिलेली आहे त्या विषयावर सभागृहासमोर असलेले सर्व कामकाज बाजूला ठेऊन चर्चा करण्यास परवानगी द्यावी.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी नियम 293 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली आहे. मी देखील या विषयाबाबत नियम 293 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली होती. आपण या विषयावर म्हणणे मांडण्याची संधी देत आहात त्याबद्दल आम्ही आपले आभारी आहोत. हा विषय अत्यंत गंभीर आहे. देशामध्ये गोहत्या बंदी कायदा अस्तित्वात असताना नव्याने गोवंश हत्या बंदी कायदा आणून सामाजिक वातावरण दूषित करण्याचा, मांसाहार करणाऱ्या समाजाच्या हक्कावर बंदी आणण्याचा प्रयत्न होत आहे. समाजातील काही घटकांनी या कायद्याविरुध्द हायकोर्टात याचिका दाखल केल्यानंतर शासनाची भूमिका स्पष्ट करण्याविषयी न्यायालयाने मत व्यक्त करताना शासनाची टिंगल केली आहे. गोवंश हत्या बंदी राज्यामध्ये लागू करीत आहात, अशा वेळी इतर जनावरांचे काय? असा प्रश्न न्यायालयाने महाअधिवक्त्यांना विचारला आहे. शासनाची या संदर्भातील भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी आपल्या वक्तव्यामध्ये न्यायाधीशांनी टिंगल केली असे शब्द उच्चारले आहेत. हे वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे, ते रेकॉर्डवर राहू नये अशी माझी विनंती आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : मी त्याऐवजी 'उपरोधिक' हा शब्द वापरतो आणि 'टिंगल' हा शब्द मागे घेतो.

**सभापती** : ठीक आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : आज राज्यामध्ये शिवसेना व भारतीय जनता पक्षाचे युती सरकार सत्तेवर आहे. अशा परिस्थितीत महाअधिवक्त्यांनी न्यायालयात शासनाचे धोरण मांडताना असे म्हटले आहे की, गोवंश हत्या बंदी हे शासनाचे पहिले पाऊल असून यापुढे टप्प्याटप्प्याने आम्ही इतर सर्व प्रकारच्या मांसाहारावर बंदी आणणार आहोत. राज्यातील बहुतांश जनता मांसाहार करणारी आहे. त्यामुळे कोंबड्या, शेळ्या, मेंढ्या, मासे यांचा व्यवसाय करणाऱ्यांच्या दृष्टीने मोठा गंभीर प्रश्न निर्माण होणार आहे. मांसाहार करणाऱ्या जनतेच्या हक्कावर गदा येणार आहे. केवळ काही मूठभर लोकांना खूष करण्यासाठी, जी यंत्रणा राज्य चालविण्याकरिता तुमच्या मागे बसली आहे त्यांच्या आदेशाने तुम्ही हा निर्णय घेत असाल तर ती अत्यंत गंभीर बाब आहे. यापेक्षा दुसरा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

गंभीर प्रश्न होऊ शकत नाही. त्यामुळे सभागृहाचे उर्वरित सर्व कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घेण्यात यावी अशी मी विनंती करतो. मांसाहारावर बंदी आणली जाणार नाही अशी स्पष्ट भूमिका राज्य शासनाने सभागृहात स्पष्ट केली पाहिजे. आज शिवसेना आणि भारतीय जनता पक्ष यांच्यामध्ये या विषयाबाबत मत मतांतर दिसून येत आहे. माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी स्पष्टपणे सांगितले की, आमची शासनाच्या निर्णयाबाबत सहमती नाही. सदनातील 80 ते 90 टक्के माननीय सदस्य मांसाहार करणारे आहेत. त्यामुळे शासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करुन मांसाहारी जनतेला दिलासा द्यावा अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** या विषयावर आजच माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी वि.प.स.नियम 293 अन्वये सूचना दिली असून या सूचनेवर राज्य शासनाने उद्याच निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे नियम 293 अन्वये "केंद्र शासन दिनांक 7 एप्रिल, 2015 पासून भूसंपादन कायदा लागू करणार असून हा कायदा शेतकरी विरोधी असणे" या विषयावर दुसरी सूचना दिली असून उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नसल्याने नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी नियम 289 अन्वये "नागपूर मध्यवर्ती कारागृह असुरक्षित असून या कारागृहास आयएसओचे प्रमाणपत्र मिळणे, याच कारागृहातून मोक्का कायद्यांतर्गत अटकेत असलेले पाच आरोपी गज कापून फरार होणे" या विषयावर तिसरी सूचना दिली असून उपस्थित केलेला विषय आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर समाविष्ट असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात नसल्याने नियम 289 च्या उपरोक्त सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, सुनील तटकरे, हेमंत टकले, प्रकाश गजभिये, ख्वाजा बेग यांनी नियम 289 अन्वये "चंद्रपूर जिल्हयातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पामध्ये दिनांक 3 एप्रिल, 2015 पासून मोठया प्रमाणात वणवा लागणे, या वणव्यामध्ये ताडोबातील 234 हेक्टरासह 500 हेक्टर जंगल जळून खाक होणे" या विषयावर सूचना दिली आहे. याच विषयावर माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. या सूचनेवर शासनाने निवेदन करावे असा मी निर्देश देत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

07-04-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y.3

SGB/ AKN/ MMP/ 14:40

**विधानभवनाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी कार्यक्रमासंबंधी**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शनिवार दिनांक 4 एप्रिल, 2015 रोजी छत्रपती शिवाजी महाराजांची पुण्यतिथी राज्यभर मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. मुंबई येथील विधानभवनाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पचक्र वाहण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सभापती महोदय, आपण साखर कारखान्याच्या निवडणूक कार्यक्रमामध्ये व्यस्त असल्यामुळे उपस्थित राहू शकला नाहीत अशी माझी धारणा आहे. या कार्यक्रमाला विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे सचिव आणि अधिकारी देखील उपस्थित नव्हते. हा छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान आहे.

एखाद्या कार्यक्रमाला पीठासीन अधिकारी उपस्थित राहणार नसतील तर स्थानिक आमदारांना निमंत्रित करण्याची प्रथा आहे. यापूर्वी कुलाबा मतदारसंघातील आमदार श्रीमती ॲनी शेखर यांना अशा कार्यक्रमाकरिता बोलावले गेले होते. लागोपाठ चार दिवस सुट्टी असल्यामुळे या कार्यक्रमाला कोणी उपस्थित राहिले नाहीत ही गंभीर बाब आहे. ही बाब राज्य शासनाला आणि सभागृहाच्या परंपरेला कमीपणा आणणारी आहे. विधानभवन परिसर आपल्या अधिपत्याखाली येत असल्यामुळे बाहेरची कोणतीही व्यक्ती या ठिकाणी ढवळाढवळ करु शकत नाही. या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याकडे मी आपले लक्ष वेधतो आणि या संबंधी अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी अशी मी विनंती करतो.

**सभापती** : माननीय सदस्यांनी केलेले वक्तव्य तपासून घेऊन पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**सभापती :** माझ्याकडे आज दिनांक 7 एप्रिल, 2015 रोजी नियम 93 अन्वये ज्या सूचना प्राप्त झाल्या होत्या, त्या संदर्भातील माझा निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "वेंगुर्ले तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) मठ पंचक्रोशी परिसरातील सिलिका खनिज प्रकलप सुरु करण्याकरिता दिनांक 8 एप्रिल, 2015 रोजी जनसुनावणी लावण्यात आलेली असणे, या सुनावणीकरिता इंग्रजीमधून प्रसारित करण्यात आलेला पर्यावरण विभागाचा अहवाल मराठीतून प्रसारित करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनिल तटकरे यांनी "पेण तालुक्यातील निगडे येथील जनार्दन शिवराम नाईक यांच्या 4 वर्षाच्या मुलीने दुसऱ्यांदा प्रसाद घेतल्याने मुलीला धक्का दिल्याबाबत संबंधितांना जाब विचारल्याने त्यांना गावकीने गेली 3ञ वर्षे वाळीत टाकल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर झेड.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.हुस्नबानू खलिफे यांनी "राज्यातील कोकण किनारपट्टीवर दहा वर्षामध्ये झालेल्या औद्योगिकरणामुळे व नागरीकरणामुळे खाडीतील मासेमारी संपण्याच्या मार्गावर असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री धनजंय मुंडे, अमरसिंह पंडित यांनी "मौजे हेळंब (ता.परळी वैजनाथ, जि.बीड) ग्रामपंचायतीच्या 13 व्या वित्त आयोगाच्या निधीत झालेल्या अपहाराची चौकशी करण्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांचेकडे तक्रार केल्यानंतरही कारवाई न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील, विजय सावंत,कपिल पाटील,श्रीकांत देशपांडे यांनी "लासलगाव मुख्य कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याला व्यापाऱ्यांनी लिलावाचा भाव कमी पुकारल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "मुंबई शहर व उपनगरात पुरविले जाणारे अन्न, भाजीपाला निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे दररोज 50 बालकांचा बळी जात असल्याचे एका सर्वेक्षणातून निदर्शनास येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री माणिकराव ठाकरे यांनी "राज्य सरकारने महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्यात सुधारणा केल्याने या विरोधात दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी करण्यात आली असता गायी व बैलांवरच बंदी का, शेळी सारख्या प्राण्यांचे काय असा प्रश्न खंडपीठाने उपस्थित केला असता ॲड.जनरल सुनील मनोहर यांनी भविष्यात असे घडू शकेल असे मत व्यक्त केल्यामुळे जनमानसात निर्माण झालेली साशंकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "प्रेतांची राख चाळून नाशिक महानगरपाकिा क्षेत्रातील 250 मागासवर्गीय कुटुंब करीत असलेला उदरनिर्वाह" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी "चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाला दिनांक 3 एप्रिल 2015 रोजी लागलेल्या आगीमुळे वन्य प्राण्यांना निर्माण झालेला धोका" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>पॉईंट ऑफ प्रोसिजर बाबत</u>**

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, अधिवेशन संपायला 4 दिवस राहिलेले आहेत. महत्त्वाच्या विषयावर आम्ही 93 अन्वयेची सूचना देतो. आम्ही पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या दिवशी सूचना देऊन देखील त्यावरील निवेदने अद्याप पर्यंत आलेली नाहीत. मी गेले चार दिवस बीड येथे असल्यामुळे माहिती घेतली असता 93 ची निवेदने आलेली असून ती येथे चर्चेला येत नाहीत. हे आयुधच विरोधी पक्षाचे आहे. मोजकी 2-3 निवेदनेच चर्चेला येत आहेत. यात कुठे तरी मॅन्युप्युलेशन केले जात आहे की काय अशा प्रकारची शंका येऊ लागली आहे. निवेदनावरील लेखी उत्तरे पाठवून देखील ती सभागृहापुढे का येत नाहीत ?

**सभापती :** शासनाच्यावतीने सभागृहात आता सन्माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर उपस्थित आहेत. यासंबंधी मी यापूर्वीचनिदेश दिले आहेत. नियम 93 वरील निवेदने हे विरोधी पक्षाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आयुध आहे. निवदने येऊन देखील ती चर्चेला येत नसतील तर ती बाब अत्यंत गंभीर आहे. या विषयासंबंधी आपण माननीय संसदीय कामकाज मंत्र्यांशी बोलावे. नियम 93 च्या सूचनेवरील निवेदने कशी येतील हे आपण पहावे आणि उरलेल्या तीन दिवसात जेवढी निवेदने आपल्याला सादर करता येतील तेवढी ती सादर करावीत.

श्री.बबनराव लोणीकर : होय.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आपल्या कार्यालयात निवेदने आली आहेत.....

**सभापती :** माझ्या कार्यालयात निवेदने आलेली नाहीत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापत महोदय, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. आपल्या कार्यालयात किती निवेदन आलीत याचा फॉलोअप घेण्यासाठी आपण स्वतंत्र कक्ष स्थापन करावा. मागणी करून देखील जाणूनबुजून 93 वरील निवेदने दिली जात नाहीत. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, नियम 93 वरील निवेदने वेळेवर येत नसल्यामुळे आपण सर्वांनी मिळून सभात्याग करूया.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी घोषणा देत सभात्याग करतात.)

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष उल्लेखाची सूचना**

**पृ.शी./मु. शी.** : रोहा तालुक्यातील (जि.रायगड) यशवंतखार उघडीची दूरवस्था झाल्यामुळे उघडीच्या दुतर्फा मातीचा मुरुम टाकणे याबाबत श्री.अनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल तटकरे (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

रोहा तालुक्यातील (जि.रायगड) यशवंतखार उघडीची दूरवस्था झाल्याने एकेकाळी समुद्राचे खारे पाणी शेतीत जात असल्याने खार भूमी विभागाने 30 लाख रुपये खर्च करुन सन 2014 मध्ये कंत्राटदारांमार्फत उघड बांधली त्यानंतर शेतकऱ्यांनी निश्वास सोडला मात्र मच्छीमार झडपा उघड्या ठेवत असल्याचा शेतीचे नुकसान होत असल्याचा आरोप करीत असले तरी मात्र उघडीच्या दुतर्फा मुरुमाचा भराव नसल्याने भात शेतीचे नुकसान होत असल्याने यशवंतखार परिसरात असलेल्या उघडीच्या दोन्ही बाजूस मुरुम मातीचा भराव टाकण्यात यावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती :** आता नियम 93 वरील निवेदने घेण्यात येतील. निवेदन क्र.64

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मला आजच्या आणि कालच्या निवेदनावर प्रश्न विचारण्यास अनुमती द्यावी. मी प्रथम आजचे निवेदन क्रमांक 64 वर प्रश्न विचारतो.

**पृ.शी./मु.शी.** : नाशिक विभागातील रोजंदारी/तासिका पद्धतीने काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी आयुक्त,आदिवासी विकास नाशिक येथे केलेले ठिय्या आंदोलन याबाबत श्री.जयंत जाधव वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.विष्णू सवरा ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 64 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती**: निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आदिवासी विभागात रोजंदारी/तासिका पद्धतीने काम करणारे कर्मचारी नंदूरबार येथून चालत येऊन त्यांनी आयुक्त, आदिवासी विकास नाशिक भवन येथे मोर्चा आणला. या मोर्चेकरांची अत्यंत दयनीय अवस्था होती. आम्ही संबंधित आंदोलनकर्त्यांना जाऊन भेटलो होतो. योगोयोगाने माननीय मुख्यमंत्र्यांचा त्या दिवशी दौरा होता त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी तातडीने कारवाई करून न्याय देऊ अशा प्रकारचे आश्वासन दिले. त्यानंतर मग आंदोलनकर्त्यांनी आपले आंदोलन मागे घेतले. आज खात्यामध्ये शेकडो पदे रिक्त आहेत. सुशिक्षित युवक बेरोजगार आहेत. मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्यानंतर देखील या रोजंदारी युवकांवर आजही उपासमारीची वेळ येत असेल तर ते फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने चालणाऱ्या राज्याला शोभणारे नाही म्हणून मी मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनासंबंधी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व या सर्व आंदोलनकर्त्यांना शासन किती दिवसांमध्ये न्याय देणार आहे ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, नाशिक येथे आंदोलन केले आहे ही बाब खरी आहे. आमच्याकडे रिक्त असलेल्या पदांचा आढावा आम्ही घेततेला आहे. आदिवासी विकास विभागात वर्ग-3 या संवर्गात 3270 रिक्त असून त्यातील 1289 पदांवर तासिका पद्धतीने कर्मचारी काम करीत आहेत. वर्ग-4 मध्ये एकूण 1909 पदे रिक्त असून 1422 पदांवर रोजंदारी पद्धतीने काम करण्यात येत आहे. 4 तास, 5 तास किंवा त्याहून अधिक तासिकांवर काम करणारे हे कर्मचारी आहेत. अशा प्रकारची मागणी आली तरी ती मान्य करू नये अशा प्रकारचा निदेश मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे. हा विषय आदिवासी विभागांपुरताच मर्यादित आहे असे नाही. महाराष्ट्रात 28 विभाग असून त्यात अशा प्रकारे काम करणारे कर्मचारी आहेत. त्यामुळे यात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. मागच्याच महिन्यामध्ये आम्ही सर्व माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे पाठविली आहे. या प्रश्नासंबंधी आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे. यासंबंधात जे निदेश येतील त्याप्रमाणे पूर्तता करण्यात येईल.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : आश्रमशाळेत सोलर वॉटर हिटर तसेच टेंडर केवळ दोन कंपन्यांनाच मिळत असण्याबाबत श्री.जयंतराव जाधव,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप कांबळे ( सामाजिक न्याय मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 115 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

----------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंतराव जाधव : सभापती महोदय, मी गेल्या तीन वर्षापासून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या सुखसोयीबाबत तसेच इतर सुविधा पुरवण्याबाबत मी या सदनात गेल्या तीन वर्षापासून विविध आयुधांच्या माध्यमातून विषय उपस्थित करीत आलेलो आहे. माझ्या नाशिक जिल्हयातील सर्व आश्रमशाळेच्या संदर्भातील दप्तर घेऊन आलेलो आहे. नाशिक जिल्हयातील 50/60 टक्के आश्रमशाळेत बसवलेले सोलर वॉटर हिटर आजही कार्यरत नाही. पाणी नसलयामुळे सोलर वॉटर हिटर कार्यरत नाही. जर पाणी उपलबध नसेल तर अशा ठिकाणी सोलर वॉटर हिटर का बसवण्यात आले ? संबंधित मुख्याध्यापक, पर्यवेक्षक यांनी अधिकाऱ्यांना वेळोवेळी तक्रार करुन सांगितले आहे की, आमच्या आश्रमशाळेत जे सोलर वॉटर हिटर लावलेले आहे ते कार्यान्वित नाही. सोलर वॉटर हिटर कार्यान्वित नसल्यामुळे आमचे आदिवासी बांधवांची मुले त्याच परिस्थितीमध्ये जगत आहेत. मी मांडत असलेला विषय अतिशय गंभीर आहे. या आदिवासी बांधवाना न्याय मिळाला नाही तर आमचे आदिवासी बांधव संपूर्ण आयुष्य सुधारु शकणार नाही. आश्रम शाळेच्या सोलर वॉटर हिटरचे आरसी 10-10 कंपन्यांचे मंजूर आहेत. परंतु शासन केवळ दोन ठेकेदारांनाच टेंडर देत आहे. त्यामुळे हे दोन ठेकेदार शासनाचे जावई आहेत काय ? मुख्याध्यापक वेळोवेळी तक्रार करुन सुध्दा त्या तक्रारीवर काहीही कारवाई केली जात नाही. आदिवासी भागात काम करणारे सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, आश्रमशाळेतील 10 टक्के सुध्दा सोलर वॉटर हिटर चालू नसतात. याप्रकरणाची चौकशी 3 वेळा करण्याचे निश्चित करण्यात आले होते परंतु या चौकशीला परत परत मुदतवाढ दिली गेली आहे. परत परत मुदतवाढ करण्याची नामुश्की या शासनावर आलेली आहे. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करु इच्छितो की, या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय अधिकाऱ्याची नियुक्ती करुन यावंदर्भात सखोल चौकशी केली जाईल काय ? इतरही कंपन्याचे आरसी मंजूर असतांना दोनच कंपन्याना ठेके का दिले गेले याची चौकशी तातडीने करुन त्यासंदर्भातील अहवाल किती दिवसात दिला जाईल ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, दिनांक 24/1/2011 रोजी दोन कंपन्यांना वसतीगृह आणि आश्रमशाळांना सोलर वॉटर हिटर बसवण्याचे काम देण्यात आले होते. याची किंमत 11 कोटी 26 लाख 2 हजार रुपये होती. जवळ जवळ 12 कोटी रुपयापर्यतचा हा खरेदी व्यवहार आहे. सन 2011 पासून हे पुरवठादार आजही वसतीगृह आणि आश्रमशाळांना सोलर

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. दिलीप कांबळे .......

वॉटर हिटर पुरवण्याचे काम करीत आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंतराव जाधव यांनी नियम 93 अन्वये मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार मी सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 15 दिवसाच्या आत या सर्व प्रकरणाची चौकशी केली जाईल. ज्या दिवशी या दोन ठेकेदारांना रक्कम दिलेली आहे त्या दिवसापासून व्याजासह ही रक्कम वसूल केली जाईल.

श्री. जयंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या विषयाच्या संदर्भात अतिशय चांगले उत्तर दिल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. या विषयामध्ये बायोमॅट्रीकचा सुध्दा विषय होता. अधिकारी कशा प्रकारे उत्तर देऊन वेडयात काढतात त्याचे हे उत्तम उदाहरण आहे. निवेदनात म्हटले आहे की, करारनाम्यातील अटी व शर्थीनुसार बायोमेट्रीक यंत्रांचा पुरवठा 12 आठवडयाच्या आत करावयाचा होता. परंतु सदर संस्थांची संख्या जास्त असल्यामुळे व तालुका विभागीय स्तरावर जास्तीचा वेळ लागत असल्यामुळे तसेच एकाच वेळी संस्थेतील विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित असल्यास एकाच वेळी काम होऊ शकत नाही. सुट्टया आणि गैरहजेरीमुळे काम होऊ शकत नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. ज्या अधिकाऱ्याने हे उत्तर तयार केलेले आहे त्या अधिकाऱ्याला खरे म्हणजे हे उत्तर तयार करताना लाज वाटली पाहिजे होती. माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा खातरजमा करुनच उत्तर द्यावयास पाहिजे होते. ठेका घेतांना कालावधी ठरवून दिलेला असताना अशा पध्दतीने उत्तर देणे योग्य नाही. बायोमॅट्रीक आणि सोलर वॉटर हिटरच्या माध्यमातून जो भ्रष्टाचार होत आहे त्यावर शासनाच्या वतीने 15 दिवसाच्या आत कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितल्या प्रमाणे महिन्याभराच्या आत संपूर्ण चौकशी केली जाईल. माझ्या विभागाचे सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन महिन्याभरात चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तसेच रत्नागिरी जिल्हयातील लांजा तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेली गारपिटीबाबत श्री.अनिल तटकरे,वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. दिलीप कांबळे ( विशेष सहाय्य मंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 107 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय,नियम 93 च्या निवेदनात मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, आंबा व काजू पिकाचे नुकसान झालेले नाही. या ठिकाणी 12 व 9 मि.मी. पाऊस झालेला आहे. आंबा पिकाच्या संदर्भात मंत्री महोदयांना जास्त कल्पना आहे की, नाही हे मला माहिती नाही. परंतु या ठिकाणी मंत्री महोदय श्री. केसरकर साहेब बसले असून त्यांना यासंदर्भातील संपूर्ण माहिती आहे. आंबा व काजू पीक इतके नाजूक असते की, पावसाळी वातावरण तयार झाले तर आंबा व काजू पिकावर रोग पडतो व त्यामुळे हे पीक योग्य त्या प्रमाणात येत नाही. निवेदनात म्हटले आहे की, 12 व 9 मि.मी. पाऊस झालेला आहे परंतु त्यामध्ये आंबा व काजू पिकाचे नुकसान झालेले नाही. 12 मि.मी.पावसाने या पिकाचे नुकसान होत नाही असे मंत्री महोदय श्री. केसरकर साहेब म्हणाले तर मी माझे विधान मागे घेईन. त्यामुळे यासंदर्भात माझे म्हणणे असे आहे की, शासन निवेदनामध्ये एका ठिकाणी म्हणते की, 12 व 9 मि.मी. पाऊस झालेला आहे परंतु त्यामध्ये आंबा व काजू पिकाचे नुकसान झालेले नाही त्यामुळे यासंदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करावा एवढी विनंती आहे.

श्री. दिलीप कांबळे : सभापती महोदय, या ठिकाणी जो पाऊस पडला आहे त्यासंदर्भात शासकीय नियमाप्रमाणे कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देण्यात येत नाही. भविष्यकाळात शासन यासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांशी चर्चा करेल. मघाशी महसूल मंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी राज्यातील अवकाळी पावसाच्या संदर्भात काहीनाकाही मदत करण्याच्या संदर्भात लवकरच निर्णय घेईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. अनिल तटकरे : सभापती महोदय, रत्नागिरी जिल्हयातील लांजा येथे 25 तारखेला 12.40 मि.मी. पाऊस व वादळ झाले होते. या पावसामुळे व वादळामुळे फळ पिकांचे नुकसान झाले असून पंचनामे केले जात आहे. मला मंत्री महोदयांना एवढेच विचारावयाचे आहे की, 12 व 9 मि.मी. पाऊस झालेला आहे परंतु त्यामध्ये आंबा व काजू पिकाचे नुकसान झालेले नाही परंतु नंतरच्या पॅरामध्ये म्हटले आहे की, 12 मि.मी. पाऊस पडल्यामुळे नुकसान झाले आहे. त्यामुळे या ठिकाणी परस्पर विरोधी उत्तरे दिली आहेत त्यामुळे मंत्री महोदयांनी यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे. निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, "नुकसानग्रस्त घरे व गोठे यासाठी आपदग्रस्तांना मदत देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे." निवेदनात पुढे असा उल्लेख आहे की, "रत्नागिरी जिल्हयातील लांजा तालुक्यातील बिवलडे व भांबेड मंडळात दिनांक 25 मार्च, 2015 रोजी पाऊस झाला होता. या घटनेला 45 दिवस उलटून गेले आहेत.. यानंतर श्री. अजित..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनिल तटकरे...

ही कारवाई केव्हा पूर्ण होईल. जर कारवाई पूर्ण झाली असेल तर त्याची तपशीलवार माहिती म्हणजे कुणाच्या घराचे किती नुकसान झाले, कोणाच्या गोठ्याचे किती नुकसान झाले, कोणाची किती जनावरे मृत्युमुखी पडली या संदर्भातील माहिती पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, होय. या संदर्भातील माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी पटलावर ठेवण्यात येईल.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी./ मु.शी.** : नाशिक जिल्ह्यातील पेठ तालुक्यात कायरे सादडपाडा येथे वीज कोसळून दोन व्यक्तींचा झालेला मृत्यू याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप कांबळे ( मदत व पुनर्वसन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 110 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सध्या वातावरणातील बदलामुळे काही ठिकाणी गारपीट, मुसळधार पाऊस पडत आहे, वीज पडत आहेत आणि हे सातत्याने सुरु आहे. आदिवासी भागामध्ये जी काही कामे सुरु असतात ती शासकीय कामे असतात. अशी कामे करीत असताना त्या मजुरांवर अशा वादळ आणि वाऱ्यांचा विपरित परिणाम होत असतो. अशाचप्रकारे नाशिकमध्ये वीज पडून दोन व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. त्या व्यक्तींची नावे निवेदनात दिलेली आहेत. निवेदनात नमूद केलेले आहे की, निकषानुसार आर्थिक मदत देण्यात आलेली आहे. माझा प्रश्न आहेत की, ते निकष कोणते आहेत, वीज पडून मृत्यू झाल्यानंतर किती रकमेची मदत करण्यात येते ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, दोन मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दीड लाखांची मदत देण्यात आली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय स्पष्ट प्रश्न विचारलेला आहे. त्याचे उत्तर माननीय मंत्र्यांनी दिलेले नाही. निवेदनात नमूद केले आहे की, "दिनांक 30.3.2015 रोजीच्या निकषानुसार आर्थिक मदत देण्यात आली आहे." ते निकष कोणते आहेत ? वीज पडून किंवा आगीमध्ये एखाद्याचा मृत्यू झाला तर मृत व्यक्तींच्या कुटुंबीयांना किती रक्कम देण्याचे धोरण सरकारने घेतलेले आहे, शासन त्यांना दीड लाख, दोन लाख किंवा तीन लाख रुपयांची मदत देते काय ?

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, शासनाच्या प्रचलित नियमाप्रमाणे मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना प्रत्येकी दीड लाख रुपयांची मदत दिलेली आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, मृत व्यक्तीच्या कुटुंबीयांना प्रत्येक दीड लाख रुपयांची मदत दिलेली आहे. कोणत्याही सरकारी कामाच्या निविदेमध्ये प्रत्येक ठेकेदाराला कामगारांच्या आरोग्यासाठी आणि अपघातासाठी विमा काढावा लागतो. निविदेच्या नियमानुसार या कामामध्ये सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून कामगारांचा विमा काढण्यात आला होता काय ? त्यांचा विमा काढला असता तर त्यांच्या कुटुंबीयांना यापेक्षा कितीतरी जास्त रक्कम मिळाली असती. निविदेमध्ये विमा काढण्याची अट अंतर्भूत केली नसेल तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करणार काय ?

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दिलीप कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेली माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. परंतु सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत ते बरोबर आहे. ठेकेदाराने नियमाप्रमाणे विमा काढला असता तर दुर्घटनाग्रस्त व्यक्तींच्या कुटुंबीयांना यापेक्षा जास्त मदत मिळाली असती. या संदर्भातील माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी पटलावर ठेवण्यात येईल. तसेच ठेकेदाराने कामगारांचा विमा काढला नसेल तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" साजरा करणे

**मु.शी.:** राज्यात "भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक समता सप्ताह" साजरा करणे संबंधी माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे निवेदन

श्री.राजकुमार बडोले (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

( प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे )



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>नियम 93 अन्वयेच्या सूचनेबाबत पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन</u>

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आतापर्यंत नियम 93 अन्वये सूचनेची किती निवेदने प्राप्त झाली, किती निवेदनांवर चर्चा झाली या संबंधी आपण निर्देश दिले होते.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, नियम 93 अन्वयेची निवेदने सभागृहात येण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना पाठपुरावा करण्याचे निदेश यापूर्वीच दिलेले आहेत. मी या संदर्भात स्वतः लक्ष घालत आहे. सर्व निवेदने तीन दिवसांत द्यावीत असे आदेश मी दिलेले आहेत.

---------

..7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**विशेष उल्लेख**

**पृ. शी./मु. शी.** : शासकीय सेवेत असताना निधन झालेल्या शिक्षक-शिक्षकेतर कुटुंबीयांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेणे याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"राज्य शासनाने धोरणात्क निर्णय घेऊन सेवेत असताना निधन झालेल्या शिक्षक शिक्षकेतर कुटंबीयांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेण्याबाबतचे आदेश दिनांक 31 डिसेंबर, 2002 च्या शासन निर्णयानुसार दिले आहेत. तथापि अनुकंपा धारकांना सेवेत सामावून घेण्यास जिल्हा शिक्षणाधिकारी टाळाटाळ करीत असून अनुकंपाधारक नोकरीपासून वंचित आहेत. ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदूर्ग व पालघर जिल्ह्यातील अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. जिल्ह्यांमध्ये अनेक शाळांमध्ये अनुकंपा धारकांना सेवेत सामावून घेण्यासाठी जागा उपलब्ध असूनही अनुकंपा धारक अधिकाऱ्यांची आर्थिक मागणी पूर्ण करु शकत नसल्याने प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवली आहेत. वारंवार विनंती करुन, निवेदने देऊन व चर्चा करुनही ठाणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक विभागाचे शिक्षणाधिकारी त्यांची आर्थिक मागणी पूर्ण होत नसल्याने प्रकरणांचा निपटारा करीत नाहीत. या बाबत तातडीने चौकशी व्हावी, अनुकंपा धारकांना शासनाच्या नियमानुसार सेवेत सामावून घ्यावे व अनुकंपा धारकांची प्रकरणे जाणीवपूर्वक प्रलंबित ठेवल्याबाबत व जबाबदारी टाळल्याबद्दल संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनास करीत आहे.

--------

यानंतर श्री.बोर्डे..

**पृ.शी./मु. शी.** : गृहनिर्माण धोरण तयार होईल त्याच दिवशी पोलिसांच्या घरांबाबतची घोषणा करण्याच्या निर्णयाची अंमलजावणी करुन पोलिसांना घरे मिळण्यासाठी कार्यवाही करणे, या बाबत श्री.प्रकाश गजभिये, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुंबईसह राज्यात असलेली घरांची घरघर विचारात घेऊन शासनाने येत्या पाच वर्षात 18 लाख घरे बांधण्याचा निर्णय घेणे, तसेच दिनांक 1 मे, 2015 रोजी नवीन गृहनिर्माण धोरण अंमलात आणतानाच शिवशाही पुनर्वसन योजनाही सुरु करण्याचा निर्णय दिनांक 31 मार्च, 2015 रोजी घेण्यात येणे, ज्या दिवशी गृहनिर्माण धोरण तयार होईल त्याच दिवशी पोलिसांच्या घरांची घोषणा करण्याचा निर्णय शासनाने घेणे, या योजनेची अंमलबजावणी काटेकोरपणे करुन सर्वसामान्य नागरिकांसह पोलिसांना घरे मिळण्यासाठी कार्यवाही करावी. तसेच राज्यातील सर्व सफाई कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहापुढील कामकाजाबाबत**

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दोन शासकीय विधेयके दर्शविलेली आहेत. त्यानंतर केळकर समितीच्या अहवालावर सुध्दा चर्चा होणार आहे. शिवाय नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील माननीय कामगार मंत्र्यांचे उत्तर सुध्दा आहे. त्यामुळे आज मध्यंतर घ्यावे की रद्द करावे, हे सभागृहाने ठरवावे.

सभागृहाचा सेन्स बघता आजचे मध्यंतर रद्द करण्यात येत आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.हरिसिंग राठोड यांनी विशेष उल्लेखाची सूचना मांडावी.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>**

(पुढे सुरु....)

**पृ.शी./मु. शी.** : विदर्भ व मराठवाड्यात शेतकऱ्यांनी कर्जबाजारीला कंटाळून आत्महत्या केल्यामुळे शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करणे, याबाबत श्री.हरसिंग राठोड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हरिसिंग राठोड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"माननीय मुख्यमंत्री यांनी या महिन्यात यवतमाळ जिल्ह्याचा दौरा करुन शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करणार असे जाहीर करणे, त्यामुळे शेतकरी मोठ्या आशेने मुख्यमंत्र्यांकडे पाहत होते, परंतु मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस सरकार दुष्काळग्रस्त व कर्ज नापिकीला तोंड देत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी अपयशी ठरले असून मागील तीन दिवसात विदर्भ मराठवाड्याच्या दहा शेतकऱ्यांनी होळी सणाच्या कालावधीत आत्महत्या केल्या, यवतमाळ जिल्ह्यात मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी रात्रीचा मुक्काम केला होता. बीड जिल्ह्यात 3 तर वाशिम, अकोला, अमरावती व वर्धा जिल्ह्यात प्रत्येकी एका शेतकऱ्याने कर्जबाजारीला कंटाळून आत्महत्या केल्या. या वर्षी विदर्भात 128 तर मराठवाड्यात 102 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यामुळे शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत जाहीर करण्याची मागणी सर्व स्तरातून होत आहे. यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता असल्याने हा विषय मी विशेष उल्लखाच्या सूचनेच्या माध्यमातून मांडत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : शासनाने राज्यातील मनरेगा च्या कामामध्ये लक्ष घालून बोगस कामांना वेळीच पायबंद घालण्याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

महोदय, ही विशेष उल्लेखाची सूचना मांडताना वेगवेगळ्या विभागात शासकीय योजनांची जी कामे चालतात आणि त्यातून जे गैरप्रकार उघडकीस येतात त्यातील हा विषय म्हणजे एक छोटासा भाग आहे.

"राज्यात मनरेगा खाली बरीच कामे केली जातात. पालघर जिल्ह्यातील एकट्या जव्हार येथे मोजमाप पुस्तिका, मस्टर, मनरेगाचे संकेतस्थळ पाहिले तर गावागावांमध्ये अफाट कामे झाल्याचे दिसते. पण प्रत्यक्ष पाहणी केली तर कामांचा ठावठिकाणा लागत नाही. राज्याने केलेल्या सोशल ऑडिटमधून बोगस कामांची जंत्रीच बाहेर आली आहे. चांभारशेत या गावात 37 हजार तुटक समतल चरांच्यासाठी रुपये 51 लाख 69 हजार खर्च दाखविण्यात आला आहे. प्रत्यक्षात त्या ठिकाणी अवघे सहा हजार चर आहेत. त्यावर खर्च 9 लाख म्हणजे 42 लाख 50 हजार उधळले आहेत. याबरोबरच पिंपळशेत, दाबेरी, रूईघर बोपदरी, दाबलॉन, कासटवाडी चौक, वाळवंड, बारवपाडा इत्यादी गावांमधील कामे संशयास्पद आहेत. अशा कामांसाठी बनावट नावांचे मस्टरही तयार केले गेले आहेत. ऑडिट टिमने गावात मस्टरचे जाहीर वाचन केले तर संबंधित व्यक्ती अस्तित्वातच नसल्याचे उघड झाले आहे. एका चांगल्या योजनेची अशा तऱ्हेने होणारी वासलात अतिशय धक्कादायक आहे. राज्यातील सर्व ठिकाणच्या मनरेगाच्या कामाबद्दल शासनाने तातडीने लक्ष घालून वेळीच पायबंद घालावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीतआहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : ठाणे पोलीस आयुक्तालयातील अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) या यपदावर सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यायाबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मागील एक वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून ठाणे जिल्ह्यात सोनसाखळी चोरी, मंगळसूत्र चोरी, खून, दरोड्यांचे सत्र चालू असणे, वाढत्या बार संस्कृतीमुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, त्याचप्रमाणे मुंबई जवळच्या संवेदनशील असलेल्या या जिल्ह्यात ऑगस्ट 2014 पासून म्हणजेच सुमारे आठ महिन्यांपासून ठाणे पोलीस आयुक्तालयातील अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) हे महत्त्वाचे पद रिक्त असणे, ठाणे जिल्ह्यात गुन्हेगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असताना सदर पदावर सक्षम अधिकाऱ्याची विनाविलंब नियुक्ती करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मुलुंड (पूर्व) येथील म्हाडा कॉलनीतील गणेश निवास बंगल्याच्या गच्चीवर अनेक कंपन्यांचे अनधिकृत टॉवर उभारण्यात येणे, याबाबत प्रा.जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"मुलुंड (पूर्व) मुंबई येथील म्हाडा कॉलनीतील गणेश निवास या बंगलाधारकाने आपल्या गच्चीवर रिलायन्स, आयडिया, एअरटेल व इतर कंपन्यांचे 3-G चे मोबाईल टॉवर्स असताना रिलायन्स 4-G चा टॉवर लावण्याचे प्रयत्न सुरु करणे, मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या अटी व शर्तीनुसार 4-G च्या टॉवरमुळे मोठ्या प्रमाणात रेडिएशन होत असल्याने हे टॉवर्स बगीचा किंवा खुल्या मैदानांच्या जागेवर उभारण्यास परवानगी दिलेली असणे, महानगरपालिकेच्या टी वार्डने टॉवर्स उभारण्याच्या निश्चित केलेल्या जागांमध्ये या जागेचा उल्लेख नसणे, म्हाडा कॉलनीतील गणेश निवास हा बंगला भरवस्तीत असून तेथे कोणत्याही प्रकारचे मैदान अथवा बगीचा नसतानाही तेथे अनेक कंपन्यांचे अनधिकृत मोबाईल टॉवर्ससोबत 4-G चा मोबाईल टॉवर उभारण्यात येत असल्याने स्थानिक नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका या प्रकरणी माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, माननीय आयुक्त, महानगरपालिका तसेच माननीय सहाय्यक आयुक्त, टी-वॉर्ड महानगरपालिका यांना निवेदने दिलेली असणे, निवेदने देऊनही अद्यापपर्यंत हे अनधिकृत मोबाईल टॉवर्स हटविण्याबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व संतापाची भावना, परिणामी अनधिकृत मोबाईल टॉवर्ससोबत 4-G चा मोबाईल टॉवर लावण्याबाबत शासनाने त्वरित प्रतिबंध घालण्याची आवश्यकता, ही परिस्थिती खरोखरच गंभीर स्वरुपाची असून या संदर्भात शासनाने तातडीने निवेदन करावे, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

---------

...7..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मुंबई विद्यापीठाच्या महाविद्यालय प्राचार्य पदी शैक्षणिक व प्रशासकीय अनुभव तसेच संशोधक वृत्ती असणाऱ्या तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती करण्याबाबत, श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई विद्यापीठाच्या कार्यकक्षेत आजमितीस जवळजवळ 740 महाविद्यालये असून त्यापैकी 36 टक्के कॉलेजमध्ये मान्यताप्राप्त प्राचार्य असल्याचे तर 279 कॉलेजमध्ये पूर्णवेळ प्राचार्य असल्याचे, तर 30 कॉलेजमध्ये पीएचडी धारक प्राचार्य नसल्याचे नुकतेच निदर्शनास आलेले असणे, संस्था चालकांनी विद्यापीठाला अंधारात ठेवून प्राचार्याच्या नियुक्त्या केल्या असून अर्हताधारक उमेदवारांची प्राचार्य पदी नियुक्ती होत नसल्याने पात्रताधारक उमेदवारांवर अन्याय होत असून विशेष म्हणजे बेकायदेशीररित्या प्राचार्याच्या होणाऱ्या नियुक्त्यांबाबत विद्यापीठाकडून आक्षेप घेतला जात नाही, याबद्दल विद्यापीठ वर्तुळात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. तरी महाविद्यालयांचा शैक्षणिक प्रशासकीय दर्जा सुधारण्यासाठी शासनाने या प्रकरणी लक्ष घालून महाविद्यालयाच्या प्राचार्य पदी शैक्षणिक व प्रशासकीय अनुभव तसेच संशोधक वृत्ती असणाऱ्या तज्ज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

---------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)**

**पृ.शी./मु.शी.** : जिल्हा परिषद नागपूर अंतर्गत नरखेड येथे बालविकास अधिकारी या पदावर असलेले श्री. प्रशांत मोहड यांनी अंगणवाडी महिलांना मानसिक व शारिरीक त्रास दिल्याने महिला कर्मचाऱ्यांत पसरलेले भीतीचे वातावरण याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

"जिल्हा परिषद, नागपूर अंतर्गत नरखेड येथे बालविकास अधिकारी या पदावर सन 2004 ते सन 2010 या काळात कार्यरत असलेले श्री. प्रशांत मोहड यांनी या कालावधीत अंगणवाडी महिलांना हेतू:पुरस्सर मानसिक व शारीरिक त्रास देणे, वेतन रोखणे, रजा नामंजूर करणे, वेतन कपात करणे, वेतन वाढ रोखणे इत्यादी प्रकारचा त्रास देऊन कारवाई करण्याची भीती दाखविणे, याबाबत जिल्हा परिषद सदस्य, शिक्षण समिती सदस्य यांनी माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांच्याकडे तक्रार करणे, सदर तक्रारीनुसार कारवाई होऊन पंचायत समिती, नरखेड येथून जिल्हा परिषद, वर्धा येथे बाल विकास प्रकल्प अधिकारी म्हणून पदोन्नतीने बदली होणे, सन 2013 पासून पुन्हा नरखेड येथे बदली करून आलेले असणे व पुन्हा महिलांना त्रास देण्यात येणे, महिलांना हेतू:पुरस्सर त्रास देणाऱ्या व ज्यांच्याविरूध्द महिलांनी तक्रारी केल्या आहेत अशा व्यक्तीला बढती देण्यात आल्यामुळे महिला कर्मचाऱ्यांत पसरलेले भीतीचे वातावरण, सदर अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून ताबडतोब निलंबनाची कारवाई करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : राज्यामध्ये दिनांक 14 व 15 मार्च, 2015 रोजी एमबीए, सीईटीच्या घेण्यात आलेल्या चारही स्लॉट परिक्षेतील प्रश्न चुकीचे ठरवून नंतर वगळण्यात आल्यामुळे पहिल्या स्लॉटच्या मुलांना 40 ते 50 मार्क कमी देण्यात आले असून ते पुन्हा वाढवून देण्याबाबतची मागणी याबाबत ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड. जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यामध्ये दिनांक 14 मार्च, 2015 रोजी सकाळी 10 वाजता घेण्यात आलेल्या एमबीए, सीईटी परिक्षेमध्ये डायरेक्टर टेक्निकल एज्यूकेशन यांनी जाहीर केल्याप्रमाणे 19 प्रश्न चुकीचे ठरविण्यात येऊन नंतर वगळण्यात येणे, त्यामुळे परीक्षा 200 गुणांऐवजी 181 गुणांची होणे, दुसरी स्लॉट परीक्षा दिनांक 14 मार्च, 2015 रोजी दुपारी 2 वाजता झाली असता त्यामध्ये 18 प्रश्न चुकीचे ठरवून वगळण्यात येण्, तसेच परीक्षा 200 ऐवजी 182 गुणांची झाली असणे, तिसऱ्या स्लॉटची परीक्षा दिनांक 15 मार्च, 2015 रोजी सकाळी 10 वाजता घेण्यात आली असता यामध्ये 11 प्रश्न चुकीचे म्हणून वगळण्यात येणे, त्यामुळे परीक्षा 189 गुणांची होणे, चौथ्या स्लॉटची परीक्षा दिनांक 15 मार्च, 1015 रोजी दुपारी 2 वाजता घेण्यात आली असता यामध्ये 11 प्रश्न चुकीचे ठरवून परीक्षा 189 गुणांची होणे, या चारही स्लॉटपैकी फक्त पहिल्या स्लॉटच्या जवळपास 13 हजार मुलांना गुणांमध्ये सुमारे 40 ते 50 गुण कमी देण्यात आलेले असणे, मुलांच्या उत्तरांचे नॉर्मलायझेशन करताना चुकीची पध्दत वापरण्यात आली असल्यामुळे स्लॉट 1 मध्ये सुमारे 13 हजार विद्यार्थ्यांवर झालेला अन्याय, त्यामुळे त्यांचे झालेले शैक्षणिक नुकसान, स्लॉटमधील विद्यार्थ्यांना 40 ते 50 गुण कमी करण्यात आले आहेत, ते पुन्हा वाढवून देण्यात यावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : नागपूर शहरात ऑटो रिक्षा वाहन परवाना (परमिट) संपलेल्या अनेक ऑटो रिक्षा राजरोसपणे वाहतूक करीत असणे याबाबत श्री. मितेश भांगडिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. मितेश भांगडिया (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"नागपूर शहरात प्रवासी वाहतूक करणारे ऑटो रिक्षा चालक सतत मुख्य मार्गावर विशेषत: सीताबर्डी परिसरात वाहतुकीला अडथळा आणत असतात. शहरात ऑटो रिक्षांचा वाहन परवाना (परमिट) संपलेल्या अनेक ऑटो रिक्षा राजरोस वाहतूक करीत असतात. प्रवासी वाहतुकीकरिता मिटरचा वापर करण्याकरिता ऑटो चालक नेहमीच टाळाटाळ करतात. त्यांना मिटरबाबत विचारणा केली असता सर्व ऑटो चालक एकत्र येऊन प्रवाशांशी भांडतात. या प्रकारात समान्य नागरिक सतत भरडला जात असतो. तक्रार करायला गेलेल्या नागरिकांना पोलीस स्टेशमध्ये तक्रार न करण्याकरिता बाध्य करतातत, वेगवेगळी खोटी कारणे व आरोप लावून आपल्या चालक संघटनेमार्फत पोलीस प्रशासनाला घेराव टाकून आपलेच म्हणणे ऐकण्यास बाध्य करतात. नागपूर प्रादेशिक परिवहन कार्यालयात अपुरे कर्मचारी असल्यामुळे विना परवाना (परमिट) ऑटो चालकांवर कारवाई करण्यास उशीर होत आहे. विशेषत: रेल्वे स्टेशन व बस स्टॅण्ड परिसरात विना मिटर विना परमीट ऑटो चालक राजरोस प्रवासी वाहतूक करतात. खाजगी प्रवासी कार वाहतुकदारांना (ओएलए) या ऑटोचालकांनी रेल्वे स्टेशन परिसरात घुसण्यास मज्जाव केला आणि त्यांच्या वाहनांची तोडफोड देखील केल्याची घटना नुकतीच घडली आहे. या संपूर्ण प्रकारामुळे सामान्यांच्या मनात भीती निर्माण झालेली आहे. नागपूरातील सर्व प्रवासी वाहतूक मिटरने चालविण्याकरिता सक्ती करण्याची आणि रेल्वे स्टेशन, बस स्टॅण्डवरील ऑटो चालकांची दादागिरी संपविण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : एम.टेक व इतर पदव्युत्तर पदवी या अभसक्रमातील विजाभज इमाव व विमाप्र या प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सुविधा उपलब्ध करणे याबाबत श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांत विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना एम.टेक व इतर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती सुविधा लागू करण्यात आलेली नाही.

शैक्षणिक वर्ष सन 2014-15 करिता एम.टेक व इतर पदव्युत्तर पदवीकरिता प्रवेश घेतेवेळी विद्यापीठाने विजाभज, इमाव व विमाप्र या प्रगर्वांसाठी ठरवून देण्यात आलेली फी सदर विद्यार्थ्यांनी भरणा करणे, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी व इतर पदव्युत्तर पदवीकरिता प्रवेश घेतेवेळी सदर विद्यापीठांनी कोणतीही पूर्व कल्पना न देता फी भरण्याचा आदेश दिलेला असणे, एम.टेक व इतर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी लागणारी फी भरणे या प्रवर्गांतील विद्यारर्थ्यांना आर्थिक दृष्ट्या अशक्य असणे, सदर अभ्यासक्रमासाठी विजाभज, इमाव व विमाप प्रवर्गांतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीकरिता अर्ज भरण्याची सुविधा शासनाने उपलब्ध करून देण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

----

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : चंद्रपूर गडचिरोली महामार्ग क्रमांक 7 मूल शहरातील पंचायत समिती ते बाजार रोड पर्यंत सन 2014 पासून 15 कोटी रूपयांचे सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम सुरू असून सदर कामावर वापरण्यात येणाऱ्या पाण्यामुळे तालुक्यात निर्माण झालेली पाणी टंचाई याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात यावेळी पाऊस खूप कमी पडल्यामुळे चंद्रपूर गडचिरोली जिल्ह्यात पाण्याचा दुष्काळ निर्माण झाला असताना चंद्रपूर गडचिरोली महामार्ग क्रमांक 7 मूल शहरातील पंचायत समिती ते बाजार रोड पर्यंत सन 2014 पासून 15 कोटी रूपयांचे सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे काम सुरू असणे, सदर कामावर वापरण्यात येणारे पाणी माहे मे 2014 पासून मूल येथील मा.मा. तलावाचे पाणी ऑईल इंजिनद्वारे उपसा करून टँकरद्वारे रोडवर टाकले जाणे, सदर तलावात पाणी नसल्याने आता मूल येथील उमा नदीचे पाणी ऑईल इंजिनद्वारे उपसा करून दररोज 25 ते 30 टँकरद्वारे रोडवर टाकणे व मटेरियल कामाकरिता वापरले जात असणे, परंतु सदर पाणी उपसा करताना पाणी परवाना न घेता सर्रास उपसा करून संबंधित कंत्राटदार वापर करीत असणे, त्यामुळे मूल उमा नदी पूर्णता आटली जाणे, नियमबाह्य कोणताही परवाना न घेता सर्रास उपसा सुरू असणे, त्यामुळे तालुक्यात पाणी टंचाईची निर्माण झालेली भीती, शासनाने संबंधित कंत्राटदारावर कारवाई करण्याची आवश्यकता."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : मुंब्रा, जि. ठाणे येथील लकी कंपाऊंड मधील आदर्श बिल्डिंग ही अनधिकृत इमारत दिनांक 4 एप्रिल, 2103 रोजी कोसळून त्यामध्ये सुमारे 73 पेक्षाही अधिक रहिवासी मृत्युमुखी पडण्याची घडलेली दुर्घटना तसेच तेथे ट्युशन क्लासेस भरविले जात असल्यामुळे जीवितहानीमध्ये लहान बालक विद्यार्थ्यांचा समावेश असणे याबाबत ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड. निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले[illegible]ची सूच[illegible] मांडतो.

"मुंब्रा, जि. ठाणे येथील लकी कंपाऊंड मधील आदर्श बिल्डिंग ही अनधिकृत इमारत दिनांक 4 एप्रिल, 2013 रोजी कोसळून त्यामध्ये सुमारे 73 पेक्षाही अधिक रहिवासी मृत्युमूखी पडण्याची घडलेली दुर्घटना, सदर इमारत दुर्घटनेपूर्वी तेथे ट्यूशन क्लासेस भरविले जात असल्याने जीवितहानीमध्ये लहान बालक विद्यार्थ्यांचा समावेश असणे, ठाण्यातील मुंब्रा व त्या लगतच्या भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामाचे प्रमाण जास्त असल्याने त्या इमारत दुघटनेची सविस्तर चौकशी करण्यासाठी शासनाकडून तत्कालीन प्रधान सचिव, श्री. स्वाधिन क्षत्रिय यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नियुक्त करण्यात येणे, तसेच या चौकशी समितीने त्या प्रकरणी आपला अहवाल शासनास गेल्या वर्षीच सादर करणे, तथापि एक वर्षपेक्षाही अधिक कालावधी होऊन देखील या अहवालावर अद्याप कार्यवाही करण्याची शासनाकडून होत असलेली टाळाटाळ, परिणामी श्री. स्वाधिन क्षत्रिय समितीचा अहवाल जनतेसाठी उघड करण्याची होत असलेली आग्रही मागणी, त्याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, एवढीच मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाकडे करीत आहे. ही गंभ्मीर बाब आहे. माननीय मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सदर प्रकरणी सभागृहात बऱ्याच वेळा चचा झाली आहे. माननीय मंत्र्यांनी त्या संदर्भात कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो."

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : भारताचे पहिले हिंद केसरी श्रीपती खंचनाळे तसेच हिंद केसरी सर्वश्री गणपतराव आंदळकर, दिनानाथसिंह विनोद चौगुले, रूस्तम ए-हिंद दादू चौघुले यांचे मानधन प्रलंबित असणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"भारताचे पहिले हिंद केसरी श्रीपती खंचनाळे यांना राज्य शासनामार्फत त्यांच्या कामगिरीची योग्य दखल म्हणून गेली अनेक वर्षे सहा हजार इतके मानधन देण्यात येत होते. ते मानधन 72 हजार होऊनही अद्याप त्यांना देण्यात न येणे, तसेच हिंदकेसरी सर्वश्री गणपतराव आंदळकर, दिनानाथसिंह विनोद चौगुले, रूस्तम ए-हिंद दादू चौघुले यांचे मानधन प्रलंबित राहणे, परिणामी त्यांची होत असलेली निराशा, याबाबत सर्वच हिंदकेसरी पुरस्काराच्या मानकऱ्यांचे मानधन आघाडी सरकारने केलेल्या वाढीसह तातडीने द्यावे, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

------------

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांचे स्मारक उभारणे याबाबत डॉ.सुधीर तांबे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो :-

सभापती महोदय, बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड हे मुळचे नाशिक जिल्ह्यातील मालेगाव जवळील कौळाणे येथील होत. त्यांची जन्मशताब्दी गतवर्षी होती. ते पुरोगामी विचारांचे होते. महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात अलौकिक कामगिरी केली होती. स्वातंत्र्य चळवळीसाठी देखील त्यांनी सदैव सहकार्य केले होते. मोफत व सवलतीचे शिक्षण देण्यासारखे अनेक सामाजिक निर्णय त्यांनी आपल्या संस्थानात घेतले. अशा प्रकारे लोकोत्तर कार्य केलेल्या नरेश सायाजीराव गायकवाड यांचे भव्य स्मारक कौळाणे, जिल्हा नाशिक येथे व्हावे, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राज्यातील सकाळ व सायंकालीन न्यायालयांना निधी उपलब्ध करुन देणे या बाबत श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले[illegible]ची सूचना मांडतो :-

सभापती महोदय, राज्य सरकारने दिनांक 14 सप्टेंबर, 2010 रोजी अधिसूचना काढून राज्यात सकाळ-संध्याकाळची 124 न्यायालये सुरु केली होती. देशभर ही योजना सुरु करण्यात आली होती. अपघात विषयक तसेच फौजदारी स्वरुपाच्या दाव्यांचे कामकाज या न्यायालयात चालत होते. 124 न्यायालयांपैकी 20 न्यायालये मुंबईत तर 6 न्यायालये नगरला होती. उर्वरित सर्व न्यायालये राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यांच्या ठिकाणी होती. ही न्यायालये सुरु होताना राज्यात 49 लाख 58 हजार दावे प्रलंबित होते. नियमित न्यायालयांवरचा दाव्यांचा ताण कमी करण्यासाठी या न्यायालयांचा उपयोग होईल, असे त्यावेळी गृहीत धरण्यात आले होते. गेल्या 5 वर्षात केंद्र सरकारकडून राज्य सरकारला 3 हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम न्यायालयीन सुधारणांसाठी मिळाली. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात जलदगती न्यायालये, सकाळ व सायंकालीन न्यायालये सुरु झाली. न्यायालयांनी प्रकरणे निकाली काढण्याची गती वाढविली तरीही राज्यात सध्या 29 लाख, 29 हजार, 148 प्रकरणे विविध न्यायालयात प्रलंबित आहेत. या परिस्थितीत चौदाव्या वित्त आयोगाकडून सकाळ व सायंकालीन न्यायालयांसाठी निधी मिळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. निधी मिळणार नसल्याने सकाळ व सायंकालीन न्यायालये बंद होणार आहेत. ही न्यायालये बंद झाल्यानंतर नियमित न्यायालयांवर कामकाजाचा ताण येणार आहे. प्रलंबित प्रकरणांची संख्याही वाढण्याची शक्यता आहे. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्यासाठी राज्यातील सकाळ व सायंकालीन न्यायालये बंद होऊ नये, यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाने कार्यवाही करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे.

---------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : शासकीय अधिकारी श्री.विद्यासागर हिरमुखे व कमरुद्दीन रसूल जामदार यांनी केलेली फसवणूक याबाबत श्री.विजय सावंत, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, पुणे येथील शासकीय अधिकारी श्री.विद्यासागर हिरमुखे व श्री.कमरुद्दीन रसूल जमादार यांनी आपल्या पदाचा गैरवापर करुन खोटे दस्तऐवज करुन शासनाला आणि इतर व्यक्तिंना फसविले असून लोणावळा व त्या परिसरात इतरत्र संगनमताने उघडउघडपणे करीत असल्याचे माहे जून, 2014 मध्ये उघडकीस येणे, सदर प्रकरणी त्यांच्याविरुध्द भरपूर पुरावा असूनही पोलीस त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे आढळून येणे, याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी माननीय मुख्यमंत्री यांचे कार्यालयात दिनांक 10 डिसेंबर, 2013 रोजी दिले असणे, मात्र यावर अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही झाली नसल्याने संबंधित अधिकारी उन्मत्त होणे, यामुळे सर्वसामान्यांमध्ये असंतोष चिडीची भावना पसरली आहे. त्यामुळे फसवणुकीबाबतची चौकशी करुन दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर तातडीने कारवाई करावी, अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाला विनंती करीत आहे.

------------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : जळगांव जिल्ह्यातील अमळनेर तालुक्यातील अनेक कार्यालय इमारतींची झालेली दुर्दशा याबाबत श्रीमती स्मिता वाघ वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती स्मिता वाघ (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते :-

सभापती महोदय, जळगांव जिल्ह्यातील अमळनेर या तालुक्याच्या ठिकाणी बऱ्याच शासकीय कार्यालयांच्या इमारतींची दुरावस्था झालेली असणे तसेच काही शासकीय कार्यालयांच्या जागांचे प्रस्ताव प्रलंबित असणे, काही कार्यालयांना हक्काची जागा नसणे, ती भाड्याच्या इमारतीत असणे, अमळनेरमध्ये महसूल, कृषी व पोलीस विभागाचे विभागीय कार्यालय असणे, शहरात असलेले एक कार्यालय शहराच्या वेगळ्या टोकाला तर दुसरे दुसऱ्या टोकाला, अशी अवस्था झाली असणे, त्यामुळे सामान्य जनतेला पायपीठ करावी लागणे, तालुक्याचे मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या पंचायत समितीमध्ये काही विभागाच्या खोल्या गेल्या काही वर्षांपासून नादुरुस्त असणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांना बसायला पुरेशी जागा नसणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण व असंतोष पसरणे, अमळनेर शहरातील उप विभागीय अधिकारी, तहसील कार्यालय, उप विभागीय पोलीस अधिकारी, पंचायत समिती, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, सिंचन, विभागीय कृषी कार्यालय, तालुका कृषी कार्यालय, उप सिंचन, पाणी पुरवठा, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम, भूमि अभिलेख कार्यालय, दुकाने निरीक्षक, एकात्मिक बालविकास कार्यक्रम, वैद्यमापन अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, माहिती कार्यालय अधिकारी व अशा प्रकारचे सर्व कार्यालये एकाच इमारतीत असण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व तातडीने करावयाची कार्यवाही, ही बाब मी या विशेष उल्लेखाद्वारे सदनाच्या निदर्शनास आणते.

-----------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : नागपूरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयातील रिक्त पदे याबाबत श्री.अनिल सोले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल सोले (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूचाा मांडतो :-

सभापती महोदय, विदर्भातील समान्य गोरगरीब जनता महागडा विशेषोपचार माफक दरात घेण्याकरिता नागपूरातील सुपर स्पेशालिटी रुग्णालयामध्ये येत असतात. शासनाने या सर्वांच्या विशेषोपचाराकरिता करोडो रुपये खर्च करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाची स्थापना केलेली आहे. हे रुग्णालय उत्तमरितीने चालण्याकरिता 310 पदांच्या पद भरतीचा प्रस्ताव शासनाकडे अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. अनेक विभागाला विभाग प्रमुख, निवासी डॉक्टर, स्टाफ नर्स उपलब्ध नसल्यामुळे विभागांमार्फत उपचाराकरिता आलेल्या रुग्णांचे फार हाल होतात. दिनांक 27 मार्च, 2015 रोजी एका सर्पदंश महिलेचा हिमोडायलिसिस न झाल्यामुळे मृत्यू झाला. सुपर स्पेशालिटी रुग्णालयात पदभरती करण्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच उपलब्ध अनेक अत्याधुनिक मशिनरी तंत्रज्ञ नसल्यामुळे बंद आहेत. तेथे पद नियुक्ती करण्याची देखील नितांत गरज आहे, यासाठी सदरची बाब विशेष उल्लेखाद्वारे मी सभागृहात उपस्थित करीत आहे.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## सभागृहाच्या कामकाजाबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजर

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल सभागृहात चर्चेला घ्यावा, अशा प्रकारची मागणी सातत्याने सदस्यांनी केली आहे आणि मुख्यमंत्री महोदयांनीही त्याला दुजोरा दिला आहे. त्यांनी असे सांगितले की, अशा प्रकारची चर्चा घेण्यात येईल आणि सर्वांची मते लक्षात घेऊन त्या संदर्भात राज्य शासन निर्णय घेईल. त्यानुसार अशी अपेक्षा होती की, राज्य शासनाकडून हा अहवाल सदनासमोर मांडण्यात येईल आणि त्यावर सदनात चर्चा होईल. हा अहवाल समितीने शासनाला सादर केलेला आहे. परंतु, आज नियम 260 अन्वये या अहवालावर सभागृहात चर्चा होणार आहे, हे उचित नाही. या अहवालावरील चर्चेचा प्रस्ताव मुख्यमंत्री महोदयांनी किंवा अन्य मंत्री महोदयांनी सभागृहात मांडला पाहिजे आणि त्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे. या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्येही चर्चा झालेली आहे. तसे शक्य नसेल तर किमान सभापती महोदयांनी तरी हा चर्चेचा ठराव मांडावा आणि त्यावर सभागृहात चर्चा व्हावी. आपण या संदर्भात निर्णय घ्यावा आणि आम्हाला अवगत करावे, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

**तालिका सभापती :** या संदर्भात निश्चितपणे योग्य वेळी निर्णय देण्यात येईल. कामकाज पत्रिकेवरील इतर कामकाज पेंडिंग आहे. कामगार मंत्री महोदयांचे उत्तर पेंडिंग आहे. सभागृहाची मान्यता असेल तर आपण अगोदर कामगार मंत्री महोदयांचे उत्तर सुरु करु आणि बिले व अन्य कामकाजाबाबत चर्चा करुन निर्णय घेऊ. अन्य कामकाज आटोपून घेऊ.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, कामगार मंत्री महोदयांचे उत्तर सुरु करण्यास आमची हरकत नाही. परंतु, तेवढ्या कालावधीत मी उपस्थित केलेल्या मुद्याबाबतचा निर्णय आपण चर्चा करुन घ्यावा, एवढीच विनंती आहे.

**तालिका सभापती :** सभागृहाचा वेळ जाऊ नये म्हणून मी हा मार्ग सुचविला आहे. कामगार मंत्री महोदयांचे उत्तर होईपर्यंत आपल्या मुद्याबाबत चर्चा करुन निर्णय घेता येईल.

...7....

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, कामकाज पत्रिकेवरील क्रमानुसार आता वि.स.वि.क्र.16 आहे. सभापती महोदयांच्या दालनात एक महत्त्वाची बैठकही आहे. कामगार मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत मी त्या बैठकीला जाऊन येऊ शकतो का ? मी आता बिल मांडतो. त्यानंतर कामगार मंत्री महोदयांचे उत्तर होईल. म्हणजे मग मला बैठकीलाही उपस्थित राहता येईल.

**तालिका सभापती :** सभागृहाची अशी प्रथा आहे की, सभागृहाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांशी चर्चा करुन विधेयकांबाबतचा निर्णय घेत असतात. त्या संदर्भात मी सचिवांना सूचना दिल्या आहेत. निर्णय झाल्यानंतर आपल्याला कळविण्यात येईल.

---------------

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, माझी आपणाला विनंती आहे की, आपण माझे म्हणणे ऐकून घ्यावे. यानंतर केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा आहे, तेव्हा देखील नियोजन राज्य मंत्री म्हणून मला येथे बसावे लागेल. चार वाजता माननीय सभापती महोदयांकडे बेसा ॲक्टच्या संदर्भात एक बैठक आहे, आपण मला पूर्व कल्पना दिली तर त्या बैठकीला मी जाऊन येऊ शकतो. कारण त्यानंतर दोन्ही विषय माझे आहेत, एक विधेयक मला सभागृहात मांडावयाचे आहे.

**तालिका सभापती** : मंत्री महोदय आपण बैठकीला जाऊन येऊ शकता.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, ठीक आहे.

------------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मु.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे

**पृ.शी.** : कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार करणे, या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुनील तटकरे, नरेंद्र पाटील, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, जयवंतराव जाधव, प्रकाश गजभिये, आनंद ठाकूर, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री राजेंद्र मुळक, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, ॲड.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता (कामकार मंत्री) : सभापती महोदय, सोमवार दिनांक 30 मार्च 2015 रोजी सभागृहात नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. भाई जगताप, सुनील तटकरे, नरेंद्र पाटील, माणिकराव ठाकरे, हेमंत टकले, संजय दत्त, जयवंतराव जाधव, प्रकाश गजभिये, आनंद ठाकूर, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, प्रा.जोगेंद्र कवाडे, ॲड.जयदेव गायकवाड, सर्वश्री.राजेंद्र मुळक, हरिसिंग राठोड, शरद रणपिसे, डॉ.सुधीर तांबे, सर्वश्री रामहरी रुपनवार, आनंदराव पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, या सर्व सन्माननीय सदस्यांनी राज्यातील उद्योग धंद्यांना चालना देण्यासाठी कामगार कायद्यात मोठे बदल करण्याचा प्रस्ताव राज्य शासनाने तयार केलेला असणे. परंतु प्रस्तावित बदलावर कामगार संघटना व उद्योगपतींची परस्पर विरोधी मत असणे. याबाबत सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील श्री.भाई जगताप व श्री.किरण पावसकर यांनी व इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडली आहेत. त्यावेळी देखील मी सांगत होतो की, एखादा कायदा करण्यात येणार आहे अशी समजूत डोक्यात ठेऊन या प्रस्तावावर आपण चर्चा केली आहे. ही चर्चा आजच सुरु झाली असे नाही. या सरकारला कामगाराचे अहित करण्याची घाई झाली अशा प्रकारचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

...3...

श्री.प्रकाश महेता...

सभापती महोदय, माझी सर्व सन्माननीय सदस्यांना नम्र विनंती आहे की, 15 नोव्हेंबर, 2001 रोजी राज्य सरकारने सेक्शन 25 के अंतर्गत कामगार कायद्यात बदल करण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळात मंजूर केला होता व तो प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला होता. यामध्ये मोघम तीन प्रश्न होते त्याबाबत सर्व कामगार क्षेत्रात चिंतेची बाब निर्माण झाली आहे. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम 1948, कंत्राटी कामगार अधिनियम 1970, कारखाने अधिनिमय 1948, औद्योगिक विवाद अधिनियम 1947 यामध्ये काहीतरी बदल होतील. ज्या कारखान्यात 100 पेक्षा कमी कामगार आहेत, त्यांना कारखाना बंद करताना आज परवानगी घेण्याची आवश्यकता नाही. 100 पेक्षा जास्त कामगार असतील व कारखाना बंद करायचा असेल तर त्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागते. कामगाराच्या संख्येची मर्यादा 100 ऐवजी 300 केली तर राज्यातील उद्योगपतींना एक सूट मिळेल. 300 कामगार असून कारखाना बंद करायचा असेल तर आता शासनाची परवानगी घेण्याची गरज नाही. कारखाने बंद होतील व कामगार बेकार होतील अशी चिंता निश्चितपणे आहे. त्याबाबत कोणताही वाद असण्याचे कारण नाही. याची दुसरी बाजू अशी आहे की, ज्या उद्योगांना 300 पर्यंत कामगार घ्यावयाचे आहेत, ज्यावेळी अशा कायद्याची चर्चा करण्यात येईल तेव्हा 100 कामगारांच्या वर कामगार घेताना कायम स्वरुपी कामगार घ्यावेत, कंत्राटी कामगार घेण्याची सूट त्यांना देता येणार नाही. अशा प्रकारचा नियम तयार केला तर तो कामगाराच्या हिताचा होईल. सन 2001 मध्ये 100 कामगारांच्या संदर्भातील प्रस्ताव होता. आता 300 ऐवजी 1000 कामगार करावेत असे केंद्र शासनाने सूचविले होते. यासंदर्भातील नोटीफिकेशन माझ्याकडे आहे. त्यावेळी असे ठरविले होते की, असा प्रकार करता येणार नाही. 300 कामगारांची संख्या करताना देखील विचार करावा लागणार आहे. त्यावेळी ही चर्चा सभागृहात झाली नसली तरी सभागृहात व सभागृहाच्याबाहेर जे कामगार चळवळीत काम करणारे कार्यकर्ते होते त्यांनी शासनाकडे वारंवार सादरीकरण केले. त्यामुळे हा विषय 2001 पासून 2014 पर्यंत टळला आहे. यामध्ये महाराष्ट्र कामगार चळवळीचा विजय आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील अत्यंत पोटतिडीकीने बोलत असताना श्रीपाद डांगे व बाबू गेनू यांच्यापासून त्यांनी मुख्यमंत्री महोदयांपर्यंत सर्वांचा उल्लेख केला आहे. राज्यात कामगारांच्या हिताच्या दृष्टीने आजपर्यंत निर्णय घेण्यात आले आहेत. इतर राज्यातील

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

कामगार चळवळ व महाराष्ट्रातील कामगार चळवळीमध्ये फार मोठे अंतर आहे. या राज्याच्या स्थापनेत शेतकरी व कामगार वर्गाचा मोठा सहभाग राहिला आहे. ही बाब कोणत्याही राज्य सरकारला नाकारता येणार नाही. यासंदर्भात ज्या वेळी चर्चा झाली त्यावेळी मी सन्माननीय सदस्यांना सांगितली आहे की, उद्योग विभागाने काही सूचित केले असले तरी कामगार विभागाने अधिसूचना काढली नसून तो मसुदा होता. याबाबत राज्यात जोपर्यंत सर्वंकष सर्व स्तरावर सर्व सबंधित लोकांनी एकत्र बसून त्रिस्तरीय समिती तयार करुन या संदर्भातील सर्व सोक्षमोक्ष होत नाही तोपर्यंत या राज्यात कामगारांचे शोषण करणारा कोणताही नवीन कायदा केला जाणार नाही अशी हमी मी सभागृहात देऊ इच्छितो. राज्यातील कामगार कायदे राज्यातील कामगारांचे हित साधू शकत नाही व उद्योगांना चालना देऊ शकत नाही. माझ्याकडे आजपर्यंत 150 फाईल अशा आहेत की, गेल्या तीन महिन्यापासून त्या पडून आहेत. जे उद्योग बंद झाले त्यासंदर्भात मी चार पाच वर्षातील 100 व त्यापेक्षा कमी असलेल्या कामगारांची व कारखान्याची आकडेवारी काढली आहे. 50 पेक्षा कमी व 100 पेक्षा जास्त कामगार असलेले कारखाने किती बंद झाले याची मी माहिती घेतली. हा टीका करण्याचा विषय नाही. याची कारणे काय आहेत, कदाचित राज्य शासन इन्फ्रास्ट्रक्चर देण्यात कमी पडले काय. कारखान्याना वीज व पाणी पुरवठा करण्यास शासन कमी पडले काय ? त्यामुळे उद्योग बंद पडत आहेत काय ? आज कामगार कोणत्या कारणामुळे देशोधडीला लागले आहेत. कंत्राटी कामगार कायदा पारीत झाला याबाबत दोन्ही बाजू आहेत. अशी परिस्थिती निर्माण झाली म्हणून कंत्राटी कामगार कायदा आणला गेला काय ? कंत्राटी कामगार कायदा राज्याला व राज्यातील उद्योगांना चालना देण्यासाठी रोजगार वाढविण्यासाठी लागू केला काय.

या नंतर श्री.भारवि....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.प्रकाश महेता....

पण मला वाटते की, कंत्राटी कामगार ॲक्टमुळे कामगार चळवळ दबली गेली. त्यामुळे त्यांना न्याय मिळत नाही. मिनिमम व्हेजेस देखील मिळत नाही. त्याने किती तास काम करावे याचा देखील त्यात उल्लेख नाही. कंत्राटी कामगार कायद्यामुळे महाराष्ट्रातील कामगार चळवळ जवळजवळ संपत आली अशा प्रकारचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. तेव्हा याचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. कंत्राटी कामगार कायद्यामुळे कामगार क्षेत्रावर अन्याय होत आहे, कामगार चळवळीवर अन्याय होत आहे, कामगारांचे शोषण होते हे मंत्री महोदय मान्य करीत आहेत. राज्य सरकारमध्ये कोणत्याही प्रकारची कंत्राटी पद्धती असणार नाही याची घोषणा ते करणार काय, मग शिक्षण क्षेत्र असेल, आरोग्य क्षेत्र असेले....

श्री.प्रकाश मेहता : सभापती महोदय, असे प्रश्न सन्माननीय सदस्यांनी गेल्या 15 वर्षात विचारले असते तर बरे झाले असते. या सार्वभौम सभागृहात आपण चर्चा करतो याचा अर्थ असा होतो की, सर्वांनी मिळून कामगारांच्या हिताचा निर्णय घेतला पाहिजे. आज कामगारांच्या हितासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. हा निर्णय आपण सर्वांनी मिळून करावयाचा आहे. यात आपला देखील सहभाग अपेक्षित आहे. यात आपण विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष असा फरक केला तर ते चुकीचे होईल. असा फरक कामगार संघटनांमध्ये असतो. दोन युनियनमध्ये हेवेदावे हे असतात. संपूर्ण कामगार चळवळ एकाच झेंड्याखाली उभी आहे असे चित्र कधीच पहायला मिळत नाही. कॉ.डांगे, श्री.बाबू गेनू यांनी कामगार चळवळ सुरू केली. ती चळवळ नंतर श्री.अण्णासाहेब पाटील यांनी पुढे नेली. त्यानंतर अनेक कामगार नेते झाले. ते सगळेच योग्य होते. पण त्यांचे मार्ग वेगळे होते. शेवटी कामगार चळवळीला गालबोट देखील लागले.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

त्या गालबोटकडे आपण पाहू नये. जो मजूर आहे, कामगार आहे, ज्यांच्या रक्ताने हे राज्य उभे राहिले त्यासंबंधी विचार करणे आवश्यक आहे. जेव्हा सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील तळमळीने बोलत होते तेव्हा मी त्यांना सांगितले की, पाटील साहेब कामगारांना पोटपण आहे आणि तिडीक देखील आहे.

या देशाच्या स्वातंत्र्यापूर्वी गुमास्ता ॲक्ट लागू करण्यात आला. मी आपणास सांगू इच्छितो की, या राज्यात गुमास्ता ॲक्ट माझ्या आजोबांनी आणलेला आहे. त्यावेळी आपल्याला आझादी देखील मिळाली नव्हती. आपण सरकारच्या प्रती पूर्वग्रहदूषित दृष्टीकोन ठेवला तर ते योग्य होणार नाही. हे शासन उद्योगपतींसाठी धोरण स्वीकारणार आहे असे सांगणे बरोबर नाही. आम्ही असे धोरण स्वीकारणार नाही. वेळ काढू धोरण असल्यामुळे कामगारांना न्याय मिळत नाही. उद्योगांवर वाढत चाललेला बोजा, त्यामुळे राज्य शासन कामगार कायद्यात काही बदल करू इच्छिते असे मत व्यक्त करण्यात आले आहे. हे बदल आम्ही एकतर्फी करणार नाही. हा बदल सर्वांना विश्वासात घेऊन विचारविनिमयानंतर करण्यात येणार आहे. कामगार असेल तरच उद्योग चालविता येतील आणि उद्योग असेल तरच कामगारांचे पूर्णपणे समाधान करता येऊ शकेल. केंद्रामध्ये देखील कामगार आहेत. आम्हाला कामगारांना सक्षम करावयाचे आहे. त्याला सक्षम केले पण उद्योग नसेल तर त्याचा त्याला काही उपयोग होणार नाही. आज कामगार धोरणामुळे उद्योग नाहीत असे आपल्याला म्हणावयाचे आहे काय ? वस्तुस्थिती तशी नाही. कामगार कायद्यातील तरतुदीमुळे आहे ते उद्योग बाहेर जात आहेत व त्यामुळेच आपल्या राज्यात उद्योग येत नाहीत अशी परिस्थिती नाही. राज्यातील पायाभूत सुविधेबद्दल विचार करून राज्याबाहेर गेलेले उद्योग पुन्हा राज्यात कसे येतील व त्यांची संख्या कशी वाढेल हे पाहणे गरजेचे आहे. आपल्या राज्यात उद्योग आले तर मोठ्या प्रमाणावर रोजगार मिळून कामगार सक्षम होईल. तसा विचार आज आपल्याला करणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कामगार चळवळीमुळे उद्योग येत नाहीत असा जर आरोप करत असाल तर तो मी मान्य करायला तयार नाही. हे सर्वस्वी चुकीचे आहे, साफ खोटे आहे. उद्योग न येण्यास

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता....

बाकीची अन्य कारणे देखील कारणीभूत आहेत. त्या कारणात देखील आपल्याला जावे लागणार आहे. आपण सरसकट बदल करावयास निघालेलो नाहीत. आपण फक्त एकच बाजू मांडली आहे. आपण दुसरी बाजू देखील मांडायला पाहिजे होती. आपण सकारात्मक विचार केला तर रोजगार देखील वाढू शकतो. मी आपणास सांगू इच्छितो की, या क्षणा पर्यंत कामगार कायद्यामध्ये बदल करण्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे नाही. हे मी जबाबदारीने बोलत आहे. नेहमी कोणता तरी विषय घेऊन राजकीय भाषण करून टीकात्मक बोलणे हे चुकीचे आहे. आपण सर्वजण कामगार चळवळीत, समाजात काम करणारे कार्यकर्ते आहोत. कामगारांना केंद्रबिंदू ठेवूनच कामगार कायद्यामध्ये बदल करण्यात येतील. अन्यथा कामगार कायद्यामध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करण्यात येणार नाही, असे स्पष्टपणे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. मी या प्रस्तावाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, अशा प्रकारे चुकीचा पायंडा या महाराष्ट्रात पडणार नाही. 105 हुतात्मे हे कामगार होते याची जाणीव आम्हाला देखील आहे.

माझी जन्मभूमी, कर्मभूमी घाटकोपरमध्ये आहे. डॉ.दत्ता सामंत यांच्यासमोर आम्ही वाढलो. मी 1995 ते 1999 या काळात कामगार राज्यमंत्री होतो. विद्याविहार येथे नाथाणी कंपनी असून ती बंद पडली होती. कामगारांची देणी मिळत नव्हती. मग डॉक्टरांनी मोर्चा काढण्याचे ठरविले. मी घाटकोपर येथे राहतो हे त्यांना माहीत होते. मला सकाळी 9.30 ते 10.00 च्या दरम्यान पोलिसांचा संदेश आला की, आपल्या घरावर मोर्चा येत आहे. मी म्हटले ठीक आहे. मला कोणीतीही अडचण नाही. नाथाणी कंपनीच्या कामगारांचा मोर्चा स्वत: डॉ.दत्ता सामंत घेऊन येत होते. मोर्चा निघण्यापूर्वीच कंपनीच्या गेटच्या बाहेर डॉ.सामंत बसलेले होते. त्यावेळी मी स्वत:हून त्यांच्याकडे गेलो व त्यांना सांगितले की, आपण दोघे टेबलवर चर्चा करूया. आपण आपला विषय मांडावा शासनाच्यावतीने मी काय सांगितले पाहिजे ते सांगावे असे त्यांना सांगितले. या कामगारांच्यासंबंधातील धोरण आपण येथेच ठरवू या व त्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करू या असे सांगितले.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी त्यावेळी आयोजित केलेल्या गेट मिटींगला देखील मी गेलो होतो. डिसेंबरमध्ये नागपूर येथे अधिवेशन असताना माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी कामगारांचा मोर्चा आणला होता. त्या मोर्च्याला मी सामोरे गेलो होतो. कारण मला कामगारांच्या प्रती संवेदना आहे. कामगार देशोधडीला लागला तर ते या राज्याला परवडणारे नाही. कष्टकरी माणसाच्या स्वप्नातील महाराष्ट्राची निर्मिती आपल्याला करावयाची आहे. त्यामुळे कामगाराला केंद्रबिंदू ठेवूनच आपल्याला विचार करावा लागणार आहे.

यानंतर श्री.जुन्नरे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता ......

1995 मध्ये कामगार कायद्यात बदल करण्यासंदर्भात त्रिस्तरीय समिती नियुक्त केली होती. या त्रिस्तरीय समितीने कामगारांचे एक एक हित लक्षात घेऊन चर्चा केली व नंतर कामगार काद्यामध्ये सुधारणा केल्या. काही माथाडी बोर्डावर चेअरमन नसल्यामुळे निर्णय थकले आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु माथाडी कामगारांच्या बोर्डावर चार वर्षापासून चेअरमनची नियुक्ती झालेली नाही ही सुध्दा वस्तुस्थिती आहे. आम्ही सत्तेत येऊन केवळ 150 दिवस झालेले आहेत. मागच्या चार वर्षापासून कामगार क्षेत्रामध्ये जो काही घोळ आहे तो तुमच्या काळातील आहे, यामध्ये आमची काही जबाबदारी नाही असे आम्ही सांगणार नाही. शासन शासनाची जबाबदारी पार पाडत असते. काही कारणामुळे माथाडी कामगारांच्या बोर्डावर चेअरमनची नियुक्ती झाली नसेल तर नियुक्ती करुन कार्यवाही करुन निर्णय घेतले पाहिजेत. परंतु अशा प्रकारचे निर्णय झाले नसतील तर आम्ही ते करु. कामगारांच्या संदर्भात आम्ही लवकरच निर्णय करणार आहोत. महिना दीड महिन्याच्या आत कामगार मंडळाच्या बोर्डवर चेअरमनची नियुक्ती केली जाईल आणि त्यामध्ये चेअनमनचा समावेश करताना सर्वस्तरावरील, सर्व भाषांचे, सर्व पक्षाच्या प्रतिनिधींचा समावेश कसा करता येईल यासंदर्भात आपण निर्णय घेणार आहोत. मी मंत्री झाल्यावर आठ दिवसाच्या आत सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील माथाडी कामगारांच्या संदर्भात माझ्याकडे एक विषय घेऊन आले होते. त्या विषयाला सचिवांनी स्टे दिला होता. सन्माननीय सदस्य आल्याबरोबर मी "या विषयातील स्टे उठवण्यात यावा" असे एका सेकंदात लिहून दिले. असे लिहून दिल्यामुळे माझ्याकडे अनेक व्यपारी आले. आलेल्या व्यापाऱ्यांना मी आमदार महोदयांना चर्चेसाठी बोलावतो असे सांगितले. मी व्यापाऱ्यांना असेही सांगितले की, गेल्या चार-पाच वर्षात आपल्या नफ्यात काहीच वाढ झाली नाही का ? तुमच्या कमाईमध्ये जर वाढ होत असेल तर त्यातील काही हिस्सा माथाडी कामगारांना द्यावयास नको काय ? यासंदर्भात माझ्यावर किती तरी व्यापाऱ्यांनी दबाव आणण्याचा प्रयत्न केला होता. त्यामुळे या सरकारचा दृष्टिकोन कामगार विरोधी आहे असे आपल्याला म्हणता येणार नाही. काही विषयामध्ये तर सरकार म्हणून नाही तर महाराष्ट्रातील कामगार म्हणून दृष्टिकोन ठेवण्याची आवश्यकता आहे. आपल्या सर्वांची इच्छाशक्ती एकत्र करुन शेतकरी, शेतमजूर, माथाडी, कामगारांच्या संदर्भात पक्षीय राजकारण न करता पक्षाच्या पलीकडे जाऊन विचार करण्याची

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. प्रकाश महेता ......

आवश्यकता आहे. महाराष्ट्राची अस्मिता जोपासण्यासाठी धोरण स्वीकारण्याची मानसिकता या शासनाची आहे. या चर्चेवरील वेळेचे बंधन बघता ज्या भावना सभागृहाने व्यक्त केल्या त्या भावनांशी या सरकारच्या भावना व्यक्त नाहीत एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. प्रकाश बिनसाळे)**

त्यामुळे आमचे आणि तुमचे हा विषय येथे येतच नाही. आपण सर्वांनी कष्टकरी लोकांसाठी एकत्र येऊन महाराष्ट्रातील उद्योग वाढावा व महाराष्ट्र उद्योगातही पुढे यावा तसेच कामगार सक्षम व्हावा यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन ठोस निर्णय घेऊ अशा प्रकारची अपेक्षा व्यक्त करुन शासनाची माथाडी कामगारांच्या संदर्भातील भूमिका स्पष्टपणे या ठिकाणी मांडली आहे. शासनाची कामगारांच्या बद्दलची मानसिकता खुली आहे. कामगारांच्या संदर्भात, कष्टकऱ्यांच्या संदर्भात, शेतकऱ्यांच्या संदर्भातील प्रश्नाच्या बाबत आपण सर्वांनी एकत्र येऊन चर्चा करु व पुढील दिशा स्पष्ट करु एवढे सांगून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेसंदर्भात महाराष्ट्रातील विविध कामगार नेत्यांनी तसेच सभागृहातील सदस्यांनी कामगारांच्या संदर्भातील राज्य सरकारचे धोरण व कामगार कायद्याच्या संदर्भातील धोरण यासंदर्भात चर्चा केली होती.

सभापती महोदय, कामगार मंत्री महोदयांच्या आजोबांनी गुमास्ता कामगारांच्या प्रश्नासंदर्भात फार मोठा लढा उभा केला होता. कामगार मंत्र्यांचे वडील सुध्दा कामगार चळवळीमध्ये होते. आज मंत्री महोदय कामगार मंत्र्यांच्या स्वरुपात महाराष्ट्रातील कामगारांना न्याय देण्याची इच्छा चांगल्या पध्दतीने प्रकट केली आहे. या ठिकाणी आम्ही 3/4 नोटीफिकेशनच्या संदर्भात धोरणात्मक चर्चा केली. पहिले नोटीफिकेशन लेबर डिपार्टमेंटच्या जाईंट सचिवांनी 14 नोव्हेंबर, 2014 मध्ये काढले होते व त्यामध्ये 3 कामगार कायद्यात बदल करणार असा उल्लेख होता. भले तो ड्राफ्ट असेल त्या ड्राफ्टबद्दल मंत्री महोदयांनी सांगावे की, हा ड्राफ्ट आम्ही नामंजूर करीत आहोत. दुसरा मुद्दा असा आहे की, इंडस्ट्रीयल सचिवांच्या कमिटीच्या मिनिट्स आमच्याकडे आल्या असून त्यामध्ये अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेतला जाणार नाही असे कमिटीने सांगितले आहे परंतु मंत्री महोदयांनी सभागृहाला उल्लेखून सांगितले तर महाराष्ट्रातील कामगाराना चांगला

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील......

दिलासा मिळू शकेल. तिसरा मुद्दा असा आहे की, मेकींग महाराष्ट्र आणि डिजीटल महाराष्ट्राचा उल्लेख आम्ही केला होता. यामध्ये 22 कामगार कायद्यामध्ये बदल सुचवले जाणार आहेत असा आम्ही उल्लेख केला होता. त्यामुळे यासंदर्भातही मंत्री महोदयांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे. चौथा मुद्दा असा आहे की, माथाडी ॲडव्हायजरी बोर्डामध्ये नियुक्त केलेले कामगार नेते असावेत अशी विनंती आम्ही केली होती. त्यासंदर्भात मंत्री महोदयांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे. पाचवा मुद्दा असा आहे की, सुरक्षा रक्षक माथाडी कामगार मंडळ आणि उद्योग धंद्यामध्ये काम करणारा कामगार बेरोजगार होणार नाही याबाबत मंत्री महोदयांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी तारांकित प्रश्नाच्या संदर्भात कामगार कायद्यासंदर्भात उल्लेख केला होता. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात सांगितले होते की, औद्योगिक क्षेत्रामध्ये काही गुंड प्रवृत्तीच्या लोकांमुळे माथाडी कामगार कायद्याला त्रास होतो आहे व अशा गुंड प्रवृत्तीच्या लोकांचा आम्ही बंदोबस्त करु. त्यामुळे यासंदर्भातही कामगार मंत्र्यांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे. गुंड प्रवृत्तीचा त्रास उद्योग धंद्याला जसा होतो तसा तो माथाडी कामगारांना सुध्दा आहे. या गुंडगिरीमुळे आमची चळवळ सुध्दा खराब होत असते त्यामुळे यासंदर्भात मंत्री महोदयांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या सभागृहाचे सन्माननीय सदस्य सर्वश्री. सोले साहेब , जानकर साहेब, किरण पावसकर साहेब, भाई जगताप साहेब तसेच डॉ. नीलम गोऱ्हे यांनी या विषयावर आपले विचार व्यक्त केले आहेत. कॉन्ट्रक्ट लेबर ॲक्टमध्ये बोनसच्या संदर्भात आम्ही आग्रह धरला होता. आता कामगारांना 8.33 टक्के बोनस मिळतो व त्यामध्ये 10 हजार रुपयांची सिलिंग आहे. त्यामुळे हा बोनस कामगारांना 20 टक्के मिळावा व सिलिंग 25 ते 30 हजार पर्यंत केली तर जावी यासंदर्भात मंत्री महोदयांनी भाष्य करण्याची आवश्यकता आहे.

**तालिका सभापती** (श्री. रामनाथ मोते ) : माझी आपल्याला विनंती आहे की, आपण प्रस्तावाच्या संदर्भात जे मुद्दे मांडले होते त्यावर सन्माननीय कामगार मंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. आपल्या एखाद्या मुद्याचे उत्तर आले नसेल तेवढाच मुद्दा आपण विचारावा.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. नरेंद्र पाटील : सभापती महोदय, सेंट्रल गव्हर्मेंट ॲक्टच्या संदर्भात केंद्रामध्ये सेंट्रल ॲक्ट आणि स्टेट ॲक्ट मध्ये कृपया बदल करु नये एवढीच माझी मंत्री महोदयांना नम्र विनंती आहे. कामगार मंत्र्यांनी आपल्या भाषणात जो उल्लेख केला त्याबद्दल मी त्यांचे स्वागत करतो. परंतु कामगार कायदे बदलू नका, आऊट सोर्सीगचा कायदा बदलू नका व कामगारांना पर्मनंट करा एवढीच माझी आपल्याला विनंती आहे.

श्री. प्रकाश महेता : सभपती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नरेंद्र पाटील यांनी शेवटचा मुद्दा सांगिला त्या मुद्यापासून मी सुरुवात करतो. सेंट्रल गव्हर्मेंटचे जे कामगार कायदे आहेत त्यामध्ये सुधारणा करण्यासंबंधी राज्यशासन म्हणून माननीय मुख्यमंत्री निश्चितपणे शिफारस करतील. परंतु त्याच बरोबर कामगार मंत्री म्हणून मी माननीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांना विनंती करणार आहे की, आपण पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेबांबरोबर चर्चा करुन या विषयाच्या संदर्भात मार्गदर्शन करावे.

यानंतर श्री. अजित.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

ते आठवड्यातून दोनदा भेटतात आणि महाराष्ट्राच्या हिताच्या दृष्टीने चर्चा करतात. तेव्हा या मध्ये काही अडचण येईल असे मला वाटत नाही. आपल्या स्तरावर जे काही करायचे आहे ते आपण येथे करुन घेऊ. आपल्या वरिष्ठ नेत्यांची दोस्ती आहे तशी आपली देखील दोस्ती आहे. आपणास राज्याला पुढे न्यायचे आहे.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ते जे म्हणत आहेत तो मसुदा मंजूर केलेला नाही. आपण मसुद्यावर एकत्रित विचार करणार आहोत. आतापर्यंत माथाडी मंडळ किंवा बोर्ड बनविताना आपण एकतर्फी प्रेमच केले. आम्हाला कामगारासंबंधी काही कळत नाही असे आपणास वाटले.. (अडथळा)..

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, युतीचे शासन असताना माथाडी मंडळामध्ये माथाडी कामगार त्यामध्ये होता. श्री.साबीर शेख हे कामगार मंत्री होते त्यावेळी देखील शिवसेनेचा कामगार नेता होता, हे मी आपल्या लक्षात आणून देतो.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मागील पंधरा वर्षात आपण कोणकोणाला माथाडी मंडळावर घेतले ? आपण माथाडी कामगारांचे नेतृत्व करता, ते आम्ही मान्य करतो. आपण एक बाजू सांभाळत आहात आम्ही एक बाजू सांभाळत आहोत. आपण एकत्रच महाराष्ट्राची बाजू सांभाळत चांगल्या दिशेने पाऊल टाकू. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, यामध्ये गुंडगिरी आहे आणि अन्य बाबी आहेत. हे त्यांनाही माहीत आहे आणि मलाही माहीत आहे. आपण सर्वंच विषयासंबंधी ओपनली चर्चा केली तर त्यामुळे काही लोकांना दु:ख होईल, काहीना बरे वाटणार नाही. तेव्हा आपण सकारात्मक विचार करुन कामगारांना केंद्रबिंदू ठेवून उद्योग कसा वाढेन आणि त्यातून राज्याची भरभराट कशी होईल यादृष्टीने आपण सर्वांनी विचारु करु या एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय कामगार मंत्र्यांनी अतिशय सकारात्मक उत्तर दिलेले आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत. आम्ही आजपर्यंत येथे कामगारांचे प्रश्न मांडले आणि त्यास माननीय कामगार मंत्र्यांनी उत्तरे दिली. मी माझ्या भाषणात



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

एक प्रश्न उपस्थित केला होता की, आम्ही कामगारांसाठी न्याय मागायला जातो ते इंडस्ट्रीयल कोर्ट, लेबर कोर्ट कार्यालयाची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. त्या ठिकाणी कामगार न्याय मागण्यासाठी जातात त्यांना तेथे उभे राहण्याची देखील सोय नाही. तेथे कोणत्याही प्रकारचे इन्फ्रास्ट्रक्चर नाही. आपण उद्योग वाढले असे सांगतो. जसे उद्योग वाढतात त्याप्रमाणे कामगारांची संख्या देखील वाढत असते. माझी मागणी आहे की, न्यायदान करणाऱ्या कार्यालयाच्या दुरूस्तीसाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करावी. आपण अशी तरतूद केली नसेल तर ती जरूर करावी अशी माझी विनंती आहे.

श्री.प्रकाश महेता : सभापती महोदय, मुंबईतील कामगार न्यायालय हे वांद्रे येथील न्यू ॲडमिनिस्ट्रेटीव्ह इमारतीमध्ये आहे. त्या ठिकाणी मी स्वत: भेट दिलेली आहे. तेथील बार कौन्सिलच्या ॲडव्होकेटसना मी भेटलो आहे. त्या इमारतीमधील पहिला मजला पूर्ण रिकामी आहे. त्यांची मागणी आहे की, आम्हाला जो अर्धा मजला दिलेला आहे त्यापेक्षा आम्हाला पहिला मजला पूर्णपणे दिल्यास आमची अडचण दूर होईल. मी दुसऱ्या दिवशी तसा प्रस्ताव तयार करून त्याची एक प्रत माननीय मुख्यमंत्री व दुसरी प्रत जिल्हाधिकारी यांना दिलेली आहे.मागील दीड महिन्यांपासून ही कार्यवाही सुरु आहे.

सभापती महोदय, अधिकाऱ्यांना अधिक गतीने काम करण्याच्या दृष्टीने सोयी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच इमारत कंत्राटी कामगार, घरेलु कामगार यांची नोंदणी अधिक प्रमाणात व्हावी यासाठी नोडल एजन्सी नेमून त्यांच्यामार्फत कामगारांसाठी कोणत्या सवलती देण्यात येतात याची माहिती कामगारांना देणार आहोत. माथाडी बोर्डाकडे असलेल्या निधीचा फायदा माथाडी कामगारांना कसा मिळेल यासंबंधीची एक सर्वकष भूमिका महिना दीड महिन्यात घेत आहोत. आपण आज पर्यंत कामगारांच्या सुविधेसंबंधी बसच्या मागे पोस्टर लावून, कुठे चित्र लावून माहिती देत होतो. परंतु या माध्यमातून सर्वच कामगारांपर्यंत सुविधेसंबंधीची माहिती पोहोचत नाही. कामगारासंबंधी, झोपडपट्टीसंबधी, माथाडी कामगारासंबंधी आणि ग्रामीण भागातील घर योजनेसंबंधी ब्रॅन्ड ॲम्बेसॅडर नेमण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. या कामासाठी श्री.नाना पाटेकर यांची

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश महेता...

ब्रॅन्ड ॲम्बेसॅडर म्हणून नियुक्ती करणार आहोत आणि त्यास त्यांनी मंजुरी दिलेली आहे. कामगारांना जास्तीत जास्त फायदा कसा मिळेल अशाप्रकारची योजना काही दिवसांत आणणार आहोत.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे )** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

----

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल

**मु.शी.:** डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंबंधी सभापतींचा प्रस्ताव

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडला त्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाचा जो प्रस्ताव आहे, त्याऐवजी मी आता प्रस्ताव मांडत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या दिनांक 27 मे, 2009 तसेच दिनांक 19 मार्च 2010 च्या निदेशांच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक अनुशेष 2009 /प्र.क्र.405/का-1416 दिनांक 31 मे, 2011 अन्वये समतोल प्रादेशिक विकासाच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीचा अहवाल विचारात घेण्यात यावा.

आता प्रस्तावावर चर्चा सुरु होईल. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी भाषणास सुरुवात करावी.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाड्यावर झालेला अन्याय, असमतोल विकास आणि अनुशेषाबद्दलचे प्रचंड प्रश्न आपण सतत याठिकाणी मांडले आहेत. दांडेकर समितीच्या अहवालानुसार आम्हाला न्याय मिळेल असे वाटले होते. पण तो न्याय आम्हाला मिळाला नाही आणि असमतोलाची एक मोठी दरी निर्माण झाली होती. मी आता त्या विषयात जात नाही. परंतु माननीय राज्यपालांच्या निर्देशावरुन दिनांक 31 मे 2011रोजी समतोल प्रादेशिक विकासाच्या बाबतीत एक उच्च स्तरीय समिती, ज्यावर आपण चर्चा करीत आहोत, ती डॉ.विजय केळकर याची समिती स्थापन झाली. ही समिती आम्हाला न्याय देईल का असा प्रश्न आमच्या मनात आला होता. कारण कुपोषित मुलाला एका बाजूला आणि सुदृढ मुलाला एका बाजूला उभे करुन दोघांना काही देण्याची वेळ येते तेव्हा दोघांनाही समान द्यावे असा विचार होतो, तेव्हा कुपोषित मुलगा कुपोषितच राहतो आणि सुदृढ मुलगा अधिक सुदृढ होत जातो. केळकर समितीचा अहवाल असाच येणार की काय अशी भीती आमच्या मनात होती. आम्ही केळकर समितीचा अहवाल वाचला असता विदर्भाला आणि मराठवाड्याला खूप काही दिले असे चित्र मला तरी दिसत नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

या अहवालात विदर्भ, मराठवाड्यातील शेतकरी, व्यापारी, आदिवासी, शेती क्षेत्र, सिंचन क्षेत्र, आरोग्य क्षेत्र, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, विजेचे वितरण, औद्योगिक विकास, वन क्षेत्र या सर्व विषयांना स्पर्श केलेला आहे. या अहवालातून विदर्भ आणि मराठवाड्याला न्याय देण्याचा प्रयत्न केल्याचे स्वागत करीत असताना मला एका गोष्टीची अजूनही चिंता वाटते की, खरोखरच विदर्भ आणि मराठवाड्याला या अहवालातून न्याय मिळणार आहे की नाही ?

सभापती महोदय, समतोल विकासाचा प्रश्न मांडत असताना या समितीने 8 वर्षांचा कालावधी निश्चित केला आहे. त्या समितीने सुचविल्यानुसार 8 वर्षांमध्ये विकास केला तर असमतोल दूर होईल असे समितीचे म्हणणे आहे. योजनेंतर्गत साधनसंपत्तीचे नियतवाटप या विषयांतर्गत अनुसूचित जाती उपयोजना/जनजाती उपयोजना यांचा हिस्सा वजा जाता उर्वरित साधनसंपत्तीचे सर्वसाधारण क्षेत्र 70 टक्के आणि जलक्षेत्र 30 टक्के, अशी विभागणी करावी अशी शिफारस केळकर समितीने केली आहे. परंतु कोणते सर्वसाधारण क्षेत्र आणि कोणते जल क्षेत्र विकसित करणार आहात या बाबतचा उल्लेख मात्र अहवालात नाही. त्या बाबत विचार करणे आवश्यक आहे.

महोदय, जल क्षेत्राचे करण्यात येणारे नियतवाटप हा विषय माझ्या दृष्टीने गंभीर आहे. कारण आमच्याकडे जिल्ह्यांचा विकास झालेला नाही. मराठवाड्यात सुध्दा तीच स्थिती आहे. मात्र केळकर समितीने दुष्काळग्रस्त 44 तालुक्यांचा विषय प्रथम हाती घेतला आहे. हे तालुके पश्चिम महाराष्ट्रातील आहेत याची मला जाणीव आहे. आमचे जिल्हे मागे असताना पश्चिम महाराष्ट्रातील तालुके विकासामध्ये घेतले तर आम्ही मागे राहू आणि हा भाग पुढे जाईल असे चित्र निर्माण होईल, याची मला भीती वाटते.

महोदय, जल क्षेत्राच्या करण्यात येणाऱ्या नियतवाटपामध्ये पाण्याची गंभीर समस्या असलेले 44 तालुके, भूस्तर प्रतिकूल असलेले 85 तालुके, खार पाण पट्टा यांच्यासाठी पहिले पैसे दिले जाणार आहेत. विदर्भामध्ये केवळ माजी मालगुजारी....

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु असताना सभागृहाचे नेते आणि माननीय नियोजन मंत्री सभागृहात उपस्थित

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नाहीत. यावरुन सरकारला या विषयाचे गांभीर्य किती आहे हे दिसून येते. त्यामुळे माझी विनंती आहे की, आपण संबंधितांना सभागृहात येण्याविषयी निरोप पाठवावा. ..2..



**तालिका सभापती** : ठीक आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, केवळ पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांसाठी पैसे देण्यात येणार आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छिते की, बाकीच्या क्षेत्राच्या विकासाचे काय ? जल क्षेत्राचा विकास करीत असताना पाण्याची गंभीर समस्या असलेल्या 44 तालुक्यांना, भूस्तर प्रतिकूल असलेल्या 85 तालुक्यांना आणि खार पाणपट्टयातील तालुक्यांना पैसा दिला जाणार आहे. पूर्व विदर्भातील केवळ माजी मालगुजारी तलावांसाठी पैसा द्यावा, अशी शिफारस केळकर समितीने केली आहे. पाण्याची गंभीर समस्या असलेल्या 44 तालुक्यांसाठी 1798 कोटी रुपये देण्याची शिफारस केली आहे. त्याची टक्केवारी 27.3 टक्के आहे. भूस्तर प्रतिकूल असलेल्या 85 तालुक्यांना 1732 कोटी रुपये देण्याची शिफारस केली असून त्याची टक्केवारी 26.3 टक्के आहे. तसेच माजी मालगुजारी तलावांना 2520 कोटी रुपये देण्याची शिफारस केली असून, त्याची टक्केवारी 38.2 टक्के आहे. त्याच बरोबरच खारपाणपट्टयासाठी 542 कोटी रुपये देण्याची शिफारस केली असून, त्याची टक्केवारी 8.2 टक्के आहे. अशाप्रकारे निधीचे वाटप करण्याबाबतची शिफारस केळकर समितीने केली आहे.

सभापती महोदय, प्रत्येक प्राथम्य क्षेत्रासाठी मर्यादित कालावधीकरिता नियतवाटपाची शिफारस केली आहे. म्हणजे दरवर्षी किती निधी द्यावा या बाबतचा उल्लेख केला आहे. असे असताना खरोखरच विदर्भाला काय मिळाले, पश्चिम विदर्भाला काय मिळाले ? पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीचा निधी सोडल्यास विदर्भाला काय मिळाले हा संशोधनाचा भाग आहे. पूर्व विदर्भातील माजी मालगुजारी तलाव सोडल्यास त्या ठिकाणी मोठे बंधारे आणि प्रकल्प आहेत. या प्रकल्पांना वन विभागाच्या कायद्यामुळे स्पर्श सुध्दा करता आलेला नाही. मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात असताना सुध्दा ते पाणी आम्ही अडवू शकलो नाही, किंबहुना शेतीसाठी पाणी वापरु शकलो नाही. परंतु त्या बाबतचा उल्लेख या अहवालामध्ये झालेला नाही याचे मला वाईट वाटते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, विदर्भामध्ये 132 विद्युत प्रकल्प आणण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यानुसार चंद्रपूरला 58 आणि नागपूरला 28 प्रकल्प येणार आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्युत प्रकल्प येतील तेव्हा विदर्भाचा स्मशानघाट झाल्याशिवाय राहणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

..3..



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस....

जल सिंचनाच्या बाबतीत विचार करीत असताना केवळ माजी मालगुजारी तलाव नव्हे तर विदर्भ हे पाण्याचा साठा असलेले क्षेत्र आहे. परंतु त्या भागात कोणत्याही प्रकारचा विकास न झाल्यामुळे ते शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे क्षेत्र म्हणून गणले गेले आहे. या निमित्ताने मला अशी दुरुस्ती सुचवावीशी वाटते की, केवळ माजी मालगुजारी तलाव नव्हे तर विदर्भाच्या इतरही भागात सिंचन क्षेत्र वाढविण्याचा किंवा शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या विषयाचा उल्लेख करावयास पाहिजे.

महोदय, क्षेत्रांना नियतवाटप झाल्यानंतर उर्वरित जल क्षेत्रांचे नियतवाटप करण्यात येणार आहे, असे अहवालात नमूद केले आहे. या व्यतिरिक्त जो उरलेला पैसा आहे त्याचे कसे वाटप करावे याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणी पेयजल तूट आहे त्या ठिकाणी 50 टक्के वाटप करीत असताना विदर्भाला 22.39 टक्के, मराठवाड्याला 23.01 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राला 54.60 टक्के देण्याचे ठरले आहे. मराठवाड्याला केवळ 23.01 टक्के देण्याचे ठरले आहे. वास्तविक पाहता सर्वात जास्त पिण्याच्या पाण्याचे टँकर मराठवाड्याला लागतात. आपल्या सर्वांना कल्पना आहे की, मराठवाड्यातील पाण्यासाठी सभागृहात सतत भांडणे होतात. तरी सुध्दा मराठवाड्याला पेयजल तुटींतर्गत 23.01 टक्के दिले जाणार आहेत. विदर्भाला 22.39 आणि उर्वरित महाराष्ट्राला 54.60 टक्के देण्यात येणार आहे हे विशेष करुन लक्षात घेण्यासारखे आहे. महोदय, समान विकास करावयाचा असेल तर, खऱ्या अर्थाने दुबळ्यांना जास्त मदत करणे गरजेचे आहे. मागास भागाला वर आणण्याचा या सरकारचा खरोखरच प्रयत्न करावयाचा असेल तर विदर्भ आणि मराठवाडा या विभागांना देण्यात येणाऱ्या निधीचे प्रमाण वाढवावे, अशी मी शिफारस करीत आहे.

सभापती महोदय, विकास तूट 50 टक्के दर्शविलेली आहे. वास्तविक पाहता विदर्भाची विकास तूट 48.13 टक्के, मराठवाड्याची 20.16 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राची विकास तूट 31.71 टक्के आहे. विदर्भाची विकास तूट 48.13 टक्के दाखविली असताना प्रत्यक्षात तेथील

विकास झालेला नाही. त्यामुळे विकासासाठी मोठ्या प्रमाणावर मदत व्हावी यासाठी विदर्भ नेहमीच आसुसलेला आहे. पण या अहवालामध्ये हे घडले नाही. त्यामुळे या अहवालात जी टक्केवारी दिली आहे त्या बाबतीत फेरविचार व्हावा अशी मी सभागृहाच्या माध्यमातून सरकारला विनंती करीत आहे.

..4..



श्रीमती शोभा फडणवीस....

महोदय, एकूण टक्केवारी बघता विदर्भाला 35.26 टक्के, मराठवाड्याला 21.59 टक्के आणि उर्वरित महाराष्ट्राला 43.15 टक्के अशा प्रकारचे वाटप करण्याची समितीने शिफारस केली आहे. प्रत्येक विभागाने उर्वरित जल क्षेत्र नियत वाटपापैकी भूपृष्ठावरील आणि भूपृष्ठाखालील जलक्षेत्राकरिता 50 टक्के राखून ठेवावे आणि त्या लाभ क्षेत्र विकासाकरिता वाटप व्हावे अशी शिफारस करण्यात आलेली आहे. लाभक्षेत्र विकासाकरिता 8 टक्के राखून ठेवण्याची शिफारस करण्यात आली आहे. जलसंधारणाकरिता (पाणलोट क्षेत्र) 10 टक्के आणि पेयजल व स्वच्छतेसाठी 12 टक्के असे नियतवाटपाच्या निर्धारित स्तरांचे अनुपालन केले पाहिजे अशीही शिफारस केली आहे. याचाच अर्थ या ठिकाणी वाटप झाल्यानंतर उर्वरित वाटप टक्केवारी पध्दतीने करावे अशी शिफारस करण्यात आली आहे. तसेच नियतवाटपाच्या निर्धारित स्तरांचे अनुपालन केले पाहिजे अशी शिफारस केली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांना चौकटीत बसवून विकास करणे बंधनकारक केल्यास भविष्यात समतोल विकास करण्याचे स्वप्न साकार होऊ शकते. हे वाटप करीत असताना तिन्ही क्षेत्राचा जितका असमतोल असेल त्या पध्दतीने वाटप केले तर भविष्यात ही दरी काही प्रमाणात कमी करु शकतो, अशी माझी धारणा आहे.

सभापती महोदय, अनुसूचित जाती उपयोजना/जनजाती उपयोजना/जल या बाबतच्या तरतुदी वजा जाता राज्य पातळीवर उपलब्ध सर्वसाधारण क्षेत्र साधनसंपत्ती संकोषाची सामान्यता 60:40 या प्रमाणात विभाज्य व अविभाज्य घटकांमध्ये आणखी विभागणी करावयास पाहिजे, असेही नमूद केले आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

मी आदिवासी भागात काम करते. मी एकदा आदिवासींचा अभ्यास करण्यासाठी बसले तेव्हा मला असे वाटले की, आपल्याला खरोखर स्वातंत्र्य मिळाले आहे का, आपण खरोखर आदिवासींचा विकास केला आहे का ? 0 ते 2 हजार रूपये कमाविणाऱ्या आदिवासी कुटुंबाची संख्या 32 हजार आहे. 2 ते 3 हजार रूपये कमाविणाऱ्या आदिवासी कुटुंबांची संख्या 1 लाख 32 हजारांच्या वर आहे. आपण आदिवासींचा विकास कुठे केला ? आपण दरडोई उत्पन्नाचा विचार करतो त्यावेळी आदिवासी क्षेत्राचा किंवा आदिवासींचा विचारच करीत नाही. सर्वांच्या उत्पन्नाचा एकत्रित विचार करून दरडोई उत्पन्न ठरविले जाते, त्यामध्ये श्रीमंतांचे, गाड्यावाल्यांचे, कारखानदारांचे उत्पन्न असते, त्यात माझा बिचारा आदिवासी 20 रूपयांचा सहभागी असतो. श्रीमंतांचे उत्पन्न मात्र 43, 52 हजार असते. आदिवासींना न्याय मिळवून द्यायचा असेल तर त्यांचा पैसा त्यांच्यावरच खर्च झाला पाहिजे अशी शिफारस अहवालात करण्यात आली आहे. शिफारस करताना असेही सांगितले आहे की, यातील 60 टक्के विभाज्य निधी समितीच्या शिफारशीवरून नियत वाटपाकरिता आधारभूत किंवा निर्धारित स्तर म्हणून समजण्यात यावा म्हणजे् एकूण आदिवासी उपयोजनेंतर्गत पैसे दिले जातात, त्यातील उर्वरित पैशांच्या 60 टक्के समितीच्या शिफारशीप्रमाणे वाटप केले पाहिजेत असे बंधन शिफारशीच्या माध्यमातून घोतलेली आहे.

सभापती महोदय, वेगळी ठेवलेली साधनसंपत्ती एकूण विश्वास तूट म्हणून 3 प्रदेशांत समितीच्या सूत्रानुसार वितरित करण्यात यावी आणि ही साधनसंपत्ती प्रादेशिक मंडळाच्या ताब्यात ठेवण्यात यावी अशीही शिफारस करण्यात आली आहे. एखाद्याच्या हातात ती दिल्यानंतर त्याचे समान वाटप होईलच यावर कोणाचाही विश्वास नसल्यामुळे येथे ही साधनसंपत्ती प्रादेशिक मंडळाच्याच ताब्यात ठेवण्यात यावी जेणेकरून वाटप समान होईल. वाटप त्या पध्दतीने सूत्रानुसार होईल असा विश्वास दर्शविला आहे. समितीच्या सूत्रानुसार 3 प्रदेशांमध्ये 60 टक्के वाटपाचे नियत सूत्र दिले आहे, त्यात लोसंख्येचा विचार केला आहे, विकासातील तफावतींचा विचार केला आहे, दरडोई् उत्पन्नाचा विचार केला आहे. क्षेत्रविकासाची एकूण टक्केवारी पाहता विदर्भाला 60 टक्क्यांमध्ये 33.24 टक्के, मराठवाड्याला 25.31 टक्के आणि उर्वरित महाराष्टाला 41.45 टक्के

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

नियतव्ययाचे वाटप करावे अशीही शिफारस समितीने केली आहे. समितीने उर्वरित महाराष्ट्राचा विचार अजूनही पक्का ठेवला आहे. आपल्याला पाहिजे त्या प्रमाणात वाटप करताना मराठवाडा व विदर्भाला जास्तीचे दान द्यावे असे मला वाटत नाही. परंतु कमी देत असाल तर ते देताना आपण थोडे कंजूष आहात असे मला वाटते. विभाज्य साधनसंपत्तीच्या प्रादेशिक संख्या. देत असलेल्या पैशाचेही वाटप जिल्ह्यामध्ये पंचायत समिती, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून कसे झाले पाहिजे याकरिताही त्यांनी निर्देश दिले आहेत. विभाज्य साधनसंपत्तीच्या प्रादेशिक संकोषापैकी जिल्हा नियोजन समित्यांना 30 टक्के आणि गटांना 30 टक्के देण्यात यावे अशीही शिफारस करण्यात आली आहे. समितीच्या नियत वाटपाच्या सूत्राचा वापर करून प्रादेशिक विकास मंडळाकडून नियतव्यय वाटप करावे अशीही शिफारस समितीने केली आहे. निर्धारित स्तरावरील क्षेत्रीय नियतव्यय वाटपाकरिता वाहतूक मार्गांचे जाळे, रस्ते, रेल्वे बंदरे, हवाई मार्ग, कृषी व संलग्न सेवा, कृषी पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय, सहकार, वीज, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण यांना विभाज्य राज्याच्या सर्वसाधारण योजनेच्या अनुक्रमे वाहतुकीसाठी 20 टक्के, कृषीसाठी 15 टक्के, विजेसाठी 8 टक्के, सार्वजनिक आरोग्यासाठी 11 टक्के व शिक्षणासाठी 11 टक्के या प्रमाणात नियतव्यय वाटप करण्यात यावे अशीही शिफारस समितीने केली आहे. सुशासन महत्तम प्रादेशिक सक्षमीकरण आणि उत्तरदायित्व यामध्ये कामाचे नियोजन, अधिकार व समित्यांचे राज्य ते तालुका स्तरापर्यंत गठन करणे अशी मागणी झाली आहे. तसेच विकास आराखड्याचे नियोजन, पर्यवेक्षण व संनियंत्रण याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यात विशेष उल्लेख नागपूर कराराचा आहे. नागपूर करारातील प्रमुख बाबींना चालना देण्यासाठी महत्त्वाच्या मंत्रालयीन विभागांची तीनही प्रदेशांमध्ये समन्यायी संचालनालयाची विभागणी व्हावी असे म्हटले आहे. नागपूर करार झाला तेव्हा असे ठरले होते की, सर्व संचालक कार्यालये नागपूरमध्ये हलविली पाहिजेत. आम्ही गेली कित्येक या संदर्भात मागणी करीत आहोत. फक्त वन विभागाचे कार्यालय सोडले तर दुसरे कोणतेही प्रादेशिक कार्यालय नागपूरला आलले नाही. परंतु तेही कार्यालय पुन्हा जायच्या तयारीतच बसले आहे. त्यामुळे आता या शिफारशीनुसार सर्वच संचालकांची कार्यालये नागपूर विभागात यावीत. शिफारशीप्रमाणे कामे व्हावीत आणि तशी कामे

श्रीमती शोभा फडणवीस ....

झाली तर काही प्रमाणात का होईना न्याय देता येईल.

सभापती महोदय, संचालकांचे कार्यालय औरंगाबादला सुध्दा स्थलांतरित करण्यात यावे अशी शिफारस अहवालात करण्यात आली आहे. मराठवाड्याला न्याय देण्याकरिता काही संचालकांची कार्यालये औरंगाबादला स्थलांतरित करावीत अशी मागणी झाली आहे. प्रत्येक वर्षी 1 ते 31 डिसेंबर या निर्धारित काळाकरिता मंत्रालय नागपूर येथे स्थलांतरित करावे अशी शिफार समितीने केली आहे. नागपूर अधिवेशनापुरतेच मंत्रालय तेथे येते. माझी सभागृहाला विनंती आहे की, नागपूर अधिवेशन 1 ते 31 डिसेंबरपर्यंत करावे जेणेकरून महिनाभर तरी किमान मंत्रालय तेथे राहील. आधीचा एक आठवडा व पुढचा एक आठवडा असे कमीत कमी 6 आठवडे तरी ते तेथे राहील. त्यामुळे नागपूर अधिवेशन 4 आठवडे करणे गरजेचे आहे. सभागृहाने सदर शिफारशीचा विचार करावा अशी मी विनंती करते. विदर्भाच्या खनिज संपत्ती मधून मिहणारे स्वामित्व धन स्थानिक क्षेत्र विकासाठीच नियमित असावे ही खरी गोष्ट आहे. सर्वात जास्त खनिज संपत्ती पूर्व विदर्भात आहे, ती पश्चिम विदर्भात थोडी फार आहे. खनिज संपत्ती सर्वांत जास्त विदर्भाच्या वाट्याला आली आहे. जेव्हा त्याचे स्वामित्व धन एकत्र केले जाते तेव्हा त्याचे वाटप करताना मात्र आम्हाला आमच्या हिश्श्याप्रमाणे मिळत नाही. आम्हाला सांगितले जाते की, विदर्भ आर्थिकदृष्ट्या तुटीचा असल्यामुळे विदर्भ वेगळा करणे बरोबर नाही. आपल्याला विचार केल्यास निदर्शनास येईल की, सर्वात जास्त खनिज संपत्ती विदर्भात आहे. त्यामुळे यातून मिळणारे स्वामित्व धन स्थानिक क्षेत्र विकासासाठीच निर्बंधित असावे. त्याचप्रमाणे स्वामित्व धन हे सरसकट मुल्यानुसार ठरविण्यात यावे आणि ठराविक कालावधीनंतर त्यात सुधारणा करण्यात यावी अशी महत्त्वाची शिफारस समितीने केली आहे. जेणेकरून या पैशाच्या माध्यमातून आम्ही विदर्भाचा विकास करू शकू. प्रदेशात निर्माण होणारी वीज स्थानिक ठिकाणी कमी दराने उपलब्ध करून देण्यात यावी ही सर्वात मोठी शिफारस करण्यात आली आहे. आपण एका ठिकाणी सर्व वीज गोळा करतो आणि तेथून वाटप सुरू होते, म्हणजे वीज 1800 कि.मी. जाणार आणि पुन्हा तेवढेच अंतर परत येणार. त्यामुळे मोठ्या प्रमाणात ट्रान्समिशन लॉसेस होतात. सभागृहाची कित्येक दिवसांपासूनची मागणी आहे की, वीज जेथे

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस ....

निर्माण केली जाते तेथेच दिली तर ट्रान्समिशन लॉसेस कमी होतील, विजेची किंमत कमी होईल, कमी पैशात विजेचा वापर करता येईल. त्यामुळे ही शिफारस अत्यंत महत्त्वाची आहे. आपण कमी दराने स्थानिक ठिकाणी वीज उपलब्ध करू न देण्यास सुरूवात केली तर मोठ्या प्रमाणात ट्रान्समिशन लॉसेस कमी होतील आणि लोकांना कमी दरात वीज मिळेल.

सभापती महोदय, इतर प्रदेशांना निर्यात होणाऱ्या विजेपासून मिळणाऱ्या महसुलाचा काही भाग पुनर्वसन, प्रदूषण नियंत्रण व स्थानिक विकासासाकरिता वापरावा अशी शिफारसही समितीने केली आहे आणि ही योग्य आहे. कारण आपण् फक्त विजेचे मोठे प्रकल्प उभे करतो, प्रदुषणाच्या बाबतीत झालेल्या वारंवार चर्चेत कारखाने बंद करण्याच्या घोषणा करतो पण प्रदूषण कमी करण्याच्या गोष्टी करीत नाही. त्यामुळे आमची मागणी आहे की, प्रदुषणच कमी झाले पाहिजे. आपल्याला प्रदूषण कमी करायचे असेल तर प्रदूषण नियंत्रण समितीवर प्रचंड प्रमाणात दबाव असण्याची आवश्यकता आहे, त्यांच्याकडून चांगले काम अपेक्षित असणे हेही अतिशय महत्त्वाचे आहे. महसूलचा काही भाग पुनर्वसन, प्रदूषण नियंत्रण व स्थानिक विकासाकरिता वापरावा अशी शिफारस समितीने केली आहे आणि ती अतिशय योग्य आहे.

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्र वचन पूर्ती. महाराष्ट्र शासनाने जनजाती क्षेत्र उपयोजनेचा निधी व्यपगत होणार नाही किंवा इतर प्रयोजनाकडे वळविता येणार नाही असे कायद्याद्वारे अनिवार्य करावे अशी शिफारस समितीने केली आहे मला आठवते की, विधानसभेत व विधानपरिषदेत या संदर्भात चर्चा झाली आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, सोलापूरचा आणि गडचिरोलीचा काय संबंध आहे, कोल्हापूरचा आणि चंद्रपूरचा काय संबंध आहे ? परंतु, आपण आदिवासी क्षेत्रांची यादी बघितली तर किती तरी रस्ते गडचिरोली जिल्ह्याच्या नावाने, चंद्रपूर जिल्ह्याच्या नावाने दाखविण्यात आले आहेत आणि प्रत्यक्षात ते रस्ते सोलापूर किंवा कोल्हापूरला केलेले आहेत. त्या ठिकाणी आदिवासी विकास विभागाचा निधी देता येत नाही म्हणून आदिवासी क्षेत्राच्या नावाने कामे दाखवून आदिवासी विकास विभागाचा निधी बिगर आदिवासी क्षेत्राकडे वळविण्याचे अनेक प्रकार मागील काळात घडले आहेत. म्हणून या अहवालात अशी शिफारस करण्यात आली आहे की, जनजाति क्षेत्र उपयोजनेचा निधी व्यपगत होणार नाही किंवा इतर प्रयोजनांकडे वळविता येणार नाही, असे कायद्याव्दारे अनिवार्य करावे.

सभापती महोदय, या अहवालात अशीही शिफारस करण्यात आली आहे की, जनजाति क्षेत्र उपयोजनेच्या निधीच्या मर्यादा व नियतवाटप पुढील रीतीप्रमाणे असावे. ग्रामसभा 50 टक्के, ग्रामपंचायत 15 टक्के, पंचायत समिती 15 टक्के, जिल्हास्तर 10 टक्के आणि राज्य स्तर 10 टक्के. सध्या आपण आपल्या अर्थसंकल्पात आदिवासी योजनांसाठी एकूण तरतुदीच्या 9 टक्के तरतूद देत असतो. तथापि, अर्थसंकल्पीय तरतूद 9 टक्के केली असली तरी तो निधी वाटप करीत असताना असमानता होते. कारण, आज आपण बघितले तर आदिवासी क्षेत्रांमध्ये रस्ते नाहीत, पिण्याच्या पाण्याच्या सोयी, शाळा, अंगणवाड्या नाहीत. आजही त्यांना रानटी जीवन जगावे लागत आहे. त्यामुळे अर्थसंकल्पात तरतूद करीत असताना त्याचे वाटप कशा पध्दतीने केले पाहिजे, या संदर्भातील समितीने केलेली शिफारस स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, बहुसंख्येने आदिवासी लोकसंख्या असलेले असे एकूण आठ जिल्हे व शंभर तालुके निर्माण करण्यात यावेत, ही प्रशासकीय युनिटे सर्वसाधारणपणे अनुसूचित क्षेत्राशी जोडली जावीत, अशा प्रकारची एक शिफारस या अहवालात करण्यात आली आहे. तथापि, ही शिफारस मान्य होण्यासारखी नाही. कारण, राज्य शासनाने माडा, मिनी माडा, पाडा असे आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात क्षेत्र घोषित केलेली आहेत. लोकसंख्येमध्ये बहुसंख्येचा विचार केला तर 50 टक्के, 30 टक्के आदिवासींची लोकसंख्या असलेल्या गावातील आदिवासींवर अन्याय होईल. त्यामुळे शासनाने आदिवासींच्या टक्केवारीनुसार केलेली व्यवस्थाच योग्य आहे.

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

त्याकरिता 100 तालुके आणि 8 जिल्हे हे नियमाप्रमणे करता येतील, असे मला वाटत नाही. त्यामुळे या शिफारशीचा फेरविचार करावा, अशी माझी विनंती आहे. आजही 30 टक्क्यांपर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांना मिनी माडा आणि पाडा यामध्ये चौकशी करुन समाविष्ट करण्याची गरज आहे. अजून अनेक गावे अशी आहेत की, आदिवासींची संख्या 30 टक्क्यांच्या वर आहे. परंतु, ती गावे अजूनही माडा, मिनी माडामध्ये समाविष्ट झालेली नाहीत. त्यामुळे तेथील आदिवासींना या सर्व योजनांपासून वंचित रहावे लागत आहे. त्या गावांचा फेरविचार करुन माडा आणि मिनी माडामध्ये समाविष्ट करावे, अशा प्रकारची विनंती मी करीत आहे.

सभापती महोदय, एक अतिशय चांगली शिफारस केळकर समितीने केली आहे. "दोन दशलक्ष आदिवासी तरुणांमध्ये स्वयं-रोजगाराची क्षमता निर्माण करण्यासाठी पुढील दहा वर्षाकरिता प्रतिवर्षी दोन लाख आदिवासी तरुणांसाठी, शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर एक कार्यक्रम हाती घेण्यात यावा." आज तरुण मुलांना काम मिळत नाही, रोजगार नाही, अशी मुले नक्षलवादाकडे वळत आहेत. त्यामुळे त्यांच्यापासून मुलांना वाचवायचे असेल किंवा एक चांगली, सुदृढ पिढी निर्माण करावयाची असेल तर त्यांना शैक्षणिक व व्यावसायिक कौशल्ये विकसित करण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. ही शिफारस मान्य केल्यास त्याचा मोठ्या प्रमाणावर आदिवासी तरुणांना फायदा होणार आहे.

सभापती महोदय, राज्यात दोन जनजाति विद्यापीठे असावीत. त्यापैकी गडचिरोलीमधील गोंडवन विद्यापीठ हे एक जनजाति विद्यापीठ असेल तर दुसरे नवीन विद्यापीठ ठाणे-नाशिक प्रदेशामध्ये स्थापन करण्यात यावे, अशा प्रकारची शिफारस या समितीने केली आहे. या माध्यमातून आणखी एक विद्यापीठ स्थापन करावे, अशा प्रकारची शिफारस आहे.

सभापती महोदय, आश्रमशाळेतील शिक्षणाचा अभ्यासक्रम व दर्जा आणि आश्रमशाळेची स्थिती परिणामकारकपणे सुधारण्यात आलीच पाहिजे, असा आग्रह समितीने एका शिफारशीव्दारे धरला आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर आश्रमशाळा सुरु करण्यात आल्या आहेत. आदिवासी मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न आहे, त्याचप्रमाणे आदिवासी मुलींचे होणारे शोषण हा देखील महत्त्वाचा

...3...

श्रीमती शोभा फडणवीस.......

मुद्दा आहे. शिक्षणाचा दर्जा चांगला असला पाहिजे, आदिवासी मुले स्पर्धेत टिकली पाहिजेत, अशा प्रकारची मागणी या निमित्ताने मी करीत आहे.

सभापती महोदय, आदिवासी मुलांच्या शिक्षणाचे माध्यम हे सुरुवातीला मातृभाषा असावे. तिसऱ्या इयत्तेपासून पुढे इतर भाषांचा परिचय करून देण्यात यावा, अशा प्रकारची शिफारस या अहवालात करण्यात आली आहे. जेणेकरून मुलांना शिक्षणाची गोडी लागेल आणि शाळा शिकणाऱ्या मुलांची टक्केवारी वाढेल, असा उद्देश या शिफारशी मागे आहे. ही शिफारस अतिशय चांगली आहे.

सभापती महोदय, कुपोषण व बालमृत्यू कमी करण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या बालमृत्यू समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात यावी, अशा प्रकारची शिफारस समितीने केली आहे. सन 2005 मध्ये केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी आतापर्यंत केलेली नाही. सन 2005 मध्ये केलेल्या शिफारशींची आठवण या समितीला सन 2015 मध्ये करून द्यावी लागत आहे, हे अतिशय दुर्दैवी आहे.

सभापती महोदय, आदिवासींकरिता जातीची पडताळणी आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण कालबध्द रीतीने कठोरपणे अंमलात आणावे, अशा प्रकारची शिफारस समितीने केली आहे.

सभापती महोदय, वनांवरील सामूहिक हक्कांसह, आदिवासी गावांना व त्यांच्या विकासाकरिता हरित बोनस आणि कृषि व वन विकास यांमधून निधी देण्यात यावा, अशी एक महत्त्वूपर्ण शिफारस समितीने केली असून ती स्वागतार्ह आहे.

सभापती महोदय, नवीन शेती पध्दती मधील भूमिका व आव्हाने याचा विचार करीत असताना समितीने पुढील दहा वर्षांमध्ये कोरडवाहू जमिनीची उत्पादकता वाढविण्याकरिता, कोरडवाहू जमीन कृषि विकास कार्यक्रमाची पाणलोट क्षेत्र अभियानासह, अंमलबजावणी करावी, अशा प्रकारची शिफारस केली आहे. जेणेकरून सिंचनाचे क्षेत्र वाढेल, कोरडवाहू जमीन कमी होईल आणि उत्पन्नाची क्षमता वाढेल. या शिफारशीची शासनाने कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशा प्रकारची मागणी मी येथे करीत आहे.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, विदर्भ व मराठवाड्याकरिता कापूस अभियान व पूर्व विदर्भाकरिता भात अभियानाची स्थापन करावी, अशा प्रकारची एक शिफारस या अहवालामध्ये आहे. तसेच, विदर्भ व मराठवाडा या मागास प्रदेशांमधील फलोत्पादनाचा विकास करण्यासाठी पुढील पाच वर्षांसाठी प्रादेशिक फलोत्पादन मिशनची शिफारसही समितीने केली आहे.

सभापती महोदय, लाभक्षेत्राचा सामाजिक आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आंतरशाखीय दृष्टिकोन, संरचना व मनुष्यबळ असणारे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरण निर्माण करण्यात यावे. पाणी नियंत्रण, पाणी सोडणे, पाण्याचा वापर, पीक नियोजन व कार्यक्षम पाणी वापर व कालव्याचे परिरक्षण ही कामे नवीन लाभक्षेत्र विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात यावीत, अशी शिफारस या अहवालात करण्यात आली आहे.

सभापती महोदय, ऊसासारख्या जास्त पाणी लागणाऱ्या पिकांकरिता सूक्ष्म सिंचन तंत्रज्ञानाच्या व्दारे एक अनिवार्य बदल करावयास हवा. सूक्ष्म सिंचन आणि यांत्रिकीकरण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीकरिता सर्व योजना आणि विभाग यांचे अंदाजपत्रक एककेंद्रभिमुख करुन या सर्व योजनांचे त्यात विलिनीकरण करुन त्याव्दारे "महाराष्ट्र कृषि अभियांत्रिकी कंपनी" निर्माण करावी, अशी शिफारस समितीने केली आहे. या शिफारशीची अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, संपूर्णपणे वेगळी कृषिविषयक हवामानाची स्थिती असणाऱ्या पूर्व विदर्भ प्रदेशाच्या विकासाकरिता विदर्भातील चंद्रपूर येथे नवीन कृषि व वनीकरण विद्यापीठाची शिफारस समितीने केली आहे. सदर प्रदेशाकरिता योग्य अशा कृषि अवजारांचे व साधनसामग्रीचे संशोधन करणे व ती विकसित करणे, त्याची चाचणी घेणे, प्रशिक्षण देणे व प्रात्याक्षिक करणे याकरिता महाराष्ट्र कृषि विद्यापीठाला व प्रादेशिक कृषि यांत्रिकीकरण अभियानाला संलग्न अशी कृषि यांत्रिकीकरण संस्था स्थापन करावी, अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती महोदय, प्रत्येक प्रदेशाकरिता एक शेतकरी महिला प्रशिक्षण संस्था असावी, अशीही शिफारस समितीने केली आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, जे एकत्रितपणे मोठ्या प्रमाणावर साधनसंपत्ती, उत्पन्न मिळवून देऊ शकतात अशा वनीकरण, मत्स्यव्यवसाय, पशुसंवधर्न यावर अतिशय कमी लक्ष दिले जाते व त्यांना साधनसंपत्तीही कमी दिली जाते. त्यामध्ये समतोल साधण्याची गरज आहे. शासनाने वनीकरणासाठी पुरेशी तरतूद करायला हवी, अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती महोदय, अतिरिक्त वनक्षेत्रांमधील प्रकल्पांकरिता पूरक वनसंपदा म्हणून वनक्षेत्र कमी असणाऱ्या प्रदेशांना आणि जिल्ह्यांना वनीकरणाच्या संबंधात लक्ष्य ठरवून द्यायलाच हवे. सर्व जिल्ह्यांमध्ये 33 टक्के वनक्षेत्र असावे ही बाब राज्याच्या वन धोरणाशी सुसंगतच आहे.

सभापती महोदय, केवळ विदर्भाच्या वनावर महाराष्ट्राचा पर्यावरणीय डोलारा उभा आहे. विदर्भामध्ये 19.20 टक्के जंगल आहे आणि या क्षेत्राच्या भरोशावर संपूर्ण राज्याचा पर्यावरणाचा डोलारा उभा आहे. या दृष्टीकोनातून ही शिफारस अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक जिल्ह्याने 33 टक्के जंगल लावले पाहिजे, त्यामुळे पर्यावरणाचा डोलारा सांभाळला जाईल.

सभापती महोदय, मल्टीनोडल इंटरनॅशनल कार्गो हब ॲट नागपूर मिहानमध्ये मुक्त व्यापारी वखार साठवण क्षेत्र निर्माण करण्यात यावे, अशी शिफारस या समितीने केली आहे.

सभापती महोदय, विदर्भ प्रदेशात असलेले अनेक अनुकूल घटक पाहता कापसाचे मूल्य वाढवण्याबरोबर 2 लाख जनतेला एक लाभदायी रोजगार मिळवून देण्यासाठी ग्रामीण क्षेत्रात लघुउद्योग म्हणून खादी, हातमाग आणि त्याच्याशी संबंधित कापड व्यवसाय निर्माण करण्यासाठी चालना देण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने परभणी-हिंगोली-वाशीम हा संपूर्ण प्रदेश वस्त्रोद्योग प्रदेश म्हणून जाहीर करावा आणि या जिल्ह्यांसाठी एक विशेष एकत्रित धोरण लागू करावे, अशी शिफारस समितीने केली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राने आपले सौर धोरण लवकर जाहीर करावे. तामिळनाडू, राजस्थान आणि गुजरात यासारखी बरीच राज्ये याबाबतीत पुढाकार घेऊन यशस्वी झाल्याची उदाहरणे आहेत, अशी शिफारस या अहवालात आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस.......

सभापती महोदय, दूरगामी विकासाचे पैलू लक्षात घेऊन ते पूर्ण करण्यासाठी शहरातील रस्ते, उड्डाणपूल, पाणी पुरवठा, मलनिःसारण, परिवहन आगार, क्रीडा संकुल, उद्योग केंद्रे, पर्यटकांना आकर्षित करणारी स्थळे आणि हरित शहर बनविण्याकरिता एक स्वतंत्र औरंगाबाद प्रादेशिक विकास प्राधिकरण स्थापन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन समितीने केले आहे.

सभापती महोदय, पाणलोट जमिनीचा विकास करण्याकरिता वित्तीय प्रमाणामध्ये वाढ केली पाहिजे. प्रति हेक्टरी 25 हजार रुपये करायला हवे, असे जरी म्हटले असले तरी 25 हजारामध्ये हे होत नाही. त्यामुळे आम्ही अशी मागणी केली आहे की, प्रति हेक्टरी 50 हजार रुपये निधी दिला तरच आपण मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करु शकू. या दुरुस्तीला सभागृहाने मंजुरी द्यावी.

सभापती महोदय, पाण्याच्या उपलब्धतेच्या बाबतीत तापी नदीचे खोरे हे पाण्याचे दुर्भिक्ष असलेले खोरे आहे. नर्मदेच्या पाण्याचा अतिरिक्त हिस्सा कमी पाणी असणाऱ्या खानदेश प्रदेशाकरिता वापरण्यात यावा, अशीही शिफारस समितीने केली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस..

परंतु त्याचबरोबर पश्चिम विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट या आदिवासी भागाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा व सिंचनाची सोय व्हावा अशी दुरूस्ती मी सभागृहाच्या माध्यमातून मांडत आहे. विदर्भ प्रदेशाकरिता वन जमीन संपादित करणे, वनांच्या जागेकरिता आवश्यक असणारी रक्कम सध्याच्या निव्वळ मुल्यांच्या एनपीव्ही आधारे प्रदान करण्याची गरज आहे. अशी रक्कम प्रदेशातील प्रकल्प खर्चात न आकारता पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प या सारख्या आकस्मिकता निधीतून आकारण्यात यावी. ही एनपीव्हीची रक्कम रद्द करण्यात यावी. अशी दुरूस्ती मी सभागृहाच्या माध्यमातून करीत आहे. या कामासाठी आमच्या विभागातून एनपीव्ही दिला जातो. जंगलाची जागा देखील दिली जाते, जंगल संपत्तीतून उत्पन्न मिळते. म्हणून या एनपीव्हीमधून राज्य शासनाची सुटका व्हावी अशी मागणी बऱ्याच वर्षापासून आम्ही करीत आहोत. पाण्याखाली गेलेल्या प्रदेशातील वनक्षेत्र 0.5 टक्के पेक्षा कमी आहे. अशा प्रकल्पाच्या बाबतीत उदा.तुलतुले कारवाफा, ह्यूमन अशा क्षेत्रात सिंचन प्रकल्पासाठी राज्यपाल महोदयांची विशेष परवानगी घेण्यात यावी. अशी शिफारस करण्यात आली आहे, विदर्भातील अपूर्ण प्रकल्प प्राथम्य क्रमाने तातडीने पूर्ण केले जावेत. वैनगंगा व तिच्या उप नद्यांमधील जलसंपदा व बंधारे उपसा सिंचन योजनेद्वारे वापरण्यात यावेत. अशी महत्वपूर्ण शिफारस केळकर समितीने केली आहे. अशा पध्दतीने विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राच्या विकासासाठी केळकर समितीने घेतलेल्या निर्णयास मी ज्या दुरूस्त्या सूचविल्या आहेत त्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. या समितीचे मी स्वागत करते व माझे भाषण संपविते.

--------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

श्री.माणिकराव ठाकरे : (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, महाराष्ट्रात डॉ.विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली 14 सदस्यांची समिती नियुक्त करण्यात आली होती. त्या समितीने अहवाल दिलेला आहे. त्या अहवालाच्या संदर्भात राज्यात व विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात विषय उपस्थित करण्यात आला होता. नागपूर अधिवेशनात हा अहवाल शासनाने सभागृहाच्या पटलावर ठेवला त्यावेळी या अहवालावर चर्चा केव्हा होणार याबाबत शासनाकडे विचारणा केली जात होती. याबाबत वित्त मंत्री यांनी असे सांगितले होते की, सदर अहवाल नागपूर अधिवेशन काळात प्राप्त झाला आहे हा अहवाल शासनाने स्वीकारला देखील नाही व नाकारला देखील नाही. सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या काय भावना आहेत, त्या लक्षात घेऊन राज्य शासन याबाबत निर्णय घेईन. असे अर्थमंत्री व राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात सांगितले होते. या अहवालावर चर्चा व्हावी व शासनाने तसा प्रस्ताव सभागृहात मांडावा अशी इच्छा दोन्ही सभागृहांची होती. यामध्ये शासनाला कोणती अडचण आली ते मला कळले नाही. हा अहवाल स्वीकारावा किंवा नाकारावा याबाबत दोन्ही सदनात चर्चा घडवून आणताना सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांची काय मते आहेत, त्यानंतर शासन आपले मत निश्चित करणार आहे. असे शासनाचे धोरण आहे, अशा प्रकारचा अहवाल आम्ही अंशतः स्वीकारला आहे किंवा नाकारला आहे. याबाबत जे सांगायचे असेल ते सदनात मुख्यमंत्री महोदयांनी सांगायला पाहिजे होते.

सभापती महोदय, सत्ताधारी पक्षातील एखाद्या सन्माननीय सदस्यांना हा विषय सभागृहात उपस्थित करायला लावायचा त्या विषयासंदर्भात शासनाचे काही मत असू नये असे धोरण राज्य शासनाने स्वीकारले ते अनाकलनीय आहे. विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात माननीय सभापती व माननीय अध्यक्षांनी हा ठराव मांडावा व त्यानंतर सभागृहात चर्चा सुरु व्हावी. अशा प्रकारची नवीन पध्दत सुरु करावी लागली आहे. या विषयावर सभागृहात चर्चा होत असताना मूळ अहवाल व त्यात कोणते विषय आहेत, त्यामध्ये कशा प्रकारे शिफारशी केलेल्या आहेत, त्या शिफारशीवर काय चर्चा व्हावी हा विषय वेगळा आहे. हा अहवाल स्वीकारावा किंवा नाकारावा यावर शासनाची भूमिका ठाम नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्यांकडून चर्चा करताना या शिफारशी योग्य प्रकारे आल्या किंवा

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

नाहीत, घटनात्मक व कायदेशीर दृष्टीने आल्या किंवा नाहीत या बाबी तपासून अहवालाच्या संदर्भातील निर्णय राज्य शासनाने घ्यावा असे माझे मत आहे. महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरिय समितीचा अहवाल असे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. या अहवालाच्या प्रास्ताविकात डॉ.विजय केळकर समितीचे अध्यक्ष यांनी असे नमूद केले आहे की, महाराष्ट्राचा समतोल प्रादेशिक विकास साध्य करणे हे महाराष्ट्र राज्याच्या महत्वाच्या ध्येय धोरणांपैकी एक धोरण आहे. हे साध्य करण्यासाठी बहुआयामी दृष्टीकोन प्रस्तावित करतो. प्रस्तावना लिहित असताना ज्या कामासाठी व ज्या उद्देशाने राज्यपाल महोदयांनी आपली नियुक्ती केली त्या उद्देशाच्या व्यतिरिक्त फार माझा अभ्यास आहे, मला सर्व समजते, मला जग समजते, म्हणून मनाप्रमाणे तशा प्रकारचा अहवाल सादर करणे, समितीने नेमून दिलेल्या सर्व विषयांचा अहवालात मी परामर्श घेतला आहे.

सभापती महोदय, डॉ.विजय केळकर त्यांच्या प्रस्तावनेत असे नमूद करतात की, त्यापुढे जाऊन आम्ही राज्यातील तालुके आणि जनजाती क्षेत्र समाविष्ट करण्याचा दृष्टीकोन ठेवला आहे. राज्यपाल महोदयांनी समिती गठीत केली, त्यामध्ये कोणते विषय घ्यावे, याचा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. असे असताना वेगळ्या पध्दतीने मनमानेल त्याप्रमाणे मी अहवाल तयार करीन अशा प्रकारे बेछूटपणे अहवाल तयार करण्याचे काम डॉ.विजय केळकर यांनी केले आहे. वास्तव आणि कल्पित प्रदेशातील विकासातील गावे सुसह्य करण्याकरिता त्यांनी राज्यपाल महोदयांनी घटनेच्या 371(2) मध्ये काय नमूद केले आहे ही बाब बाजूला ठेऊन राज्यात काय समस्या आहेत त्यावर मी अहवाल सादर करतो व राज्यात कोठे निधी खर्च केला पाहिजे ते मी सांगतो. इतक्या वर्षात दोन्ही सभागृहात सन्माननीय सदस्यांनी जी चर्चा केली त्यातून असे प्रस्तावित केले की, हे राज्य कसे चालले पाहिजे. कोणत्या दिशेने खर्च केला पाहिजे, संयुक्त महाराष्ट्र एकत्र राहण्यासाठी कोणती पावले उचलली पाहिजेत.

या नंतर श्री.भारवि....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे.....

कल्पित प्रदेश, विकासाच्या धोरणाचा केंद्रबिंदू असे म्हटले आहे. तो अनुशेष आहे. राज्यामध्ये कुठल्या विषयावर वाद असेल तर तो अनुशेषावर आहे, असे प्रस्तावनेमध्ये डॉ.विजय केळकर यांनी म्हटले आहे. डॉ.विजय केळकर यांना कशासाठी नेमले होते ? त्यांची नेमणूक करण्यामागे राज्य शासनाचा कोणता उद्देश होता ? राज्यातील विदर्भ, मराठवाडा, उर्वरित महाराष्ट्र हा भाग अविकसित आहे. घटनेच्या अनुच्छेद 371 (2) अनुसार दांडेकर समितीवर, अनुशेष निर्देशांक समितीवर जी जबाबदारी होतीच तीच जबाबदारी या समितीवर होती. 1994 साली अनुशेष निर्देशांक समितीची स्थापना करण्यात आली. त्यापूर्वी 1983 मध्ये दांडेकर समितीची स्थापना झाली. 1994 पासून अनुशेष निर्देशांक समितीच्या सूचनेप्रमाणे राज्य सरकारने तिन्ही क्षेत्रातील बॅकलॉग पूर्ण करण्यासाठी प्रयत्न सुरू केला. 1994 मध्ये अनुशेष काढण्यात आला. तो पूर्ण करण्याकरिता सन 2010 पर्यंत प्रयत्न करण्यात आला. काही प्रमाणात अनुशेष भरला गेला. त्यात काही प्रमाणात कमतरता राहिली असेल. परंतु, सन 1994 पासून सन 2000 पर्यंत नव्याने किती अनुशेष निर्माण झाला हे दाखवून देण्याकरिता डॉ.विजय केळकर यांच्या नेतृत्त्वाखाली 14 सदस्यांची समिती शासनाने गठित केली व या समितीकडे माननीय राज्यपालांनी काम सोपविले आणि त्यानंतरच या कामाला सुरूवात झाली. विकासाचा क्षेत्रीय असमतोलचा अंदाज घेण्यासाठी निर्देशांक ठरविणे हा यात उद्देश ठेवण्यात आला होता. दुसऱ्या कलमामध्ये म्हटले आहे की, 2010 अखेर उपलब्ध असलेल्या माहितीच्या आधारावर महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भात असमतोल निश्चित करणे. हे करीत असताना राज्य शासनाची थेट गुंतवणूक, खर्च आणि राज्य व केंद्र शासनाच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रात झालेल्या गुंतवणुकीचा विचार करणे. तीन मध्ये नमूद केले आहे की, निश्चित केलेल्या निर्देशांपैकी प्राधान्याने कोणत्या निर्देशांवर कारवाई होऊ शकेल याची मर्यादा ठरविणे. चार मध्ये नमूद केले आहे की, निश्चित होणारा अनुशेष दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविणे व त्या अनुषंगाने विकास निधी वाटपाचे सूत्र ठरविणे व भविष्यात पुन्हा असमतोल निर्माण होऊ नये यासंदर्भात उपायोजना सुचविणे. वैधानिक विकास

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

मंडळाच्या भूमिकेच्या संदर्भात वैधानिक विकास मंडळ आणखी प्रभावीपणे काम कसे करू शकेल त्याही संदर्भात भूमिका ठरविणे. असे डॉ.विजय केळकर समितीच्या कामकाजचे सूत्र असताना ते बाजूला ठेवून मनमानेल अशा प्रमाणे जणू काही मी राज्याचे भले करायला निघालो आहे अशा थाटात कुठल्या क्षेत्रात काय आहे याचा उल्लेख त्यांनी केलेला आहे. तसेच निधी कसा वाटप केला पाहिजे हे जे थेट सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे त्याचे कोणीही समर्थन करू शकत नाही. वरिष्ठ अर्थसचिव म्हणून ज्यांनी कारभार पाहिला आहे त्या सचिवांकडून अशा प्रकारची अपेक्षा राज्यातील सर्व सन्माननीय सदस्यांनी करून शकत नाही. त्यांनी एक भरकटलेला अहवाल तयार केला आहे. माननीय राज्यपाल यांनी डॉ.विजय केळकर यांच्या नेतृत्त्वाखाली समिती स्थापन केली. त्या समितीला विदर्भातील, मराठवाड्यातील, उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष भरून काढण्यासंबंधात सूचना करायला सांगितल्या होत्या. परंतु, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, उर्वरित महाराष्ट्र यांच्या विकासाच्या संदर्भात हा अहवाल अत्यंत कुचकामी ठरला आहे. हा अहवाल कचऱ्याच्या टोपलीत टाकावा अशा प्रकारची विनंती मी राज्य शासनाला करीत आहे. या अहवालाचे आपण आणखी पैलू पाहिलेत तर आपल्या लक्षात येईल की, त्यांनी आपल्या अहवालात विदर्भात असंतोष का आहे याची कारणमिमांसा केलेली आहे. यात त्यांनी कारणे देखील दिलेली आहेत. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सेवा, उर्वरित महाराष्ट्र प्रदेशात झालेली प्रगती यामुळे विदर्भातील जनता नाराज असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. त्यांचे बुद्धीकौशल्य पहावे. पश्चिम महाराष्ट्राचा विकास झाला म्हणून विदर्भात बॅकलॉग आहे. कृषी क्षेत्रात पीछेहाट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या आत्महत्या, आदिवासी क्षेत्रातील हिंसाचार आणि राजकीय सत्तावाटपात निर्माण झालेली विषमता यामुळे विदर्भात असंतोष आहे, असे देखील त्यांनी नमूद केले आहे. विदर्भामध्ये बॅकलॉग आहे. विदर्भामध्ये सिंचनाची व्यवस्था नाही म्हणून शेतकरी आत्महत्या करीत आहेत, असे केळकर समितीला म्हणता आले असते. मंत्री पदे मिळाली नाहीत किंवा पश्चिम महाराष्ट्रामुळे आमच्या मनात जेलसी आहे अशा प्रकारचे तारे डॉ.विजय केळकर समितीने तोडलेले आहे. अशी एक नाही अनेक उदाहरणे देता येतील. या समितीला महाराष्ट्राच्या सरासरी विकासाच्या संदर्भातील प्रादेशिक समतोलता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

निश्चित करण्याचे सांगितले असताना अनेक ठिकाणी त्यांनी राज्यातील अविकसित अशा तीन जिल्ह्यातील सरासरी काढून तिच्याशी असमतोलाचे मोजमाप केले. त्यामुळे प्रगत विभागात राज्य सरासरी प्रमाणे अनुशेष नाही तेथे तो समितीने काढून ठेवला. अशा प्रकारे समितीने कार्यकक्षेचे उल्लंघन करून अतिशय मनमानी प्रमाणे काम करून आपल्या अहवालात शिफारशी केलेल्या आहेत. आपल्याला जी जबाबदारी दिली होती ती न पाळता वेगळ्या पद्धतीने असमतोल काढण्याचे काम करण्यात आले आहे. जेथे अधिक कामे झाले असतील, अधिक पैसा खर्च झाला असेल त्याही ठिकाणचा असमोलपणा काढण्याचे काम करण्यात आले आहे. या समितीने 12 महिन्यात आपला अहवाल द्यावा अशी अपेक्षा असताना 28 महिन्यांनी अहवाल दिला. आपल्या राज्यात कोणत्या उणिवा आहेत, कोणत्या पद्धतीने अनुशेष भरून निघाला पाहिजे यासंबंधातील कुठलीही माहिती समिती देऊ शकलेली नाही. असमन्यायी विकास निधी वाटपामुळे सिंचन क्षमता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, उद्योग, वीज पुरवठा या क्षेत्रामध्ये होत असलेल्या प्रादेशिक असमतोलाबाबत समितीला दिलेल्या कार्यकक्षेप्रमाणे समतोलाचे मोजमाप करावयाचे होते.

यानंतर श्री.जुन्नरे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .........

परंतु नेमके हेच न करता समितीने महाराष्ट्राचा एकूण असमतोल काय आहे ते काढण्याचा प्रयत्न केला. अनुशेष निर्देशांक समितीमध्ये तुमचा कोण कोणत्या क्षेत्राच्या संदर्भात अनुशेष आहे यासंदर्भात चर्चा झाली होती. मग तो अनुशेष आरोग्य असेल, शिक्षण असेल, उद्योग असेल, वीज असेल किंवा रस्ते असेल. सिंचनाच्या व्यतिरिक्त या क्षेत्रातील जो बॅकलॉग आहे तो किती आहे हे काढण्याचे काम समितीला देण्यात आले होते. सन 1994 ते 2010 पर्यंतचा बॅकलॉग किती आहे, त्यातून किती बॅकलॉग निघाला यासंदर्भात तिन्ही विभागाच्या संदर्भात काहीही उल्लेख दिसून येत नाही. नागपूर करार हा 371 कलमानुसार व घटनेप्रमाणे झाला. विकास करण्याची तसेच अनुशेष काढण्याची जबाबदारी या समितीवर होती परंतु ही जबाबदारी टाळण्याचे काम डॉ.विजय केळकर समितीने केलेले आहे. स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचेनचा विषय समोर आला होता त्यावेळी फजल कमिटीकडे जबाबदारी देण्यात आली होती व या समितीने वेगळा विदर्भ असावा अशी सूचना केली होती. परंतु संयुक्त महाराष्ट्र असावा, सर्वजण एकत्र असावेत म्हणून तत्कालीन मुख्यमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण साहेब तसेच विदर्भातील ज्येष्ठ नेत्यांनी संयुक्त महाराष्ट्र एकत्र असला पाहिजे असे विचार व्यक्त केले. परंतु हे होत असताना मागास भाग सदन भागाबरोबर गेला पाहिजे व आपण पाठीमागे राहतो आहोत अशी भावना व्यक्त केल्यामुळे त्यावेळी स्व.यशवंतराव चव्हाण आणि इतर नेत्यांनी घटनात्मक विश्वास दिला की, आम्ही 371(2) कलम करतो आहोत. ज्यावेळेला तुम्हाला वाटेल की, राज्यामध्ये आलेली सरकारे तुम्हाला न्याय देत नाही तेव्हा 371(2) कलमाचा वापर करुन तुमच्या करता वैधानिक विकास मंडळाची तिन्ही क्षेत्रात स्थापना करण्यात येईल. 1984 मध्ये वसंतदादा पाटील मुख्यमंत्री होते त्यावेळेला दोन्ही सदनामध्ये संयुक्त महाराष्ट्राच्यावेळी दिलेले शब्द पाळले जात नाही अशी भावना व्यक्त करण्यात आली. त्या वेळी भंडारा येथील आमदार स्व.गिरीजा शंकर नागपुरे यांनी सदनात 1984 मध्ये राष्ट्रपतींकडे जे घटनात्मक अधिकार आहेत ते राज्यपालांकडे द्यावेत व बॅकलॉग आणि विकासाची असमानता भरुन काढण्याचा प्रयत्न करावा यासंदर्भात ठराव आणला होता. त्यावेळी हा ठराव सदनाने मागे घ्यावा अशा प्रकारची विनंती त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी केली होती. आपण हा ठराव मागे घ्यावा व शासनाच्या वतीने दोन्ही सभागृहात राष्ट्रपतींकडे जे घटनात्मक अधिकार आहेत ते राज्यपालांकडे

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे .........

देण्याच्या संदर्भात राष्ट्रपतींना विनंती करु की, 371(2) कलम राज्यामध्ये लागू करावा. हा ठराव 26 जलुै, 1984 मध्ये सदनामध्ये आला. या ठरावावर सभागृहात चर्चा झाली. त्यावेळी विरोधी पक्ष नेते श्री. शरद पवार साहेब होते. त्यावेळी सर्वांनी सांगितले की, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्राकरिता मंडळे विकसित केली पाहिजेत व राष्ट्रपतींकडे 371(2) चे जे अधिकार आहेत ते माननीय राज्यपालांना देण्यात यावे व आवश्यक असलेला निधी राखून ठेवण्याचे अधिकार राज्यपालांना प्राप्त व्हावे यासंदर्भात ठराव केला त्यावेळेस माननीय श्री. शरद पवार साहेबांनी त्यावेळेस अनेक उदाहरणे दिली होती. पवार साहेबांनी शाहू महाराजांच्या संदर्भात एक उदाहरण दिले होते. छत्रपती शाहू महाराज कमी बोलत होते. परंतु ते कृतीने सिध्द करुन दाखवत होते. शाहू महाराजांनी एक कर्मचाऱ्याला टांगाचौकामधून चार घोडे आणावयास सांगितले व दुसऱ्या कर्मचाऱ्याला महाराजांच्या बागेतील चार घोडे आणावयास सांगितले. या आठही घोड्यांसमोर 200 फूटावर एका हंडीमध्ये चंदी ठेवण्यात आली. या आठही घोडयांना एकदम चंदी खाण्याकरिता सोडले तेव्हा जी मजबूत घोडी होती, महाराजांच्या पागेतील जी घोडी होती त्या घोडयांनी वेगामध्ये जाऊन टांगा चौकातील घोडे येण्याच्या अगोदर सर्व चंदी संपवून टाकली. या उदाहरणावरुन महाराजांना जास्त काही बोलण्याची गरज पडली नाही. या ठिकाणी असमानता आहे हे स्पष्ट झाले होते. ज्या भागात असमानता असेल, दुर्भिक्ष असेल त्यांना मदत करण्याची भूमिका शाहू महाराजांच्यावेळी असायचा. त्यावेळचे राज्यकर्ते सुध्दा अशाच प्रकारचा दृष्टिकोन ठेवून काम करीत होते. त्यावेळी त्यांनी सदनामध्ये यासंदर्भात काही उदाहरणे ठेवली होती. त्यावेळी विदर्भाची लोकसंख्या 25 टक्के होती. राजकीय दृष्टिकोनातून बॅकलॉग पूर्ण केला पाहिजे, नोकऱ्यांच्या संदर्भातील बॅकलॉग दूर केला पाहिजे, आर्थिक, शैक्षणिक व सिंचन क्षेत्रातील व इतर क्षेत्रातील बॅकलॉग दूर केला पाहिजे यासाठी प्रयत्न केले गेले. विदर्भामध्ये त्यावेळी 25 टक्के जनता असतांना नोकरी मिळण्याची सरासरी 3 टक्के होती व मराठवाडयाची नोकरी मिळण्याची सरासरी 2 टक्के होती. विदर्भातील जनतेला नोकरीमध्ये 25 टक्के वाटा मिळणे आवश्यक असतांना त्यांना केवळ 3 टक्के वाटा मिळत होता त्यामुळे ही असमानता नाही तर दुसरे काय होते ? यासंदर्भात विचार करुन या भागाचा विकास करण्याच्या संदर्भात पावले टाकली गेली.

...3...

श्री. माणिकराव ठाकरे .........

ज्यावेळेस माननीय राष्ट्रपतींनी कलम 371(2) चे अधिकार माननीय राज्यपाल महोदयांना दिले त्यावेळेस दांडेकर समितीच्या माध्यमातून अनुशेष काढला जात होता.

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..

आपण दांडेकर समितीचा अहवाल स्वीकारला नव्हता,परंतु त्यावेळी राज्य शासनासमोर कोणतीही आकडेवारी नव्हती म्हणून एक आधार म्हणून दांडेकर समितीची मदत घेऊन अनुशेष असलेल्या भागांना मदत करण्याच्या बाबतीत राज्य सरकार निर्णय घेत असे. परंतु सदनामध्ये अशी देखील चर्चा झाली की, दांडेकर समितीने फार काही आधार नसताना आकडेवारी दिलेली आहे. भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यामध्ये मालगुजारी तलाव मोठ्या संख्येने आहेत असे या समितीने सांगितले. परंतु हे मालगुजारी तलाव जवळपास बुजत आले आहेत. दांडेकर समितीने सांगितले होते की, या तलावांमधून 1 लाख 20 हजार रुपयांचा बॅकलॉग भरुन निघत आहे, परंतु प्रत्यक्षात परिस्थिती वेगळी होती.

सभापती महोदय. त्यानंतर अनुशेष निर्देशांक समिती आली. या समितीने अगोदरच्या उणिवा दूर करण्याचा प्रयत्न केला. या समितीने आर्थिक आणि भौतिक आधार असा दोन पद्धतीचा बॅकलॉग काढला. आज आपण एक एकर ओलिताखाली जे प्रोजेक्ट मंजूर करतो त्यावर साधारणत: दीड ते अडीच लाख रुपये खर्च येतो. त्यावेळी अनुशेष निर्देशांक समितीने 10 हजार हेक्टरपर्यंत आधार धरुन बॅकलॉग काढला. हा अनुशेष भरुन काढत असताना सर्वांच्या लक्षात आले की, आपण पैसा खर्च करतो, परंतु त्या प्रमाणात सिंचन कुठे दिसत नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी अनुशेषा संदर्भात आग्रह धरला. सन 2005 मध्ये माननीय राज्यपाल श्री.कृष्णा यांनी सांगितले की, भौतिकदृष्टया बॅकलॉग काढला पाहिजे. सिंचनाचे क्षेत्र किती वाढेल त्या प्रमाणात त्या भागाचा बॅकलॉग कमी झाला असा त्यातून अर्थ घेण्यात आला. सन 2010 आणि 2012 मध्ये अशा पद्धतीने बॅकलॉग काढण्याची पद्धत सुरु होती. माननीय राज्यालांना जनतेने विचारले की, आपण जो बॅकलॉग काढत आहात तो तर कमी झालाच नाही. दांडेकर समितीच्या वेळेला जो बॅकलॉग होता तो अनुशेष निर्देशांक समितीच्या वेळी तीन टक्क्यांनी वाढला. अनुशेष निर्देशांक समितीच्या वेळी जो बॅकलॉग होता तो नंतरच्या समितीच्या वेळी म्हणजे सन 2010 पर्यंत तो 53 टक्क्यांवर गेला. बॅकलॉग काढण्याची जी पद्धत होती त्यामध्ये पैसा देऊनसद्धा बॅकलॉग होतच राहिला.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सभापती महोदय, सन 1994 ते 2010 पर्यंत जो कालावधी गेला त्यामध्ये नव्याने निर्माण झालेला बॅकलॉग काढण्यासाठी नव्याने समिती गठीत करण्यात आली. या समितीने काय केले ? त्या समितीने सांगितले की, आपण जो बॅकलॉग काढत आहोत त्यापेक्षा मी वेगळे काहीतरी करणार आहे. त्यांनी स्वत:च्या कल्पनेतून काही क्षेत्रांचा बॅकलॉग काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना कोणत्यातरी भागावरच टार्गेट करायचे होते याकरिता त्यांची नेमणूक केलेली आहे असे वाटत होते. माननीय राज्यपालांनी ज्या चौकटीमध्ये अहवाल देण्यास सांगितले होते ती चौकट ते विसरुन गेले. त्यांनी चार पद्धतीने बॅकलॉग काढण्याच्या सूचना केल्या. त्यांनी सांगितले की, यामध्ये अवर्षण प्रवण तालुक्यांचा समावेश केला पाहिजे.मालगुजारी तलावांचा समावेश केला पाहिजे. खारपाणपट्ट्याचे क्षेत्र घेतले पाहिजे. यामध्ये विदर्भातील जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न होत होता. पण आपली दिशा कुठे ठेवायची आणि आपल्याला कुठे लँड व्हायचे आहे, हे पूर्वनियोजित षडयंत्र होते. त्याप्रमाणे दांडेकर समितीची वाटचाल होती. या समितीने मालगुजारी तलावांचा देखील बॅकलॉग आहे असे सांगितल्यामुळे त्या भागातील जनतेला केळकर समितीने आमच्यासाठी काही तरी आणलेले आहे असे वाटले.

सभापती महोदय, 1994 साली अनुशेष निर्देशांक समिती होती. त्यावेळी या भागाचा बॅकलॉग 11 कोटी रुपये होता. आज 117 कोटी रुपयांची किंमत तीन ते साडे तीन हजार कोटी रुपये होऊ शकते. आम्ही तुम्हाला दोन हजार कोटी रुपये देणार आहोत असे सांगायचे. अनुशेषाचा जो काही भाग आहे त्या भागाकरिता वेगळी रक्कम राज्य शासनाने द्यावी असे सांगितले असते तर मी समजू शकलो असतो.

सभापती महोदय, खारपाणपट्टयासाठी 550 कोटी रुपये देणार असल्याचे सांगण्यात आले. खरे म्हणजे त्यांना अशाप्रकारे पैसे वाटण्याचा अधिकार कोणी दिला ? हा अधिकार माननीय राज्यपालांचा आहे. परंतु डॉ.विजय केळकर समिती म्हणते की मी सर्वज्ञ आहे. मला राज्यपालांचे सर्व अधिकार आहेत. कोणाला काय वाटप पाहिजे ते माझ्याकडे या आणि घेऊन ज्यांनी ही समिती



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे..

नियुक्त केली होती त्यांच्यावरच कुरघोडी करण्याचा आणि आम्ही काही तरी वेगळे आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांनी सांगितले की, मी माझ्या बुद्धीप्रमाणे कल्पित असे काही करीत आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये विकास करीत असताना सर्व भागांचा विकास झाला पाहिजे यामध्ये कोणाचे दुमत असण्याचे काही कारण नाही. खारपाण पट्टयासाठी 550 कोटी रूपयें देणार असल्याचे आमिष दाखवावयाचे. परंतु केळकर समिती हे विसरून गेली की, राज्यातील आठ जिल्ह्यांमध्ये सर्वात जास्त अनुशेष आहे आणि त्यातील चार जिल्हे हे पश्चिम विदर्भातील आहेत व त्यामध्ये खारपाण पट्टयाचे पंधरा तालुके येतात. त्या तालुक्यांना अनुशेषाच्या माध्यमातून मदत द्यायची नाही आणि राजा फार उदार झाला याप्रमाणे खारपाणपट्टयासाठी 550 कोटी रूपये देतो असे म्हणायचे हे योग्य नाही. मी आपणास एक माहिती देतो.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

सभापती महोदय, मी आपल्याला पश्चिम विदर्भातील आकडेवारी सांगतो. राज्याच्या सरासरीने बुलढाणा जिल्ह्यात अपेक्षित सिंचन क्षमता 4,22,794 हेक्टर निर्माण व्हावयास हवी होती. पण प्रत्यक्षात तेथे 1,84,360 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करु शकलो आणि त्या जिल्ह्यात सिंचनाचा अनुशेष 2,38,460 हेक्टर क्षेत्राचा राहिला आहे. तसेच अकोला जिल्ह्यामध्ये 2,62,175 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण व्हावयास हवी होती, पण प्रत्यक्षात केवळ 1,04,740 हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण करु शकलो. या जिल्ह्यात 1 लाख 57 हजार हेक्टरचा अनुशेष राहिला आहे. वाशिम जिल्ह्यामध्ये 2,36,319 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण व्हावयास हवी होती, पण प्रत्यक्षात 1 लाख 220 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करु शकलो आणि 1,36,110 हेक्टर क्षेत्राचा अनुशेष आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये 4,52,688 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण व्हावयास हवी होती. परंतु तेथे केवळ 1,83,280 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करु शकलो आणि त्या जिल्ह्याचा अनुशेष मात्र 2,69,440 हेक्टर आहे. यवतमाळ जिल्ह्यात 5,17,056 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण व्हावयास हवी होती, पण प्रत्यक्षात तेथे 3,21,150 हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करु शकलो आणि अनुशेष मात्र 2 लाख हेक्टरपेक्षा जास्त राहिला आहे. विदर्भातील इतरही बहुतेक जिल्ह्यात अशीच आकडेवारी आहे.

सभापती महोदय, पूर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, चंद्रपूर गडचिरोली या जिल्ह्यांत राज्याच्या सरासरी सिंचन क्षमतेच्या तुलनेत अनुशेष निर्माण झाला आहे. पूर्व विदर्भातील जिल्ह्यांची एकूण आकडेवारी पहिली तर 9,97,410 हेक्टर सिंचन क्षमतेचा अनुशेष असल्याचे दिसून येतो. संपूर्ण राज्यात सिंचनाचा अनुशेष 19,73,830 हेक्टर आहे. एका बाजूला पूर्व विदर्भात 10 लाख हेक्टरचा अनुशेष असताना, संपूर्ण राज्यात मात्र 19 लाख 73 हजार हेक्टरचा अनुशेष आहे. संपूर्ण राज्यात सिंचनाचा जितका अनुशेष आहे त्याच्या अर्ध्यापेक्षा जास्त अनुशेष पूर्व विदर्भातील केवळ 5 जिल्ह्यांत आहे.

महोदय, त्या ठिकाणचा खारपाणपट्टयाचा प्रकल्प इतरत्र नेता. परंतु असे म्हणत नाही की, घटनेच्या कलम 371 (2) नुसार अनुशेष असलेल्या भागातील लोकांना अनुशेष दूर करण्यासाठी प्रथम पुरेसा निधी दिला पाहिजे. पण या बाबतचा उल्लेख अहवालात कुठेही नाही. अशा प्रकारची



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

एक नव्हे अनेक उदाहरणे देता येतील. संपूर्ण परिसरात अवर्षणप्रवण तालुक्यासबंधी, खारपाणपट्टयांसंबंधी आणि केवळ माजी मालगुजारी तलाव दाखवून विदर्भावर अन्याय करण्याचा प्रयत्न डॉ.केळकर समितीने अहवालाच्या माध्यमातून केला आहे.

सभापती महोदय, डॉ.केळकर यांनी विकास अनुशेषावर केंद्रित झाला आहे आणि त्याचे केंद्रबिंदू राज्य ठेवावे, त्याचा केंद्रबिंदू अनुशेषग्रस्त भाग ठेवू नये असे अहवालात नमूद केले आहे. ज्या कामासाठी त्यांची नियुक्ती केली होती ते काम न करता किंवा विदर्भ-मराठवाड्यातील लोकांकडे लक्ष न देता, संपूर्ण राज्याचे हित मला कसे कळते आणि त्या पध्दतीने तुम्ही राज्य चालवावे अशा प्रकारे डॉ.विजय केळकर यांनी मनमानी प्रमाणे अहवाल बनविण्याचे काम केले आहे. अनुशेष दूर करण्यासाठी मदत लागत असेल तर ती राज्य सरकारकडे मागू नये, ती मदत केंद्र सरकारकडे मागावी अशा प्रकारचा सल्लाही त्यांनी अहवालाच्या माध्यमातून देण्याचा प्रयत्न केला आहे. अनुशेष दूर करण्याची बाब राज्य सरकारकडून केंद्र सरकारकडे ढकलण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे.

महोदय, डॉ.केळकर यांनी सांगितले की, जो अनुशेष आहे तो दूर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळाच्या तीन घटनात्मक समित्या नेमल्या आहेत. महोदय, गेली 25 वर्षे आम्ही अनुशेष दूर होण्यासाठी माननीय मुख्यमंत्री आणि राज्य सरकारवर अवलंबून राहिलो आहोत. माननीय मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख असतात. परंतु अहवालात अशी शिफारस केली आहे की, प्रादेशिक विकास मंडळाचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्र्यांना करावे. महोदय, हा तर उलटा कारभार झाला. प्रादेशिक मंडळाचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्र्यांना केले तर प्रादेशिक मंडळ कशाला हवे ? प्रादेशिक मंडळाची गरज राहणार नाही. घटनेच्या कलम 371 (2) अन्वये जे अधिकार दिले आहेत त्या अधिकारांचे काय ? जो अनुशेष आज निर्माण झाला आहे त्या संदर्भात त्यांनी सूचना करावयास पाहिजे होती की, अमुक इतक्या दिवसात अनुशेष दूर करावयास पाहिजे. किंबहुना त्यासाठी जास्तीत जास्त निधी देऊन अनुशेष दूर करण्यासाठी प्रयत्न करावयास पाहिजे होता.

महोदय, यातील पहिल्याच कलमात नमूद केले आहे की, अतिरिक्त आणि अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टिकोनातून आणखी काय उपाययोजना कराव्या लागतील ? अनुशेष हा आर्थिक तरतुदीशिवाय दूर होऊ शकत नाही. त्यांनी या बाबतीत विविध कारणे दिली आहेत. या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे....

दृष्टिकोनातून विकास केला पाहिजे असे त्यांनी सांगितले आहे. परंतु अधिक रक्कम देण्याच्या बाबतीत त्यांनी कुठेही उल्लेख केला नाही. पैसा सोडून विकासाची कितीही साधने वापरण्याचा प्रयत्न करण्याबाबत नमूद करुन एकप्रकारे या समितीने पूर्णपणे दिशाभूल करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

महोदय, हा अहवाल राज्य सरकारने स्वीकारण्याचे कारणच नाही. ज्या उद्देशाने ही समिती नेमण्यात आली होती तो उद्देश सफल झाल्याचे कुठेच दिसून येत नाही. या संदर्भात अधिक पैसा देण्याबाबत तसेच उर्वरित अनुशेष भरुन काढण्याच्या बाबतीत अहवालात काही नमूद केल्याचे कोठेच दिसून येत नाही. त्यामुळे डॉ.केळकर यांनी एकप्रकारे भरकटलेला आणि दिशाहीन स्वरुपाचा अहवाल सादर केलेला आहे. या अहवालामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील जनतेचा असंतोष वाढणार आहे. या शिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत या अहवालामध्ये कोठेही उल्लेख केलेला नाही. वास्तविक पाहता या आत्महत्या होण्यास आर्थिक अडचण हे एक प्रमुख कारण आहे. विदर्भातील शेतकऱ्यांच्या कापसाला भाव नाही, तेथे योग्य ते उत्पादन येत नाही, त्यामुळे त्या भागातील शेतकरी आर्थिकदृष्ट्या खचल्यामुळेच ते आत्महत्या करीत आहेत. परंतु या बाबतीत त्यांनी आर्थिक कारणांबाबत एक शब्दही नमूद केला नाही. डॉ.केळकर यांनी अहवालात नमूद केले की, उदासीनतेमुळे किंवा दुसऱ्या भागात विकास झाल्यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. पण आर्थिक अडचण दूर करण्याच्या दृष्टीने कोणताही प्रयत्न या अहवालात करण्यात आल्याचे दिसत नाही.

महोदय, जल नियामक आयोग स्थापन केल्यानंतर त्यांनी दरवर्षी अहवाल सादर करण्याची अपेक्षा होती. त्यानुसार त्यांनी 2012 आणि 2013 मध्ये एक अहवाल सभागृहात सादर केला होता. वास्तविक पाहता या संदर्भातील उदाहरण देण्याची गरजच नाही. कारण डॉ.केळकर यांचा अहवाल हा चुकीच्या बाबींवर आधारित आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

मराठवाड्यातील जालना, औरंगाबाद, हिंगोली इत्यादी 8 जिल्ह्यांच्या संदर्भातील स्थिती सांगितली आहे. जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा अहवाल आहे. पश्चिम महाराष्ट्रातील 2-3 जिल्ह्यांच्या संदर्भात देखील थोडे सांगितले पाहिजे. जून, 1982, सन 1994, सन 2012 मधील अनुशेष पाहिला तर आपल्याला बऱ्याच गोष्टी लक्षात येतील. पुणे विभागाचा अनुशेष 56 टक्के होता. सन 1982 ला सरासरीपेक्षा अधिक प्रमाणात सिंचन व्यवस्था केली जात होती. सन 1994 ला अनुशेष निर्देशांक समिती आली त्यावेळी तो अनुशेष वाढला आणि त्यामध्ये 510 हेक्टरची वाढ झाली. ती वाढ जवळपास हजार हेक्टरची होती. सन 2012 मध्ये 811 लाख हेक्टरची त्यामध्ये वाढ झाल्याचे चित्र आपल्यासमोर आहे.

सभापती महोदय, सातारा जिल्ह्यातील अनुशेष हा देखील सतत मोठ्या प्रमाणात होता. अनुशेषाची टक्केवारी अधिकची असताना प्रत्येक वेळी विकसित क्षेत्राकरिता पैसा दिला गेला आणि तेथे सिंचन व्यवस्था झाली. सातारा भागातीलच काही तालुक्यांना अधिक पैसा द्यावा अशी मागणी सातत्याने येणे स्वाभाविक आहे. ते अवर्षणप्रवण क्षेत्र आहे. सिंचनाची व्यवस्था नसलेले क्षेत्र आहे. तेथे पाऊस अत्यंत अल्प प्रमाणात पडत आहे. धरण बांधण्याकरिता कुठेही जागा नाही. माननीय राष्ट्रपतींनी या संदर्भात निर्देश दिले आहेत. माननीय राष्ट्रपतींनी सांगितले आहे की, आपण तेथे खर्च करीत असलेला पैसा अवर्षणप्रवण क्षेत्रात खर्च करा. सांगली जिल्ह्यातील माजी माननीय राज्यमंत्री श्री. पाटील साहेबांनी त्याकरिता केंद्र शासनाकडून अडीच हजार कोटी रुपये 3 प्रकल्पांकरिता आणले होते. टेंभू, म्हैसाळ या प्रकल्पांकरिता अडीच हजार कोटी रुपये आणले गेले. परंतु त्यांनी हेही सांगितले की, आपण अनुशेष भरून काढणार नसाल तर दिलेला पैसा आम्ही परत घेऊ. केंद्र शासनाने अशी भूमिका घेतली होती. केंद्र शासनाने स्पष्ट सांगितले होते की, पहिल्यांदा अनुशेष भरून काढावा, नंतर हा पैसा तुम्हाला केंद्र शासनाकडून मिळेल. सदर भागात किती टक्के सिंचन व्यवस्था होती, किती वाढली, किती पैसा मिळाला ही सर्व आकडेरवारी देण्याची गरज नाही. आपल्याला ही आकडेवारी सहज उपलब्ध होईल. आपण अवर्षण प्रवण तालुक्यांकरिता त्यामधील किती हिस्सा देत होता, तुमची त्याबाबत जबाबदारी आहे की नाही ? दुष्काळग्रस्त तालुक्यांच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. माणिकराव ठाकरे ....

नावाने सधन तालुके आपली सिंचन व्यवस्था वाढवित होते. अमुक जिल्ह्याला इतके पैसे मिळाले याचा उल्लेख डॉ. विजय केळकर यांनी आपल्या अहवालामध्ये केलेला नाही. अवर्षणप्रवण तालुक्याला पैसा द्यायचा नाही हे योग्य नाही. ज्या क्षेत्रात सिंचन व्यवस्था सरासरी कितीतरी पटीने जास्त आहे त्याच भागात पैशाचा वापर करायचा हे योग्य आहे का ?

सभापती महोदय, आपण कृष्णा खोरे आणले होते. परंतु कृष्णा खोऱ्यामध्ये किती प्रमाणात पैसा मिळाला ? साडे सात हजार कोटी रूपये खर्च झाले. अनुशेषाकरिता विदर्भासाठी 1200 कोटी रूपये व मराठवाड्यासाठी 1100 कोटी रूपयांचे रोखे काढून पैसे काढले होते. त्यावेळी कोण काय म्हणाले होते हे लक्षात घ्यायला पाहिजे. रोखे काढण्याकरिता अधिकार दिले होते. (अडथळा) लवादासंबंधी सांगायला लागलो तर मी सर्व सांगेन. परंतु मी आता त्यावर बोलणार नाही. तुम्ही ते करून निमित्त देण्याचा प्रयत्न केला असेल. इतर भागावर सातत्याने अन्याय झाला. लवादाने असे म्हटले नव्हते की, 17 टक्के व्याज दराने रोखे काढा. राज्यावर इतक्या हजार कोटी रूपयांचे कर्ज आहे या संदर्भात आपण आज देखील चर्चा करतो. आपल्याला त्याचे दीड हजार कोटी रूपये व्याज आजही द्यावे लागते. तुम्ही कृष्णा खोऱ्याकरिता 17 टक्के व्याज दराने रोखे काढले होते. शासनाला त्याचे व्याज आजही द्यावे लागत आहे. आपण हे पाहून घ्यावे. माननीय राज्यपालांनी संपूर्ण् अहवालाच्या संदर्भात जबाबदारी सोपविली. अधिकार कक्षा तसेच कोणत्या आधारे अहवाल सादर करावा ते स्पष्टपणे सूचित केले. परंतु त्या बाबीचा समितीला संपूर्ण विसर पडला आहे. समितीने कोणत्या तरी दबावाखाली असा अहवाल शासनाकडे सादर केला आहे. हा अहवाल राज्यातील अनुशेषित विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व उर्वरित महाराष्ट्र या सर्व भागावर अन्याय करणारा आहे. अनुशेष भरून काढण्याकरिता अत्यंत कुचकामी असा हा अहवाल आहे. हा अहवाल कचऱ्याच्या टोपलीत फेकून देण्यासारखा आहे. शासनाने हा अहवाल स्वीकारू नये अशी मी विनंती करतो. शासनाने विदर्भ, मराठवाडा येथील जनतेला न्याय द्यावा आणि डॉ. विजय केळकर यांना अहवालाच्या संदर्भात समज द्यावी अशी सूचना देखील मी करतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभागृहातील कामकाजाबाबत**

श्री. गिरीष बापट : सभापती महोदय, सभागृहाची वेळ संध्याकाळी 6 वाजता संपत आहे. आपल्याला 2 विधेयके मंजूर करावयाचे असल्याबाबत माननीय सभापतींच्या दालनात ठरले आहे. सभागृहाची इच्छा असेल तर 2 विधेयके मंजूर केल्यावर केळकर समितीच्या अहवालावर रात्री 8-9 वाजेपर्यंत चर्चा होऊ शकते. चर्चेत भाग घेणारे वक्ते जास्त आहेत. आपण काही चर्चा आज आणि काही चर्चा उद्या उरकू . मात्र उद्या आपल्याला ही चर्चा संपवायची आहे.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**मंत्रालयीन अधिकाऱ्यांच्या गॅलरीमध्ये एकही अधिकारी उपस्थित नसल्याबाबतचा पॉईंट ऑफ प्रोसिजर**

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. सभागृहात ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे चर्चा करीत होते. आता सदर चर्चेमध्ये सन्माननीय विरोधी पक्षनेते भाग घेणार आहेत. सभागृहात 2 माननीय राज्यमंत्री उपस्थित आहेत. शासनाचा प्रशासनावर बिलकूल अंकुश नाही. सभागृह कसे चालावे याचे काही नियम ठरले आहेत. नियोजन विभागाशी संबंधित विषय आहेत. परंतु गॅलरीमध्ये एकही मंत्रालयीन अधिकारी नाही. सभापती महोदय, ही पध्दत असते का ? नोंटिंग करण्यासाठी कोणीही उपस्थित नाही. प्रशासन माननीय मंत्र्यांना चालविणार आहेत का हा माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. अत्यंत गंभीर बाब आहे. मुख्य सचिव चर्चेच्या वेळी थांबले पाहिजे होते. केळकर समितीचा अहवाल ही काही साधी गोष्ट नाही. सन्माननीय सदस्य पोटतिडकीने बोलत आहेत. माननीय राज्यमंत्री, माननीय मंत्री सभागृहात हजर आहेत. मी त्याबद्दल त्यांचे कौतुक करतो.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** सभागृहाची वेळ सायंकाळी 6 वाजेपर्यंत होती. ती आता पुढील निदेश होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ही सभागृहाची पध्दत नाही. प्रशासनावर राज्य शासनाचा अंकुश राहिलेला नाही, प्रशासन राज्य शासनाला विचारीत नाही, हे चुकीचे आहे. आपण या संदर्भात संसदीय कामकाज मंत्री महोदयांना सांगितले पाहिजे की, ही पध्दत योग्य नाही. आम्ही या ठिकाणी घशाला कोरड लागेपर्यंत बोलायचे आणि अधिकाऱ्यांनी मात्र अे.सी.मध्ये बसायचे, ही कोणती पध्दत आहे ?

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आता सन्माननीय विरोधी पक्षनेते बोलणार आहेत. आपण संसदीय कार्य मंत्री महोदयांना अधिकाऱ्यांच्या संदर्भात सूचना दिल्या पाहिजेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात काय चर्चा होत आहे, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेले आहे. केळकर समितीच्या महत्त्वपूर्ण अहवालावरील चर्चेत सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे यांचे भाषण सुरु असताना नियोजन विभागाचे सचिव सभागृहात उपस्थित नाहीत, हा प्रशासनाकडून सभागृहाचा झालेला अपमान आहे.

सभापती महोदय, एका गंभीर विषयावर या ठिकाणी चर्चा सुरु आहे. केळकर समितीच्या कोणत्या शिफारशी स्विकाराव्यात व कोणत्या स्विकारु नयेत, याचा निर्णय या चर्चेच्या आधारे होणार असताना कोणीही अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित नाही. शासन चालविण्याची जबाबदारी केवळ मंत्र्यांची नाही. असे असेल तर संसदीय कार्य मंत्री महोदयांनी या ठिकाणी याबाबतची स्पष्टता करावी. ही जबाबदारी केवळ मंत्र्यांची आहे, कोणीही अधिकारी सभागृहात उपस्थित राहिले नाही तरी चालेल, असे त्यांनी सांगावे. असे असेल तर मग प्रत्येक कामकाजाच्या संदर्भात हे झाले पाहिजे. केळकर समितीच्या अहवालावर सभागृहात चर्चा पूर्ण होण्यापूर्वीच शासनाकडून काही दिशा ठरलेली आहे का ? ज्या अर्थी, अधिकारी गॅलरीत उपस्थित नाहीत, त्या अर्थी, ही दिशा अगोदरच ठरलेली आहे किंवा कसे, अशी शंका आमच्या मनामध्ये निर्माण झाली आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. परंतु, अधिकारी नाहीत. त्यामुळे आपण माननीय संसदीय कार्य मंत्र्यांमार्फत त्यांना समज दिली पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे. या मुद्याशी पक्षाचा किंवा राजकारणाचा संबंध नाही. हे खरे आहे की, अर्थसंकल्प, विभागवार चर्चा, प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना किंवा अन्य कामकाजाच्या वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सभागृहाच्या गॅलरीमध्ये उपस्थित असले पाहिजे. आता काही अधिकारी वरच्या गॅलरीत उपस्थित आहेत. ते वरिष्ठ अधिकारी आहेत की कनिष्ठ, हा भाग वेगळा. परंतु, मी आपल्या मताशी सहमत आहे. सन्माननीय गटनेते श्री.माणिकराव ठाकरे हे अतिशय पोटतिडीकीने बोलत होते. राज्याच्या दृष्टीने हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गॅलरीमध्ये उपस्थित असणे गरजेचे आहे. मी याबाबत मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करीन, आजच्या चर्चेला वरिष्ठ अधिकारी उपस्थित असावयास हवे होते, ते का नाहीत, याची विचारणा संबंधितांकडे केली जाईल आणि त्यांना योग्य ती समज देखील दिली जाईल.

सभापती महोदय, मी मघाशी म्हटल्याप्रमाणे कामकाज पत्रिकेमध्ये दोन विधेयके दाखविलेली आहेत. विधेयकाचे कामकाज झाल्यानंतर आपण ही चर्चा पुन्हा सुरु करु शकू.

**तालिका सभापती :** योग्य वेळी विधेयके घेण्यात येतील.

आता सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले भाषण सुरु करावे.

-----------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी. :** डॉ.विजय केळकर समितीचा अहवाल

**मु.शी.:** डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंबंधी सभापतींचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु...........)

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, डॉ.विजय केळकर समितीच्या अहवालासंबंधी आपण मांडलेल्या प्रस्तावावरील सुरु असलेल्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, केळकर समितीची स्थापना जणू काही विदर्भाचा अनुशेष काढण्यासाठी केली होती की काय, अशी शंका या अहवालाचे वाचन केल्यानंतर आमच्या मनात निर्माण झाली आहे. कारण, प्रत्येक ठिकाणी आपले मुद्दे मांडत असताना समितीने फक्त विदर्भाचाच उल्लेख केला आहे. "विदर्भात अमूक करण्यासाठी, अमूक एवढा निधी, विदर्भातील अमूक प्रकल्प पूर्ण करण्यासाठी योग्य तो निर्णय घेणे गरजेचे आहे, विदर्भातील अमूक करण्यासाठी अमूक निर्णय घेणे गरजेचे आहे", असे सर्व अहवालात आहे. औद्योगिकरण, रस्ते, जलसंपदा, शिक्षण किंवा अन्य विषयांच्या संदर्भात निष्कर्शाप्रत पोहोचत असताना समितीने मराठवाड्याचा उल्लेख केलेला नाही, उर्वरित महाराष्ट्राचा आणि उत्तर महाराष्ट्राचाही उल्लेख केलेला नाही. पण विदर्भाच्या संदर्भात मात्र अतिशय प्रकर्षाने जाणीव होणारा उल्लेख केळकर समितीच्या अहवालामध्ये केलेला आहे. कोकणचा तर प्रश्नच नाही. विदर्भ आणि कोकणामधील भौगोलिक अंतर खूप मोठे आहे. सन्माननीय नियोजन राज्यमंत्री श्री.दीपक केसरकर या ठिकाणी उपस्थित आहेत. परंतु, त्यांना कोकण आणि विदर्भातील अंतराची जाणीव अद्याप झालेली नाही.

सभापती महोदय, केळकर समिती कशासाठी स्थापन करण्यात आली होती ? या समितीच्या विचारार्थ "प्रादेशिक विकासातील असमतोल अंदाजित करण्यासाठी निर्देशांक निश्चित करणे," असा एक विषय होता. या नुसार समितीने केंद्रीय आणि राज्य निर्देशांकांचा अभ्यास करणे व त्यामधील अनुशेष काढणे गरजेचे होते.

सभापती महोदय, "प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात सन 2010 या वर्षाच्या अखेरीस अलीकडच्या उपलब्ध आकडेवारीच्या आधारे, राज्य विकास सरासरीच्या संदर्भात विकासातील

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित......

असमतोल निश्चित करणे, असे करताना, राज्य शासनाची थेट गुंतवणूक, खर्च आणि राज्य व केंद्र सरकारच्या मदतीने खाजगी औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक विचारात घेण्यात आलेली आहे," असेही त्यामध्ये नमूद केले आहे.

सभापती महोदय, या बाबीचा विचार करावयाचा झाल्यास गेल्या 10 वर्षात मराठवाड्यात ात किती गुंतवणूक झालेली आहे ? ज्या विभागात गुंतवणुकच झालेली नाही, त्या विभागाचा असमतोल आपण काय काढणार आहात ? आम्ही पिण्याच्या पाण्यासाठी भांडत आहोत. पिण्याच्या पाण्यापलीकडे बोलण्याचा आम्हाला अधिकार नाही. शेतीच्या पाण्याबद्दल आम्ही बोलायचेही नाही. उद्योगाच्या पाण्याचे तर सोडूनच द्या. वेगवेगळ्या कारणास्तव, या ना त्या कारणास्तव ही सर्व परिस्थिती पाण्यामुळे निर्माण झाली आहे. मी अनेक आयुधांचा उपयोग करून ही सर्व परिस्थिती यापूर्वी अनेक वेळा सभागृहात मांडली आहे.

सभापती महोदय, "सुनिश्चित निर्देशांकांतून ज्याची प्राथम्याने अंमलबजावणी करता येऊ शकेल असे निर्देशांक ठरविणे", असा तिसरा विषय या समितीला देण्यात आला होता. या अंतर्गत असमतोल दूर करण्यासाठी समितीने उपाययोजना सुचवावयाच्या आहेत. परंतु, मराठवाड्याबाबत उपाययोजना सुचविली असती तर आपण त्यावर जरूर चर्चा केली असती.

सभापती महोदय, "विकासविषयक निधीच्या नियतवाटपाची तत्त्वे सुचविणे", या विषयाकडे ुद्याकडे मी नंतर येणार आहे.

सभापती महोदय, "भविष्यात अनुशेष निर्माण होणार नाही म्हणून उपाय सुचविणे आणि याबाबतीत विकास मंडळाची भूमिका सूचित करणे", असाही एक विषय आहे. मराठवाड्याचा अनुशेष कैक पटीने वाढला आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

म्हणून समिती कामकाजाची पध्दती निश्चित करीन. समितीपुढे हे विषय विचारार्थ होते. मी आता केळकर समितीच्या शिफारशी व त्यावरील भाष्य....

<u>**सभागृहाच्या गॅलरीत अधिकारी उपस्थित नसल्याबाबत**</u>

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची चर्चा सभागृहात उपस्थित करण्यात आली आहे. सभागृहाच्या गॅलरीत एकही अधिकारी उपस्थित नाहीत.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य भाषण करीत असताना माननीय संसदीय कार्यमंत्री त्याची दखल घेत आहेत.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, अधिकाऱ्यांच्या गॅलरीत संबंधित विभागाचे सचिव नाहीत. हे लक्षात आणून दिल्यावर देखील सचिव उपस्थित राहत नाहीत, ही बाब अपमानजनक आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपण ऑनलेग आहात आता ही चर्चा आपण येथे थांबवू या.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी मराठवाड्यातील विषय मांडता असताना अधिकाऱ्यांच्या गॅलरीमध्ये जलसंपदा सचिव, बांधकाम विभागाचे सचिव अशा प्रकारे दोन तीन सचिव महोदय तरी उपस्थित राहणे आवश्यक आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलत असतात)

**तालिका सभापती** : आपण जे बोलत आहात त्याची नोंद संसदीय कार्यमंत्री महोदय घेत आहेत. आता एकाच सन्माननीय सदस्यांनी बोलावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा विषय सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे व मी उपस्थित केला होता. त्यानंतर संसदीय कार्य मंत्री महोदयांनी स्पष्ट केले की, ही बाब अतिशय गंभीर आहे, याबाबत आम्ही संबंधितांना समज देऊ. असे सांगितल्यानंतर देखील कोणताही प्रशासकीय अधिकारी या चर्चेच्यावेळी अधिकारी गॅलरीत उपस्थित नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. संसदीय कार्य मंत्री महोदयांनी दखल घेतल्यानंतर देखील कोणी उपस्थित राहत नाही.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्यानंतर संसदीय कार्य मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, या विषयाची गंभीर दखल घेतली आहे. यासंदर्भात मुख्यमंत्री महोदयांशी ते बोलणार आहेत, असे त्यांनी सभागृहात सांगितले आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर असा होता की, सभागृह कसे चालावे याबाबत नियम ठरले आहेत, विरोधी पक्ष नेते भाषण करीत असताना सचिव दर्जाचे अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित पाहिजेत. हा विषय किती महत्वाचा आहे. अधिकाऱ्यांबाबत सभापती महोदय आपण काहीच रुलिंग देणार नाहीत काय ? संसदीय मंत्री महोदयांचे मी समजू शकतो. आपण आम्हाला संरक्षण देणार नाहीत काय ?

**तालिका सभापती** : याबाबत संसंदीय कार्य मंत्री महोदयांनी दखल घेतली आहे. दखल घ्यावी असे मी परत त्यांना सांगत आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या सभागृहात केळकर समितीच्या अहवालावर चर्चा सुरु आहे. भविष्यात राज्याचे नियोजन करण्यासाठी सर्वात महत्वाचे हे डाक्युमेंट आहे. याबाबत सविस्तर चर्चा झाली पाहिजे. सन्माननीय सदस्यांचे अनेक छोटे मोठे प्रश्न आहेत. या बारीक सारिक प्रश्नांची नोंद व्हायला पाहिजे. इतर चर्चेच्या उत्तरासारखे केळकर समितीच्या अहवालावरील चर्चेचे उत्तर आम्हाला अपेक्षित नाही. यातील सर्व गोष्टींची दखल घेण्याची नितांत आवश्यकता आहे. असे असताना संसदीय कार्यमंत्री सांगतात की, याबाबत मुख्यमंत्री महोदयांशी चर्चा करण्यात येईल. अशा वेळी कोणी तरी अधिकारी गॅलरीत उपस्थित असायला पाहिजेत. असे सांगून देखील आपले काहीही बिघडत नाही, अशी प्रवृत्ती झाली असल्यामुळे येथे बसण्याचे काही काम नाही. मग आम्ही चर्चा कशासाठी करायची. .....(गोंधळ)....

**तालिका सभापती :** ही चर्चा मी येथे थांबविली आहे, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित ऑनलेग आहेत. याबाबत संसदीय कार्यमंत्री महोदयांनी दखल घेतली आहे. माननीय सभापतींच्या निर्देशानुसार दोन विधेयके चर्चेला घ्यावयाची आहेत. मी आपल्या भावना ऐकल्या आहेत. संसदीय कार्यमंत्री महोदयांनी सभागृहात आश्वासन दिले आहे. मी त्यांना निर्देश दिले आहेत. ते त्यांनी मान्य केले आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट यांनी सांगितले की, याबाबत मी दखल घेतो. दखल घेण्यासाठी हा विषय होऊन गेलेला नाही. आज या विषयावर महत्वाची चर्चा सुरु आहे. ही चर्चा चालू असताना आम्हाला असे अभिप्रेत आहे की, सभापती महोदयांनी हा ठराव सभागृहात उपस्थित केलेला आहे. वित्त व नियोजन विभागाचे अधिकारी गॅलरीत उपस्थित असायला पाहिजेत.

**तालिका सभापती** : आता ही चर्चा आपण थांबविली आहे, तुमच्या सूचनांची दखल घेऊन पुढील चर्चा सुरु होईल. अधिकारी उपस्थित नाही म्हणून चर्चा थांबविण्यात आलेली नाही. सभापती महोदयांनी दोन विधेयके घ्यावेत असे निर्देश दिल्यामुळे ही चर्चा थांबविण्यात आली आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आता आपण विधेयके चर्चेला घ्यावीत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, संसदीय कार्य मंत्री महोदयांनी सांगून देखील प्रशासन दखल घेत नसेल व या चर्चेच्या वेळी अधिकारी गॅलरीत उपस्थित राहत नसतील तर हे बरोबर नाही. हा संसदीय कार्य मंत्री महोदयांचा अपमान आहे, सभागृहाचा अवमाना आहे. आपला सर्वांचा हा अवमान आहे. या बाबीसाठी आम्ही सर्व सदस्य सभात्याग करतो.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

----

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : कर विषयक कायदे (कर बसविणे, सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक.

L.A.BILL NO. XVI OF 2015

( A BILL FURTHER TO AMEND CERTAIN TAX LAWS IN OPERATION IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.दीपक केसरकर (वित्त राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-16 महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-16 महाराष्ट्र राज्यात अंमलात असलेल्या विवक्षित करविषयक कायद्यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 14 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.दीपक केसरकर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 16 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 16 संमत झाले आहे.

----------

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : महानगरपालिका (सुधारणा) विधेयक.

**L.A. BILLNo.XVII OF 2015.**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL CORPORATIONS ACT.)

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 17- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 17- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**तालिका सभापती** : आता सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 17-महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकाच्या संदर्भात मला दोन सूचना करावयाच्या आहेत. "Ease of Doing Business" या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि उद्योजकांच्या मदतीसाठी शासनाने हे विधेयक मांडलेले आहे, याबाबतीत आमचे दुमत नाही. राज्यात औद्योगिकीकरण वाढावे, राज्यात मोठे उद्योग यावेत, अशी आमचीही अपेक्षा आहे. महानगरपालिकेच्या अधिकारितेतील एमआयडीसी क्षेत्रात एमआयडीसी कडून परवानगी मिळाली तर कलम 313 अन्वये महानगरपालिका आयुक्तांकडून परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही, असे या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये नमूद केलेले आहे. ही सुधारणा नक्कीच चांगली आहे. परंतु, या संदर्भात महानगरपालिकेचे कोणते अभिप्राय आहेत, याबाबत विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. महानगरपालिकेच्या नियमात एमआयडीसी संदर्भात काही तरतुदी असतील तर त्या कशा पद्धतीने पाहिल्या जातील याबाबत खुलासा होणे गरजेचे होते. तसेच, बांधकामाच्या संदर्भात असलेल्या तरतुदी उदाहरणार्थ ओपन स्पेस कोणी ठरवावयाचा आहे ? उद्या जर उद्योजकांना महानगरपालिकेची कोणतीही परवानी घ्यावी लागणार नसेल तर ओपन स्पेस संबंधी, त्या वास्तूची उंची किती असावयास पाहिजे यासंबंधी, अग्निशमन दलाच्या अटी संबंधी, लिफ्ट संदर्भातील ज्या अटी आहेत त्यासंबंधी, बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने महानगरपालिका जी तपासणी करते त्या सर्व गोष्टी किमान एमआयडीसी तपासणार आहे काय आणि तपासणार असेल तर याबाबत कायद्यात कोणतीही सुस्पष्टता दिसून आलेली नाही. म्हणून मंत्री महोदयांनी याबाबतीत खुलासा करावा, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने याबाबतीत नक्कीच एक चांगले पाऊल उचलले आहे. परंतु, "Ease of Doing Business" करीता केवळ बांधकाम परवानगीची अट काढून टाकल्याने उद्योजकांना पूर्ण अडथळे पार पाडता येतील असे नाही. शासनाने कितीही घोषणा केल्या तरी उद्योजकांना पर्यावरण, एमपीसीबी, कामगार विभाग, ऊर्जा विभाग व आणखी इतर ज्या काही परवानग्या घ्याव्या लागतात त्यासाठी अडचणी येणारच आहेत. म्हणून राज्य शासनाने या संदर्भात आपले धोरण जाहीर केले पाहिजे.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.......

सभापती महोदय, मी ज्या दोन-तीन सूचना केलेल्या आहेत त्याबाबत मंत्री महोदयांनी खुलासावा करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक 17-महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सुसूत्रता आणण्याच्या दृष्टीने, कामाची योग्य दिशा आणि कमीत कमी वेळेत सर्व परवानग्या मिळण्याच्या दृष्टीने शासनाने हे विधेयक मांडलेले आहे. आम्ही या विधेयकाचे स्वागतच करतो. परंतु, बदलत्या परिस्थितीत मागील 30-40 वर्षात काय झाले आणि पुढे काय होणार आहे, ही वेगळी संकल्पना आहे. आता एमआयडीसी जेव्हा नव्याने जागा घेईल तेव्हा ती जागा महानगरपालिका हद्दीच्या बाहेर असण्याची शक्यता अधिक आहे. पूर्वीच्या एमआयडीसी आता महानगरपालिका क्षेत्रात आलेल्या आहेत. त्यांच्या व्यवस्थापनाचे प्रश्न, एमआयडीसीची ॲथॉरिटी आणि कॉर्पोरेशनची ॲथॉरिटी त्यामुळे अनेक एमआयडीसीमध्ये आजचा अनुभव असा आहे की, महानगरपालिकेचे त्यावर काहीही नियंत्रण नाही. तेथील दिवाबत्ती, रस्ते, सांडपाण्याची गटारे या सर्व बाबतीत नवीन अडचणी निर्माण होत आहेत. उद्योजकांना सवलती देण्याच्या दृष्टीने आपण हे सर्व सोपे करण्याचा प्रयत्न करीत आहोत. मग उद्योजकांकडे असलेल्या जागेचा उद्योगासाठी वापर, इतर कामासाठी वापर आणि ज्यामध्ये कॉर्पोरेशन आणि एमआयडीसी या दोघांचाही समावेश असेल याबाबतची नियमावली केली तर आपल्याला यामध्ये अधिक सुसूत्रता आणता येईल, असे मला वाटते. पूर्वी काही एमआयडीसी एरियातून अशी मागणी करण्यात येत होती की, ज्या प्रमाणे कॉर्पोरेशन आहे त्या प्रमाणे एमआयडीसी एरियापुरता कॉर्पोरेशन एरिया वेगळा करावा आणि त्याचे संपूर्ण नियोजन, पाहणी किंवा देखभाल हा संपूर्ण भाग एमआयडीसीकडे द्यावा. ज्या ठिकाणी असा वाद आहे तो सोडविण्यासाठी या विधेयकाच्या माध्यमातून कशी मदत करता येईल या दृष्टीने पुढे जी नियमावली येणार आहे त्यामध्ये याचा अंतर्भाव असावा, अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

--------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे यांनी अशी सूचना केलेली आहे की, महानगरपालिकेचे जे नॉर्म्स आहेत, ज्या अटी व शर्ती आहेत त्यानुसार बांधकाम करावयास पाहिजे, एफएसआय वापरावयास पाहिजे, उंचीच्या संदर्भातील बंधने, फायरच्या संदर्भात देखील बंधने देखील आहेत. एमआयडीसी, कॉर्पोरेशन स्वायत्त आहे आणि यावर त्यांचे नियंत्रण असते. या विधेयकाच्या उद्देश व कारणांमध्ये स्पष्टपणे असे म्हटलेले आहे की, कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा कोणत्याही जागेमध्ये नव्याने स्थापन करता येणार नाही, एका जागेतून दुसऱ्या जागेत हलवता कामा नये, तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीसाठी बंद केल्यानंतर पुन्हा महानगरपालिकेकडे जावे लागते किंवा आयुक्तांकडून परवानगी घ्यावी लागते, त्यासाठी खेटे मारावे लागतात आणि यामध्ये बराच विलंब होतो. हा विलंब टाळता आला पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे आणि सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सोईसुविधांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, ज्या सोईसुविधा आहेत त्या महानगरपालिका निश्चितपणे तेथे देणारच आहे. बऱ्याच महानगरपालिकांच्या स्पेशल ॲथॉरिटी देखील आहेत. उदाहरणार्थ नागपूर येथे एनआयटी आहे आणि ते त्यांच्या नॉर्म्स प्रमाणे पाहणी करणारच आहेत. त्या संदर्भात कोणतेही कॉम्प्रमाईज न होता आपल्या ज्या सूचना यामध्ये घेता येतील त्या घेतल्या जातील. उद्योजकांना परवानगी घ्यावयाची नाही म्हणजे त्यांच्यावर एफएसआय, उंची संदर्भात, फायर संदर्भात कोणताही अंकुश नाही असे न होता त्यामध्ये आपल्या सूचना अंतर्भूत केल्या जातील.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री.भोगले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-17 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-17 संमत झाले आहे.

----------

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## पॉईंट ऑफ इन्फर्मेशनसंबंधी

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, आमदार महोदयांच्या स्वीय सहाय्यकांना मागील 3 ते 4 महिन्यांपासून वेतन मिळालेले नाही. त्यांना तातडीने वेतन मिळण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशी मी संसदीय कार्यमंत्र्यांना विनंती करतो.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, यापूर्वी आमदारांच्या स्वीय सहाय्यकांना ऑफ लाईन पध्दतीने वेतन दिले जात होते. नव्याने अस्तित्वात आलेल्या विधानसभेच्या टर्मपासून बीडीएस पध्दत लागू करण्यात आली आहे. या संदर्भात मी संबंधितांशी चर्चा केली असून पुढील काही दिवसात ऑनलाईन पध्दतीने वेतनाची रक्कम मागील फरकासह स्वीय सहाय्यकांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सभागृहाची बैठक आता स्थगित होणार आहे. संपलेले कामकाज पाहण्यासाठी जो अधिकारी वर्ग गॅलरीमध्ये उपस्थित आहे त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

------------

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. उद्या बुधवार, दिनांक 8 एप्रिल, 2015 रोजी सकाळी 11.00 ते दुपारी 12.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या विशेष बैठकीत 'कोकणातील आंबा पिकाचे नुकसान' या विषयावरील म.वि.प.नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 32 मिनिटांनी बुधवार, दिनांक 8 एप्रिल, 2015 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION